उदर चिकित्सा प्रकरण

अध्याय १५ वा

१ उदर व जलोदर यांचें संक्षिप्त वर्णन

उदररोगाच्या संप्राप्तीचा सारांश असा दिसून येतो कीं पहिल्यानें निरनिराळ्या कारणांनी दोष दूषित होतात. दोषांच्या दुष्टीमुळे जठराग्नि मंद होतो. अग्निमांद्यामुळे अन्नाचा जो रस तयार होतो तो आमयुक्त होतो. त्या आमयुक्त रसामुळे स्रोतसें चिकट होतात स्रोतसे चिकट झाल्यामुळे त्यांतून रस मोकळेपणानें वाहण्याचें कार्य चांगलें होत नाही. त्यामुळे रस स्वेद, जल, व मूत्र वाहणाऱ्या स्रोतसांचा अवरोध होतो, स्रोतसांचा अवरोध झाल्यामुळे त्या स्रोतसाच्या सूक्ष्म छिद्रांतून तो रस पाझरून आतडी व पोटावरील त्वचा यांच्या मध्यें असलेल्या पिशवींत साठूं लागतो. पहिल्यानें तो पदार्थ लाळेसारखा असून फार थोडा असतो. पुढेपुढे त्याचें प्रमाण पुष्कळ वाढते व कांही दिवसांनी तो द्रव फार फार पातळ पाण्यासारखा होतो. तेव्हां त्याला जलोदर म्हणतात. शरीराच्या इतर भागांतहि स्रोतसाचा अवरोध झाला म्हणजे तेथूनहि हा द्रव पाझरून त्वचेखाली जमतो, त्यामुळे तेथील जागेवर फुगोटी आलेली दिसून येते त्या फुगोटीला आपण सूज आली असे म्हणतो अपानवायूच्या क्षेत्रांतील स्रोतसांचा अवरोध झाल्यास मुख्यतः पायावर सूज येते व प्राणवायूच्या क्षेत्रांतील स्रोतसांचा अवरोध झाल्यास मुख्यत। तोंडावर सूज आलेली दिसते. अपानवायुच्या दुष्टीमुळे मूत्रपिंडांतील स्रोतसांचा अवरोध होतो तोही द्रव उदरांतील त्वचेखाली झिरपत असावा असें दिसते कारण जलोदरांत मूत्ररेचक चूर्ण व मूत्रकृच्छ्रांतक दररोज देत गेल्यास जलोदरांतील पाणी कमी कमी होत जाते असा अनुभव आहे.

२ जलोदरांत खालील भाग दूषित होतात

१ मंदेग्नौ
२ प्राणाग्नि अपानान् संदूष्य
३ मार्गान् रुध्वाऽधरोत्तरान्
४ त्वङ्मासान्तरमागत्य
५ कुक्षिमाध्मापयन् भृशम्
६ स्वेदांबु वाहीनि रुध्वां

७ कोष्ठात उपस्नेहवत् अन्नमारो निसृत्य

८ त्वचं समुन्नभ्य,

९ क्लोम्न्यवस्थितः स्रोतःसु रुद्धमार्गेषु कफश्चोदकं मूर्च्छितः वर्धयेतां तदेवाम्बु स्वस्थानादुदरायतौ

याचा अर्थ खालीलप्रमाणें दिसून येतो. औषधोपचाराच्या दृष्टीनें विचार केला तर अपान वायुचे दुष्टीमुळे—

१. मलाचा अवरोध.

२. मूत्राचा अवरोध.

३. स्त्रियांच्या विटाळाचा अवरोध.

४. दुषीत प्राणवायुमुळे पोटांत तयार झालेला अन्नरस, स्रोतोदुष्टीमुळे हृदयांत न जातां पोटावरील त्वचा व आंतील मांस याचेवर साचणें.

५. स्वेदवाही स्रोतसाचा व जलवाही स्रोतसाचा अवरोध होणें.

६. क्लोममध्यें असलेल्या स्रोतसांचा अवरोध होतो त्यामुळे तें पाणी कफाशीं मिसळून जलांश वाढतो व तोहि उदरांत साचतो.

यावरून असें दिसून येईल की मल, मूत्र, स्वेद, अन्नरस व क्लोममधील जलांश हे सर्व त्यांच्या त्यांच्या स्रोतसांचा अवरोध झाल्यामुळे तें आपापल्या वाहिन्यांत साठवून अडकून पडतें आणि त्या वाहिन्या अति ताठल्यामुळे यथा नवघटादि उपस्नेहः अणुतम स्रोताभिः बहिः स्रवत् तद्वत् तोय रसवाहिनि स्रोतांसि रुध्द्वा अंत्रात् सलील प्रकाशः स्रावः स्रवत् त्वचः समुन्नम्य समंतात विवर्धमानः उदर करोति तेल किंवा तूप घातलेल्या कोऱ्या मडक्यांतून त्यांत असलेल्या सूक्ष्म सूक्ष्म छिद्रांतून जसातो स्नेह झिरपतो त्याचप्रमाणें वर दिलेल्या सर्व भागांतील स्रोतसांचा अवरोध झाल्यामुळे तेथील रसस्वेद जल वाहिन्यांतील सलिल प्रकाश स्राव अंत्रांत स्रवतो आणि पोटाची त्वचा उंच होते व उदररोग उत्पन्न होतो.

आतापर्यंत दोषवृद्धीमुळे होणारा स्रोतसांचा अवरोध व त्यामुळे मल, मूत्र, स्वेद, रस यांचें मोकळे अभिसरण बंद होऊन जागच्या जागीं आपापल्या वाहिन्यांत साठल्यामुळे त्या वाहिन्यांतून सलिल प्रकाशयुक्त स्राव उदरांत झिरपतो. त्यामुळे पोट फुगून जलोदर रोग उत्पन्न होतो. हें सांगण्यांत आलें.

३ उदरांत करावयाची उपाययोजना

जलोदरांतील ह्या सर्व विकृति नाहीशा करण्याकरितां कोणते उपचार करणें जरूर आहे, याचा आपण आता विचार करूं.

१. ज्या दोषामुळे स्रोतसांचा अवरोध झाला आहे, ते दोष स्रोतसांत घट्ट चिकटून बसलेले असतात. ते त्या स्रोतसांत मृदु करून पातळ करणें जरूर आहे, मृदु होण्या-

करितां स्नेहन व मृदु झालेले दोष पातळ होण्याकरितां स्वेदन द्यावा. ह्या स्नेहन स्वेदनाच्या क्रिया पहिल्याने कराव्या.

२. पातळ झालेले दोष कोठ्यांत आणून बाहेर काढणें. ते तीन चार मार्गानें काढावे लागते.

१. आमाशयांतील दोष वांतीचें औषध देऊन बाहेर काढावे.

२. कोठ्यांत साचलेला मळ बाहेर काढण्याकरितां कांही दिवस दररोज जुलाब देणें. दहा दिवसानंतर आठवड्यांतून दोन वेळ.

३. अपान वायुचा अवरोध झाल्यामुळे त्या भागांतील स्रोतसांत साठलेलें मूत्र मूत्ररेचक चूर्ण देऊन बाहेर काढणें.

४. लघ्वीची झालेली रुकावट दूर करणाऱ्या मूत्रकृच्छ्रांतक आदि औषधींची योजना करणें.

५. स्रोतसांचा झालेला अवरोध काढून टाकण्याकरितां औषधीची योजना करणें.

६. मस्तकांतील दोष बाहेर काढण्याकरितां नस्य देऊन नाकावाटे ते दोष बाहेर काढावें.

४ मूत्रपिंड व यकृत यांचेवरील उपचाराचे महत्व

१. जलोदरांत मुख्यत: लघ्वी साफ होत राहणें, हें महत्वाचें आहे. जलोदरांत लघ्वी साफ होत नाही, मूत्रकृच्छ्र किंवा मूत्राघाता प्रमाणें थेंब थेंब किंवा राहून राहून होते. ती आडकाठी नाहीशीं करणें हें पहिलें काम आहे. रोग्याकडून ही विकृति पहिल्याने कळून येत नाही. परंतु मूत्रपिंडाची ही विकृति थोड्या फार प्रमाणांत असतेच.

२. दुसरें अन्नरस वाहून नेणारीं स्रोतसे व यकृतांतील स्रोतसे यांचा अवरोध होतो. त्यामुळे तो अन्नरस तेथींल निरनिराळ्या रसवाहिन्यांत साठून राहतो. हृदयाकडे तो अन्नरस जाऊं शकत नाही. याकरितां लिव्हरवरील उपचार करावेत. याने रसवाहिनी व यकृत यांतील अवरोध नाहीसा होईल.

३. त्या स्रोतसांतील दुष्टी नाहीशीं होण्याकरितां निवडुंगाचा चीक असलेले औषध जलोदरारी वापरावे.

४. मलावष्टंभ नाहीसा करण्याकरितां वारंवार जुलाब द्यावा.

५. जलोदरांत उदरांतील पाणी आम्हीं केव्हांहि काढलें नाही. मूत्ररेचकचूर्ण देऊन लघ्वीवाटेच तें पाणी निघत असावें, असें आम्हास वाटते.

५ जलोदरातील औषधीची योजना

१) जलोदरारी ४ गुं. स्रोतसाचा अवरोध नाहीसा करून मलप्रवृत्ति साफ करणें.
(निवडुंगाचा चीक हें महत्त्वाचें औषध आहे.)

२) मूत्रकृच्छ्रांतक ४ गुं. जलोदरांत बहुतेकांना लघ्वी साफ होत नाही. थेंब थेंब,

थोडी थोडी अशी होते, तो अवरोध नाहीसा करण्याकरितां हे औषध आहे.

३) आरोग्यवर्धिनी ६ गुं. स्रोतसाचा अवरोध नाहीसा करणें, स्रोतोरोधामुळे आलेली सूज नाहीशीं करणें व रसधातूचा मार्ग मोकळा करणें.

४) लोकनाथरस ४ गुं. यकृतांतील कार्य सुरळीत चालण्याकरितां अन्नरस तयार झाल्यानंतर तो हृदयांत यकृतमार्गानें जातो. त्या सर्व भागांतील अन्नवह स्रोतसांची दुष्टी नाहीशी करण्याकरितां, तसेंच यकृताचे सर्व विकारावर हे औषध फारच उत्तम आहे.

५) अग्निकुमाररस ४ गुं. अग्निमांद्याकरितां.

ह्या औषधाच्या ४–४ पुडया कराव्यात.

विशेष :–जलोदरारी पोट मुरडत असेल तर कांही दिवसांकरितां ते बंद ठेवावे. पुन्हां सुरूं करावें किंवा १ गुंजेची १ पुडीच वेगळी द्यावी.

अनुपान–पुनर्नवासव १ तोळा, महारास्नादि काढा ॥· तोळा व तितकेंच म्हणजे १॥· तोळा गरम पाणी घालून त्यांत वरील ४ पुडयापैकी १ पुडी घालून घेणें याप्रमाणें दिवसांतून ४ वेळ वरील पुडया घेणें.

विशेष – जलोदरांतील पाणी काढण्यांत येऊं नयें.

१) वरील औषधीशिवाय रात्रीं दररोज लध्वी साफ होण्याकरितां मूत्ररेचक चूर्ण द्यावे.

२) जलोदरांत इतर त्रास देणारीं लक्षणें असल्यास त्यावर दुसरीं स्वतंत्र औषधें द्यावीत.

मूत्ररेचक चूर्ण १ मासा पाण्याबरोबर रात्रीं निजतांना दररोज घेणें.

३) रात्रीं निजतांना रुईचीं पानें एरंडेल लावून, गरम करून पोटावर बांधावीं, व वरून घट्ट कपडयाने पोट बांधून ठेवावें. पोट उघडें ठेऊं नये.

४) इच्छाभेदी २ गुं. आठवडयांतून दोन वेळां देणें.

५) पाणी पिणें ८–१० दिवस बंद ठेवावें. शक्य झाल्यास पुढेंहि १० दिवस बंद ठेवावें. नंतर पाणी तापवून अर्धे ठेवून तें थंड करून फारच थोडें पिणें.

६) खाण्याकरितां फक्त दूध, चहा (दोन्ही मिळून सहा वेळा) मोसंबी डाळिंब ही फार क्वचित.

७) मीठ अजिबात बंद करणें कारण त्यानें सूज उत्पन्न होते.

८) प्रत्येक आठवडयांत यांत पोटाचा घेर मोजून मांडून ठेवीत जावा.

६ उदराची कारणें

अत्युष्ण लवणक्षारविदाह्यम्लगराशनात् ।
मिथ्या संसर्ज्जनाद् रूक्ष विरुद्धाशन भोजनात् ।।
प्लीहार्शोग्रहणीदोष कर्षणात् कर्मविभ्रमात् ।
क्लिष्टानामप्रतीकारात् रौक्षात् वेगविधारणात् ।।
स्रोतसां दुषणादाधामात् संक्षोभादतिपूरणात् ।
अर्शोबालिशकृद्दोषादंत्रस्फुटन भेदनात् ।।
अतिसंचित दोषाणां पापं कर्मच कुर्वताम् ।
उदराण्युपजायंते मंदाग्निनां विशेषतः ।।

अत्यंत गरम पदार्थ मीठ, क्षार, विदाहि, आंबट, विषयुक्त पदार्थ सेवन केल्यानें विरुद्ध आहार, प्लीहा, अर्श, ग्रहणी यांपैकी कोणताहि एकादा रोग झाल्यानें अशक्तपणाने पंचकर्मे योग्य रीतीनें न घेतल्याने शरिराला कोणताहि रोग झाल्यास त्यावर योग्य उपचार केलें नाही तर रुक्षतेमुळे, वेगावरोध केल्याने, स्रोतसे दूषित झाल्याने, आमदोषानें, मनस्ताप झाल्यानें दही आदि पदार्थ जास्त प्रमाणांत सेवन करण्यानें, अर्शरोग, अवष्टभंक पदार्थ सेवन केल्यानें आंतडी पुटल्यानें किंवा तुटल्याने दोष अति संचित झाल्यानें, पांपकर्मे केल्यानें व मंदाग्नि असलेल्यांना उदररोग होतो.

७ उदराचीं पूर्वरूपें

क्षुन्नाशः स्वाद्वतिस्निग्ध गुर्वन्नं पच्यते चिरात् ।
भुक्तं विदह्यते सर्वं जीर्णाजीर्णं न वेत्ति च ।।
सहते नाति सौहित्य मीषच्छोफश्च पादयोः ।
शश्वत् बलक्षयेऽल्पेऽपि व्यायामे श्वास मृच्छति ।।
वृद्धिः पुरीषनिचयो रूक्षोदावर्त हेतुका ।
बस्तिसंधौ रुगाध्मानं वर्धंते पाट्यतेऽपिच
आंतन्यते च जठरमपि लघ्वल्पभोजनात् ।
राजीजन्म वलीनाश इति लिंगं भविष्यताम् ।। ३७३ चं. कि.

भूक न लागणें, मधुर, अत्यंत स्निग्ध व भारी असें अन्न फारच उशिरा पचणें खाल्लेलें सर्व अन्न न पचणें, अपक्व स्थितीतच राहणें. अन्न पचते की पचलें नाही हें कळत नाही. तृप्ति वाटेपर्यंत जेवण केल्यास सहन होत नांही.

८ पूर्वरूपें

दोन्ही पायावर किंचित (थोडी) सूज येणें, निरंतर थोडी थोडी अशक्तता येते. त्यामुळे थोडा जरी व्यायाम झाला तरी श्वास भरून येते. उदरवृद्धि होणें. मल साचणें,

रूक्षता व पोटाचा फुगारा यामुळे बस्ती व संधीचें ठिकाणीं शूळ पोटाचा फुगारा जास्त वाढतो. पोट फाटल्याप्रमाणें वाटते. लघु व अल्प आहाराने देखील पोट ताणते, फुगते, पोटावर शिरा उमटतात व पोटावरील वळचा नाहीशा होतात. हीं लक्षणें उदर होण्यापूर्वीं होतात. हीं उदराचीं पूर्व रूपें जाणावी.

८ उदर संप्राप्ति

अग्निदोषान्मनुष्याणां रोगसंघाः पृथग्विधाः ।
मलवृद्धया प्रवर्तंते विशेषेणोदराणि तु ॥
मंदेग्नौ मलिनैर्भुक्तैरपाकाद्दोष संचयः ।
प्राणाग्न्यपानान् संदूश्य मार्गान् रुध्वाऽधरोत्तरान् ॥
त्वङ्मांसान्तरमागत्य कुक्षिमाध्मापयन् भृशम् ।
जनयत्युदरं तस्य हेतुं श्रुणु सलक्षणम् ॥ च. चि. ३७३

अग्निमांद्यामुळे मनुष्याच्या शरीरांत मल वाढून (संचित) अनेक प्रकारचे भिन्न भिन्न रोग विशेषकरून उदररोग उत्पन्न होतो. दुषित (घाणेरडे) पदार्थ नेहमी खाण्यांत आल्यानें व ते न पचल्यानें दोष संचित होतात व पचनशक्ति बिघडते त्यामुळे अग्निमांद्य उत्पन्न होते. ते प्राणवायु, जठराग्नि व अपानवायु या सर्वांना दूषित करून वरील व खालचे असें दोन्ही मार्गाचा अवरोध करून त्वचा व मांस याचे मधील पोकळींत शिरून दोन्ही कुशी बऱ्याच फुगून उदररोग उत्पन्न होतो. पोट व कुशीं यांत फुगारा उत्पन्न करून उदररोगाची उत्पत्ति करितात.

कोष्टादुपस्नेहवदन्नसारो निःसृत्य दुष्टाऽनिलवेगनुन्नः ।
त्वच; समुन्नम्य शनैः समन्ताद् विवर्धमानो जठरं करोति ॥ सु. वि. ७

कोठ्यांत तयार झालेला अन्नरस आंतडींतून शोषित झाल्यानंतर कुपीत वायुमुळे त्याचा मार्ग अवरुद्ध होऊन मधल्या पोकळींत तो साठल्या जाऊन उदराचा आकार मोठा होऊन उदररोग निर्माण होतो.

जलोदराची संप्राप्ती

स्नेहपीतस्य मंदाग्नेः क्षीणस्याति कृशस्य च ।
अत्यंबुपानान्नष्टेऽग्नौ मारुतः क्लोम्न्यवस्थितः ॥
श्रोतःसु रुद्धमार्गेषु कफश्चोदक मूर्च्छितः ।
वर्धयेतां तदेवाम्बु स्वस्थानादुदराय तौ ॥ च. चि. ३७९

क्षीण, अति कृष व मंदाग्नि असलेल्यांनी स्नेहपान करून पुष्कळ पाणी प्राशन केलें तर त्याचा अग्नि नष्ट होतो व क्लोममध्यें असलेल्या स्रोतसांचा मार्गावरोध होऊन तें जल कफाशीं मिश्रित होऊन त्यामुळे वाढलेला जलांश आपलें स्थानांतून निघून, उदरांत जाऊन उदरवृद्धि उत्पन्न करितो.

उदररोगाची संप्राप्ति

रुद्ध्वा स्वेदांबुवाहीनि दोषाः स्रोतांसि संचिताः ।

प्राणोग्न्यपानान् संदूष्य जनयंति उदरं नृणाम् ।।

संचित झालेले दोष स्वेदवाही व जलवाही स्रोतसांचा अवरोध उत्पन्न करून प्राणवायु, अपानवायु व जठराग्नि यांना विकृत करून उदररोग उत्पन्न करितात.

९ उदराचीं सामान्य लक्षणें

आध्मानं गमनेऽशक्ति दौर्बल्यं दुर्बलाग्निता ।

शोथः सदन मंगाना संगो वात पुरीषयोः ।।

दाहस्तंद्रा च सर्वेषु जठरेषु भवंति हि ।

सर्व प्रकारच्या उदरामध्यें आध्मान, चालणें, फिरणें, कष्ठाचे होतें. दुर्बलता, जठराग्नीची क्षीणता, सूज येणें, अंग शिथिल होणें, वायु व मलाचा अवरोध, दाह, तंद्रा हीं लक्षणें उदररोगांत होतात.

कुक्षेराध्मानमाटोपः शोफः पादकरस्य च ।

मंदोग्निः श्लक्ष्णगंडत्वं कार्श्यंचोदरलक्षणम् ।। च. चि. ३७४

पोट, बरगडचा यांत फुगारा, पोटांत गुडगुड आवाज होणें, हात व पाय या ठिकाणीं सूज येणें, अग्निमांद्य गाल व कपाळ याठिकाणीं चिकटपणा वाटणें व कृशता हीं उदररोगाचीं लक्षणें होत.

विशेष- यांत विशेषेकरून अग्निमांद्य, हातापायावर सूज, कृशता, आध्वान, आटोप, स्वेदांबुवाही स्रोतसांचा अवरोध झाल्यामुळे लघ्वी साफ न होणें, पोटाच्या वळचा नाहीशा होऊन काळसर निळसर शिरा उमटतात व बेंबी उलथून आल्यासारखी होते व उदरावरची त्वचा चमकदार आणि गुळगुळीत दिसते. हीं लक्षणें उदररोगांत होतात.

१० निर्जल उदराचें लक्षण

सर्व त्वतोय मरुणमशोफं नातिभारिकम् ।

गवाक्षितं शिराजालैः सदा गुडगुडायते ।। वी. र.

पाणी झालें नाही अशा सर्व उदररोगांत शरीराचा वर्ण तांबूस असतो. अंगावर सूज नसते. पोट फार जड आहे असें वाटत नाही. अंगावर सर्वत्र शिरांचीं जाळीं दिसू लागतात आणि पोटांत गुडगुड आवाज होतो.

११ जलोदर संप्राप्ति

यथा नवघटादि उपस्नेहः अणुतम स्रोतोभिः बहिः ।

स्रवत् तद्वत् तोयरसवहानो स्रोतांसि रुद्धा अंत्रात् ।

सलील प्रकाशः स्रावः स्रवेत् सु. नि. श्लो. २० त्वचः

समुन्नम्य समंतात् विवर्धमानः सु. नि. श्लोक ६ जठरं उदरं करोति

कोन्दा मडक्यांत घातलेलें तेल व तूप हीं जशीं त्यांत असलेल्या सूक्ष्म छिद्रांतून बाहेर झिरपतात. त्याचप्रमाणें उदरांतील स्रोतसांचा अवरोध झाल्यामुळे तेथील रस, स्वेद, जलवाहिन्यांतील सलिल प्रकाशस्राव अंत्रांत स्रवतो आणि पोटाची त्वचा वर येते व उदररोग उत्पन्न होतो.

१२ जलोदराचीं लक्षणें

गुरूदरं स्थिरं वृत्तमाहतंच न शब्दवत् ।
मृदुव्यपेत राजीकं नाभ्यां स्पृष्टं च सर्पति ॥
तदनूदक जन्मास्मिन्कुक्षि बृद्धिस्ततोऽधिकम् ।
सिरांतर्धानमुदक जठरोक्तं च लक्षणम् ॥ वा. भ.

जलोदरांत पोट ताठ, जड, वाटोळे व मऊ होते. बोटाने ठोकलें असतां वाजत नाही. त्याच्या वरच्या शिरा नाहीशा होतात. बेंबीवर दाबलें असतां सगळे पोट एकदम हलल्यासारखे भासते. नंतर त्यांत पाणी होऊन पूर्वीपेक्षा पोट मोठें होतें. शिरा दिसेनाशा होतात, जलोदरांत हीं लक्षणें होतात.

तोयपूर्ण दृति स्पर्श शब्दप्रक्षोभवेपथ ।
दकोदरं महास्निग्धं स्थिरमावृत्त नाभितत् । बा. भ.

जलोदरांत पोटाला स्पर्श केला असतां पाण्यानें भरलेल्या पखालीप्रमाणें दिसते व पाण्याचें हेलकावे हाताला लागते व त्याचा शब्दहि पखालींतील पाण्याप्रमाणेच येतो. पोट मोठे, गुळगुळीत, ताठ असते. बेंबीवर येऊन भोवताली गरगरीत, वाटोळी होते. हीं जलोदराचीं लक्षणें होत.

जलोदर लक्षण

अनन्नकाङ्क्षा पिपासा गुदस्रावः शूलः
श्वासकास दौर्बल्यानि. अपिचोदरं नानावर्णराजिसिरासन्तम् ।
उदक पूर्णं दृति क्षोभ संस्पर्शभवति एतदुदकोदरमितिविद्यात् ॥

अन्नावर इच्छा नसणें, तहान लागणें, गुदावाटें स्राव होत राहणें, उदरशूळ, श्वासकास, दुर्बलता, पोटावर नानावर्ण असलेल्या शिरा दिसणें, पाण्यानें भरलेल्या पखालीप्रमाणे दिसते. स्पर्श केला असतां पाण्याचें हेलकावे लागतात. ही लक्षणें असली म्हणजे त्याला जलोदर असें म्हणतात.

कुक्षेरतिमात्राभिवृद्धिः सिरान्तर्धानगमन ।
मुदकपूर्णदृतिसंक्षोभसंस्पर्शत्वंरच च. चि ३८२

दोन्ही बरगडचा फुगतात पोटावरील शिरा नाहीशा होतात. पाणी भरलेल्या पखालीप्रमाणें पोटांत पाणी भरते स्पर्श केला असता पाण्याचे हेलकावे हाताला लागतात. हीं जलोदराचीं लक्षणें आहेत.

१३ उदराचे उपद्रव

छर्द्यतीसार तमक श्वास, कास, हिक्कादौर्बल्यपार्श्वशूलारुचिस्वरभेद
मूत्रसंगाद्दय: तथा विषम चिकित्स्यं विद्यादिति　　च. चि. ३८२

वमन, अतिसार, तमक श्वास, तृष्णा, श्वास. कास, हिक्का, दुर्बलता, पार्श्वशूळ, अरुचि, स्वरभेद, मूत्रावरोध, आदि उदररोगांत उपद्रव होतात. ही सर्व लक्षणें एकत्र असल्यास रोगी असाध्य समजावा.

१४ जलोदर चिकित्साक्रम

अपां दोषहराण्यादौ प्रदद्यादुदकोदरे ।
मूत्रयुक्तानि तीक्ष्णानि विविधक्षारवन्तिच ॥
दीपनीयै: कफघ्नैश्च तमाहारैरुपाचरेत् ।
द्रव्येभ्यश्चोदकादिभ्यो नियच्छेदनु पूर्वश: ॥　　च. चि. ३३६

अगदी सुरुवातीस जलोदरांत जें संचित झालेलें जल असते तें जल निवारण करण्याकरितां जलनाशक मूत्रयुक्त व तीक्ष्ण क्षारयुक्त औषधें द्यावींत. दीपन व कफघ्न असा आहार द्यावा. पाणी पिणें बंद करावें किंवा पुष्कळ कमी करावें. (स्रोतसांचा अवरोध कमी करण्याकरितां पाण्यांत थोडी सुंठ, मिरे, वावडींग ही घालून उकळलेलें थंड केलेलें पाणी थोडें थोडें द्यावें.

१५ उदराचे प्रकार

पृथक् दोषै: समस्तैश्च प्लीहक्षबद्धदतोदकै: ।
संभवं त्युदराण्यष्टो तेषां लिंगं पृथक् श्रुणु ॥　　च. चि. ३७४

वातोदर, पित्तोदर, कफोदर, सन्निपातोदर, प्लीहोदर, बद्धोदर व दकोदर असें एकूण उदराचे आठ प्रकार आहेत.

१६ वातोदर लक्षण

तत्र वातोदरे शोफ: पाणिपान्नाभिकुक्षिषु ।
कुक्षिपार्श्वोदरकटीपृष्ठरुक्पर्व भेदनम् ॥
शुष्ककासोऽग मर्दोऽधो गुरुता मलसंग्रह: ।
श्यावारुणत्वगादित्व मकस्मातवृद्धिन्हासवत् ॥
सतोदभेदमुदरं तनुकृष्ण सिराततम् ।

आध्मातदृतिवच्छब्दमाहतं प्रकरोतिच ।
वायुश्चात्र सरेक्शब्दो विचरेत्सर्वतोगतिः ॥ यो. र. २०२

वातोदरामध्यें हात, पाय, बेंबी, कुशी यांना सूज, कुशी पार्श्वभाग, पोट, कमर व पाठ यांत वेदना हाडांचीं पेरें फुटल्यासारखी वाटणें, कोरडा खोकला, अंग मोडून येणें, शरीराचा खालचा भाग जड वाटणें, शौचास न होणें, त्वचा, डोळे, नखें, काळीं किंवा तांबडीं होणें. पोट एकाएकी लहान किंवा मोठें होणें, पोटांत टोचल्यासारखी किंवा फोडल्यासारखी पीडा होणें, पोटाची त्वचा पातळ व काळ्या शिरांनी व्याप्त असणें हीं लक्षणें होतात. पोट वाजविलें असतां वायूनें फुगलेल्या भात्याप्रमाणें आवाज होतो. आणि पोटामध्यें गुडगुड शब्द करीत वायु सर्वत्र फिरतो.

१७ पित्तोदर लक्षण

पित्तोदरे ज्वरो मूर्च्छा दाहस्तृट् कटुकास्यता ।
भ्रमोऽतिसारः पीतत्वं त्वगादावुदरं हरित् ॥
पीतताम्र सिरानद्धं सस्वेदं सोष्म दह्यते ।
धूमायते मृदुस्पर्शं क्षिप्रपाकं प्रदूयते ॥ यो. र. २०३

पित्तोदरांत ताप, मूर्च्छा, दाह, तहान, तोंडाला कडवटपणा, भ्रम, अतिसार, त्वचा, नखे यांना पिवळटपणा, पोटावर हिरवटपणा, पोट पिवळ्या व तांबुस शिरांनी व्यापणें, पोटाला घाम येणें, हाताला कढत लागणें, पोटाची आग होणें, त्यांतून धूर निघाल्यासारखे वाटणें, स्पर्श केला असतां मऊ लागणें हीं लक्षणें होतात. पोट दुखते व त्याचा लवकर पाक होतो, म्हणजे जलोदर होते.

१८ कफोदर लक्षण

श्लेष्मोदरेऽङ्गसदनं स्वापः श्वयथुगौरवम् ।
निद्रोत्क्लेशोऽरुचिः श्वासः कासः शुक्लत्वगादिता ॥
उदरं स्तिमितं स्निग्धं शुक्लराजीततं महत् ।
चिराभिवृद्धिकठिनं शीतस्पर्शं गुरु स्थिरम् ॥ यो. र. २०३

कफोदरांत अंग गळल्यासारखें, अंग बधीर होणें, सूज, जडत्व, अतिशय झोप, अरुचि, श्वास, खोकला, त्वचा, नखें, हीं पांढरीं होणें, पोट स्तब्ध होणें व तुळतुळीत दिसणें, पोटावर पांढऱ्या शिरा दिसणें, हीं लक्षणें होतात. या कफोदराची वाढ होण्याला फार दिवस लागतात. पोट कठीण होतें. तें गार लागते, जड व स्थिर असते.

१९ वातोदराची चिकित्सा

उपक्रमेद्भिषग्दोषबलकालविशेषवित् ।

स्थिरादिसर्पिषः पानं स्नेहं स्वेदं विरेचनम् ।।
वेष्टनं वाससा ग्लानौ शाल्वणेनोपनाहनम् ।
पेयां यूषरसान्नं च योज्यं वातोदरे क्रमात् ।।

दोष, बल व काल यांचा चांगला विचार करून वातोदराची चिकित्सा करावी. (सालवणादि घृत) प्राशन करणें, स्नेहन, स्वेदन, विरेचन, वस्त्रानें गुंडाळणें, ग्लानी आली असतां साल्वण स्वेद, पेया, यूष, मांसरस व अन्न यांची क्रमानें वातोदरांत योजना, करावी.

२० पित्तोदर चिकित्सा

पित्तोदरे च बलिनं पूर्वमेव विरेचयेत् ।
पयसा त्रिवृत्ताकल्केनो रूबूकशृतेन वा ।।
सातलात्रायमाणाभ्यां शृतेनाऽऽरग्वधेन च ।
घृतं पित्तोदरे पेयं मधुरौषध साधितम् ।।
स्थाल्बिवृत्तिश्रला सिद्धं सर्पिष्यानं विशुद्धयेत् योे. र. २११

पित्तोदराचा रोगी बलवान असल्यास, त्याला प्रथम विरेचन द्यावे. अथवा दूध, तेल व एरंडमूळ यांच्या कल्काने सिद्ध केलेलें घृत, शिकेकाईचें मूळ, त्रायमाण व बहाव्याची शेंग यांनी सिद्ध केलेलें घृत अथवा मधुर औषधांनी सिद्ध केलेलें घृत पित्तोदरामध्यें प्राशन करावें. कोष्ठशुद्धि होण्याकरितां तेड व त्रिफळा यांनी सिद्ध केलेलें तूप प्यावें.

२१ कफोदर चिकित्सा

श्लेष्मोदरिणं तु पिपल्यादिसिद्धेन सर्पिषा स्नेहं परमयित्वा ।
स्नुहीक्षोरानुलोम्य त्रिकटुक मूत्रतैल मुस्तादि क्वाथेना ।।
स्थापयेदनुवासयेच्च यवकिट्टसर्षपामलकबीजैश्चोपना हयेदुदरम ।
भोजयेच्चैनं त्रिकटुकप्रगाढेन कुलित्थ युषेण पयसा वा ।
स्वेदयेच्चाभीक्ष्णम् ।
व्योषयुक्तं कुलित्थाम्बु पयो वा भोजने हितम् ।
गोमुत्रारिष्टपानैश्च चूर्णायस्कृतिभिस्तथा ।
सक्षीरतैलपानैश्च शमयेत्तु कफोदरम् ।। यो. र. २११

कफोदराच्या रोग्याला पिप्पल्यादि गणांतील औषधांनी सिद्ध केलेल्या तुपानें स्नेहन करवून त्रिधारी निवडुंगाचा चीक, वातानुलोमक औषधें, सुंठ, मिरे, पिंपळी, गोमूत्र, तेल व मुस्तादिगणांतील औषधांच्या काढयानें आस्थापनबस्ती द्यावा. आणि जवखार, मोहऱ्या, आवळयाचें बी यांच्या पोटीसानें पोट शेकावें. या कफोदराचें

रोग्याला सुंठ, मिरे, पिप्पळीचें चूर्ण घालून तयार केलेल्या हुलग्याच्या कढणानें किंवा दूधानें जेवूं घालावें. पुष्कळ घाम काढावा. जेवणामध्यें सुंठ, मिरे, पिंपळी घातलेलें हुलग्याचे सार अथवा दूध जेवणामध्यें हितकर आहे. गोमूत्र व अरिष्ट हें प्यावयास देणें. चूर्णे व अयस्कृति देणें, दूध, तेल, पाणी एकत्र करून देणें. ह्या योगानें कफोदराचें शमन करावें.

२२ एरंडतेलादि योग

एरण्डतैलं दशमूलमिश्रं गोमूत्रयुक्तं त्रिफला रजो वा ।
निहन्ति वातोदरशोथशूलं क्वाथः समूत्रो दशमूलजश्च यो. र. २०९

दशमूळाच्या काढ्यांत एरंडेल किंवा त्रिफळ्याचें चूर्ण घालून गोमूत्रांत द्यावें अथवा दशमूळाचा काढा गोमूत्र घालून द्यावा. तो वातोदर, सूज व शूळ यांचा नाश करितो.

२३ दशमूलादि योग

दशमूलकषायेण क्षीरवृत्तिः शिलाजतु ।
सद्यो वातोदरी क्षीरमौष्ट्रमाजं च केवलम् ॥ यो. र. २०९

वातोदरी रोग्यानें दूधावर राहून दशमूळाच्या काढ्यांतून शिलाजीत घ्यावा. दूध केवळ उंटीणीचें किंवा शेळीचें घ्यावें.

२४ उदरावर सुश्रुतांतील योग

हरीतकीसहस्त्रं वा गोमूत्रेण पयोऽनुपः ।
सहस्रं पिप्पलीनां वा स्नुक्क्षीरेण सुभावितम् ॥
पिप्पलींवर्धमानां वा क्षीराशी वा शिलाजतु ।
तद्वद्वा गुग्गुलुं क्षीरं तुल्यार्द्रकरसं तथा ।
चित्रकामर दारुभ्यां कल्कं क्षीरेण वा पिबेत् ॥ यो. र. २२३

दूधावर राहुन हजार हिरडे गोमूत्राबरोबर खावें किंवा त्रिधारी निवडुंगाची भावना दिलेल्या पिंपळ्या हजार खाव्या. वर्धमान पिंपळी घ्यावी. किंवा दुधावर राहून शिलाजित घ्यावा. त्याचप्रमाणे गुग्गुळ, दूध व आल्याचा रस समभाग घालून घ्यावा किंवा चित्रकमूळ व देवदार यांचा कल्क दूधाशीं घ्यावा.

२५ क्षारद्वय चूर्ण

क्षारद्वयानलव्योषनीलवणलीपंचकम् ।
चूर्णितं सर्पिषा पेयं सर्वं गुल्मोदरापहम् ॥ यो. र.

जवखार, सज्जीखार, चित्रकमूळ, सुंठ, मिरे, पिंपळी, निळंबीचें बी व पंचलवणे यांचें चूर्ण करून तूपाशीं घ्यावें. तें सर्व गुल्माचा व उदरांचा नाश करिते.

२६ जलोदरावर योग

१) लोहपर्पटी १ गुंज, मृगशृंग ३ गुंज यांच्या तीन पुड्या दिवसांतून ३ वेळ घ्याव्यात.

अनुपान—तूप व मध. १॥ महिना हेंच औषध चालू ठेवावे.

२) मकरध्वज ३ गुंजा, आरोग्यवर्धिनी २ गुंजा, पुनर्नवादि १० गुंजा, चंद्रप्रभा ३ गुंजा यांच्या ३ पुड्या व कुटकीचूर्ण ५ तोळे व पाणी ४० तोळे यांच्या काढ्याबरोबर वरील पुड्या घ्याव्यात.

३) जलोदरारी, तिलक्षार, चंद्रप्रभा (मूत्रल), पुनर्नवामंडूर, पुनर्नवासव, पलाशपुष्प, लोहासव, रोहीतकारिष्ट, आ. वर्धिनी देवदार यापैकी ३ औषधें व त्यांतच हिरडा तीन मासे गोमूत्रांत उगाळून व त्यांतच आरोग्यवर्धिनी मिळवून द्यावी. दिवसांतून ३ वेळ.

४) पंचामृत लोहगुग्गुळ — पारा ४ तोळे, गंधक ४ तोळे, रौप्य ४ तो., अभ्रक ४ तोळे, माक्षिक ४ तोळे, लोह ८ तोळे, गुग्गुळ २८ तोळे. यांची पहिल्याने कज्जली करावी. नंतर गुग्गुळ कुटावा व त्यांत कज्जली घालावी. व इतर भस्में टाकावीत. व एक दिवस खल करावा. ४–४ गुंजेच्या गोळ्या कराव्यात.

२७ सर्व उदरावर सामान्य उपचार

उदराणां मलाढ्यत्वाब्दहुशः शोधनं हितम् ।
क्षीरेणैरण्डजं तैलं पिबेन्मूत्रेण वा सकृत् ॥
ज्योतिष्मत्याः पिबेत्तैलं पयसा वा दिने दिने ।
मूत्राण्यष्टावुदरिणां सेके पाने च योजयेत् ॥　　यो. र. २२१

उदरें हीं दोषयुक्त असल्यामुळें त्यांना बहुधा शोधन हितकारक आहे म्हणून दुधाबरोबर अगर गोमूत्राबरोबर वरचेवर एरंडेल प्यावें अथवा करडकांगोणीचें तेल रोजच्यारोज दूधांतून प्यावें. गोमूत्रादि आठ प्रकारचीं मूत्रें उदराच्या रोग्याला पिण्याकरितां व अंगावर शिंपडण्याकरितां योजावीत.

२८ उदरावर देवदार्व्यादि लेप

देवदारुपलाशार्क हस्ति पिप्पली शिग्रुकैः ।
साश्वगन्धैः सगोमूत्रैः प्रदिह्यां दुदरे शनैः ॥　　यो. र. २१२

देवदार, पळस, रुई, गजपिंपळी, शेवग्याची साल व अश्वगंधा ही गोमूत्रांत वाटून त्याचा उदरावर लेप करावा.

२९ उदररोग चिकित्सा

सर्वमेवोदरं प्रायो दोषं संघातजं यतः ।
अतो वातादिशमनी क्रिया सर्वत्र शस्यते ॥ भै. र. वली पा. ५३०

सर्व प्रकारचे उदररोग प्रायः त्रिदोषापासून उत्पन्न होतात. म्हणून त्यावर त्रिदोषनाशक चिकित्साच प्रशस्त आहे.

उदरे दोषसंपूर्णे कुक्षौमंदो यतोऽनलः ।
तस्मात् भोज्यानि योज्यामि दीपनानि लघुनिच ॥
रक्तशालीन् यवान मुग्दान् जांगलांश मृगद्विजान् ।
पयोमूत्रासवारिष्टे मधुशीधु च शीलयेत् ॥ भै. र. वली पा. ५३०

सबंध उदरांत दोषांचा प्रकोप असल्यामुळे पाचकाग्नि मंद झालेला असतो म्हणून पहिल्यानें अग्नीला प्रदीप्त करणारे व पचनाला हलके जें पदार्थ असतील ते पदार्थ उदररोग्यांना खाण्यास द्यावें. जसे रक्तशाली यव. सातु, मुगाचे पदार्थ जंगली पशुपक्षी यांचें मांस, गाईचें दूध, गोमूत्र, आसव अरिष्ट, मद्य, सीधु हे सर्व पदार्थ उदररोगांत हितकारक आहेत.

दोषाति मात्रोपचयात् स्रोतोमार्गनिरोधनात् ॥
संभवत्युदरं तस्मान्नित्यमेनं विरेचयेत् ।।
पाययेत्तैलमेरण्डं समूत्रं सपयोऽपिवा । भै. र. वली ५०

उदरांत दोष संचित झाले असल्यामुळे रसाला वहन करणारीं स्रोतसे यांचा अवरोध झाल्यामुळे अन्नरसाचें वहन चांगलें होत नाही. त्या अन्नरसाला रुकावट झाल्यामुळे तो रस उदरांत संचित होत राहतो. यामुळे उदररोग उत्पन्न होतो. म्हणून स्रोतसचा अवरोध नाहीसा करण्याकरितां एरंडेल हे गोमूत्रांतून किंवा गाईचें दुधांतून वारंवार पाजावें.

३० शोफोदर चिकित्सा

हरीतकी नागर देवदारु पुनर्नवा छिन्नरुहाकषायः ।
सगुग्गुलुर्मूत्रयुतश्च पेयः शोफोदराणां प्रवरः प्रयोगः ॥ यो. र. २२८

हिरडे, सुंठ. देवदार, वसु व गूळवेल यांचा काढा गुग्गुळ व गोमूत्रांत घालून प्यावा. हा प्रयोग शोफोदराच्या रोग्याला उत्तम आहे.

पुनर्नवानिम्बपटोल शुंठी तिक्ताभयादार्व्यमृताकषायः ।
सर्वांगशोफोदर कास शूल श्वासान्वितं पाण्डुगदं निहन्ति ॥ यो. र. २२८

वसुची मुळी, कडू निम्बाची साल, कडू पडवळ, सुंठ, कुटकी, वाळहिरडे, दारुहळद, गुळवेल यांचा काढा सर्वांगाची सूज, खोकला, शूळव श्वास ह्याहि पांण्डुरोगाचाहि नाश करतो.

पुनर्नवादार्व्य भयागुडूचीः पिबेत्समूत्रा महिषाक्षयुक्ताः ।
त्वग्दोष शोफोदर पाण्डुरोग स्थौल्य प्रसकोर्ध्वकफामयेषु ।। यो. र. २२८

वसुची मुळी, दारुहळद, गुळवेल याचा काढा, गोमूत्र व गुग्गुळ घालून त्वचेचे रोग, शोफोदर पांडुरोग, स्थूलपणा, मळमळणें, मानेवरील कफरोग ह्याजवर द्यावा.

गोमूत्रयुक्तं महिषीपयो वा क्षीरं गवां वा त्रिफलाविमिश्रम् ।
क्षीरान्नभुक्के वलमेव गव्यं मूत्रं पिबेद्वा श्वयथूदरेषु ।। यो. र. २२९

शोफोदरावर गोमूत्र घालून म्हशीचें दूध प्यावें. अथवा गाईचें दूध त्रिफळाच्या काढ्यांतून प्यावे. अथवा दूधभात खावून नुसते गोमूत्र प्यावें.

सप्ताहं माहिषं मूत्रं पयसा चाम्बुवर्जितम् ।
पिबेदौष्ट्रं पयो मासं श्वयथूदरनाशनम् ।। यो र. २२९

पाणी न पितां दूधावर राहून शोफोदरावर सात दिवसपर्यंत म्हशीचें मूत्र प्यावें. किंवा एक महिनाभर उंटिणीचें दूध प्यावें. तें शोफोदराचा नाश करिते.

३१ प्लीहोदर व यकृतोदर लक्षण

विदाह्यभिष्यन्दिरतस्य जन्तोः प्रदुष्टमत्यर्थमसृक्कफश्च ।।
प्लीहाभिवृद्धिं कुरुतः प्रवृद्धौ प्लीहोत्थमेतज्जठरं वदन्ति ।
तद्वामपार्श्वे परिवृद्धिमेति विशेषतः सीदति चाऽऽतुरोऽत्र ।।
मंदज्वराग्निः कफपित्तलिंगैरुपद्रुतः क्षीणबलोऽतिपाण्डुः । यो. र. २०४

विदाही अभिष्यंदी असे पदार्थ नेहमी खाणाऱ्या मनुष्याचें रक्त व कफदोष कुपीत होऊन वाढलें असतां ते पोटांतील डाव्या बाजूची प्लीहा (पांथरी) वाढवितात. त्याला प्लीहोदर असें म्हणतात. तें डाव्या बाजूस वाढते. ह्या उदरांत विशेषतः रोगी म्लान होतो. ह्यामध्यें बारीक ज्वर व अग्निमांद्य असते. आणि कफजन्य, पित्तजन्य उदराचीं लक्षणें होतात. रोगी अशक्त व पांढरा फटफटीत होतो.

३२ पांथरी व यकृत यांची चिकित्सा

स्नेहस्वेदविकारादि विधेयं प्लीहरोगिणाम् ।
वामबाहौ च मोक्तव्या कर्पूराभ्यन्तरे शिरा ।।
विध्येत्प्लीहविनाशाय यकृन्नाशाय दक्षिणे ।
मणिबन्धे समुत्पन्नवामांगुष्ठसमीरिताम् ।
दहेच्छिरां शरेणाशु वैद्यः प्लीहप्रशान्तये ।। यो. र. २१२

पानथरीच्या रोग्याला अनेकप्रकारचे स्नेहन, स्वेदनादि प्रयोग करावेंत. डाव्या बाहूच्या ठिकाणीं असणाऱ्या शिरेचा-किंवा कोपरामध्यें असणाऱ्या शिरेचा वेध करावा.

यकृन्नाशार्थ उजव्या बाजुची त्या त्या ठिकाणची शीर छेदावी, डाव्या अंगठचाची मनगटाचे ठिकाणीं असणारी शीर तोडावी.

३३ उदर साध्यासाध्यता

वातात्, पित्तात् कफात् प्लीन्हः सन्निपातात् तथोदकात् ।
परं परं कृच्छ्‌ तममुदरं भिषगादिशेत् ।
पक्षाद् बद्धगुदन्तूदुर्ध्वं सर्वंजातोदकं तथा ।।
प्रायोभवत्यभावायं छिद्रांत्रं चोदरं नृणाम् ।। च. चि. ३८२

खालीलप्रमाणें उदररोग एकापेक्षा एक कष्टसाध्य आहे. वातोदरापेक्षा पित्तोदर, पित्तोदरापेक्षा कफोदर, कफोदरापेक्षा प्लीहोदर, प्लीहोदरापेक्षा सन्निपातोदर व त्याहिपेक्षा जलोदर हें कष्टसाध्य आहेत. बद्धगुदोदर, जलोदर, छिद्रोदर हे तर सर्वच असाध्य आहेत.

शूनाक्षं कुटिलोपस्थ मुपविलन्न तनुत्वचम् ।
बलशोणित मांसाग्नि परिक्षीणंच वर्जयेत् ।।
श्वयथुः सर्वमर्मोत्थः श्वासो हिक्कारुचिस्तथा ।
मूर्च्छा छर्दिरतिसारो निहंत्युदरिणं नरम् ।। च. चि. ३८२

डोळचाला सूज येणें, इंद्रियाला, अंडकोशाला सूज येणें, बल, रक्त, मांस क्षीण होणें, अग्नि मंद होणें, असा उदररोगी असाध्य समजावा. तसेंच सर्व मर्मस्थानाला सूज, श्वास, हिक्का, मूर्च्छा, वांति होणें, अतिसार असलेले उदररोगी हे सर्वच असाध्य होत.

३४ शंखनाभि चूर्ण

सुपक्वजंबीरसेन शंखनाभीरजः पीतमवश्यमेव ।
कर्षप्रमाणं शमयेदवश्यं प्लीहामयं कूर्मसमानमाशु ।। यो. र. २१३

चांगल्या पिकलेल्या लिंबाच्या रसामध्यें एक तोळाभर शंखभस्म टाकून प्यावें. तें कासवाच्या पाठीसारख्या जाड पांथरीचा त्वरित नाश करितें.

३५ मूत्ररेचक चूर्ण

गोखरू, सागाचें बी, शिलाजीत, विलायची, पाषाणभेद, बाहाव्याचें शेंगांतील मगज, काकडीचें बी, पुनर्नवा, वाळकाचें बी, दारुहळद, जिरें, रेवाचिनी, कंकोळ, सोरा, नौसागर, जवखार हे सर्व समभाग घेऊन वस्त्रगाळ चूर्ण करून दोन मासे ऊन पाण्याबरोबर घ्यावें. म्हणजें लघ्वी साफ होऊन मूत्रपिंडाची सूज कमी होते. त्यामुळे उदर रोग्याला बराच फायदा होतो.

३६ हृदुष्यादि चूर्ण

हपुषां कांचनक्षीरीं त्रिफलां कटुरोहिणी म्।
नीलिनीं त्रायमाणाञ्च शातलां त्रिवृत्तां वचाम् ।
सैंध वंकालल्वणं पिप्पलीम् चेति चूर्णयेत् ।
दाडिम त्रिफलामांसरसमूत्र सुखोदकैः ।।
पथ्योऽयं सर्वगुल्मेषु प्लीन्हि सर्वोदरेषु च ।
श्वित्रे कुष्ठे सरुजके सवाते विषमाग्निषु ।
शोथार्शः पांडुरोगेषु कामलायां हलीमके ।
वातपित्त कफांश्चाशु विरेकात् संप्रसाधयेत् ।। च. चि. ३९०

शेरणी, सत्यानाशी, हिरडे, बेहाडे, आवळकंठी, कुटकी, नीली, त्रायमाण, शातला (सेंदुडभेद) निशोत्तर, वेखंड. सैंधव, काळे मीठ, पिंपळी या सर्वांचें चूर्ण करावें. डाळींब दाण्याचा रस, त्रिफला क्वाथ, मांसरस, गोमूत्र अथवा गरम पाणी यापैकी कोणत्याहि एका पेयाबरोबर पोटांत घ्यावें.

यानें गुल्म, सर्व प्रकारचे उदर, यकृत, प्लीहा, श्वेतकुष्ठ, शूळ, वातव्याधि, मंदाग्नीची विषमता, सूज, अर्श, पांडुरोग, कावीळ, हलीमक या सर्व रोगांत तें योग्य प्रमाणांत दिल्यास तसेंच वात, पित्त, कफ या सर्वांत फार लवकर फायदा होतो.

३७ नीलिन्यादि चूर्ण

नीलिनीं निचुतं व्योषं द्वौ क्षारौलवणानि च ।
चित्रकं च पिबेत् चूर्ण सर्पिषोदर गुल्मनुत् ।। च. चि. ३९०

नीली, समुद्रफल, सुंठ, मिरे, पिंपळी, सज्जिखार, जवखार, सैंधव, समुद्रमीठ, बिडलोण व चित्रक, यांचें चूर्ण उदर व गुल्मविकाराचा नाश करितें.

३८ वज्रक्षार

सौवर्चलं यवक्षारं सामुद्रं कांचसैंधवम् ।
टंकणं सर्जिकाक्षारं तुल्यमेकत्र चूर्णयेत् ।।
अर्कदुग्धैः स्नुहीदुग्धै र्भावयेदातपे त्र्यहम् ।
ऊर्ध्वाधस्थैः क्रमात्तस्य तत्तुल्यैरर्क पल्लवैः ।।
भाण्डे संस्थाप्य मृल्लिप्ते रुध्द्वा गजपुटे पचेत् ।
स्वांगशीतं तु संचूर्ण्य चूर्णमेषां तु मेलयेत् ।।
त्र्यूषणं च विडंगं च राजिकां त्रिफलामपि ।
चव्यं च हिंगुसंभृष्टं तर्केणाद्याद्यथाबलम् ।।
वज्रक्षाराभिधं चूर्णमुदराणि विनाशयेत् ।

शोथं गुल्मं तथाऽष्ठीलां मंदाग्नि मरुचिं तथा ।
प्लीहानं यकृद्वाल्याख्य मुदरं च विशेषतः ।। यो. र. २१५

पादेलोण, जवखार, मीठ, बांगडखार, सेंधेलोण, टांकणखार व सज्जीखार हे समभाग घेऊन त्याला रूईचा चीक, त्रिधारी निवडुंगाचा चीक यांच्या ऊन्हामध्यें ३-३ भावना द्याव्यात. नंतर तें चूर्ण एका मडक्यांत थोडें पसरून, वर रूईचें पान घालून त्यावर पुन्हा चूर्ण पसरावें. याप्रमाणें थरावर थर देऊन त्या गाडग्यास मातीनें संधिलेप करावा व गजपूट द्यावें. स्वांगशीत झाल्यावर काढून त्याचें चूर्ण करावें नंतर सुंठ, मिरे, पिंपळी, वावडींग, मोहऱ्या, हिरडा, बेहेडा, आवळकाठी, चवक व हिंग यांचें चूर्ण समभाग मिळवून ठेवावें आणि शक्तिमानाप्रमाणें ताकांतून घ्यावें. हें वज्रक्षार नांवाचें चूर्ण उदरांचा नाश करिते. तसेंच सूज, गुल्म, अष्ठीला, अग्निमांद्य, अरुचि, पांथरी आणि विशेषः यकृत यांचा नाश करिते.

३९ अग्निमुख लवण

चित्रकत्रिवृत्तादन्तीत्रिफलारुचकैः समैः ।
यावन्त्येतानि चूर्णानि तावन्मात्रं तु सैंधवम् ।।
भावयित्वा स्नुहीक्षीरैः स्नुक्काण्डे प्रक्षिपेत्ततः ।
मृत्पंकेनानुलिप्याथ प्रक्षिपेज्जातवेदसि ।।
सुदग्धं च ततो ज्ञात्वा शनैर्वैद्यः समुद्धरेत् ।
तक्रेण पीतं तच्चूर्णं यकृत्प्लीहोदरापहम् ।।
एतदग्निमुखं नाम्ना लवणं वन्हिवर्धनम् ।।

यो. र. २१७

चित्रकमूळ, तेड, दांतीमूळ, हिरडा, बेहेडा, आवळकंठी व पादेलोण हीं औषधें समभाग आणि सर्वांच्याबरोबर सेंधेलोण यांच्या चूर्णाला त्रिधारी निवडुंगाच्या भावना देऊन तें त्रिधारी निवडुंगाच्या कांडांत भरून, त्यावर मातीचा लेप करून विस्तवांत टाकावें. आणि चांगलें भाजलें म्हणजे त्यांतील चूर्ण हळुच काढून घ्यावें. हें चूर्ण ताकाशीं घ्यावें. हें यकृत, पांथरी व उदर यांचा नाश करिते. हें अग्निमुख नांवाचें लवण अग्निवर्धक आहे.

४० शिलाजित्वादि योग

शिलाजतूनां मूत्राणां गुग्गुलोस्त्रैफलस्य च ।
स्नुही क्षीर प्रयोगश्च शमयत्युदरामयम् ।। भै. र. ५३५

शुद्ध शिलाजित, गोमूत्र, शुद्ध गुग्गुळ, त्रिफळाचूर्ण आणि निवडुंगदूध, ह्या पांच द्रव्यापैकी कोणत्याहि एका द्रव्याचा निरंतर यथाविधि उपयोग (सेवन) केल्यास उदररोग नष्ट होतो.

४१ इच्छाभेदी रस

शुद्ध सूतस्य भागैकं गंधकान्माषक त्रयम् ।
बिभीतकस्य माषैकं धात्र्याश्चैव तु माषकम् ॥
माषद्वयश्च पिप्पल्याः शुण्ठीनां माषक त्रयम् ।
जैपालबीज मज्जाया गुडकं विंशति तथा ॥
अम्ल लोणी रसैः पिष्ट्वा वटिकां कारयेद् बुधः ।
कलाय परिमाणां तुं भक्षयेद्रेचतार्थकम् ।
अम्ल लोणीरसः सार्द्धं तोयमुष्णं पिबेद्दनु ॥
तावद्वि रिच्यते वेगाद् यावच्छीतं न सेव्यते ।　　　भै. र. ५३५

शुद्ध पारद १ मासा, शुद्ध गंधक ३ मासे, बेहडा, आवळाचूर्ण १–१ मासा, पिप्पलीचूर्ण २ मासे, शुण्ठीचूर्ण ३ मासे, शुद्ध जेपाळबीजचूर्ण २० मासे घेऊन प्रथम पारा आणि गंधक यांची कज्जली करून नंतर इतर द्रव्यांचें चूर्ण एकत्रात करून आंबटचुक्यांच्या स्वरसासह खल करून वाटाण्याएवढ्या [अंदाजे २ गुंजा] गोळ्या तयार कराव्यात. त्या सुकल्यानंतर शीशीमध्यें भरून ठेवाव्यात त्यांतील एक एक गोळी आंबटचुक्याच्या रसासह सेवन करावी किंवा उष्णोदकासह घ्यावी. जोपर्यंत थंड पाणी पिण्यांत येणार नाही तोपर्यंत रेच चालू राहतील.

४२ भेदनी वटी

त्रिकण्टकस्नुक पयसा पिप्पल्या वटिका कृता ॥
भेदनीयं सिद्धमता महागद निषूदनी ॥　　　भै. र. ५३५

गोक्षूर चूर्ण, निवडुंग दूध, तसेंच पिप्पलीचूर्ण १–१ तोळा घेऊन त्या चूर्णांना वस्त्रगाळ चूर्ण करून निवडुंगाचें दुधाची एक–एक भावना देऊन १–१ गुंज प्रमाणाच्या गोळ्या करून सुकवाव्या. महाभयंकर रोगांचा विनाश करणारी ही वध आहे.

४३ नाराच रस

सूतं टंकण तुल्यांशं मरिचं सूततुल्यकम् ।
गन्धकं पिप्पली शुण्ठी द्वौ द्वौ भागौ विचूर्णयेत् ॥
सर्व तुल्यं क्षिपेद्दन्ती बीजं निस्तुष मेव च ।
द्वि गुन्जा रेचने सिद्धा नाराचोऽयं महारसः ॥
गुल्म प्लिहोदरं हन्ति पिबेत् उष्णेन वारिणा ।　　　भै. र. ५३५

शुद्ध पारा, शुद्ध सुहागा (टंकण) मिरे, चूर्ण १–१ तोळा, शुद्ध गंधक, पिप्पली चूर्ण, शुण्ठीचूर्ण २–२ तोळे आणि सर्वांचें समान (९ तोळे) शुद्ध जयपाळचूर्ण घेऊन प्रथम पारा आणि गंधक यांची कज्जली करावी. शेष द्रव्यांचीं चूर्णे त्यांत मिसळून

त्यांचा उत्तम खल करावा. ह्याच्या दोन गुंज प्रमाणानें सहदाबरोबर किंवा उष्णोदकासह सेवन केल्यास रेच होतात. हा नाराचरस गुल्म, प्लीहावृद्धि तसेंच सर्व उदररोगांवर उत्तम आहे.

४४ जलोदरारी रस

पिप्पली मरिचं ताम्रं रजनी चूर्ण संयुतम् ।
स्नुहीक्षीरैर्दिनं मर्द्यं तुल्यं जैपालबीजकम ।।
निष्कं खादेद् विरेकः स्यात सद्योहन्तिजलोदरम् ।
रेचनार्थञ्च सर्वेषां दध्यम्लं स्तंम्भने हितम् ।।
दिनान्ते च प्रदातव्यमन्नं वा मुद्गयूषकम् । भै. र. ५३६

पिप्पली, मिरें, ताम्रभस्म, हळदीचुर्ण हीं प्रत्येकी १–१ तोळा. तसेंच शुद्ध जेपाळचूर्ण ४ तोळे घेऊन ह्या सर्वांचा निवडुंगाच्या दुग्धामध्यें खल करावा. नंतर २–२ गुंज प्रमाणाच्या गोळ्या तयार करून सुकवाव्यात. ह्या रसाची १–१ गोळी सेवनानें उत्तम रेच होऊन जलोदर नाहीसा होतो. रेच अधिक झाल्यास आम्ल दही सेवन केल्यास रेच बंद होतात. त्या दिवशीं संध्याकाळीं हलकें अन्न किंवा मुगाचें यूष सेवन करावें.

४५ उंदरारी रस

पारदं शिखितुत्थञ्च जैपालं पिप्पली समम् ।
आरग्वध फलान्मज्जा वज्रीक्षीरेण मर्दयेत् ।।
माष मात्रां वटीं खादेत् स्त्रीणां जलोदरं जयेत् ।
चिञ्चाफलरसञ्चानु पथ्यं दध्योदनं हितम् ।
दकोदरहरञ्चैन तीव्रेण रेचनेनच ।। भै. र. ५३

रससिंदूर, शुद्ध तुत्थ चूर्ण, शुद्ध जेपाळ, पिप्पली, बहावा शेंगेचा गीर हीं प्रत्येकी १–१ तोळा घेऊन, सर्वांचा एकत्र खल करून त्याला निवडुंगाच्या रसाची भावना देऊन, खल करून त्याच्या १-१ मासा प्रमाणाच्या गोळ्या करून त्या सुकवाव्यात. ह्या रसाची १-१ गोळी दररोज सेवन केल्यास स्त्रियांचा जलोदर अवश्य नष्ट होतो. ह्याचें सेवनानंतर कांही वेळानंतर चिंचेचा गर अगर पाल्याचा रस २ तोळे घ्यावा. क्षुधा लागल्यास दहीभात खावा. ह्याचें सेवनाने रेच होऊन जलोदर नाहीसा होतो.

४६ पिप्पल्यादि लोह

पिप्पली मूल चित्राभ्र त्र्येन्दु सैंधवम् ।
सर्वचूर्णं समं लोहं हन्ति सर्वोदरामयम् ।। भै. र. ५३९

पिप्पलीमूळ, चित्रक, अभ्रकभस्म, त्रिकटु, त्रिफला, त्रिजात, कर्पूर, सैंधवमीठ, हीं सर्व समभाग घेऊन चूर्ण करावें. ह्या सर्वांएवढेंच लोहभस्म एकत्रित करून ठेवावे. हा पिप्पल्यादि लोह सर्व उदर रोगांचा नाश करतो.

४७ उदरघ्न रस

जीमूतलोहरसगंध शिलालताम्र ।
व्योषाग्निकुष्ठमुसलीविषदीप्य चूर्णम् ।।
निंबुकनीर लुलितं गुटकीकृतं तत् ।
भूक्तं निशासु मधुना सकलोदरघ्नम् । र. च.

अभ्रकभस्म, लोहभस्म, पारा, गंधक, मनशीळ, हरताळ ताम्रभस्म, सुंठ, मिरे, पिंपळी, चित्रकमूळ, कोष्ठ, मुसळी बचनाग, ओवा हीं औषधें समभाग घ्यावीं. नंतर सुंठ वगैरे औषधींचें वस्त्रगाळ करून, पारा व गंधक यांची कज्जली करून त्यांत तें चूर्ण व वरील अभ्रकादिकांचें मिश्रण टाकावें. मग निंबाचें रसांत खल करून त्याच्या गोळ्या कराव्यात. त्यांतून रोज रात्रीं १-१ गोळी मधाशीं भक्षण करावी. हीं सर्व उदररोगांची नाशक आहे. ह्याला उदरघ्न रस म्हणतात.

४८ मूत्रकृच्छ्रांतक रस

शतावरी रसैः पिष्ट्वा मृतसूतं च तालकम् ।
शिखितुत्थं च तुल्यांशं दिनैकं मर्दयेत् दृढम् ।।
तद्गोलं सर्षपे तैले पाच्यं यामं च चूर्णयेत् ।
मूत्रकृच्छांतक श्चास्य क्षौद्रैर्गुंजा चतुष्टयम् ।।
भक्षणान्नात्र संदेहो मूत्रकृच्छं निहंत्यलम् ।
तुलसीतिल पिण्याकं बिल्वमूलं तुषांबुना ।।
कर्षेकं वा नुपानेन सुरयो वा सुवर्चलैः । र. च.

रससिंदूर, हरताळ, शुद्ध मोरचुत हीं द्रव्यें समभाग घेऊन त्यांचा शतावरीचें रसांत एक दिवस खल करावा. नंतर त्याचा गोळा करून तो शिरसेलांत एक प्रहरभर शिजवावा. ह्याला मूत्रकृच्छ्रांतरस असें म्हणतात. हा ४ गुंजेपर्यंत मधाशीं घेतला असतां सर्व प्रकारच्या मूत्रकृच्छ्रांचा नाश करितो. ह्यांत शंका नाही. यांवर अनुपानार्थ तुळशीचा पाला, तिळाचें कूट, बेलाचें मूळ यांचा एक तोळा कल्क कांजींतून द्यावा. किंवा मधांतून पादेल्लोण द्यावें.

मूत्रकृच्छांतक अनुभविक २

रससिंदूर. शुद्ध हरताळ. शुद्ध मोरचुत, जवखार, लोहभस्म, शिलाजीत. शतावरीचे रस व गोखरूचा काढा यांच्या १-१ भावना द्यावी. यानें सर्व प्रका-

रच्या मूत्रकृच्छ्रांचा नाश होतो. प्रमाण ४ गुंजा. मधांतून द्यावें. याप्रमाणे दिवसांतून २ वेळ देणें.

४९ तक्रपान

वातोदरी पिबेतक्रं पिप्पली लवणान्वितम् ।
शर्करामरिचोपेतं स्वादु पित्तोदरी पिबेत् ॥
यवानी सैंधवाजाजो व्योषयुक्तं कफोदरी ।
संनिपातोदरी तक्रं त्रिकटुक्षारसैंधवैः :
बद्धोदरी तु हपुषा दीप्यकाजानि सैंधवैः ।
पिबेच्छिद्रोदरी तक्रं पिप्पली क्षौद्रसंयुतम् ।
त्र्यूषणक्षारलवणैर्यक्तं तु सलिलोदरी ।।

वातोदराच्या रोग्यानें पिंपळीचें चूर्ण व सैंधव घालून ताक प्यावें. वातोदराच्या रोग्यानें साखर व मिऱ्याची पूड घालून ताक प्यावें. कफोदराच्या रोग्यानें ओवा, सैंधव, जिरे, सुंठ, मिरे, पिंपळी यांचें चूर्ण घालून ताक प्यावें. सन्निपातिक उदराच्या रोग्यानें सुंठ, मिरे, पिंपळी, जवखार व सैंधव यांचें चूर्ण घालून ताक प्यावें. बद्धोदराच्या रोग्यानें शेरणी, ओवा, जिरे व सैंधव यांबरोबर प्यावें. छिद्रोदराच्या रोग्यानें, पिंपळीचें चूर्ण व मध घालून ताक प्यावें. सूंठ, मिरे, पिंपळी जवखार व सैंधव घालून केलेलें ताक, जलोदराच्या रोग्यानें प्यावें.

५० ताक केव्हां देऊं नये

नैव तक्रं क्षते दद्यात् नोष्णकालेच दुबले ।
न मूर्च्छा भ्रम दाहेषु न रोगे रक्तपित्तके ॥ च. चि. ८३७

व्रण, क्षत असल्यास उष्णकालांत दुर्बल मनुष्यास, मूर्च्छा, भ्रम दाह व रक्तपित्त असलेल्या रोग्यांना ताक देऊं नये. यांना व अशावेळीं दूध द्यावे.

५१ उदररोग्यांना दूध

शोफानाहार्ति तृण्मूर्छा पीडितेकारभं पयः ।
शुद्धानां क्षामदेहानां गव्यं छागं समाहिषम् ॥ च. चि. ३८७

सूज, पोटफुगी, तहान, मूर्च्छा या विकारांवर उंटीणीचे आणि शोधनानें कृश झालेल्या मनुष्यास शक्तीकरितां गाईचें, बकरीचें अथवा म्हशीचें दूध द्यावें.

५२ अन्न केंव्हा सुरू करावे

हृतदोषः क्रमादश्नन् लघुशाल्योदनंप्रति ।

दोष पुष्कळ कमी होऊन पोट हलकें वाटूं लागलें म्हणजे हळूं हळूं हलकेंसें अन्न सुरू करून क्रमानें साळीचा भात बेतानें खाण्यास सुरुवात करावी.

५३ उदररोगांत उपयुक्त आहार

नाति सांद्रं हितं पाने स्वादुतक्रमपेलवम् ।
त्र्युषणक्षार लवणैर्युक्तं तु निचयोदरीं ॥
वातोदरी पिबेत्तक्रं पिपली लवणान्वितम् ।
शर्करा मधुकोपेतं स्वादुपित्तोदरी पिबेत् ।।
यवानी सैंधवाजाजी व्योषयुक्तं कफोदरी ।
पिबेन्मघुयुतं तक्रं कबोष्णं सातिपेलवम् ।
मधुतैलवचा शुंठी शताब्दा कुष्ठ सैंधवैः ।।
युक्तं प्लिहोदरी जातं सव्योषं तूदकोदरी ।
बद्धोदरी तु हपुषा यवान्यजाजि सैंधवैः ॥
पिबेत् छिद्रोदरीतक्रं पिप्पलीक्षौद्रसंयुतम् ।
गौरवारोचकार्तानां समंदाग्न्यतिसारिणाम् ।
तक्रं वातकफार्तानाममृतत्वाय कल्पते ।। च. चि. पा. ३८७

मधुर, फार घट्ट नसलेलें, त्यांतून लोणी काढलेलें ताक सन्निपातिक, उदररोग्याला त्रिकटू, यवक्षार व सैंधव मिळवून घेण्यानें हितकारक होते. वातोदर रोग्याला पिंपळी व सैंधव घालून, पित्तोदरी रोग्यास साखर व सहद मिळवून द्यावें. कफोदऱ्यांनी सैंधव, ओवा, जिरे, सुंठ. मिरे, पिंपळी व सहद मिळवून, थोडें उष्ण करून लोणी काढलेलें ताक, प्यावें. प्लीहोदरी रोग्यानें साखर, तैल, वेखंड, सुंठ, बडिशोप, कोष्ठ व सैंधव मिळवून घ्यावें. जलोदर झालेल्या रोग्यानें त्रिकटु घालून ताजे ताक प्यावें. बद्धोदर वाल्यानें हाऊबेर, ओवा व सैंधव मिळवून ताक प्यावें. छिद्रोदरी रोग्यानें पिंपळी, सहद मिळवून ताक प्यावें.

जडपणा, अरुचि, मंदाग्नीसहीत अतिसार असून वातकफ प्रकृतीच्या रोग्यांना ताक हें अमृताप्रमाणें आहे.

५४ उदररोग्यांना दूध हेच उपयुक्त अन्न

प्रयोगाणांच सर्वेषामनुक्षीरं प्रयोजयेत् ।
दोषानुबंधरक्षार्थंबलस्थैर्यार्थमेव च ॥
प्रयोगापचिताङ्गानां हितं ह्युदरिणां पयः ।
सर्वधातु क्षयार्तानां देवानाममृतं यथा ॥ च. चि. ३९६

सर्व प्रकारचे औषधीप्रयोग सुरूं असतांना दोषांपासून रक्षण करण्यासाठीं तसेंच शक्ति कायम टिकविण्यासाठीं दूधाचा प्रयोग सुरूं ठेवावा. ज्याचें सर्व शरीर क्षीण झालें आहे, सर्व धातुचा क्षय झाला आहे. अशा उदररोग्यांना दूध हें अमृताप्रमाणें जाणावें.

५५ अनुभविक चिकित्सा

पहिल्यानें उदराचें माप घ्यावें. (१) बेंबीवरील. (२) त्या ठिकाणीं जास्त उंची असेल, त्या ठिकाणचें पोटाचें प्रमाण. हें माप दर आठवड्यांनी घ्यावें व मांडून ठेवावें.

तारीख— इंच—
बेंबीवरील माप—
बेंबीचें वर (उंच भागावरील)

पहिल्यानें इच्छाभेदी २ गूंजा थोडचा दूधांतून द्यावी. तिनें ३–४ जुलाब होतील. रोगी अशक्त असल्यास एरंडेल द्यावें. किंवा सारकचूर्ण द्यावें.

(२) नंतर दुसरे दिवशीं—

सकाळीं— तूप २॥ तोळे
सैंधव १ मासा
मध १ मासा

कपभर गरम पाण्यांत मिळवून घ्यावें.

दुपारीं व रात्रीं

जलोदरारी	२ गूं.
लोकनाथरस (यकृतावरील)	२ ,,
मूत्रकृच्छ्रांतक	२ ,,
ताम्रभस्म	२ ,,

२ पुड्या. मधांतुन द्यावें.

१) याप्रमाणें ५ दिवस वरीलप्रमाणें सकाळीं, दुपारीं व रात्रीं औषधीं द्यावी.

२) सहाव्या दिवशीं—

सकाळीं— पापडी ८ ,,
कृमिकुठार २ ,,
गूळ १६ ,,

कुटून गोळी करून सकाळी द्यावी.

दुपारीं ४ वाजतां—

सर्व अंग शेकून टाकावें किंवा वाफारा द्यावा.

दुसरे दिवशीं—

गेळफळ चूर्ण ३ मासे

सैंधव १ मासा मध—१ मासा

कपभर गरम पाण्यांत मिसळून प्यावें. त्यामुळे १–२ उलटचा होतील.

त्याचें दुसरें दिवशीं—

इच्छाभेदी २ गुंजा

कोमट दुधांतून द्यावें.

वांतीचे–जुलाबाचे दिवशीं दुसरें औषध देऊं नये.

त्यानंतर खालील औषधीयोजना सुरूं ठेवावी.

जलोदरारी ४ गुं.

मूत्रकृच्छ्रांतक ४ गुं.

लोकनाथरस ४ गुं.

ताम्रभस्म ४ गुं.

४ पुडया. सकाळीं, दुपारीं ४ वाजतां व रात्रीं, याप्रमाणें दिवसांतून ४ वेळा मधांतून द्यावें.

या औषधीयोगांत दोषपरत्वें खालील १–१ औषध मिळवावें.

कफोदरांत आरोग्यवर्धिनी, पित्तोदरांत सुवर्ण सूतशेखर, वातोदरांत महायोगराज दशमूळकाढचांत.

रात्रीं निजतांना:—

१) मूत्ररेचकचूर्ण १–१॥ मासा पाण्याबरोबर द्यावें.

२) रुईचीं पानें एरंडेल लावून गरम करून दररोज पोटावर बांधावीं.

३) वरून दररोज रात्रीं वीतभर रुंदीचें जाड फडकें पाठीखालून पोटावरून घेऊन घट्ट बांधावें.

वरील औषधींपैकी जलोदरारी व मूत्रकृच्छ्रांतक १—१ किंवा २–२ गुंजेने जरूरी वाटल्यास वाढवावें. बाकीची लोकनाथरस व ताम्रभस्म यांचें प्रमाण तेंच ठेवावें पोटाचा घेर फारसा कमी न झाल्यास ८ व्या दिवशीं इच्छाभेदी २ गुंजा द्यावी. वरील ४ औषधें १५-२० दिवस चालू ठेवावीं. पोटांतील पाणी काढूं नये.

रोगी अशक्त असेल तर इच्छाभेदी न देतां एरंडेल द्यावें. जलोदर २ महिन्यांत दुरुस्त होतो.

खाण्याकरितां फक्त दूधच द्यावें. शक्यतोवर पिण्यास पाणी देऊं नये. फारच तहान लागल्यास दुधच घ्यावें. दूध मात्र गरम असावें. जलोदरांत इतर कांही लक्षणें दिसलीं तर दुसरीं औषधें द्यावींत.

वर जी औषधी योजना लिहिली आहे ती सर्वसामान्य असून उदर वाजत असेल तर वरील औषधींत १।। मासा महायोगराज घालावा म्हणजे प्रत्येकवेळीं ते ३ गुंजा येईल. पित्तोदर असल्यास सुवर्णसूतशेखर २ गुंजा घालावा म्हणजे प्रत्येक पुडींत तें प्रमाण अर्धी गुंज येईल. कफोदर असल्यास आरोग्यवर्धिनी ४ गुंज घालावी, प्रत्येक पुडींत तें एक गुंज येईल. जलोदराचे रोग्यांत दोषवारी किंवा अवस्थावारी किती होते. हें लिहून ठेवलें नाही.

५६ आहार

सर्वमेवोदरं प्रायो दोषसंघातजं मतम् ।
तस्मात् त्रिदोषशमनीं क्रियां सर्वत्र कारयेत् ।
दोषैः कुक्षौः हि संपूर्णे वन्हिर्मंदत्व मृच्छति ।
तस्माद्योज्यानि भोज्यानि दीपनानि लघूनिच ।।
रक्तशालीन यवान् मुग्दान जांगलांश्च मृगद्विजान् ।
पयोमूत्रासवारिष्टान् मधुसीधु तथासुराम् ।।
यवागूमोदकं वाऽपि युषैरद्यात् रसैरपि ।
मदाम्लस्नेह कटुभिः पंचमूलोप साधितैः ।। च. चि. ३८६

सर्व उदररोग, तीनहि दोष पृथक् पृथक् किंवा एकत्रित अशा कुपित दोषांपासूनच झालेले असतात. म्हणून सन्निपातिक चिकित्साच सर्वत्र करावी. कारण उदरांत दोषांचीच वृद्धि झालेली असते. त्यामुळे अग्नि मंद झालेला असतो. याकरितां दीपन व हलकें अन्न खाण्यास द्यावें. लाल साळीं, तांदूळ, यव, मूग, जंगली पशुपक्षीयांचें दूध, गोमूत्र, आसव, अरिष्ट, मध, सिंधु अधिक सुरा, यवागु, भात तसेंच किंचित खारट, तिखट यांनी युक्त असें यूष किंवा मांसरस पंचमूलकाढयांत शिजवून खाण्यास द्यावे.

५७ जलोदरांत आहार

स्यात्क्षीरवृत्तिः षडमासांस्त्रीन्पेयां पयसा पिबेत् ।
त्रींश्चांऽन्यान्ययसंवाद्यात् फलाम्लेनरसेनवा ।।
अल्पशः स्नेहलवणं जीर्णं श्यामाक कोद्रवम् ।।
प्रयतो वत्सरेणैवं विजयेत्तज्जलोदरम् वा. भ. चि.

पहिले सहा महिने दुधावर रहावे. पुढे ३ महिनें दुधांत शिजविलेली कण्हेरी घ्यावी. आणि शेवटी ३ महिनें जुनें सावें व हरीक यांचा थोडा थोडा भात दुधाबरोबर

किंवा फळांनी आंबट केलेल्या मांसरसाबरोबर किंचित तूप व सैंधव घालून जेवावा. याप्रमाणें एक वर्षभर पथ्य केलें असतां जलोदर बरा होतो.

५७ उदररोगात वर्ज्य पदार्थ

औदकानूपजं मांसं शाकं पिष्ट कृतांस्तिलान् ।
व्यायामाध्व दिवास्वप्न यानं पानंच वर्जयेत् ॥
तथोष्ण लवणाम्लानि विदाहीनि गुरूणिच ।
नाद्यादन्नानि जठरी तोयपानंच वर्जयेत् ॥ च. चि.

उदररोग्यानें जलीय व आनूपदेशीय पशुपक्षांचें मांस, शाक, पिठाळ-पिठाचें पदार्थ, तीळ, व्यायाम, फार चालणें, दिवसा निजणें, घोडे, उंट यावर बसणें, गाडी-बैलांत बसून जाणें, द्रवपदार्थ पिणें, ह्यासर्व गोष्टी वर्ज्य कराव्या. तसेंच उष्ण, लवण, आम्ल, विदाहि, जड पेयें व पाणी पिणें ह्या गोष्टी वर्ज्य कराव्यात. व अन्न खाणें बंद करावें.

पांडुरोग चिकित्सा प्रकरण

अध्याय १६ वा

पांडुरोग

१ पांडुरोगाचें संक्षिप्त वर्णन

निरनिराळ्या पित्तप्रकोपक कारणांनी पित्तांत विकृति उत्पन्न होते आणि तें दूषित पित्त रक्ताबरोबर सर्व शरीरांत पसरून वात व कफ हे दोष व रसरक्तादि सर्व धातु व त्वचा या सर्वांना बिघडविते. तसेंच पित्तविकृतीमुळे पित्ताचे पांचहि प्रकार विशेषत: यकृतप्लिहेंतील रंजक पित्त जास्त प्रमाणांत बिघडते. त्यामुळे रक्ताचा लाल रंग कमी होतो. त्यामुळेच शरीरांतील मुळचा रंग (कांती) जाऊन पांढरेपणा दिसू लागतो. पित्तच बिघडल्यामुळे पित्ताचे सर्वच रंग हिरवा, पिवळा हे रंगहि पांढुरकें रंगाबरोबर त्वचा, तोंड, डोळे इत्यादिकांवर कांही दिवसांनी दिसू लागतात. त्यांतहि पांढरेपणाच जास्त दिसत असल्यामुळे या रोगास पांडुरोग असें म्हणतात. त्या रोगांत थोडे श्रम झाल्याबरोबर हृदयांत धडधड होऊ लागते व काम करण्याकडें लक्ष लागत नाही.

पांडुरोगांत डोळे, नाक, गाल सर्व त्वचा, नखें ही पांढरीं व थोडी पिवळट दिसूं लागतात. लघ्वी व मळाचा रंग पिवळट होतो व डोळ्याचां खालचा भाग व चेहरा यांत सूज दिसू लागते. पुढे पुढे ती सूज हात व पाय यावर दिसू लागते. व ज्वरहि येतो. कांही कांहीं पांडुरोगांत यकृताची व प्लीहेची फारच वाढ होते. कित्येकवेळा तें दगडाप्रमाणें कठीण असें आपल्या हातास लागतात. असा पांडुरोगी दुरुस्त होणें कठीण जाते.

पांडुरोगांतील मुख्य उपचार म्हणजे शरीरांत पसरलेलें पित्त बाहेर काढणें व रक्तवृद्धि करणारीं औषधें देणें, हे होय. पहिले ३।४ दिवस ३।४ तोळे तूप, मध व सैंधव घालून कोमट पाण्यांत द्यावे. नंतर तूपानें सर्वं शरीर स्निग्ध झाल्यावर सर्व अंग शेकावें. नंतर एक दोन दिवसाचे अंतराने दोन जुलाब द्यावे व एकदातरी वमन द्यावे. पांडुरोगावरील मुख्य औषध म्हणजे लोहभस्म, शिलाजित, सुवर्णमाक्षिक, लोहासव, पुनर्नवासव, माक्षिक मध, तूप, ही द्रव्यें असलेले योग होय. पहिल्यानें स्नेहन, व स्वेदन, वमन, विरेचन हीं सर्व क्रिया केल्यावरच वरील लोहशिलाजित्युक्त योगापासून उत्तम फायदा होतो.

पांडु रोगांत बकऱ्याचें यकृत पाण्यांत उकळून तें पाणी पिण्यास द्यावें. यकृतापासून तयार केलेली पूड किंवा यकृताचा अर्क हीं बाजारांत केमिस्टकडे मिळतात. तो घ्यावा. शिवाय लोखंडाचें भांड्यांत ठेवलेलें दुध त्यांच भांड्यांत तापवून वारंवार देत जावे. जेवतांना गांजराच्या फोडी करून खाव्यात. पांडूरोगांत गांजराचा उपयोग फार चांगला होतो. इतर वेळींहि ताजें गांजर लाल रंगाचे फोडीं करून खावे. किंवा त्याचा एकदोन तोळे रस काढूनहि प्यावा. पांडुरोगांत जें औषध घ्यावयाचे ते गांजराच्या रसाच्या अनुपानांतूनच देत गेल्यास उत्तम फायदा होईल.

मृद्भक्षण पांडुरोग

माती खाल्ल्यानंतर त्याचा शरीरांत पाक होऊन मधुर आम्लादि रसांत त्याचे रुपांतर झाले असते तर मग हा स्वतंत्र प्रकार मानण्याचें कांहीच कारण नव्हतें. परंतु माती पोटांत गेल्यावर त्याचा पाक होत नाहीं. झालाच तर तो फार अल्प होतो. मातीचा पाक न झाल्यामुळे ती माती रसांत मिसळून रस रक्त वाहिन्यांत भरून राहते. त्यामुळे रसरक्ताचें वहन बरोबर होत नाही. त्यामुळे रक्त, मांस आदि धातूंचे पोषण होत नाही. त्यामुळे सर्व धातु क्षीण होत जातात. आणि बल व कांति यांचाहि नाश होतो आणि नाभी, पाय इत्यादि ठिकाणीं सूज येते.

वातज, पित्तज, कफज पांडुरोगांत त्या त्या दोषांची चिकित्सा करावी लागते. माती खाण्यापासून होणाऱ्या पांडुरोगांत तीक्ष्ण संशोधन दिल्याशिवाय ती माती निघू शकत नाही. ती माती शरीरांत आहे तोपर्यंत पांडुरोग कायमच राहतो.

मृद्भक्षणजन्य पांडुरोगांत दोषजचिकित्सेपेक्षा निराळीच चिकित्सा करावी लागते म्हणून मृद्भक्षणजन्य पांडुरोग हा पांडुरोगाचा वेगळाच प्रकार मानणें भाग आहे. यांत तीनहि दोषांचीं लक्षणें असतात.

२ पांडुरोगाची कारणें

क्षाराम्ल लवणात्युष्ण विरूद्धासात्म्य भोजनात् ।
निष्पाव माष पिण्याक तिलतैल निषेवणात् ॥
विदग्धेऽन्ते दिवास्वप्नात् व्यायामात् मैथुनात्तथा ।
प्रतिकर्म तु वैषम्यात् वेगानांच विधारणात् ॥
कामचिंता भयक्रोध शोकोपन्हत चेतसः च. चि.
व्यायाममम्लं लवणानि मद्यं । मृदं दिवास्वप्नमतीवतीक्ष्णम् ।
निषेवमाणस्य प्रदूष्य रक्तं । कुर्वन्ति दोषास्त्वचि पांडुभावम् ॥ मा. नि.

क्षारपदार्थ, आम्ल, अति उष्ण, स्निग्ध, विरुद्ध अन्न, (जसे दुधाबरोबर आम्ल पदार्थ), प्रकृतीला न मानवणारे पदार्थ, पावटे, उडीद, पेंड, तिळाचें तेल, करपलेलें अन्न,

मैथुन वेगांचा अवरोध, काम, चिंता, भय, क्रोध, शोक यांचा अतिरेक किंवा वारंवार होणें, अति व्यायाम, अति खारट पदार्थ खाणें, अति मद्य पिणें, दिवसा झोपणें, अतिशय तीक्ष्ण, उष्ण पदार्थ खाणें, इत्यादि पदार्थांचें अति सेवन केल्यानें त्याचें हृदय कमजोर होते. व त्याचें रसरक्तमांसादि दूषित होते व वाढलेल्या दोषामुळे त्याची शरीराची सर्व त्वचा पांढुरकी दिसू लागते.

२ पांडुरोगाची संप्राप्ति

दोषाः पित्तप्रधानास्तु यस्य कुप्यन्ति धातुषु ।
शैथिल्यं तस्य धातुनां गौरवंचोप जायते ॥
ततो वर्ण बल स्नेहा ये चान्येऽप्योजसो गुणाः ।
व्रजंति क्षय मत्यर्थं दोषदूष्यप्रदूषणात् ॥
सोऽल्परक्तोऽल्पमेदस्को निःसारः शिथिलेंद्रियः ।
वैवर्ण्यं भजते तस्य हेतुं श्रुणु स लक्षणम् ॥ चरक लि. ४४९

ज्याचे पित्तप्रधान दोष धातूकुपित होतात. त्याचे धातूंत शिथिलपणा व गुरुता उत्पन्न होते. त्यामुळे त्याचा वर्ण, बल, स्नेह व इतर ओजांचे जे गुण त्यांचा अतिशय क्षय होतो. तसेच दोष व दुष्य हे दोन्ही दूषित झाल्यामुळे त्याचें रक्त व मेद हे फार क्षीण व निःसत्व होतात. सर्व इंद्रियें शिथिल होतात. त्याचे रंगांत निवर्णता (पांडुता) उत्पन्न होते.

कामचिंताभयक्रोध शोकोपहत चेतसः ।
समुदीर्णं यथा पित्तं हृदये समवस्थितम् ॥
वायुना बलिना क्षिप्तं संप्राप्य धमनीर्दश ।
प्रपन्नं केवलं देहं त्वङ्मांसान्तरमाश्रितम् ।
प्रदूष्य कफवातासृक् त्वङमांसानि करोति तत् ।
पांडु हारिद्र हरितान् वर्णान् बहुविधांस्त्वचि ॥
स पांडुरोग इत्युक्तः चरक चि. अं. पान ४५०

काम, क्रोध, भय व शोक यांपैकी एकानें, दोघानें किंवा सर्वांनी पीडित झालेल्या हृदयांत तेथे असलेलें पित्त जेव्हां त्याची वाढ होते तेव्हां प्रबळ अशा वायुमुळे बाहेर फेकल्या जाते. तेव्हां ते धमनींत शिरून, समस्त शरीरांत पसरून त्वचा व मांस यांचेंमध्यें स्थित होऊन, कफ, पित्त, त्वचा, मांस, रक्त या सर्वांना दूषित करून, त्वचेचे ठायीं पांढुरका, हरिद्रवर्ण किंवा हिरवा अशा अनेकप्रकारचे रंग त्वचेच्या ठायीं दिसू लागतात त्याला पांडुरोग असें म्हणतात. यकृतांतील रंजकपित्त बिघडल्यामुळे रक्ताचा लाल रंग कमी होतो. तें पांढुरकें होतें. त्यामुळे शरीराचा मूळचा रंग जाऊन फिक्कट-

पणा येतो. पिवळा, हिरवा हे रंगहि दिसूं लागतात. पांढरेपणा जास्त दिसत असल्या मुळे याला पांडुरोग असें म्हणतात.

४ पांडुरोग हें नांव कसें पडलें

श्लेष्म त्वग् रक्त मांसानी प्रदूष्यांतर माश्रितम् ।
त्वग् मांसयं.स्तत् कुरुते त्वचि वर्णान् पृथक् विधान् ॥
पांडु हरिद्र हरितान् पांडुत्वं तेषु चाधिकम् ।
यतोऽतः पांडुरित्युक्तः स रोग
पांडुत्वेन उपलक्षितः रोगः पांडुरोगः

त्वचा, नख, नेत्र, मळ, मूत्र, यांचा रंग पांढुरका, हिरवा, पिवळा इ. नानाविध रंगाचा होतो. त्यांतले त्यांत त्या सर्वांमध्यें पांढरेपणाच जास्त दिसतो. म्हणून त्यास पांडुरोग असें म्हणतात.

५ पांडुरोगांत विकृत दोष

१) रंजक पित्तस्य नाशोऽयं पांडुरोगः स प्रकीर्तितः ।
२) सर्वेषु चैतेष्विह पांडुभावो यतोऽधिकोऽतः खलु पांडुरोगः ।
३) सर्व.पांडुरोगस्त्रिदोषज एव ।
४) सर्वोऽपि पांडुरोगः पित्तजः । सु उ. पा. ६२१

पांडुरोगांत तीनहि दोष कुपीत होतात; तथापि पित्त हें जास्त प्रमाणांत दूषित. होते. त्यांतहि रंजक पित्ताचा नाश झाल्यामुळे त्वचेचा मुळचा रंग जाऊन त्याला पांडुरताच जास्त प्रमाणांत येते; म्हणून त्याला पांडुरोग म्हणतात. यांत रक्तकणांचचा जास्त प्रमाणांत नाश झालेला आपणास दिसून येतो. सर्व पांडुरोग पित्ताधिक्यामुळे होतात.

पित्तामुळेच [धात्वाग्नि] धातुची वृद्धि किंवा क्षय

कोठ्यांतील दूषित पित्तामुळे धात्वाग्नित विकृति

स्वस्थानस्थ कायाग्नेरंशा धातुषु संश्रिताः ।
तेषां सादाति दीप्तिभ्याम् धातुवृद्धि क्षयोद्भवः ॥ वा. सु. अ. ११

पित्तस्थानांतील कायाग्नि हा रसरक्तादि धात्वाग्नीचे पोषण करितो. तो अग्नि (पित्त) जर अविकृत स्थितींत असेल तर सप्तधातूंतील अग्नीहि सुस्थितींत राहून सप्तधातूंची सारखी वाढच होत राहील. परंतु तोच कायग्नि जर विकृत असेल तर सप्तधातूतील धात्वाग्नींहि विकृत होऊन धातूंचा क्षयच होत राहील.

६ पित्तांतील कोणते गुण पांडुरोगाला कारण

त्यक्तद्रवत्वं पित्तं पांडुरोगे कारणम् ।

अग्न्यांशानाम् अतिदीप्त्या अतितैक्ष्ण्यात् धातुक्षयोद्भवः ।

पित्तामध्यें द्रवरूप (रस व द्रव) पित्त असते तसेच त्यक्तद्रवत्व (तीक्ष्ण व उष्ण गुण) हेहि गुण पित्तांत असतात आणि पित्तांत जेव्हा तीक्ष्ण आणि उष्ण गुण जास्त वाढतात त्याचगुणामुळे पांडुरोग उत्पन्न होतो. अग्नीच्या अति दिप्ती, अति तीक्ष्ण व लघु ह्या गुणामुळेच रक्तमांसादि धातूंचा क्षय होतो.

७ पांडुरोगांत रस धातु क्षीण होतो

पांडुरोगेणधातुनां रसरुधिरादिनां शैथिल्यंच स्यात् ।

पूर्वश्च क्षीणः रसाख्यो धातुः पररक्ताख्यं धातुं तत् विधं क्षीणमेव कुर्यात् ।

पांडुरोगांत रसरक्तादि धातू शिथिल व निःसत्व होतात. पूर्वीचा रसधातु जर तीक्ष्ण आणि निःसत्व असेल तर त्यांपासून पोसलें जाणारें पुढील मेदादि धातुहि क्षीण आणि निःसत्व निपजतात.

८ पांडुरोगांत रक्तक्षय कां होतो?

रक्तपित्तयोः एक योनित्वात् अपिच रक्तपित्तयोः इव रक्तवृद्धिर्भाव्या, तथापि पांडुरोगे रक्तक्षयः रक्तपोषक रसस्य पित्तेन क्षपणात् रक्तपोषक सारभाग अनुत्पादाच्च (वा. नि.)

पित्तप्रधाना (कुपिता) इति पित्तवृद्धिः उक्ता, पित्तवृद्ध्याच रक्त वृद्ध्या भवितव्यम् तत् कथं उक्तं अल्प रक्तता इति उच्यते दोषाणां अन्योन्य दूषणात् दुष्यस्य च दोषै दूषितत्वात् प्रसाद परंपरया अशुध्दौ, सत्यां किट्टबाहुल्यात् पित्ताधिक्यं न रक्तस्य प्रसादात्मकस्य इति पित्ताधिक्यं अल्प रक्तताच इति उपपन्नम् ।

पित्त व रक्त यांचे गुण सारखेच असल्यामुळे पित्तवृद्धीमुळे होणाऱ्या रक्तपित्त ह्या रोगांत पित्तवृद्धि झाल्यामुळे रक्तवृद्धीहि होते. परंतु पित्तवृद्धीमुळे होणाऱ्या पांडुरोगांत पित्त व रक्त यांचे गुण सारखेच असले तरी पित्तवृद्धीमुळें रक्ताची वृद्धि न होता रक्ताचा क्षयच होतो. रक्तपित्तांत पित्ताचे सर आणि द्रव हे दोन गुण जास्त प्रमाणांत वाढतात. आणि रक्तांतहि सर आणि द्रव हे दोन्ही गुण असतात. त्यामुळे रक्तपित्तांत रक्ताची वाढ होते. परंतु पांडुरोगांत तीक्ष्ण आणि उष्ण हे गुण जास्त प्रमाणांत वाढतात व हे गुण रक्तांतील धातुवर्धक गुणाच्या उलट असतात. त्यामुळे अन्नाचा रस तयार होत असतांना रसामध्ये निर्माण होणारें रक्तमांसादि धातूंना पोषक

घटक द्रव्यें हीं पित्ताच्या जास्त उष्ण आणि तीक्ष्ण गुणामुळे करपल्या जातात. यामुळे धातू निर्माण होण्याऐवजी किट्टच जास्त निर्माण होते. अशा रीतीनें धातुची परंपरा अल्प होत गेल्यानें पुढील सर्व धातु क्षीण होत जातात. याप्रकारें पित्ताधिक्यामुळे किट्टच जास्त प्रमाणांत निर्माण होत असल्यामुळे रक्ताची निर्मिती फारच अल्प होते. आणि रक्ताचीच उत्पत्ति कमी झाल्यावर पुढील मांसमेदादि धातुचे पोषण पुरेसे न होत गेल्यानें ते सर्व धातु क्षीण क्षीण होत जातात. म्हणून पित्ताधिक्यामुळे पांडुरोगांत अल्परक्तता म्हणजे रक्ताला पोषक असा सार भाग फारच थोडा निर्माण होतो.

९ पांडुरोगाचीं पूर्वरूपें

हृदय स्पंदनं रौक्ष्यं स्वेदाभाव: श्रमस्तथा । च. चि. अंक पा. ४५०
त्वक् स्फोटन ष्ठीवन गात्रसाद । मृद्‌भक्षण प्रेक्षण कूट शोथा: ।
विटमूत्रपीतत्वमथाविपाको । भविष्यतस्तस्य पुर:सराणि ॥ सु. उ मा. नि.

हृदय धडधड करणें (स्पंदन), शरीर रुक्ष होणें, घाम न येणें, गळल्यासारखें वाटणें, त्वचा फुटणें (भेगा) वारंवार थुंकी येणें, अंग गळणें, माती खाण्यावर इच्छा होणें, डोळ्याच्या खालील खलग्याला सूज येणें, मळमूत्राचा रंग पिवळा होणें, पचन न होणें हीं पांडुरोगाची पूर्वरूपें होत.

१० पांडुरोगाचीं सामान्य लक्षणें

संभूतेऽस्मिन् भवेत् सर्व: कर्णक्ष्वेडी हतानल: ।
दुर्बल: सदनोऽन्नद्विट् श्रमभ्रमनिपीडित: ॥
गात्रशूलज्वरश्वास गौरवा रुचिमान् नर: ।
मृदितैरिव गात्रैश्च पीडितोन्मथितैरिव ॥
शूनाक्षिकूटो हरित: शीर्णरोमा हतप्रभ: ।
कोपन: शिशिरद्वेषी निद्रालु: ष्ठीवनोऽल्पवाक् ॥
पिंडिकोद्वेष्टकटचुरु पादरुक् सदनानि च ।
भवंत्यारोहणायासै विशेषश्चास्य वक्ष्यते । चरक चि. अंक पान ४५०

पांडुरोग झालेल्या मनुष्याच्या कानांत आवाज होतो. अग्निमांद्य होते. तसेंच दुर्बळ, अंग गळणें, अन्नद्वेष, श्रम वाटणें, भ्रम, शूळ, ज्वर, श्वास, जडपणा व अरुचि हीं लक्षणें होतात. त्याचे सर्व गात्र मातीप्रमाणें निस्तेज, रोगांनी पीडित असलेला व ज्याला फार मार बसला आहे, असा, डोळ्याखाली सूज, त्वचा हिरवट दिसणें, केस गळणें, निष्प्रभ, लवकर क्रोध येणें, थंडी सहन न होणें, झोपाळू, वारंवार थुंकी येणें, फार थोडें बोलणें, पोटऱ्या वळणें, पाय दुखणें, अंग गळणें हीं लक्षणें चढणें व थोडचा परिश्रमानेंहि होतात.

११ पांडुरोगाचे प्रकार

पांडुरोगाः स्मृतः पंच वातपित्त कफ स्त्रयः ।
चतुर्थः सन्निपातेन पंचमो भक्षणात् मृदः ।। मा. नि:

पांडुरोगाचे पांच प्रकार आहेत. वातिक, पैत्तिक, श्लैष्मिक, सन्निपातिक व माती खाण्यापासून होणारा पांडुरोग असे पांडुरोगाचे पांच प्रकार आहेत.

माती खाण्यापासून होणारा पांडुरोग वेगळा कां मानावा?

ननु मृत्तिकादनात् पांडुरोगः पृथक न वाच्यः। पृथक् वातादि दोषे पांडुरोगे अंतर्भावित्वात् मृदा हि वातादि प्रकोपोविधीयते तिक्तोषणादिभिः इव वातादि दोष प्रकोपश्च पांडुरोग कृतस्तस्मात् पृथक् मृदो न युक्तो निर्देशः

अत्रब्रूमः मृदोऽन्ये ये वातादि प्रकोप हेतवः पांडुरोग संपादने संभावन योग्याः ते पांडुरोगं संपाद्य हेतुस्वरुपतया विनिवर्तन्ते । मृत्तिका तु तैक्ष्णैः संशोदिर्विना पांडुरोगं यावत कायं बेभिद्यते इति अयं वातादि कोप हेतुभ्यः अन्येभ्यः मृदः पांडुरोगं प्रति विशेषः) वा. नि. टिका)

दोषजत्व अविशेषेऽ पि विशिष्टरूप चिकित्सा प्रदिपादनार्थं पृथक् अभिधानम् । मृज्जः त्रिदोषज एव अंतर्भूतः ।।

कांही लोकांचें असें मत आहे की, पांडुरोग हा चारच प्रकारचा मानावा. कारण मातींतहि षड्रसांपैकी मधुर, आम्ल, लवण, तिखट, तुरट, कडु याच रसांची असते. माती मधुर असली तर कफाची वाढ होईल, आम्लामुळे पित्ताची व तिखट, कडु व तुरट या स्वादाच्या मृत्तीकेमुळे वाताची वृद्धि होईल म्हणून मृद्भक्षण पांडुरोग हा स्वतंत्र रोग न मानतां वरील चार प्रकारांतच त्याचा अंतर्भाव मानण्यांत यावा. रस हें एकूण सहाच. आणि हें सहा रस तीनच दोषांची उत्पत्ति करणार. माती खाण्यामुळे या तीन दोषांपैकीच कोणत्यातरी एखाद्या दोषाची वृद्धि होणार, मग पांडुरोगाचा हा वेगळा प्रकार कां सांगितला ? रस सहा व दोष तीनच सांगितले असले तरी, माती खाण्यापासून होणारा पांडुरोग हा त्याच्या स्वतंत्र चिकित्सेमुळे वेगळा प्रकार मानणें भाग आहे.

१२ माती खाण्यापासून होणाऱ्या पांडुरोगाचें लक्षण

शूनाक्षिकूट गंडभ्रूः शूनपान्नाभिमेहनः ।
क्रिमिकोष्ठोऽति सार्यंत मलं चासृक्कफान्वितम् ।।पा. ५५१ यो. र. भाग १

डोळ्याच्या पापण्या, गाल, भुंवया, पाय, बेंबी, शिश्न ह्यांना सूज, कोठ्यांत जंत आणि रक्त व कफ यांनी मिश्र असा अतिसार हीं विशेष लक्षणें त्यामध्यें असतात.

१३ मृज्ज पांडुची संप्राप्ति

मृत्तिकादनशीलस्य कुप्यत्यन्यतमो मल: ।
कषायामारुतं, पित्तमूषरा, मधुरा कफम् ।।
कोपयेन्मृद्र सादींश्च रौक्ष्यात्भुक्तं विरूक्षयेत् ।
पूरयत्य विपक्वैव स्रोतांसि निरुणद्धि च ।।
इंद्रियाणां बलं हत्वा तजो वीर्यौजसी तथा ।
पांडुरोगं करोत्याशु बलवर्णाग्नि नाशनम् ।। चरक अंक पा. ४५१

माती खाण्याची संवय आहे, त्याचे दोष कुपीत होतात. कषाय रसवाली माती वाताला, तिखट माती पित्ताला, मधुर कफाला प्रकोपित करते. रुक्षतेमुळे खाल्लेल्या अन्नाचा पाक रुक्ष होऊन त्यांतून उत्पन्न झालेले रस व रक्त हेहि रुक्ष होतात. माती पाक न होतां ती अपक्वच सर्व श्रोतसांत भरून जाते. त्यामुळे रसरक्तादिकांच्या व त्या त्या धातूंच्या पोषक द्रव्यांच्या अभिसरणाला प्रतिबंध होतो. त्यामुळे इंद्रियाचें बळ, तेज, वीर्य व ओज नष्ट होऊन, बल, वर्ण व अग्नि यांचा नाश करणारा असा पांडुरोग उत्पन्न होतो.

१४ माती खाण्यापासून होणाऱ्या पांडुरोगाची चिकित्सा

मृदंनिर्यात्पये त्कायातीक्ष्णै: संशोधनै: पुर: ।
बलाधानानि सर्पीषि शुद्धे कोष्ठे तु योजयेत् ।। वा. चि. पा. २४८

माती खाण्यापासून झालेल्या पांडुरोगांत प्रथम तीक्ष्ण रेचक देऊन शरीरांतील माती काढून टाकावी आणि कोठा शुद्ध झाला म्हणजे शक्ति आणणारीं घृतें द्यावींत.

१५ पांडुरोग हा दुसऱ्या रोगामुळेहि होतो

पांडुरोग स्वतंत्रपणें होतो, त्याचें वर्णन वर आलेंच आहे.

१) रक्तस्राव–जखम, नासूर, कॅन्सर, अत्यार्तव, अर्श, रक्तपित्त ह्या विकारांत जास्त रक्तस्राव झाल्यामुळे किंवा हे विकार पुष्कळ दिवस राहिल्यामुळे रक्तक्षय होऊन पांडुरोग होतो.

२) रक्तक्षय होणें–कोणत्याहि प्रकारचा ताप असो, तो पुष्कळ दिवस शरीरांत राहणें.

३) अतिसार पुष्कळ दिवस राहणें.

४) लघ्वींतून साखर, रक्त व इतर शरीरपोषक पदार्थ जाणें.

५) क्षय, उपदंश या रोगांतील विषामुळे रक्तक्षय होऊन पांडुरोग होतो.

६) आंतडींत कृमींचा विकार पुष्कळ टिकल्यानें पांडुरोग होण्याची भीति राहते.

७) लीव्हर, पांथरी यांचे विकार पुष्कळ दिवस राहिल्यानें रक्तनिर्मितीच होत नाही त्यामुळे रक्तक्षय होऊन पांडुरोग होतो.

८) रसग्रंथी (लिंफ्याटिक) ह्यांत विकृति झाल्यास रक्तांत विषार वाढून, रक्तक्षय होऊन पांडुरोग होण्याची भीति राहते.

वरील रोगांपासून होणारा पांडुरोग हा सेकंडरी किंवा अप्रधान पांडुरोग होय.

सारांश-पांडुरोगांत सर्वच शरीरपोषणक्रम विस्कळीत होऊन, शरीर शुष्क होत जाते.

१६ पांडुरोगाचा चिकित्साक्रम

तत्र पांड्वामयी स्निग्धतीक्ष्णैरूर्ध्वानु लोमिकैः ।
संशोध्यो मृदुभिस्तिक्तैः कामली तु विरेचनैः ।।

पांडुरोग झालेल्या रोग्याला पहिलें स्नेहन देऊन नंतर तीक्ष्ण वमन तसेच तीक्ष्ण विरेचन देऊन त्याचें शोधन करावें त्याचप्रमाणे कावीळ झालेल्या रोग्याला मृदु असें पित्त विरेचन देऊन संशोधन करावें.

साध्यं च पांडवामयिनं समीक्ष्य स्निग्धं घृतेनोर्ध्वमधश्च शुद्धम् ।
संपादयेत्क्षौद्रं घृतप्रगाढैहरीतकी लोहरजः प्रयोगैः
पिबेत् घृतं वा रजनी विपक्वं यत्त्रैफलं तैल्वक कल्कयुक्तम् ।
विरेचन द्रव्यकृतं पिबेद्वा योगांश्च वैरेचनिकान्घृनेन यो. र. भा. १ ला पा. ५५४

पांडुरोगी साध्य आहे, असें पाहून त्याला तूप पाजून स्निग्ध करावें. नंतर वमन व विरेचन देऊन शरीर शुद्ध करावें. ज्यामध्यें लोहभस्म, हिरडेदळ, मध व तूप आहे अशीं औषधें द्यावींत. किंवा हळद घालून शिजविलेलें तूप द्यावें. अगर लोध्र किंवा लोध्राचा कल्क घालून तयार केलेल्या त्रिफळांघृतांची योजना करावी. किंवा विरेचक द्रव्यें घालून तयार केलेलें तूप पाजावें किंवा विरेचन औषधीयोग तुपाशीं द्यावें.

विधिः स्निग्धऽत्र वातोत्थे तिक्तः शीतश्च पैत्तिके ।
श्लेष्मिके कटुरूक्षोणः कार्योमिश्रस्तु मिश्रजे ।। यो. र. भा. १ पा. ५५४

वातजन्य पांडुरोगावर स्निग्ध उपचार करावेत. पित्तजन्य पांडुरोगावर कडू व शीत उपचार करावेत. कफजन्य पांडुरोडावर तिखट, उष्ण, रुक्ष असे उपचार करावेत. व मिश्र दोषजन्य पांडुरोगावर त्या त्या दोषाला अनुलक्षून मिश्र चिकित्सा करावी.

१७ पांडुरोगसाशक योग

लोहपत्रस्थितं क्षीरं सप्ताहं पथ्य भोजनः ।
पिबेत्पांड्वामयी शोषी ग्रहणीदोषपीडितः ।। ५५५ यो. र. भा. १

पांडुरोग, क्षय, संग्रहणी हे विकार ज्यांना आहेत. त्यानें लोखंडाच्या भांड्यांत ठेवलेलें दूध सात दिवस प्यावें व पथ्यकारक भोजन करावें.

पांडुरोगनाशक योग

शिलाजतुक्षौद्रविडंगसर्पिर्लोहाभयापारदताप्यभक्षः ।
आपूर्यते दुर्बल देहधातुस्त्रिपंचरात्रेण यथा शशांकः ।।

शिलाजित, मध, वावडींग, तूप, लोहभस्म, हिरडेदळ, रससिंदूर, सुवर्णमाक्षिक हीं औषधें योग्य प्रमाणांत घेऊन सेवन करावीत. म्हणजे जसा चंद्र पंधरा दिवसामध्यें पूर्णतेस येतो, तसा दुर्बळ मनुष्याचा देह व धातु हीं पंधरा दिवसामध्यें पूर्ण अवस्थेप्रत येतात.

पांडुरोग नाशक योग

शिलाजतु ५ भाग, माक्षिक, लोहभस्म व रौप्यभस्म हे ५ भाग, चित्रक १ भाग वावडींग १ भाग, त्रिफळा ३ भाग, त्रिकटु ३ भाग, खडीसाखर ८ भाग या सर्वांचें चूर्ण करून एका लोखंडाच्या भांड्यांत मधांत मिसळून कांही दिवस ठेवावें. नंतर ते ४ ते ८ गुंजा प्रमाण द्यावें.

पांडुरोगनाशक योग

अतिनिस्रुत रक्तो वा क्षौद्रयुक्तं पिबेदसृक् ।
यकृद्वा भक्षयेदाजमामं पित्तसमायुतम् ।। सुश्रु. रक्तपित्त उत्त. अ. ४४

१८ नवायस चूर्ण

त्र्यूषण त्रिफलामुस्ताविडंगदहनाःसमाः ।
नवायोरजसो भागास्तच्चूर्ण मधुसर्पिषा ।।
भक्षयेत्पांडु हृद्रोग कुष्ठार्शः कामलापहम् ।। यो. र. भा. १ पा. ५५४

सुंठ, मिरे, पिंपळी हिरडा, बेहाडा, आवळकंठी, नागरमोथे, वावडींग, चित्रकमूळ, हीं औषधें समभाग घेऊन लोहभस्म नव भाग ह्यांचें चूर्ण तूप, मध यांचेशीं द्यावें. हें पांडुरोग, हृदयाचा विकार, कुष्ठ मूळव्याध व कावीळ ह्या रोगांचा नाश करिते.

१९ पांडुरोगावर काढा

पुनर्नवानिम्बपटोलशुण्ठीतिक्तामृतादार्व्यभयाकषायः ।
सर्वांगशोफोदरपाण्डुरोगस्थौल्यप्रसेकोर्ध्वकफामयेषु ।। यो. र. ५५५

घेठूकीची मुळी (वसूची मुळी), बाळांत लिंबाची साल, कडु पडवळ, सुंठ. कुटकी, गुळवेल, दारुहळद, बाळहिरडे यांचा काढा सर्व अंगाची सूज, उदर, पांडुरोग, स्थूलपणा, तोंडाला पाणी सुटणें व ऊर्ध्वगत कफरोग ह्यांजवर द्यावा.

अयस्ति लत्र्युषण कोलभागैः सर्वैः समं माक्षिक धातुचूर्णम् ।
तैर्मोदकः क्षौद्रयुतोनुतक्रः पांड्वामये दूरगतेऽपि शस्तः ॥ यो. र. ५५६

लोहभस्म, तीळ, सुंठ, मिरी व पिंपळी हीं औषधें तोळा तोळा आणि सर्वांच्या बरोबरीनें सुवर्ण माक्षिकभस्म घेऊन सर्वांचा मधांत खल करून गोळचा कराव्यात. त्यांतील एक गोळी घेऊन वर ताक प्यावें. हा फार दिवसांच्या पांडुरोगावरदेखील प्रशस्त आहे.

२० पुनर्नवादि वटी

पुनर्नवामुळाचें चूर्ण १० तोळे, शुद्ध कासीस ५ तोळे, गुळवेलसत्व १। तोळा, मंडुरभस्म, २ तोळे.

वरील सर्व औषधें घेऊन, तीं तुपांत घोटून रानबोराएवढचा गोळचा कराव्या. त्यांतून १–१ गोळी ताकांतून घ्यावी. म्हणजे पांडुरोग, कावीळ सूज, यचा तात्काळ नाश होतो.

२१ कुंभकामला लक्षणें

कृष्णपीत शकृन्नेत्रो भृशंशूनश्च मानवः ।
सरक्ताक्षि मुखश्छर्दि विण्मूत्रो यश्च ताम्यति ॥
दाहारुचि तृडानाडतन्द्रामोह समन्वितः ।
नष्टाग्निसंज्ञः क्षिप्रहि कामलांवान्विपद्यते ॥ चरक अंक पा. ४५३

ज्याचा मळ व नेत्र काळसर व पिवळट झालेले आहेत, ज्यास पुष्कळ सूज आलेली आहे. ज्याचे डोळे, तोंड, वांति, मळ व मूत्र हें रक्ताप्रमाणें लाल झालेले आहेत. जो बेशुद्ध होतो, ज्यास दाह, अरुचि, तहान, पोट फुगणें, तंद्रा व मोह यांनी पिडीत आहे. व ज्याचा जठराग्नि नाहीसा झाला असून जो कोणास ओळखत नाही तो काविळीचा रोगी लवकर मरतो.

२२ कामला रोगाचीं कारणें व लक्षणें

पांडुरोगीतुयोऽत्यर्थं पित्तलानि निषेवते ।
तस्य पित्तमसृग्मांसं दग्ध्वा रोगाय कल्पते ॥
हरिद्रनेत्रः सभृशं हरिद्रत्वङ्नखाननः ।
रक्तपीत शकृन्मूत्रो भेकवर्णो हतेंद्रियः ॥
दाहा विपाकदौर्बल्यसदनारुचि कर्षितः

कामला बहुपित्तैषा कोष्ठशाखाश्रयामता ॥
कालांतरात् खरीभूता कृच्छ्रास्यात् कुंभकामला ॥ चरक विशेषांक
पा. ४५३

पांडुरोग्यानें पित्तकारक पदार्थ जास्त सेवन केल्यास त्याचें पित्त, रक्त व मांस यांना दग्ध करून कामलारोग उत्पन्न करिते. त्याचे डोळे हळदीप्रमाणें अतिशय पिवळे, त्वचा नखे व तोंड हेहि अतिशय पिवळी तसेच मळ व मूत्र हें लाल व पिवळ्या रंगाचे त्यांचा वर्ण बेडकाप्रमाणें पिवळा, त्याचीं सर्व इंद्रियें शिथिल झालेलीं म्हणजे आपापले विषय ग्रहण करण्यास असमर्थ. तसेच दाह, अपचन, दुर्बलता, अंग गळणें व अरुचि, यांनी पीडित होतात. कावीळ हीं अत्यंत पित्तदोषयुक्त असते. तिचें कोष्ठाश्रित व शाखाश्रित असें दोन प्रकार आहेत. कालांतरानें जीर्ण झाले कावीळ कष्टसाध्य होऊन कोठ्याचा आश्रय करते. म्हणून तिला कुंभकामला असें म्हणतात.

२३ कावीळ होण्याचें कारण

पाण्डुरोगीच योऽत्यर्थं पित्तलानि निषेवते ।
तस्य पित्तामसृङ्मांसं दग्ध्वा रोगाय कल्पते ॥ यो. र. ५५२

जो पांडुरोगी पित्तकर पदार्थं अतिशय खातो, त्याचें तें वाढलेलें पित्त, रक्त व मांस यांना दग्ध करून कावीळ उत्पन्न करिते.

२४ काविळीचें लक्षण

हरिद्रनेत्रः स भृशं हरिद्रत्वङ्नखाननः ।
रक्तपीतशकृन्मूत्रो भेकवर्णो हतेंद्रियः ॥
दाहाविपाकदौर्बल्यसदनारुचिकर्षितः ।
कामला बहुपित्तैष कोष्ठशाखाश्रया मता ।
कालांतरात्खरीभूता कृच्छ्रा स्यात्कुम्भकामला । यो. र. ५५३

ज्याला कावीळ होते, त्याचे डोळे अतिशय पिवळे होतात. त्वचा, नखें व तोंड हीदेखील पिवळीं होतात. त्याचें मूत्र व मळ हीं तांबडीं किंवा पिवळीं होतात. तो बेडकाप्रमाणें पिवळा दिसतो. त्याचीं इंद्रियें आपापलें विषय ग्रहण करण्यास असमर्थ होतात. अंगाचा दाह, अपचन, अशक्तपणा, ग्लानी व अरुचि यांनी तो पीडित होतो. कावीळ ही अत्यंत पित्तदोषयुक्त असते. तिचे कोष्ठाश्रित व शाखाश्रीत असे दोन प्रकार आहेत. कालांतरानें जीर्ण झालेली कावीळ कष्टसाध्य होऊन कोठ्याचा आश्रय करिते. म्हणून तिला (कोष्ठ) कामला म्हणतात.

२५ कामला चिकित्सा

तिलपिष्ठनिभं यस्तु कामलावान्सृजेन्मलम् ।
कफरुद्धपथं तस्य पित्तं कफहरैर्जयेत् ॥ वा. चि. पा. २४९

कावीळ झालेल्या रोग्यास वाटलेल्या तिळासारखें शौचास होते. त्याचा पित्ताचा मार्ग कफानें बंद झालेला असतो. म्हणून त्यास कफनाशक औषधें देऊन त्याचें पित्त बसवावें.

२६ कुंभकामलेवर योग

गोमूत्रेण पिबेत्कुंभलायां शिलाजतु ।
मासं माक्षिक धातुं वा किट्टं वाऽथ हिरण्यजम् ॥ वा. चि, पा. २५०

कुंभकामलेवर एक महिना शिलाजतू, सुवर्णमाक्षिक व रुप्याचें भस्म गोमूत्रातून घ्यावें.

२७ काविळीवर अंजन

नस्यं कर्कोटमूलं वा घ्रेयं वा जालिनीफलम् । भै. पाने २६८

कर्कोटाच्या मुळाचें चूर्ण करून त्याचें अथवा कडु दोडक्याचें चूर्ण करून त्याचें नस्य केल्यानें कावीळाचा रोग नाहीसा होतो.

निशा गैरिक धात्रीभिः कामलापहमंजनम् । वा चि. पा. २४९

हळद, गेरू, आवळगठी यांचें अंजन केल्यानें कावीळीचा रोग नाहीसा होतो.

काविळीवर अंजन

अंजनं कामलार्तस्य द्रोणपुष्पीरसस्य तु ।
निशागैरिकधात्रीणां चूर्णं चोपरि लेपयेत् ॥ यो. र. ५६१

कावीळ झालेल्या रोग्यांच्या डोळ्यांत द्रोण पुष्पीच्या रसाचें अंजन करावें व सोनकाव व आवळकाठी यांच्या चूर्णाचा अंगास लेप करावा.

२८ काविळीवर पंचकर्म चिकित्सा

रेचनं कमलार्तस्य स्निग्धस्याऽऽदौ प्रयोजयेत् ।
ततः प्रशमनी कार्या क्रिया वैद्येन जानता ॥ यो. र. ५५९

कावीळ झालेल्या रोग्याला प्रथम तूप पाजून स्निग्ध करावें. व रेचक द्यावें. नंतर जाणत्या वैद्यानें शमनकारक उपचार करावेंत.

२९ कावीळीवर योग

त्रिफलाया गुडूच्या वा दार्व्या निम्बस्य वा रसम् ।
प्रातर्मधुयुतं वैद्यः कामलार्ताय योजयेत् ॥ यो. र. ५६०

वैद्यानें कावीळाच्या मनुष्याला त्रिफळयाचा काढा रस, हळदीचा काढा अथवा कडू निंबाच्या पाल्याचा रस ह्यापैकी कांही तरी एक औषध प्रातःकाळीं मध घालून द्यावें.

दार्वीसत्रिफलाव्योषविडंगानयसो रजः ।
मधुसर्पियुतं लिह्यात्कामला पाण्डुरोगवान् ।। यो. र. ५६०

दारुहळद, हिरडा, बेहेडा, आवळकाठी, सुंठ, मिरी, पिंपळी, वावडींग, लोहभस्म यांचें चूर्ण, कावीळ किंवा पांडुरोग झालेल्या मनुष्यानें तूप व मध घालून घ्यावें.

धात्रीलोहरजोव्योषनिशाक्षौद्रं सशर्करम् ।
लीढं निवारयत्याशु कामलामुद्धतामपि ।। यो र. ५६०

आवळकाठी, लोहभस्म, सुंठ, मिरी, पिंपळी, हळद यांचें चूर्ण, साखर व मध याशीं द्यावें. हें फार वाढलेल्या कावीळाचादेखील त्वरित नाश करिते.

लोहचूर्णं निशायुग्मं त्रिफलां कटुरोहिणीम् ।
प्रलिह्य मधुसर्पिभ्यां कामलार्तः सुखी भवेत् ।। यो. र. ५६०

लोहभस्म, हळद, दारुहळद, हिरडा, बेहेडा, आवळकाठी, व कुटकी यांचें चूर्ण कावीळ झालेल्या रोग्यानें तूप व मध याशीं घ्यावें. म्हणजे त्यास सुख होते.

व्योषाग्निवेल्ल त्रिफलामुस्तैस्तुल्यमयोरजः ।
चूर्णितं तक्रमध्वाज्यकोष्णतोयोपयोजितम् ।। यो. र. ५६०

सुंठ, मिरी, पिंपळी, चित्रकमूळ, वावडींग, हिरडा, बेहेडा, आवळकाठी व नागरमोथे यांच्या समभाग चूर्णाबरोबर लोहभस्म घेऊन सर्व एकत्र करून तें ताक, तूप व मध किंवा ऊन पाणी ह्याशी घ्यावें. तें कावीळ, पांडुरोग व हृदरोग, कुष्ठ, मूळव्याध व प्रमेह यांचा नाश करिते.

कामला पाण्डुहृद्रोग कुष्ठार्शोमेहनाशनम् ।
तुल्यं वाय्योरजः पथ्यां हरिद्रां क्षौद्रसर्पिषा ।।

अथवा कावीळ, पांडुरोग, हृद्रोग, कुष्ठ, मेह, मूळव्याध झालेल्या मनुष्यानें लोहभस्म, हिरडेदळ व हळद यांचें समभाग चूर्ण तूप व मधाशीं घ्यावें.

पापडखार १।।' मासा, थोडा भाजून सकाळीं खावा, वरून ताक प्यावें. असें ४।५ दिवस करावें.

कडू दोडका रात्रीं भिजवून त्याचें हीम प्यावें.

नवसागर ८ तोळे, जवखार ८ तोळे, सज्जीखार ८ तोळे, त्रिफळा १६ तोळे, ।रा ४ तोळे, गंधक ४ तोळे, सर्वांचें चूर्ण १ ते ३ मासे प्रमाणांत ताकांतून तीन वेळ घ्यावें, याप्रमाणें एक आठवडा ताकभातादर रहावें.

हळद, दारुहळद, त्रिफळाचूर्ण, कुटकी, लोहभस्म सर्व समभाग चूर्ण करून ५ ते २० तोळे गाईचें दुधांतून घ्यावें.

दहा तोळे कुटकीच्या २० पुडचा करून दररोज सकाळीं १-१ पुडी साखरेबरोबर घ्यावी.

सुरती एरंडाचे तुरे २-३ व शेवटची ३-४ पानें वाटून पहाटे घेणें, सबंध दिवस पाणी पिवूं नये, फक्त त्या दिवशीं दूधावर रहावें.

इच्छाभेदी २ गुंजा व तिसरें दिवशीं देवदाली नस्य. आरोग्यवर्धिनी ४ गुंजा एरंडाचे पानाचा रस २ चमचे सकाळ, दुपार व संध्याकाळीं घ्यावें.

हिरडयाचीं टरफलें, आवळकाठी, बेहेडा, गुळवेल, अडुळसा, कुटकी, चिराईत, निंबसाल यांचा काढा निंबाचें रसांत मिळवून द्यावा. हें १० दिवस द्यावें.

कटुतुंबी तथा देवदाली यांचे फळाला पाण्यांत रात्रीं भिजवून, कुसकरून, गाळून घ्यावें.

अपथ्य — तीक्ष्ण, उष्ण पदार्थ खाऊं नये, ऊसाचा रस प्यावा, पोट साफ ठेवावें.

कुटकी, चिरायत, हिरडा. पित्तपापडा सर्वांबरोबर साखर वस्त्रगाळ चूर्ण करून तें १॥ मासा पाण्याबरोबर घ्यावें. ३ वेळ दिवसांतून, असे १४ दिवस घ्यावें.

३० ताप्यादि लोह

ताप्यादिजतुरौप्यायोमलाः पंचपलाः पृथक् ।
चित्रकत्रिफलाव्योषविडंग पालिकैः सह ॥
शर्कराऽष्टपलोमिश्रा चूर्णिता मधुनाद्रुताः ।
पांडुरोगं विषं कासं यक्ष्माणं विषमज्वरम् ॥
कुष्ठान्यजरकं मेहं, शोफं श्वासमरोचकम् ।
विशेषाद्धंत्यपस्मारं कामलां गुदजानिच ॥ र. च. पा. २५६

सुवर्णमाक्षिक, शिलाजित, रुप्याचें भस्म, लोहभस्म किंवा मंडूर हीं औषधें २०-२० तोळे, चित्रकमूळ, हिरडा, बेहाडा, आवळकंठी, सुंठ, मिरे, पिंपळी व वावडींग ह्यांचें चूर्ण ४-४ तोळे व साखर ३२ तोळे, या सर्वांचा चांगला खल करावा. ते ४ ते ८ गुंज प्रमाण घेऊन मधांतून द्यावें. म्हणजे पांडुरोग, विषबाधा. खोकला, क्षय, विषमज्वर, कुष्ठ, अग्निमांद्य, प्रमेह, सूज, श्वास, अरुचि, विशेषतः अपस्मार, कावीळ व मूळव्याध यांचा नाश होतो.

३१ लोहपर्पटी

रसगंधकयोः कृत्वा कज्जलं समागयोः
लोहचूर्णं रससमं दत्वा संश्लिप्य पर्पटी ॥

कार्या सा विधिना सेव्या रोगिभिः पथ्यभोजिभिः ।
अनुपान श्रितं क्वाथं धान्य जीरक नागरम् ।
लोहेन पर्पटी चैषा सिद्धा लोकस्य सिद्धिदा ॥
रक्तिकैकां समारभ्य वर्धयेद्रक्तिकां क्रमात् ।
सप्ताहैकं द्वयं वापि यावदारोग्य दर्शनात् ।
ग्रहणीं दुस्तरां हन्ति शूलातीसारसूतिकाम् ।
प्लीहाग्निमांद्य शोथार्शपांडूदावर्त कामलाम् ॥
सर्वोमवात कुष्ठानि रोगा त्स्त्वेवं विधा खलु ॥
भवेज्जनोऽय सर्वषुनिर्वलीपलीतोऽनया ॥
पथ्यापथ्य विधिश्चात्र सर्वो लोहविधानवत् । र. चं.

पारा व गंधक समभाग घेऊन त्याची कज्जली करावी. नंतर त्यांत पाऱ्याच्या वजनाइतका पोलादाचा चूर घालून त्याची विधियुक्त पर्पटी करावी. ती पथ्य करणाऱ्या रोग्यानें विधियुक्त सेवन करावी. तिला धनें, जिरे व सुंठ यांचा काढा अनुपानार्थ योजावा. ही लोहपर्पटी लोकांना आरोग्याची सिद्धी देणारी आहे. एक गुंजेपासून सुरुवात करून सोसेल त्या मानानें एक-एक गुंज वाढवावी. ह्याप्रमाणें दोन सप्तकेपर्यंत किंबहुना रोग बरा होईपर्यंत करावे. ही लोहपर्पटी दुस्तर संग्रहणीचा तसेंच शूळ, तसेंच अतिसार, बाळंतरोग, पांथरी, अग्निमांद्य, सूज, मूळव्याध, पांडुरोग, उदावर्त, कावीळ, सर्व प्रकारचे आमवात व कुष्ठ ह्या रोगांचा नाश करिते. सुरकुत्या पडलेलें शरीर ह्या पर्पटीचें सेवनानें लोखंडाप्रमाणें बळकट होते. ह्या पर्पटीवर सर्व पथ्यापथ्य विधि लोहभस्माप्रमाणें करावा.

३२ लोहासव

लौहचूर्ण त्रिकटुकं त्रिफलंच यवानिका ।
विडंगं मुस्तकं चित्रं चतुःषष्टिपलं क्षिपेत् ॥
चूर्णीकृत्य ततः क्षौद्रं चतुःषष्टिपलं पृथक्
दद्यात् गुडतुलां तत्र जलद्रोणद्वयं तथा ॥
घृतभाण्डे विनिक्षिप्य निदध्यान्मासमात्रकम् ।
लौहासवममुं मर्त्यः पिबेद्वन्हिकरं परम् ॥
पाण्डुश्वयथु गुल्मानि जठराण्यर्शसां रुजम् ।
ज्वरं जीर्णं प्लीहामयं कासं श्वासं भगन्दरम् ॥
अरोचकंच गृहणीं हृद्रोगंच विनाशयेत् ॥ भै. र. १२५

लोहभस्म ४ पळ, त्रिकटु ४ पळ, त्रिफळाचूर्ण ४ पळ, ओवा ४ पळ, वावडींग-चूर्ण ४ पळ, नागरमोथाचूर्ण ४ पळ, पाणी २ द्रोण घेऊन घृतस्निग्ध किंवा धूपीत अशा मातीच्या भांड्यांत पाणी टाकून त्यांत गूळ मिळवावा व इतर द्रव्यें त्यांत टाकावींत. त्या भांड्यावर एक शराव ठेऊन मुखमुद्रा करावी व ते एक महिनाभर ठेवावें. एक महिन्यानंतर तें वस्त्रानें गाळावें. हें लोहासव भोजना नंतर १ तोळा व पाणी १ तोळा घेतल्यानें पाचकाग्नीस प्रदीप्त करते. तसेंच पांडुरोग, शोथ, गुल्म, उदररोग, अर्श, वेदना, प्लीहावृद्धि जीर्णज्वर, कास, श्वास, भगंदर, अरुचि ग्रहणी व हृद्रोग यांचा नाश करीते.

३३ निशालोह

लोहचूर्णं निशायुग्मं त्रिफला रोहिणीयुतम् ।
प्रलिह्यान्मधु सर्पीभ्यां कामला पांडुशांतये ।।

लोहभस्म, हळद, दारुहळद, हिरडा, बेहाडा, आवळकंठी व कुटकी, यापैकी लोहभस्म सहा तोळे व बाकीचीं औषधें १–१ तोळा घेऊन सर्वांचें वस्त्रगाळ चूर्ण करून भरून ठेवावें. याला निशालोह असें म्हणतात. हें निशालोह दोन ते चार गुंजा घेऊन तूप व मध यांत मिसळून दररोज सेवन करावें.

३४ पुनर्नवा मंडूर

पुनर्नवात्रिवृच्छुंठी पिप्पली मरिचानिच ।
विडंगं देवकाष्ठंच चित्रकं पुष्कराव्हयम् ।।
त्रिफला द्वे हरिद्रेच दंतीच चविका तथा ।
कुटजस्य फलं तिक्ता पिप्पलीमूल मुस्तकम् ।।
एतानि समभागानि मंडुरं द्विगुणं ततः ।
गोमूत्रेऽष्टगुणे पक्त्वा स्थापयेत् स्निग्धभाजने ।
पांडुशोथोदरानाह शूलार्शः क्रिमिगुल्मनुत् ।। भै. पा. २७२

पुनर्नवाचें मूळ, निशोत्तर, सुंठ, पिंपळी, काळी मिरी, वावडींग, देवदार, चित्रकमूळ, पुष्करमूळ, हिरडा, बेहाडा, आवळगठी, हळद, दारुहळद, दंती, चव्य, इंद्रजव, कुटकी, पिंपळामूळ, नागरमोथा ही सर्व औषधें १–१ तोळा घेऊन या सर्वांचें चूर्ण करून, त्या चूर्णाच्या दुप्पट मंडूरभस्म व मंडुराच्या आठपट गोमूत्र घेऊन, प्रथम कढईत गोमूत्र टाकून त्यांत मंडूरभस्म टाकून तें चांगलें शिजवावे. चांगलें शिजलें म्हणजें वरील चूर्ण त्यांत टाकून सराटचानें घोटावें. तें चांगलें मिसळल्यावर स्निग्ध भाड्यांत किंवा कांच पात्रांत काढून ठेवावें. हें २ ते ४ गुंज प्रमाणांत दिवसांतून २ वेळ

त्यानें पांडुरोग, शोथ, सर्व उदररोग, आनाह, शूळ, अर्श, कृमि व कृमिजन्यरोग, गुल्म हे सर्व रोग नाहीसे होतात.

३५ मधुमंडूर

गृहीत्वा भिषक्प्रस्थ मंडूरभागं शृते त्रैफले मर्दयित्वाच यामम् ।
पुटे पाचयेद्यामयुग्मं कृशानौ पुटानीह देयानि चंद्राक्षिवारम् ।।
तथा धेनुमूत्रे कुमारीरसेच विधेयश्च पंचामृते योगराजः ।
भवेत्सिधुनागैः पुटैः सिद्धदोऽयमचिन्त्य प्रभावश्च मंडूरएषाः ।
मधुमंडूर एष कणामधुना चिरपांडुगदं ननुहेमभितः । ।।
जनको रुधिरस्य निहंति परं विविधार्ति हरस्त्वनुपानबलैः ।।

यो. र. भा. १ पा. ५५८

लोहाचें किट्ट ६४ तोळे घेऊन त्रिफळाच्या काढ्यांत प्रहरभर खलावें. नंतर दोन प्रहरपर्यंत अग्नीमध्यें पचन करावें. ह्याप्रमाणें एकवीस पुटें द्यावीत, त्याचप्रमाणें गोमूत्र, कुमारीचा रस व पंचामृत (सूंठ, मुसळी, गुळवेल, शतावरी व गोखरू किंवा मुंडी) ह्यांच्या रसाच्या व काढ्याच्या एकवीसपट भावना द्याव्यात. म्हणजे अशा ह्या चौऱ्यांशी पुटांनी हा अचित्य प्रभाव दाखविणारा व सिद्धिदायक असा योगराज मंडूर तयार होतो. हा मधुमंडूर फार दिवसाच्या पांडुरोगावर मध व पिंपळी याशीं ६ गुंजापर्यंत द्यावा. हा रक्त उत्पन्न करितो आणि अनुपान योजून दिला असतां अनेक प्रकारचे रोग दुरुस्त करतो.

३६ मंडूरवटक

सुराब्द दार्वी कटुषट्कताप्यवेल्लं वरा चेति समांशचूर्णम् ।
मंडूरभागद्वय मष्टमूत्रे पक्त्वा गवां तद्वटका सतक्राः ।।
कामलापाण्डुमेहार्शः शोथकुष्ठकफामयान् ।
उरुस्तम्भमजीर्णंच प्लीहानं नाशयन्ति च ।। यो. र. ५५६

देवदार, नागरमोथे, दारुहळद, सुंठ, मिरे, पिपळी, चवक, चित्रक, पिंपळमूळ, सुवर्णमाक्षिक, वावडींग, हिरडा, बेहेडा व आवळकाठी या सर्व कुटून चूर्ण समभाग आणि मंडूरभस्म दोन भाग या सर्वांचा खल करून तें आठपट गोमूत्रामध्यें पचन करून गोळचा कराव्यात. आणि त्या ताकाशीं घ्याव्यात. त्या कावीळ, पांडुरोग प्रमेह, मूळव्याध, सूज, कुष्ठ, कफरोग, उरूस्तंभ, अजीर्ण व पांथरी यांचा नाश करितात.

३७ मंडूरलवण

कृत्वाऽग्निवर्णं मलमायसं तु मूत्रे निर्षिचेद्बहुशो गवां च ।
तत्रैवसिंधूत्थसमं विपाच्यं निरुद्धधूमंच बिभीतकाग्नौ ।।

तक्रेण पीतं मधुनाथवापि बिभीतकाख्यं लवणं प्रयुक्तम् ।
पांड्वामयिभ्यो हितमेतदस्मात्पांड्वामयघ्नं नहि किंचिदन्यत् ॥
यो. र. ५५७

लोहाचें कीट अग्निवर तापवून गोमूत्रामध्यें पुष्कळ वेळ विझवावें. नंतर त्याच्या समान सैंधव घेऊन, दोहोंचा खल करून, शरावसंपुटांत घालून मातकापड करून बेहेडयाचें लाकडाचे पूट देऊन पचन करावें. याला बिभितकाख्य लवण म्हणतात. तें ताकाशीं अथवा मधाशीं घ्यावें. हें पांडुरोगावर प्रशस्त आहे. त्यासारखे दुसरें पांडुरोगनाशक औषध नाही.

३८ मंडूरवज्रवटक

पंचकोलं समरिच देवदारु फलत्रिकम् ।
विडंगमुस्तायुक्ताश्च भागास्त्रिपलसंमिताः ॥
यावन्त्येतानि चूर्णानि मण्डूरं त्रिगुणं ततः ।
पक्त्वाऽष्टगुणिते मूत्रे तद्धनीभूतमुद्धरेत् ॥
ततोऽक्षमात्रान्वटकान्पिबेत्तक्रेण तक्रभुक् ।
पाण्डुरोगं जयेत्तद्वन्मन्दाग्नित्वम् रोचकम् ॥
मण्डूरवज्रवटको रोगानीक प्रभंदनः ।
अर्शांसि ग्रहणीं शोफमुरुस्तंभं हलीमकम् ।
कृमीन्प्लीहानमुदरं गलरोगं च नाशयेत् ॥ यो. र. ५५७

सुंठ, मिरी, पिंपळी, पिंपळमूळ, चवक, चित्रक, देवदार, हिरडा, बेहेडा, आवळकाठी, वावडींग व नागरमोथे या औषधींचें समभाग चूर्ण बारा तोळे व सर्व चूर्णाच्या तिप्पट मंडूर घेऊन सर्वांच्या आठपट गोमूत्रामध्ये पचन करावा. घट्ट झाल्यावर १–१ तोळचाच्या गोळचा करून त्या ताकाशीं घ्याव्यात व त्यावर ताकाशींच जेवण करावें म्हणजे पांडुरोग, अरुचि, अग्निमांद्य यांचा नाश होतो. हा मंडूर वज्रवटक रोग समूहाचा नाश करितो. तसेंच मूळव्याध संग्रहणी, सूज, उरूस्तंभ, हलीमक, कृमि पांथरी, उदर व गलरोग यांचा नाश करतो.

३९ हंसमंडूर

मंडूरं चूर्णयेत्श्लक्ष्णं गोमूत्रेऽष्टगुणे पचेत् ।
पंचकोल देवदारु मुस्ता व्योषं फलत्रयम् ॥
विडंगं स्यात्प्रतिपलं पाकान्ते चूर्णितं क्षिपेत् ।
भक्षयेत्कर्षमात्रं च तक्रे तक्रं च भोजने ॥

पाण्डुं शोफं हलीमंच उरुस्तंभं च कामलाम् ।
अर्शांसि हन्ति नो चित्रं हंसमण्डूरको ह्ययम् ।। यो. र. ५६४

मंडुराचें बारीक चूर्ण करून आठपट गोमूत्रामध्यें प्रचन करावें. नंतर सुंठ, मिरे, पिंपळी, चवक, चित्रक, देवदार, नागरमोथे, सूंठ, मिरे, पिंपळी, हिरडा, बेहाडा, आवळकाठी व वावडींग हीं प्रत्येकी चार चार तोळे, या सर्वांचें चूर्ण करून वरील मंडूर व गोमूत्र चांगलें शिजल्यावर त्यांत टाकावें. व १ तोळा प्रमाणाने ताकाशीं भक्षण करावें. वर ताक घ्यावें. म्हणजे पांडुरोग, सूज, हलीमक, उरुस्तंभ, कामला व मूळव्याध यांचा तो नाश करतो. याला हंसमंडुर म्हणतात.

४० पांडुसूदन रस

रसं गंधं मृतं ताम्रं जयपालंच गुग्गुलम् ।
समांशमाज्यसंयुक्तां गुडिकां कारयेद्भिषक् ।।
एकैकां भक्षयेन्नित्यं पांडुशोथ प्रणुत्तये ।
शीतलंच जलं चाम्लं वर्जयेत् पांडुसूदनै ।। भैषज्य पान २७४

शुद्ध पारद, शुद्ध गंधक, ताम्रभस्म, शुद्ध जेपाळ व शुद्ध गुग्गुळ हीं प्रत्येकी १–१ तोळा घेऊन प्रथम पारा व गंधकाची कज्जली करून त्यांत बाकीचीं द्रव्यें खलांत घालून, त्यांत तूप टाकून घोटावींत. ४–५ तास घोटल्यानंतर ३–३ गुंजेच्या गोळचा करून सुकवून घ्याव्यात. पांडुरोग व शोथ यांचा नाश करण्याकरितां १–१ गोळी सकाळीं सायंकाळीं योग्य अनुपानांतून द्यावी. हें औषध घेत असतांना स्नानाकरितां व पिण्याकरितां थंड पाणीच वापरावें. व आम्ल पदार्थ वर्ज्य करावें.

पांडुरोगावर शोफचिकित्सा

पांडुरोगेषु कुशलः शोफोक्तंच क्रियाक्रमन् ।। वा. चि. पा. २५१

४१ मदेभसिंहसूत रस

रसगंधवराट ताम्रशंखं विषवंगाभ्रककांततीक्ष्णमुंडम् ।
अहिहिंगुल टंकणं समांशं सकलैःस्यात्त्रिगुणं पुराणकिट्टम् ।।
पशुमूत्रविशोधितं सुभृष्ट्वा त्रिफलाभृंगरसाऽऽर्द्रकोत्थनीरैः ।
सुविशोष्यवरामृतालिवासास्वरसैरष्ट गुणैः पुनर्नवोत्थैः
पृथगग्निकृतं घनं विपाच्यगुलिका गुंजमिता निजानूपानैः
ज्वरपांडु तृषास्रपैत्यगुल्मक्षयकासस्वरमग्निसाद मूर्च्छाम् ।
पवनादिषु दुस्तराष्टरोगान्सकलं पित्तहरं मदावृतंच ।।
बहुना किमसौ यथार्थं नामा सकलव्याधिहरो मदेभसिंहः यो. र. भाग १
पान ५६४

पारा, गंधक, कवडीभस्म, ताम्रभस्म, शंखभस्म, बचनाग, वंगभस्म,, कांतभस्म लोहभस्म, मुंड लोहभस्म, नागभस्म, शुद्ध हिंगुळ, टांकणखार, हीं औषधें समभाग व या सर्वांच्या तिप्पट जुनाट मंडूर घेऊन, त्या सर्वांचा खल करून गोमूत्रांत कालवून, भाजून काढावें. नंतर त्रिकफचाचा काढा. माक्याचा रस, आल्याचा रस ह्या प्रत्येकांत खल करून वाळवावा. नंतर त्रिफळचाचा काढा, गुळवेलीचा रस, माक्याचा रस, अडुळशाचा रस व पांढऱ्या वसूचा रस हा प्रत्येक रस सर्व औषधींच्या आठपट घेऊन प्रत्येक रसांत वेगवेगळें पचन करावें. घट्ट झाल्यावर गुंजेच्या गोळ्या करून अनुपान योजून द्याव्यात. म्हणजे, ज्वर, पांडुरोग, तहान, रक्तपित्त, गुल्म, क्षय, खोकला, स्वरभेद, अग्निमांद्य, मूर्च्छा, वातविकार, आठ प्रकारचे दुस्तर रोग, सर्व पित्तविकार, उन्माद किंवा मदात्यय. यांचा नाश होतो. हा सर्वरोगनाशक, मदेभसिंह रस यथार्थ नांवाचा आहे.

४२ लोकनाथरस

शुद्धसूतं द्विधागंधं खल्ले कुर्याच्च कज्जलम् ।
सूततुल्यं जरिताभ्रं मर्दयेत् कनकाऽम्बुना ॥
ततो द्विगुणितं दद्यात् ताम्रं लोहं प्रयत्नतः ।
सूतान्नवगुणं देयं वराही संभवं रजः ॥
काकमाची रसेनैव सर्वं तत् गोलकी कृतम् ॥
ततो लघुपुटे पच्यात् स्वांगशीतं समुद्धरेत् ।
शिवं संपूज्य यत्नेन् द्विजातीनन् तोष्य च ॥
भक्षयेत् अस्य चूर्णस्य द्विगुणं मधुना सह ।
भक्षयेत् अस्य चूर्णस्य द्विगुणं मधुना सह ।
प्लीहानमग्रमांसंच यकृतं सर्वरूपिणम् ।
जीर्णज्वरं तथा गुल्मं कामलां हंति दारुणम् ॥ भै. रं. वे. पा. ५४७

शुद्ध पारा १ तोळा, गंधक २ तोळे घेऊन, त्याला खलांत घालून चांगलें २-३ दिवस त्याची कज्जली तयार करवी. त्यांत अभ्रकभस्म १ तोळा मिळवून कोरफडीचे रसांत त्याचा खल करावा. नंतर त्यांत ताम्रभस्म व लोहभस्म २—२ तोळे व कर्पदिकभस्म ९ तोळे मिळवून मकईचे किंवा विड्याचे पानाचें रसांत किंवा काढचांत घोटावें. नंतर त्याच्या चौपट वाटोळ्या चकत्याकरून त्या सुकल्यावर एक लघुपुट द्यावें. स्वांगशीत झाल्यावर खलांत घोटून शिशींत भरून ठेवावें. प्रथम महादेवाची पूजा करून व ब्राम्हणांना भोजन घालून हें औषध २ गुंज मधांतून सेवन करावें. हा बृहल्लोकनाथरस, प्लीहा, हृदय व यकृतवृद्धि, जीर्णज्वर, गुल्म व दारुण कामलारोग हे सर्व खात्रीनें नाहींसे करितो.

४१ पांडुरोगावरील अनुभविक चिकित्सा

रोगी वैद्याकडे आल्याबरोबर हा पांडुरोग आहे, हें रोग्याची परीक्षा करून निश्चित ठरवून घ्यावें. पांडुरोगच आहे, हें निश्चित ठरल्यावर पहिल्याने इच्छाभेदी १ ते २ गुंजा तूपसाखरेंत मिसळून द्यावें. त्यानें ३–४ जुलाब होतील. नंतर खालील-प्रमाणें योजना करावी.

सकाळीं– तूप २।। तोळे, सैंधव २ मासे व मध ३ मासे हें सर्व कपभर गरम पाण्यांत मिसळून पाजावेत.

दुपारीं व रात्रीं १ ते ३ वाजतां–ताप्यादिलोह ६ गुं., निशालोह ४ गुं व पांडुनाशक योग ४ गुंजा हें सर्व एकत्र करून लाल गांजराच्या २ तोळे रसांतून. तें न मिळाल्यास दाडिमावलेहांतून किंवा दूधसाखरेतून द्यावें. रोगी अशक्त अगर लहान वयाचा असेल तर वरील औषधीचें प्रमाण जरूरीपुरते कमी करावें. कफाधिक्य असेल तर गोमूत्र व हिरड्याचा काढा, यांतून वरील औषध द्यावें.

हें औषध ५ दिवस सकाळीं दुपारीं व रात्रीं द्यावें. सहावे दिवशीं पळसपापडी ८ गुं., कृमिकुठार २ गुं., गूळ ८ गुं. या सर्वांची गोळी करून कृमीनाशाकरितां द्यावी. नंतर दुसरे दिवशीं वांतीचें औषध, गेळफळ ३ ते ४ मासे, सैंधव ३ मासे व मध ३ मासे हीं सर्व एकत्र करून कपभर कोमट पाण्यांत मिसळून द्यावें. त्यानें १–२ वांत्या होतील. हें वांतीचें औषध सकाळीं द्यावें व त्या दिवशीं रात्रींच फक्त वर लिहिलेलें औषध द्यावें. सातवे दिवशीं इच्छाभेदी २ गुंजा पाण्याबरोबर द्यावी. तिनें ३–४ जुलाब होतील.

वरील प्रमाणें स्नेहन, वमन व विरेचन औषधांनी कोठा शुद्ध झाल्यावर ताप्या-दिलोह, निशालोह व पांडुनाशक योग हें औषध वरील प्रमाणांत व वरील अनुपानांतून सकाळीं, दुपारीं ३–४ वाजतां व रात्रीं निजतांना असें ३ वेळ द्यावें. रोगाचा जोर जास्त असल्यास सकाळीं, दुपारीं व रात्रीं निजतांना असें ४ वेळ द्यावें.

यकृतवृद्धि :– यकृत्वृद्धि जास्त असेल तर वरील औषधांत लोकनाथरस (यकृतावरील) द्यावा.

पांडुरोगांत सूज आली असल्यास खालील पहिला योग फार उपयोगी आहे.

पुनर्नवामंडुर ६ गुं.
आरोग्यवर्धिनी ४ गुं.
लोकनाथरस ४ गुं.

४ पुड्या. लोहासव १ तोळा व पुनर्नवासव १ तोळा, तितकेंच गरम पाणी घालून ४ वेळ घेणें.

लोहभस्म ४ गुं.

शिलाजित ८ गुं.

सुवर्णमाक्षिक ४ गुं.

४ पुडचा. लोहासव ।।' तोळा व द्राक्षासव ।।' तोळा यांत तितकेंच पाणी घालून ४ वेळ घेणें.

रौप्यभस्म २ गुं.

निशालोह ४ गुं.

लोकनाथरस ४ गुं.

सुवर्णमाक्षिक ४ गुं.

४ पुडचा. लोहासव १ तोळा. तितकेंच पाणी घालून घेणें.

रससिंदुर ४ गुं.

सुवर्णमालिनीवसंत २ गुं.

शिलाजित ८ गुं.

लोहपर्पटी ४ गुं.

४ पुडचा. च्यवनप्राश १ तोळा घेऊन त्यातून १–१ पूडी अशा चार पुडचा घ्याव्यात.

४२ पांडुरोगावरील चिकित्सा

यकृतवृद्धि–पांडुरोगांत यकृतवृद्धि किंवा प्लिहावृद्धि जास्त असेल तर वरील औषधांत लोकनाथरस ३ किंवा ४ गुंज घालून तें औषध ३ किंवा ४ वेळ वरील अनुपानांतून द्यावें. प्रत्येक वेळेचें लोकनाथरसाचें प्रमाण १ गुंजेपेक्षा जास्त नसावें.

सूज– पांडुरोगांत सूज जास्त प्रमाणांत असेल तर वरील औषधी सुरू ठेवून आरोग्यवर्धिनी २ गुं. व पांडुसुदनरस २ गुंज यांच्या जास्त दोन पुडचा करून त्या पुनर्नवादि काढयांतून द्याव्यात. असे सहा वेळ औषध चालू ठेवावें.

मळमळ, वांति असल्यास सुतशेखर १ गुंज व वांतिहृद्रस १ गुं. यांची १ पुडी मधांतून द्यावी. जरूर वाटल्यास याचप्रमाणें दुसरी पुडी द्यावी.

४३ पांडुरोगावर उत्तम औषध

पांडुरोगावर उत्तम औषध लोहभस्म हें प्रत्येकवेळीं १ गुंजेपासून ४ गुंजापर्यंत वाढवीत घ्यावें. याप्रमाणें दिवसांतून सकाळीं व सायंकाळीं द्यावें. पण त्याचे अगोदर त्या रोग्याला पंचकर्माची चिकित्सा करून नंतर लोहभस्म, मध व तूप यांतून द्यावें.

रोगी फारच अशक्त असेल किंवा वयानें लहान असेल तर पहिल्यानें ३–४ दिवस दररोज १ ते २।। तोळेपर्यंत तूप, त्यांत सैंधव व मध मिळवून अर्धा कप गरम पाण्यांत मिळवून घ्यावें. व नंतर मण्डुरभस्म मध व तूपांतून सुरू करावें. प्रमाण १ ते ४ गुंज. याप्रमाणें दोन वेळ द्यावें. दुसरा • उत्तम योग लोहभस्म, मंडूरभस्म किंवा

सुवर्णमाक्षिक २–३ गूंज. लाल रंगाचे गांजराचा रस २ तोळे काढून, त्यांतून घ्यावें. तिसरा महत्त्वाचा योग– बकऱ्याचें यकृताचा रस किंवा काढा घ्यावा. यकृताचा रस किंवा त्याची पावडर केमिस्टकडे मिळते. त्याचा उपयोग करावा.

४४ पांडुरोगे पथ्यानि

छर्दिर्विरेचनं जीर्ण यव गोधूमशालयः ।
मुग्दाढकीर्मसूराणां यूषाजांगलजा रसाः ।।
पटोलं वृद्ध कुष्मांडं तरुणं कदलीफलम् ।
जीवंति क्षुरमत्स्याक्षी गुडूची तंडुलीयकम् ।
पुनर्नवा द्रोणपुष्पी वार्ताकुं लशुन द्वयम् ।।
पक्वाम्रमभया बिंबी श्रृंगी मत्स्योगवांजलम् ।
धात्री तक्रं घृतं तैलं सौवीरक तुषोदके ।
नवनीतं गंधसारो हरिद्रा नागकेशरम् ।
यवक्षारो लोहभस्म कषायाणि च कुंकुमम् ।
दाहश्चरणयोः संधौ नाभेश्च व्यंगुला दधः ।
मस्तके हस्तयोर्मूले मध्ये च स्तनकक्षयोः ।
यथादोषमिदं पथ्यं पांडुरोगवतां भवेत् । भैषज्य पा. २७७

वमन, विरेचन, जुने यव, गहू, जुनें तांदुळ, मूग, तूर, मसुराची दाळ याचें कढण (पातळ वरण) जंगली प्राण्याचे मासरस, पडवळ, पिकलेलें कोहळें, कच्चीं केळीं, जीवंति, तालिमखाना, दुर्वा, गुळवेल, चौळी, पुनर्नवा, द्रोणपुष्पी, वांगीं, दोन्हो प्रकारचे लसूण (लसूण व कांदे), पिकलेले आंबे, हिरडे, तोंडलीं, श्रृगी मासळी, गोमूत्र, आवळे, ताक, तूप, तेल, कांजी, पेज, लोणी, चंदन, हळद, नागकेशर, यवक्षार, लोहभस्म, तुरट रसवाले पदार्थ, हे सर्व पदार्थ पांडुरोग्यांना उपयुक्त आहेत. तसेच दोन्ही पायाचे संधिस्थान, बेंबीच्याखाली दोन अंगुले, डोळे, दोन्ही हाताचे संधिस्थान (मूळ स्थान) स्तन, बरगडचा या स्थानांत अग्निकर्म (डाग देणें) करावें.

४५ पांडुरोगे अपथ्यानि

रक्तस्रुतिर्धूम्रपानं वमिवेग विधारणम् ।
स्वेदनं मैथुनंशिंबी पत्रशाकानि रामठम् ।।
माषोऽम्बुपानं पिण्याकस्ताम्बूलं सर्षपाःसुरा ।
मृद्भक्षणं दिवास्वप्नस्तीक्ष्णानि लवणानिच ।।
सह्यविंध्याद्रिजातानां नदीनां सलिलानिच ।
सर्वाण्यम्लानि दुष्टाम्बु विरुद्धान्यशनानिच ।।
गुर्वन्नंच विदाहीनि पांडुरोगवतां विषम् ।

वन्हिमातपमायासमत्र पानंच पित्तलम् ।
सर्वथा क्रोधमध्वानं पांडुरोगी सदा त्यजेत् ॥ भै. पा. २७८

रक्त काढणें, धूम्रपान, वांतीचा वेग रोखणें, स्वेदन, मैथुन, शिंबी धान्य, पाले भाज्या. हिंग, उडीद, पाणी जास्त पिणें, तिळाची ढेप, विडा खाणें, सरसूची भाजी मद्य, माती खाणें, दिवसा निजणें, तीक्ष्ण पदार्थ, खारट पदार्थ, सह्याद्रि व विंध्याद्रि पर्वतापासून निघणाऱ्या नद्यांचें पाणी पिणें, आंबट पदार्थ, दुषित जल, प्रकृति, देश, काल आदि यांचे विरुद्ध भोजन, उशिरां पचणारे, विदाहि असे पदार्थ सेवन करणें, हें पांडुरोग्यांना विषाप्रमाणें आहे. अग्नीजवळ बसणें, उन्हांत बसणें व्यायाम, पित्ताला वाढविणारें अन्न- पान, क्रोध, पुष्कळ चालणें हे सर्व पांडुरोग्यानें वर्ज्य करावें

४६ पांडुरोगावरील औषधें

(१) ताप्यादिलोह, (२) निशालोह, (३) पुनर्नवामंडूर, (४) पांडुसुदनरस, (५) पुनर्नवादिवटी, (६) मधुमंडूर, (७) नवायसचूर्ण, (८) पांडुनाशकयोग, (९) मदेभसिंहसूतरस,

वरील औषधीपैकी दोन किंवा तीन औषधें योग्य प्रमाणांत एकत्र करून त्या ३ किंवा ४ पुड्या दिवसांतून योग्य अनुपानांतून किंवा लाल रंगाचे गांजराचे रसांतून द्याव्यात.

शोथरोग चिकित्साप्रकरण

अध्याय १७ वा

१ शोथ रोगाचे संक्षिप्त वर्णन–

सुजेचे दोन प्रकार आहेत. शरीराचे कोणत्यातरी एका भागांत सूज येणें व दुसरी सर्वांगाला सूज येणें त्या प्रत्येकांत पुन्हा वातज, पित्तक, श्लेष्मज असे तीन तीन प्रकार आहेत.

पुन्हा सुजेचे दोन प्रकार आहेत. एक निज व दुसरी आंगतुक कारणांनी आलेली त्यापैकी निजसुख म्हणजे आहार, विहार ऋतुर्मान इत्यादि कारणांनी दोष कुपित होऊन त्यांनी आलेली सूज होय व आंगतुक सूज म्हणजे बाहेरून आघात होऊन म्हणजे शस्त्र काठी आदिचा आघात होऊन किंवा विषारी पदार्थाचा स्पर्श झाल्यानेहि सूज येते.

वास्तविक पाहिले असतां शरीरांतील रक्ताभिसंचारणाला अडथळा उत्पन्न होऊन जागजागी रक्त साचल्यानें जसें कोऱ्या मडक्यांतले पाणी थंड थोडे थोडे पाझरते तसेच रक्ताचे अभिसरणाला अडथळा उत्पन्न झाल्यामुळें तेथील रक्त त्या रक्त वाहिनींत सांचते. त्या रक्ताचा कोंडमारा झाल्यामुळे त्या रक्तवाहिन्यांतून रक्तांतील द्रव रक्त-वाहिनीचे बाहेर म्हणजे बाहेरील त्वचा व आंतील मांस यांचे मध्ये सांचने, त्यामुळे त्या त्या जागी फुगोटींला सूज असे म्हणतात. हृदय आमाशय यांत विकृति झाली तर सूज वरचे भागावर येईल आंतडींतील भागांत विकृति झाली तर शरीराचे मधले भागांत सूज येईल. व खालचे म्हणजे अपान वायूचे स्थानांत विकृति झाली. म्हणजे पुरीषाशय व मूत्राशय यांत विकृति उत्पन्न होऊन त्या भागांतील रक्तभिसरणांत अडथळा उत्पन्न होऊन खालचे भागांत सूज उत्पन्न होईल हृदयाचे विकृतीमुळे सर्वांग शोथ उत्पन्न होतो.

सूज असलेल्या रोग्याला २–३ दिवस लंघन करण्यास सांगावें. दिवसांतून ४ वेळ अर्धा कप चहा प्रत्येक वेळीं द्यावा. कांही न घेतांच राहूं शकेल तर चहाहि देऊं नये. मनाचें समाधान म्हणून हलकें पेय एकादे वेळीं द्यावें. सुरुवातीस जुलाब देऊन प्रत्यक्ष अनुभविक चिकित्सा या सदराखाली याच अध्यायांत सांगितल्याप्रमाणें चिकित्सा करावी. आठवड्यांतून २ वेळ मूत्ररेचक चूर्ण द्यावें. लध्वी साफ होत राहिल्यानें स्रोतसाचा अवरोध कमी होऊन सूज कमी होईल. तो पाठ उदररोगांत दिला आहे.

सूजेकरितां स्रोतसाचा अवरोध कमी करण्याकरिता जलोदरारी हें कांही दिवस इतर औषधींबरोबर द्यावें. प्रत्येक मात्रेंत १ गुंज येईल, असें करावें. त्याशिवाय मूत्रकृच्छ्रांतक, आरोग्यवर्धिनी, पुनर्नवामंडूर व शिलाजित हीं औषधें सूजेवर उत्तम आहेत. मग तीं सर्वांगशोथ असो किंवा कांही भागावरील शोथ असो. यांत दररोज २ तोळे ताजें गोमूत्र गाळून घेतल्यास उत्तम पिण्याकरितां पाणी थोडें प्यावें; पण तें उकळी येईपर्यंत तापवून थंड केलेलें असावें. मीठ वर्ज्य करण्यास पुढें सांगितलें आहे.

२ शोथाचें संप्राप्तिपूर्वक रूप

रक्तपित्त कफान्वायुर्दुष्टो दुष्टान्बहिः शिराः ।
नीत्वा रुद्धगतिस्तैर्हि कुर्यान्मांस त्वगाश्रयम् ॥
उत्सेधं संहतं शोफं तमाहु निचयादतः । यो. र. भा. २ रा पा. २३१

स्वकारणानें कुपीत झालेला वायू कुपित झालेल्या रक्तपित्त व कफ ह्या दोषांना बाह्य शिरांत नेतो. त्यामुळे त्याचा मार्ग बंद होऊन तो कोंडला जातो. नंतर तो त्वचा व मांस यांचा आश्रय करून वर उचललो उंच अशी सूज उत्पन्न करितो. ही रक्तासह तीन्ही दोषांच्या समुदायानें होते. म्हणून त्याला त्रिदोषात्मक असें म्हणतात.

३ श्वयथु संप्राप्ति

बाह्याः सिराः प्राप्य यदा कफासृक् ।
पित्तानि संदूषयतीह वायुः ।
तैर्बद्धमार्गः स तदा विसर्पन् ।
उत्सेधलिंगं श्वयथुं करोति ॥ च. चि. अ. १२ पान ३५४

शरीरांतील वायु हा बाह्य शिरांमध्यें जाऊन कफ, रक्त व पित्त यांना दुषित करतो. तेव्हां दुषित कफ, रक्त व पित्तामुळे वायुच्या गतीला अवरोध होतो. व दुसरीकडे जाण्याला मार्ग न राहिल्यामुळे त्याच ठिकाणीं फुगोटी (उंचवटा) उत्पन्न होतो. तीच सूज होय.

४ सामान्य लक्षण

सगौरवंस्यादनवस्थितत्वं ।
सोत्सेधमूष्माथ सिरातनुत्वम्
सलोमहर्षश्च विवर्णताच
सामान्यलिगं श्वयथोः प्रदिष्टम् ॥ च. चि.अ. १२ पा. ३५६

सूजेंच्या स्थानीं जडता, अनवस्थितता (कमी जास्त प्रमाणांत दुखणें), उंचवटा आलेला, गरम वाटणें, शिरा पातळ होणें, रोमांच येणें, शरीराला विवर्णता येणें हीं शोथ रोगाचीं सामान्य लक्षणें होत.

५ सूज येण्याचीं स्थानें

दोषाः श्वयथुमूर्ध्वंहि कुर्वंत्यामाशयस्थिताः ।
पक्वाशयस्थामध्ये तु वर्चस्थानगतास्त्वधः ॥
कृत्स्नदेहमनुप्राप्ताः कुर्युः सर्वसरं तथा ॥ यो. र. भाग २ पा. २३५

आमाशयांत असलेले दोष शरीराच्या उर्ध्वभागांत सूज उत्पन्न करितात. पक्वाशयांतील दोष शरीराच्या मध्यभागीं सूज आणतात. मलाशयांतील दोष शरीराच्या खालच्या भागाला सूज आणतात. सर्व देहांत संचार करणारे दोष सर्वांगाला सूज उत्पन्न करितात.

६ स्थानपरत्वें असाध्यत्व

अनन्योपद्रवकृतः शोथः पादसमुद्भवगुह्यजो ।
पुरुषं हन्ति नारीं तु मुखजो गुह्यजो द्वयम् ॥ यो. र. शोथ पा. २३५

दुसऱ्या कोणत्या रोगावाचून आलेली पायावरील सूज मनुष्याला मारते. तोंडावर आलेली सूज स्त्रियांना मारते. गुप्तस्थानीं आलेली सूज दोघांनाहि मारते.

७ स्थानपरत्वें दोषपरत्वें चिकित्सा

यथामजं लंघन पाचनकर्म
विशोधनं रुल्बणदोषमादितः ।
शिरोगतं शीर्ष विरेचनैरधो ।
विरेचनैरूर्द्ध्वं हरैस्तथोर्ध्वजम् ॥
उपाचरेत् स्नेहभवं विरुक्षणैः
प्रकल्पयेत् स्नेहविधि च रूक्षजे ।
विबद्ध विट्केऽ निलजे निरुहणं
घृतं तु पित्तानिलजे सतिक्तम् ॥
पयश्च मूर्च्छा रति दाह तर्षिते
विशोधनीये तु समूत्रमिष्यते ॥
कफोत्थितं क्षार कटूष्ण संयुतैः ।
समुत्र तक्रासव युक्तिभिर्जयेत् ॥ च. चि. अं. पा. ३५८

सुरुवातीस आमज शोथांत लंघन देऊन पाचन क्रमानें, उल्बण दोषजन्य शोथांत विशोधन देऊन, शिरोगत रोगांत शिरोविरेचन देऊन, अधःशरीरगत शोथांत विरेचन देऊन ऊर्ध्वजशोथांत वमन देऊन, सूज कमी करावी. स्नेहपानाने उत्पन्न झालेली सूज रुक्ष बस्तिद्वारा, रुक्षताजन्य सूजेंत स्नेहन विधीनें चिकित्सा करावी. वातज शोथांत मलबद्धता असल्यामुळे निरुहबस्ति, पित्तज व वातज शोथांत तिक्तद्रव्य, साधित, घृत,

मूर्च्छा, अरति, दाह व तृषायुक्त सूजेंत दूध, पंचकर्मामुळे आलेल्या सूजेंत गोमूत्रासहित दूध फायदेशीर होते. कफामुळे आलेल्या सूजेंत क्षार, तिखट, उष्ण अशीं द्रव्यें व गोमूत्र घालून नक्रासव द्यावें.

८ शोथाची पंचकर्म चिकित्सा

लंघनं पाचनं शोथे शिर:काय विरेचनम् ।
वमनं च यथा सत्वं यथादोषं प्रकल्पयेत् ।। भै. र. वली पा. ५५६

शोथ रोगांत दोषानुसार व रोग्याचें बलाबल पाहून लंघन, पाचन, शिरोविरेचन व वमन आदि पंचकर्में केलीं पाहिजेत.

स्नेहोत्थ वातिके शोथे बद्धविट्के निरूहणम् ।
पयोघृतं पैत्तिके तु कफजे रुक्षणक्रम: ।। भै. र. वली

वांति व शोथांत स्नेहपान, कोष्ठबद्धताजन्य शोथांत निरुहबस्ति, पैत्तिक शोथांत दूध व घृतपान, कफज शोथांत रूक्ष क्रिया केली पाहिजे.

स्रोतोविबंधे मंदेऽग्नौ अरुचौ स्तिमिताशय: ।
क्षारचूर्णा सवारिष्ट मूत्र तक्राणि शीलयेत् ।। वा. भ चि. शोथ

स्रोतसांचा अवस्तंभ, अग्निमांद्य, अरुचि, कोठ्याची स्तब्धता या विकारावर क्षार, चूर्णे, आसवें, अरिष्टें, गोमूत्र व ताक यांचें सतत सेवन करावें.

९ सुजेवर पुनर्नवादि चूर्ण

पुनर्नवा दार्व्यमृता पाठा विश्वश्वदंष्ट्रिका ।
रजन्यौ द्वे बृहत्यौच पिप्पल्य श्चित्रकं वृष: ।।
समभागानि संचूर्ण्य गवांमूत्रेण वा पिबेत् ।
बहुप्रकारं श्वयथुं सर्वगात्रावसारिणम् ।।
हंति चाऽऽशूदराण्यष्टौ व्रणांश्चैवोद्धतानपि ।। यो. र. २४२

वसुची मुळी, दारुहळद, गुळवेल, पहाडमूळ, सुंठ, सराटे, हळद, दारुहळद, रिंगणीमूळ, डोरलीमूळ, पिंपळी, चित्रकमूळ, अडुळसा ह्यांचें समभाग चूर्ण करून तें गोमुत्राशीं प्यावें. हें सर्वांगावर येणाऱ्या अनेक प्रकारच्या सूजेचा नाश करिते. आठ प्रकारचीं उदरें व वाढलेले व्रण ह्यांचाहि नाश करिते.

१० सूजेवर विडंगादि चूर्ण

विडंग दंति कटुका त्रिवृच्चित्रक दारव: ।
व्योष: सकृष्णा त्रिफला समादेया ह्ययोरज: ।।
द्विगुणं तत्पिबेच्चूर्णं पयसा शोफशांतये ।। यो र. २४२

वावडींग, दात्रीमुळ, कुटकी, निशोत्तर, चित्रकमूळ, देवदार, सुंठ, मिरे, पिंपळी, गजपिंपली, हिरडा, बेहाडा, आवळगठी हीं औषधें समभाग आणि लोहभस्म २ भाग यांचेंचूर्ण दूधाशीं घ्यावें, म्हणजे सूज नाहीशीं होते.

११ शोथरोगावर गोमूत्र योग

गोमुत्रस्य प्रयोगो वा शीघ्रं श्वयथू नाशनम् ।
यवागू मानकंदंच प्रायशश्चाति शोथजित् ।। भैषज्य पा. ५५७

दररोज ताजें गोमूत्र ४ तोळे घेत गेल्यानें तसेंच खाण्यामध्यें पुनर्नवादि शोथ-नाशक औषधे घालून शिजविलेली यवागू दररोज घेतल्यानें सूज नाहीशीं होते. त्याच-प्रमाणें मानकंद दररोज सेवन केल्यानेंहि सूज नाहीशीं होते.

१२ आमशोथ चिकित्सा

सर्वत्र सर्वांगसरे दोषजे श्वयथौ पुरा ।
सामे विशोषितो भुक्त्वा लघुकोष्णांभसा पिबेत् ।।
नागरातिविषादारू विडंगेंद्रय वोषणम् ।।
अथवा विजयासुंठी देवदारू पुनर्नवम् ।
नवायसं वा दोषाढच: शुद्धे मूत्र हरीतकीः ।।
वराक्वाथेन कटुका कुंभायस्त्र्युषणाग्नि वा ।
अथवा गुग्गूलुं तद्वज्जतु वा शैलसंभवम् ।। वाग्भट शोथरोग पा. २५१

सर्व प्रकारच्या दोषज, सर्वांगव्यापी व आमावस्थेंतील सूजेवर प्रथम उपवास करावें. नंतर हलकें भोजन करावें. त्यावर गरम पाणी प्यावे. नंतर सुंठ, अतिविष, देवदार, वावडींग, इंद्रजव, मिरे यांचें किंवा हिरडे, सुंठ, देवदार व पुनर्नवा यांचें चूर्ण किंवा नवायस चूर्ण ऊन पाण्याबरोबर प्यावें. दोष फार वाढले असल्यास त्यांची शुद्धि होण्याकरितां गोमूत्रांतून हिरडयाचें चूर्ण द्यावे. किंवा कुटकी, निशोत्तर व त्रिकटु यांचें चूर्ण व मंडूरभस्म किंवा गुग्गुळ अथवा शिलाजित त्रिफळचाच्या काढयांतून द्यावा. (लघ्वी साफ होण्याचे औषध आठवडयांतून २ वेळा व निदान १ वेळ तरी जुलाब देत जावा.)

१३ सुजेवर लेप

पुनर्नवादारूशुंठी सिद्धार्थं शिग्रुमेवच ।
पिष्ठम्लैवाऽऽरनालेन प्रलेपः सर्वशोथजित ।। यो. र- भा. २ पा. २४८

वसूची मुळी, देवदार, सुंठ, मोहऱ्या, शेवग्याची साल हीं कांजींत वाटून त्याचा लेप करावा. तो सुजेचा नाश करतो. (लेप लावण्याचे अगोदर एकदा कडक शेकून टाकावे.)

१४ वातजन्य सुजेवर शुंठ्यादि काढा

शुंठीपुनर्नवैरंड पंचमूल शृतं जलम् ।

वातिके श्वयथौ पेयं भुक्तपाकेऽपि तन्मतम् ॥ यो. र. २३७

सुंठ, वसुची मुळी, एरंडमूळ, रिंगणीमूळ, डोरलीमूळ, सराटे, सालवण, पिठवण यांचा काढा वातजन्य सूजेवर प्यावा.

१५ पित्तजन्य सुजेवर काढा

क्षीराशिनः पित्तकृतेऽतिशोफेत्रिवृद् गुडूची त्रिफला कषायम् ।

पिबेत् गवांमूत्रविमिश्रितं वा फलत्रिका चूर्णं मथाक्षमात्रम् ॥

यो. र. २३८

निशोत्तर, गुळवेल, हिरडा, बेहाडा, आवळकंठी यांचा काढा पित्तजन्य सूजेवर प्यावा. अथवा त्रिफळयाचें चूर्ण गोमूत्र घालून प्यावें.

१६ पटोलादि काढा

पटोलत्रिफलारिष्ट दार्वीक्वाथः सगुग्गुलुः ।

हंति पित्तभवं शोथं तृष्णाज्वरसमन्वितम् ॥ यो. र. २३८

कडु पडवळ, हिरडा, बेहाडा, आवळकंठी लिंबाची साल, दारुहळद यांचा काढा गुग्गुळ घालून प्यावा. तो पित्तजन्य सूज, तहान, ज्वर यांचा नाश करतो.

१७ कफजन्य सूजेवर

पुनर्नवाद्विश्वत्रिवृद्गुडूची शम्याकपथ्यासुदारुकल्कम् ।

शोफे कफोत्थेऽक्षसमं समुत्रं क्वाथं पिबेद्वाऽप्यथ वैवतेषाम् ॥ यो.र. २३८

वसुची मुळी, सुंठ, निशोत्तर, गुळवेल, बहाव्याची शेंग, हिरडे व देवदार यांचा कल्क गोमूत्रांतून कफजन्य सूजेवर द्यावा. किंवा त्याच औषधींचा काढा करून द्यावा.

१८ सुजेवर शिलाजतु योग

शिलाव्हयञ्च त्रिफला रसेन ।

हन्यात् त्रिदोषं श्वयथुं प्रसह्य ॥ च. चि. अ. १२ पा. ३६२

शिलाजतु त्रिफळयाच्या काढयाबरोबर घेतला असतां त्रिदोषजन्य सूजेचा नाश करितो.

१९ शोथांकुशोरस

रसेंद्र गंधं मृतलोहताम्रं

नागं तथाऽभ्रं समसंख्यकंच ।

निर्गुंडिकास्फोतकपित्थचिंचा ।
पुनर्नवाश्रीफलकेशराजम् ।।
एषां रसैर्भावितमेकशश्च ।
कोलप्रमाणा वटिका विधेया ।
शोथज्वरारोचक पांडुरोगं ।।
सर्वांगशोथं विनिवारयेच्च ।
पित्तान्वितं वातभवं कफोत्थान् ।
शोथांकुशो नाम निहंति रोगान् ।। (भैषज्य रत्नावळी)
पान ५६१

शुद्ध पारा, शुद्ध गंधक, लोहभस्म, ताम्रभस्म, नागभस्म व अभ्रकभस्म हीं १-१ तोळा घेऊन प्रथम पारागंधकाची कज्जली करावी. त्यांत इतर वर सांगितलेलीं द्रव्यें टाकून खूप घोटावे. नंतर त्यांत निर्गुंडीपत्र, अस्फोता (हरफारेवडी), कवठें चिंच, पुनर्नवा, बेलाची साल व केशराज यांचे स्वरसांत अथवा काढचांत एक वेळ भावना द्यावी. नंतर त्याच्या एक एक गुंजेच्या गोळचा कराव्यात, त्या सुकल्यावर भरून ठेवाव्यात. हा शोथांकुशरस शोथ, ज्वर, आरोचक, पांडुरोग, सर्वांगशोथ, पित्तयुक्त वातानें उत्पन्न झालेला रोग, पित्तयुक्त कफानें उत्पन्न झालेले रोग हें सर्व रोग नष्ट करतो.

२० क्षेत्रपालरस

हिंगुलंच विषं ताम्रं लौहं तालं च टंकणम् ।
जीरकमहिफेनंच समभागं विमर्दयेत् ।।
यवार्धा वटिका कार्या पथ्यं दुग्धोदनं हितम् ।
अलवणं वारिहीनं दातव्यं भिषजां वरैः ।।
गुरुशोथ मग्निमांद्यं ग्रहणीमति दुस्तराम् ।
ज्वरंच विषमं जीर्णं नाशयेत् नात्रसंशयः ।।　　भै. शो. पा. ५६१

शुद्ध हिंगुळ, शुद्ध बचनाग यांचें चूर्ण, ताम्रभस्म, लोहभस्म, शुद्ध हरताळ, शुद्ध टांकणखार, जिऱ्याचें चूर्ण, शुद्ध अफू हीं प्रत्येकीं १-१ तोळा घेऊन सर्व एकत्र खलून, दुधांत घोटून त्याच्या अर्ध्या अर्ध्या गुंजेच्या गोळचा करून त्या सुकवाव्यात. सकाळीं व सायंकाळीं १-१ गोळी दुधाबरोबर सेवन करावी. खाण्याकरितां दुध व भात द्यावा. मीठ वर्ज्य, पाणी तापवून थंड केलेलें व तेंहि फारच थोडें घ्यावें. हा रस शोथ, अग्निमांद्य, दुर्धर ग्रहणी, विषमज्वर व जीर्णज्वर या सर्वांना नष्ट करतो.

२१ दुग्धवटी

अमृतं सूर्यगुंजं स्यादहिफेनं तथैव च ।
पंचरक्तिक लौहं च षष्ठिरक्तिकमभ्रकम् ।
दुग्धैर्गुंजाद्वयमिता वटी कार्या भिषग्विदा ।
दुग्धानुपानं दुग्धैश्च भोजनं सर्वथा हितम् ।।
शोथं नानाविधं हंति ग्रहणीं विषमज्वरम् ।
मंदाग्नि पांडुरोगंच नाम्ना दुग्धवटी परा ।
वर्जयेल्लवणं वारि व्याधिनिःशवताविधि ।। भै. र. व. पा. ५६२

शुद्ध बचनाग, शुद्ध अफू १२-१२ गुंजा, लोहभस्म ५ गुंजा, अभ्रकभस्म ६० गुंजा या सर्वांना खलांत दुधाबरोबर घोटून २-२ गुंजेच्या गोळ्या करून त्या सुकवून घ्याव्यात. सकाळ संध्याकाळ १-१ गोळी दुधाबरोबर घ्यावी. खाण्याकरितां फक्त दूध-भातच खावा. यानें सूज, ग्रहणी, विषमज्वर, मंदाग्नि, पांडुरोग हे रोग नाहीसे होतात. यांत मीठ मुळीच खाऊं नये.

२२ शोथारि लोह

अयोरजस्त्र्युषणयावशूकं चूर्णं च पीतं त्रिफलारसेन ।
शोथं निहन्यात्सहसा नरस्य यथाऽशनिर्वृक्षमुदर्वप्रवेगः ।।
भै. र. व. पा. ५६५

लोहभस्म ४ तो., सुंठ, मिरे, पिंपळी, यवक्षार हीं प्रत्येकीं १-१ तोळा घेऊन, त्याचें चूर्ण करून ठेवावें. हा शोथारिलोह २ ते ४ गुंज घेऊन त्रिफळाच्या काढ्याबरोबर घ्यावें. म्हणजे शोथरोग नाहीसा होतो.

२३ पुनर्नवादि गुग्गुळ

पुनर्नवादार्वभया गुडूची पिबेत्समूत्रां महिषाक्ष युक्ताम् ।
त्वग्दोषशोथोदरपांडुरोग स्थौल्य प्रसेकोर्ध्वकफामयेषु ।।
भा. र. व. पा. ५६५

पुनर्नवा, देवदार, हिरडा व गुळवेल या सर्वांना समप्रमाणांत मिळवून त्याचा काढा करून तो गाळून घ्यावा. त्यांत गोमूत्र २ तोळे, शुद्ध गुग्गळ १ मासा मिळवून ते दररोज घेतल्यानें त्वचेचे विकार, शोथ, उदर, पांडुरोग, स्थौल्य, लाळ गळणें, ऊर्ध्व भागांतील कफाचें विकार हे सर्व नाहीसे होतात.

२४ पुनर्नवासव

त्रिकटु त्रिफलां दार्वीश्वदंष्ट्रां बृहती द्वयम् ।
वासामेरण्डमूलंच कटुकी गजपिप्पलीम् ॥
शोथघ्नीं पिचुमर्दंच गुडूची शुष्कमूलकम् ।
दुरालभां पटोलंच पलांशेन विचूर्णयेत् ॥
धातकीं शोडशपलां द्राक्षायाः पलविंशतिम् ।
तुलामानां सितां दत्वा माक्षिकार्धं तुलां तथा ॥
जलद्रोणद्वये क्षिप्त्वा मासं भांडे निधापयेत् ।
पुनर्नवासवो ह्येष शोथोदर विनाशनः ॥
प्लीहानमम्लपित्तं च यकृद्गुल्मज्वरादिकान् ।
कृच्छ्रसाध्यामयान् सर्वान् नाशयेन्नात्रसंशयः ॥

भै. र. व. पा. ५६९

सुंठ, मिरे, पिंपळी, हिरडा, बेहाडा, आवळकंठी, दारुहळद, गोखरू, रिंगणी, डोरली, अडुळसा, एरंडमूळ, कुटकी, गजपिंपळी, पुननेवा, निंबाची साल, गुळवेळ, सुकलेला मुळा, धमासा, पडवळ हीं सर्व पांच पांच तोळे, धायटीचें फुलाचें चूर्ण ६४ तोळे, मनुका ८० तो., साखर ४०० तोळे (तुला), मध अर्ध तुला २०० तो. व पाणी २ द्रोण (४० शेर) घेऊन सर्वांना तूप लावलेल्या मोठ्या भांड्यांत घालावें व वरून झांकण ठेवून, संधि लेप करून धान्याच्या किंवा भुशाच्या राशींत एक महिनाभर पुरून ठेवावें. नंतर तें गाळून घेऊन मातीच्या भांड्यांत भरून ठेवावें. हे पुनर्नवासव, सूज, उदर, प्लिहावृद्धि, आम्लपित्त, यकृतवृद्धि, गुल्म, ज्वर व सर्व कृच्छ्रसाध्य रोगांचा नाश करते.

२५ तक्रवटी

रसस्य माषकं ग्राह्यं गंधकस्यच माषकम् ।
द्विमाषकं विषस्यापि ताम्र माषचतुष्टयम् ॥
तोलकं पिप्पली चूर्ण मंडुरस्य च तोलकम् ।
क्वाथेन कृष्णजीरस्य भावयेत् सदा सप्तवासरान् ।
वल्लप्रमाणं वटिकां तक्रेण सह पाययेत् ॥
तक्रेण भोजनं पानं लवणांभो विवर्जितम् ।
निहंति शोथं ग्रहणीं मंदाग्नि पांडुतामपि ॥

भै. र. व. पा. ५६९

शुद्ध पारद व शुध्द गंधक १-१ मासा घेऊन दोहोंची उत्तम कज्जली करून त्यांत बचनागचूर्ण २ मासे, ताम्रभस्म ४ मासे, पिंपळीचें चूर्ण तथा मंडूरभस्म १-१ तोळा त्यांतच मिळवून उत्तम घोटून काळचा जिऱ्याचें काढचांत ७ दिवस घोटावें, प्रत्येक दिवशीं काळे जिऱ्याचा काढा करून त्याला भावना द्याव्यात. आठवे दिवशीं दोन दोन गुंजेच्या गोळचा करून सुकवाव्यात. १—१ गोळी सकाळीं व संध्याकाळीं ताकाबरोबर घ्यावी. जेवण हलकें ताकाबरोबरच घ्यावें. पिण्याकरितांहि ताकच घ्यावें. पाणी व मीठ वर्ज्य करावें. ही तक्रवटी शोथ, संग्रहणी, मंदाग्नि व पांडुरोग यांचा नाश करिते.

२६ शोथारी रस

हिंगुलं जयपालं च मरिचं टंकणं कणाम् ।
समर्द्य वल्लः सघृतः सर्वशोथहरःपरः ।। भै. र. व. वा. ५६३

शुद्ध शिंगरूप, शुद्ध जेपाळ, मिरे, टांकणखार, पिंपळी समभाग घेऊन बारीक चूर्ण करून पुनर्नवादि शोधघ्न औषधींच्या रसांत किंवा काढचांत मर्दन करून ३-३ गुंजेच्या गोळचा करून सुकवाव्यात. १-१ गोळी तूपाबरोबर घ्यावी. यानें सर्व प्रकारची सूज नाहीशीं होते.

२७ आरोग्यवर्धिनी

रसगंधक लोहाभ्र शुल्बभस्म समांशकम् ।
त्रिफला द्विगुणा योज्या त्रिगुणं तु शिलाजतु ।।
चतुर्गुणं तत् पुरं शुद्धं चित्रमूलं च नःसमम् ।
तिक्ता सर्व समाज्ञेया सर्वं संचूर्ण्य यत्नतः ।
निंबवृक्ष दलांभोभिर्मर्दयेत् द्विदिनावधिः ।
ततस्तु वटिकाः कार्या राजकोल फलोपमाः ।।
मंडलं सेविता सैषा हन्ति कुष्ठान्यशेषतः ।
वातपित्त कफोद्भूतान् ज्वरान् नानाप्रकारजान् ।
देया पंचदिने जाते ज्वरे रोगे घटी शुभा ।
पाचनी दीपनी पथ्या हृद्यामेदोविनाशिनी ।।
मलशुद्धि करी नित्यं दुर्धर्षक्षुत्प्रवर्तिनी ।
बहुनाऽत्र किमुक्तेन सर्वरोगेषु शस्यते ।।
आरोग्यवर्धिनी नाम्ना गुटिकेऽयं प्रकीर्तिता ।
सर्वरोगप्रशमनी श्रीनागार्जून योगिना ।। र. च.

पारा, गंधक, लोहभस्म, अभ्रकभस्म व ताम्रभस्म हीं द्रव्यें समभाग घेऊन सर्वांचा एकत्र खल करावा. नंतर त्यांत त्रिफळाचूर्ण २ तो., शिलाजित ३ तोळे, गुग्गुळ ४ तोळे आणि चित्रकमूळाचें चूर्ण ४ तोळे घालून सर्वांच्या बरोबरीनें कुटकीचें चूर्ण घालावें. मग सर्वांचा चांगला खल करावा. नंतर बोराएवढचा गोळचा कराव्यात. त्या गोळचा बेचाळीस दिवस सेवन केल्या असतां सर्व कुष्ठांचा नानाप्रकारच्या त्रिदोषजन्य ज्वरांचाहि नाश होतो.ज्वराला ५ दिवस झाल्यावर गोळचा देण्यास सुरुवात करावी. ह्या पाचक, अग्निदीपक, पथ्यकारक, हृदयाला हितावह, मेदोनाशक, मलशुद्धिकारक आणि अत्यंत क्षुधावर्धक आहे. फार काय सांगावें ? हें सर्व रोगावर देण्यास योग्य आहे. ही सर्व रोगनाशक, आरोग्यवर्धिनी गुटिका नागार्जून मुनीनें सांगितली आहे.

२८ गोमुत्रमंडूर

गोमूत्रसिद्धमंडूरं सुरभीरसभावितम् ।
माणकार्द्रक कंदानां रसेष्वपिच भावयेत् ।।
त्रिफलाकटु चव्यानां चूर्ण पाणितलद्वयम् ।
क्षिपेत्सुसिद्धे पाके तु मधुनश्च पलद्वयम् ।
निहंति सर्वजं शोफं सर्वांगं च विशेषतः ।। यो. र. २४३

मंडूर गोमूत्रांत शिजवून त्याला तुळशींच्या रसाची भावना द्यावी. तसेंच मानकंद व आलें यांच्याहि रसाच्या भावना द्याव्यात. म्हणजे त्या रसांत मंडूर शिजवावा. नंतर त्यांत त्रिफळा, सुंठ, मिरे, पिंपळी, चवक ह्यांचें २-२ तोळे चूर्ण घालून तें चांगलें शिजल्यावर त्यांत मध ८ तोळे घालून ठेवावा. हा गोमूत्रमंडूर सर्व अंगावरील सर्व प्रकारची सूज नाहीशी करतो.

२९ तक्रादि योग

तक्रं पिबेद्वा गुरुभिन्न वर्चाः सव्योष सौवर्चल माक्षिकंच ।
यो. र. पा. २४६

ज्या सूजेच्या रोग्याला जडत्व व मळ पातळ होणें हे विकार होतात. त्यानें सुंठ, मिरे, पिंपळी, पादेलोण व मध हे सर्व घालून ताक प्यावें.

३० सूजेवर पुनर्नवादि स्वेद

पुनर्नवाग्नि निर्गुंडी पलितैरंडजैर्दलैः ।
सहचरैजश्चलं तप्तं तत्स्वेदः शोफहामतः ।। यो. र. २५१

वसुची मुळी, चित्रकमूळ, निर्गुडीचा पाला, गुग्गुळ, एरंडीचीं पानें, कोरांटी ह्या औषधी पाण्यांत कढवून पाणी अर्धें राहिलें म्हणजे त्याचा वाफारा द्यावा.

३१ सूजेवर अर्कादि लेप

सेकस्तर्थाऽर्क वर्षाभू निंबक्वाथेन शोफजित ।
गोमुत्रेणापि कुर्वीत सुखोष्णेनावसेचनम् ।
सौवर्चल समं धृष्टं सर्षपैश्च प्रलेपनम् । यो. र. २४०

रुई, वसूची मूळी, लिंबाची साल, यांचा काढा करून सुजेवर शिपावा. तो सूजेचा नाश करितो. ऊन, ऊन गोमूत्रहि सुजेवर शिपावें. मोहऱ्या व पादेलोण वाटून त्याचा सुजेवर लेप करावा.

३२ शोथरोगांत प्रत्यक्ष अनुभविक चिकित्सा

शोथरोगावर पहिल्यानें इच्छाभेदी २ गुंजा गरम दुधांतून द्यावी. त्यानें ३-४ वेळ शौचास होईल. दुसरे दिवशीं पंचकर्म व चिकित्सेला एकदमच सुरुवात करावी.

सकाळीं-तूप २॥' तोळे, सैंधव १ मासा, मध ३ मासे हो सर्व कपभर गरम पाण्यांत मिसळून पिण्यास द्यावें.

दुपारीं २ वाजतां व रात्रीं ८ वाजतां खालील औषध द्यावें.

१ मूत्रकृच्छ्रांतक २ गुं.
२ आरोग्यवर्धिनी ३ गुं.
३ पुनर्नवामंडूर ३ गुं.
४ लोकनाथरस ४ गुं.

२ पुड्या. पुनर्नवासव ·॥· तोळा, तितकेंच गरम पाणी घालून त्यांत वरील औषधींची १ पुडी मिसळून द्यावी. याप्रमाणें सकाळीं तूप, सैंधव, मध, मिश्रण करून व दुपारी-रात्री वरील पुड्या पुनर्नवासवांतून द्याव्यात. व रात्रीं १० वाजतां मूत्ररेचक चूर्ण १॥' मासा पाण्याबरोबर द्यावें. याप्रमाणें पांच दिवस चालू ठेवावें.

त्यानंतर सकाळीं-कृमिनाशक म्हणून-

पळसपापडी ८ गुं.
कृमिकुठार २ गुं.
गूळ १६ गुं.

दोहोंचें चूर्ण करून त्यांत मिसळून द्यावें.

त्यानंतर सायंकाळीं-

निर्गुडी, माका, एरंडमूळ, पुनर्नवा यांचा काढा करून, सर्व अंगास वाफारा द्यावा.

गेळफळ ३ मासे
सैंधव १ मासा
मध १॥ मासा

कपभर गरम पाण्यांत मिसळून द्यावें. यानें २ वांत्या होतील.

दुसरे दिवशीं सकाळीं पुन्हा इच्छाभेदी गरम दूधांतून द्यावी. त्यानें २-३ जुलाब होतील.

त्याचे दुसरे दिवसापासून सकाळीं, दुपारीं व सायंकाळीं खालीलप्रमाणें औषध सुरू करावे.

मूत्रकृच्छ्रांतक ३ गुं.
आरोग्यवर्धिनी ४ गुं.
पुनर्नवामंडूर ६ गुं.
लोकनाथरस (यकृतावरील) ३ गुं.

यांच्या ३ पुड्या पुनर्नवासव ·।· तोळा, तितकेंच गरम पाणी घालून ३ वेळेस ३ पुड्या द्याव्यात व रात्रीं मूत्ररेचक चूर्ण १।· मासा गरम पाण्यांतून द्यावें.

याप्रमाणें दिवसांतून ४ वेळ असे १६ दिवस तेंच औषध द्यावें. मध्येच ८ दिवसांनी पुन्हां वरीलप्रमाणें जुलाबाचें औषध द्यावें व आठवड्यांतून २ वेळ मूत्ररेचचूर्ण १ मासा देत जावे.

डोकें जास्त दुखत असेल किंवा सूज असेल तर वरील औषध चालू असतांना नस्य द्यावें. रोगाचा जोर पाहुन दररोज दिवसांतून एक वेळ नस्य द्यावें.

योग नं. २

१) मूत्रकृच्छ्रांतक ४ गुं.
२) मृगश्रृंग ६ गुं.
३) शुद्ध कुचलाचूर्ण ८ गुं.

४ पुड्या. पुनर्नवादि काढ्यांतून ४ वेळ द्याव्यात.

योग नं, ३

शिलाजतू ८ गुं.
पुनर्नवामंडूर ८ गुं.

४ पुड्या. पुनर्नवासवांतून द्यावें.

ताम्रभस्म ३ गुं.
जवखार ९ गुं.

शंखवटी ६ „

३ पुड्या पुनर्नवासवांतून देणें.

त्र्युषणादिलोह ३ गुं.

आपामार्गक्षार ६ गुं.

पुनर्नवाक्षार ६ गुं.

नवसागर ३ गुं.

३ पुड्या गोमूत्रांतून देणें.

कोणताहि योग चालू असला तर आठवड्यांतून २ दिवस मूत्ररेचक चूर्ण व एकदां तरीं जुलाबाचें औषध देत जावें.

शोथाचे उपद्रव

श्वासः पिपासा दौर्बल्यं ज्वरच्छर्दिररोचकः ।

हिक्कातीसार कासाश्च शोथिनं क्षपयंतिहि ।। यो. र. भा. २ पा. २३६

श्वास, तहान, अशक्तपणा, ज्वर, ओकारी, अरुचि, उचकी, अतिसार व खोकला हीं लक्षणें सूजेच्या रोग्याला मारतात.

कष्टसाध्य शोथ

पादप्रवृत्तः श्वयथुर्नृणां यः प्राप्नुयान्मुखम् ।

वक्त्रांत अधस्ताद्यो याति बस्ति तस्य न सिध्यति ।।

पायापासून उत्पन्न होऊन तोंडाकडे जाणारी जी सूज ती रोग्याला मारते. त्याचप्रमाणें तोंडाकडून बस्तीकडे जाणारी जी सूज तीहि साध्य होत नाही.

३३ शोथावर लेप

१. चित्रक, बोळ, गुग्गुळ, पुनर्नवा, भारशिंग, मनशीळ, शिंगरूप यांपैकी मिळतील तीं द्रव्यें थोडे थोडे उगाळून पळींत घालून, त्यांत थोडें पाणी घालून शिजवावें थोडे घट्ट झाले म्हणजे गरमगरमच लावावें. लेप लावण्याचे अगोदर सुजेच्या जागेवर त्याला कडक शेकून घ्यावें.

देवदार, गुग्गुळ, सुंठ, निंबाची साल हीं सर्व गोमूत्रांत उगाळून त्याचा सुजेवर लेप करावा.

३. वसू. मोहऱ्या, कोष्ट, गुग्गुळ, शेवग्याची साल उगाळून करम करून त्याचा लेप करावा.

३४ सूजेवर पथ्यकारक आहार

पहिले ४–५ दिवस दूध व चहा यावरच ठेवावें. नंतर पातळ साबुदाणा दूध, चहा हे योग्य प्रमाणांत द्यावें. ८ दिवसानंतर सूज अर्धी कमी झाली असल्यास जुन्या तांदुळाचा भात ताक द्यावें.

शोथरोगांत पथ्य

पुरातनाः शालियवाः कुलत्था मुग्दाश्च गोधाऽपिच शल्लकोऽपि ।
भुजंगभुक्तित्तिरिताम्रचूड लाबादयोजांगलविष्किराश्च ।।
कूर्मोऽपि श्रृंगी प्रपुराण सर्पिस्तक्रं सुरा माक्षिकमांसवश्च ।
निष्पाव काठिल्लक रक्तशिग्रू रसोन कर्कोटक बालमूलकन् ।
पुनर्नवं गृंजनकं पटोलं वेत्राग्रधात्रीफलमूलकानि ।
यथामलं पथ्यमिदं प्रयुक्तं शोफामयं सत्वरमुच्छिनत्ति ।। योगरत्नाकर

जुन्या साळी, सातु, हुलगे, मूग हीं धान्यें, घोरपड, साळी, तित्तिरपक्षी, कोंबडा व लावा वगैरे जांगल व विष्किर (पायानें उकरणारे प्राणी, कासव, शृंगी जातीचा मासा, फार दिवसाचे जुने तूप, ताक, मद्य, मध. आसव, पावटे, कर्टुले, तांबडा शेंवगा, लसून, कारलीं, कोवळा मूळा, घेटुळी, तांबडा मूळा, पडवळ, वेताचे कोंब, आवळकंठी, आवळे व मुळे, ह्या दोषानुरूप पथ्यकारक पदार्थांची योजना केली असतां सूजेचा त्वरित नाश होतो.

३५ शोथांत अपथ्य

ग्राम्याघ्मानूपं पिशित लवणं शुष्कशाकं नवान्नम् ।
गौडं पिष्टान्नं दधितिलकृतं विज्जलं मद्यमम्लम् ।।
धाना वल्लूरं समशनमथो गुर्व्यं सात्म्यं विदाहि ।
स्वप्नं चा रात्रौ श्वयधुगदवान् वर्जयेन्मैथुनंच ।। च. चि. अं क पा. ३५८

ग्राम्य, जलज, आनूप पशुपक्ष्यांचें मांस, लवण, वाळलेल्या भाज्या, नवीन धान्य, गुळाचे पदार्थ, पिठाळ पदार्थ, दही, तीळ यांचे पदार्थ, पिच्छिल पदार्थ, मद्य, आम्ल द्रव्यें धानाच्या लाह्या, सुकलेलें मांस व अपथ्यपदार्थ एकत्र करून खाणें गुरू, असात्म्य, दाहकारक पदार्थ, दिवसा निजणें, हे सर्व सूज असलेल्या रोग्यानें वर्ज्य करावें. तसेंच मैथुनहि वर्ज्य करावें.

३६ पिण्याकरिता पाणी

उकळी येईपर्यंत तापवून थंड केलेलें असें पाणी पिण्यास द्यावें, पण फारच थोडें द्यावें.

——

अर्श चिकित्साप्रकरण

अध्याय १८ वा

१ अर्शाची व्याख्या

अरिवत्प्राणिनो मांसकीलका विशसंति यत् ।
अर्शांसि तस्मादुच्यंते गुदमार्गनिरोधतः ।। यो. र. ४८४

गुद मार्गाचा रोध करणारे मांसाचे मोड शत्रुप्रमाणें मनुष्याला पीडा देतात, म्हणून त्यांना अर्श असें म्हणतात.

२ मुळव्याधीचें स्वरूप

दोषास्त्वंमासमेदांसि संदूष्य विविधाकृतीन् ।
मासांकुरान पानादौ कुर्वन्त्यर्शांसि तान्जः ।। यो. र. ४८४

कुपित झालेले वातादि दोष गुदादिकांचे ठायी त्वचा, मांस, मेद यांना दूषित करून नाना प्रकारचे मांसाचें अंकुर उत्पन्न करितात. त्यांना अर्श (मूळव्याध) असें म्हणतात.

३ अर्शाचे प्रकार

पृथग्दोषैः समस्तैश्च शोणितात्सहजानि च ।
अर्शांसि षट्प्रकाराणि विद्यादुदवलित्रये ।। यो. र. ४८४

वातादि ३ दोषांनी वेगवेगळे ३ त्रिदोषांपासून १ रक्तदोषांमुळे, १ सहज (जन्मतः) असणारा, असें मूळव्याधीचे सहा प्रकार गुदाच्या तीन्ही वळयाचे ठिकाणी होतात.

४ अर्शावर श्रेष्ठ चिकित्सा

दुर्नाम्नां साधनोपायश्चतुर्धा परिकीर्तितः ।
भेषजक्षारशस्त्राग्नि-साध्यत्वादाद्य उच्यते ।। भै. र. २१०

अर्श रोगाचा नाश करण्यासाठीं चार प्रकारची चिकित्सा केली जाते. जसें चूर्ण, वटी, क्वाथ, अरिष्ट, रस, भस्म, इत्यादि औषधी चिकित्सेने शरीरांतील दोष नाहीसे केल्यानें या चिकित्साद्वारा अर्शाचा समूळ नाश होतो. तसेंच पुन्हा उत्पत्ती होत नाही.

मोडांचा नाश करण्यासाठीं क्षारपातन, शस्त्राने छेदन व अग्नीने दाह. या चार चिकित्सेमध्यें श्रेष्ठ व निरुपद्रव होण्यासाठीं औषधी चिकित्सेचें वर्णन केलें आहे.

५ मूळव्याधीवरील चिकित्साक्रम

स्नेहस्वेदादयो वाते पित्ते स्यू रेचनादयः ।
कफे वान्त्यादयोऽर्शःसु मिश्रे मिश्रा प्रतिक्रिया ।
पित्तवद्रक्तजे कार्यः प्रतिकारोऽर्शसि ध्रुवम् ।। यो. र. ४९२

वातज मुळव्याधींवर स्नेहन, स्वेदनादि उपचार करावेत. पित्तजन्य मूळव्याधीवर रेचन वगैरे उपचार करावेत, कफजन्य मूळव्याधीवर वमनादि उपचार करावेत, मिश्रजन्य मूळव्याधीवर मिश्र चिकित्सा करावी आणि रक्तजन्य मूळव्याधीवर पित्त-जन्य मूळव्याधीप्रमाणें चिकित्सा करावी.

६ रक्तार्शावर कृष्णतिलकल्क (रक्तार्श)

सशर्करं कृष्णतिलस्य कल्कं
बस्तीपयोभिः पिबति प्रभाते ।
सद्यो हरत्येव गुदोत्थरक्तं
योगोऽयमुक्तो गिरीषप्रयुक्तः ।। भै. र. २२४

काळे तीळ १ तोळा घेऊन ते दगडावर बारीक करावेत व त्यांत १ तोळा साखर घालावी. ते दररोज प्रातःकाळीं सेवन करावे व बकरीचें दुध प्यावें. या योगानें मोडां-तून गळत असलेलें रक्त ताबडतोड थांबते.

७ अर्शावर पथ्यादिक्वाथ

पथ्योषण विडङ्गाग्नि यवानी विश्वभेषजम् ।
कषायः शूल दुर्नाम बिबन्धाध्मान सूदनः ।। भै. र. २१५

हिरडा, मिरे, वावडींग, चित्रकमूळाची साल, ओवा व सुंठ यांचा काढा शूळ, अर्शं विबंध, तसेच अध्मान यांचा नाश करतो.

८ भल्लातकादि मोदक

भल्लातकं तिलं पथ्या चूर्णं गुडसमन्वितम् ।
मोदकं भक्षयेन्माषत्रयं पित्तार्शसं जयेत् ।। भै. र. २१७

शुद्ध बिब्याचें चूर्ण १ पळ, काळचा तिळाचें चूर्ण १ पळ, हरीतकीचूर्ण १ पळ व सर्व चूर्णाचें दुप्पट जुना गूळ घेऊन मोदक तयार करावेत. पित्तजन्य अर्शावर ३ मासे हे मोदक सेवन करावेत.

९ कांकायन गुटिका

पथ्यादलस्य पलपंचकमेकमेव ।
मेकं पलं तु मरिचादपिजीरकस्य ॥
कृष्णातदुद्भवजटाचविकाग्निशुंठ्यः ।
कृष्णादिपंचकमिदं पलतः प्रबद्धम् ॥
पलाष्टभल्लातक संप्रयुक्तं ।
कंदस्वरुष्करफलाद्द्विगुणः प्रकल्प्यः ॥
स्याद्यावशूक कुडवप्रमितः समस्तै ।
र्योज्यो गुडो द्विगुणितो वटकी कृतश्च ॥
कांकायनेन मुनिना वटकः किलाय ।
मुक्तः प्रजाहित तमेन गुदामयघ्नः ॥
क्षाराग्नि शस्त्र पतनैरपि येन सिद्धाः ।
सिघ्यंतनेन वटकेन गुदामयास्ते ॥ यो. र. ४९३

हिरडेदळ २० तोळे, मिरे ४ तोळे, जिरे ४ तोळे. पिंपळी ४ तोळे, पिंपळमूळ ८ तोळे, चवक १२ तोळे, चित्रक १६ तोळे, सुंठ २० तोळे, बिबे ३२ तोळे, सुरणकंद ६४ तोळे, जवखार ८ तोळे व सर्वांचे दुप्पट गूळ घेऊन त्याच्या गोळचा कराव्यांत. ह्या गोळचा लोकांचें कल्याण व्हावें, या इच्छेने कंकायनमुनींनी सांगितल्या आहेत. ह्या मूळव्याधीनाशक आहेत. क्षार, अग्निकर्म, शस्त्रक्रिया ह्या उपायांनी जी मूळव्याध बरी होत नाही, ती या गोळचांनी बरी होते.

१० समशर्कर चूर्ण

शुण्ठीकणामरिचनागदलत्वगेलं ।
चूर्णीकृतं क्रमविवर्धितमूर्ध्वमन्त्यात् ।
खादेदिदं समसितं गुदजाग्निमान्द्य ।
गुल्मोदरश्वयथु पाण्डुगुदोद्भवेषु ॥ यो. र. ५००

वेलदोडयाचे दाणे १ भाग, दालचिनी २ भाग, विडयाचीं पानें ३ भाग, मिरी ४ भाग, पिंपळी ५ भाग, सुंठ ६ भाग याप्रमाणें औषध घेऊन त्याचें चूर्ण करून त्या चूर्णाच्या बरोबरीने साखर घालून मूळव्याध, अग्निमांद्य, गुल्म, उदर, सूज, पांडुरोग या विकारांवर द्यावें. यास समशर्करचूर्ण असें म्हणतात.

११ व्योषाद्य चूर्ण

व्योषाग्न्यरुष्कर विडंगतिलाभयानां ।
चूर्णं गुडेन सहितं सततं प्रयोज्यम् ।

दुर्नामशोफगरकुष्ठशकृद्विबन्ध ।
मग्नेर्जयत्यबलतां कृमिपाण्डुतां च ।
चूर्णे चूर्णसमो देयो मोदके द्विगुणो गुडः ।। यो. र. ५००

सुंठ, मिरी, पिंपळी, चित्रकमूळ, बिबे, वावडींग, तीळ, बाळहिरडे यांचें चूर्ण गुळाबरोबर नेहमी घ्यावें. तें मूळव्याध, सूज, विषबाधा, कुष्ठ, मलबद्धता, अग्निमांद्य कृमि, पांडुरोग यांचा नाश करिते, हें चूर्ण घ्यावयाचें असेल त्यावेळीं चूर्णा बरोबरीनें गूळ, घ्यावा. आणि गोळ्या करावयाच्या असल्यास गूळ दुप्पट घ्यावा.

गुडेन शुण्ठीमथवोप कुल्यां पथ्यां तृतीयामथ दाडिमं च ।
आमेष्वजीर्णेषु गुदामयेषु वर्चोविबन्धेषु च नित्यमद्यात् ।। यो. र. ५०१

सुंठ, पिंपळी, हिरडेदळ, डाळिंब (कोवळे) यांचें चूर्ण गूळाशीं घ्यावें. तें आमाशय, अजीर्ण, मूळव्याध व मलबद्धता या विकारावर नित्य द्यावें.

शर्करया युतसूरणकन्दः कुंजरकेसरमेव तथाऽन्यत् ।
क्षौद्रयुतं नवनीतमथो वा सूदनकारणमर्शस एव ।। यो. र. ५०१

सुरणाचा कांदा साखरेशीं घ्यावा किंवा मधांतून अगर लोण्यांतून घ्यावा. तो मूळव्याधीचें विकारावर हत्तीला सिंहाप्रमाणें आहे.

विड्विबन्धे हितं तक्रं यवानीविश्वसंयुतम् ।
न प्ररोहन्ति गुदजाः प्रायस्तक्रसमाहताः ।। यो. र. ५०२

मळाचा खडा होत असल्यास त्यावर सूंठ, ओवा घालून तयार केलेलें ताक हितावह आहे. ताकाच्या सेवनानें नाहीसे झालेलें मोड पुन्हा होत नाहीत.

यो जातो गोरसः क्षीराद्वह्निमूलावचूर्णितात् ।
पिबंस्तमेव तेनैव भुंजानो गुदजाञ्जयेत् ।। यो. र. ५०२

चित्रकमळाचें चूर्ण घालून तापविलेल्या दुधाचें ताक करून तें प्यावें. व त्यानेंच जेवण करावें, म्हणजे मूळव्याधीचा नाश होतो.

पिबेदहरहस्तक्रं निरन्नो व ।प्रकामतः ।
सप्ताहं वा दशाहं वा मासार्धं मासमेव वा ।। यो. र ५०२

मूळव्याधीच्या मनुष्यानें अन्न न खातां, सात दिवस, दहा दिवस, पंधरा दिवस किंवां महिनाभर इच्छेला वाटेल तितकें ताकच पिवून रहावें.

बलकालविकारज्ञो भिषक् तक्रं प्रयोजयेत् । यो र. ५०२

बल, काल, विकार या संबंधी पूर्ण माहिती करून घेऊन वैद्यानें ताकाची योजना करावी.

हरीतकीं तक्रयुतां त्रिफलां वा प्रयोजयेत् ।।
चित्रकं हपुषां हिंगु दद्याद्वा तक्रसंयुतम् ।

पंचकोलयुक्तं वा तक्रेणैव प्रदापयेत् ॥ यो. र. ५०२

हिरडयाचें चूर्ण अथवा त्रिफळयाचें चूर्ण ताकाशीं द्यावें, तसेंच चित्रकमूळ, शेरणी, हिंग यांचें चूर्ण ताकाशीं द्यावें किंवा पंचकोलाचें चूर्ण ताकाशीं द्यावें.

तक्रेणार्शांसि हन्यन्ते मुसलीकटुकाग्निना । यो. र. ५०३

मुसळी, कुटकी व चित्रकमूळ यांचें चूर्ण घालून ताक प्यावें, तें मूळव्याधीचा नाश करितें.

अरलुत्वगग्निससुरेंद्रयवाश्चिरबिल्बसैंधवशुंठीयुतान् ।
मथितेन पिबेद्यदि सप्त दिनं गुदजा निपतन्ति समूलबलाः ॥ यो. र. ५०३

टेटुच्या मूळाची साल, चित्रकमूळ, इंद्रजव, करंजाची साल, सैंधव, सुंठ, यांचें चूर्ण ताकाशीं सात दिवस घेतलें असतां मूळव्याधीचे मोड मूळासकट गळून पडतात.

१२ रक्ती मुळव्याधीवर काढा

(१) रक्तचंदन, चिराईत, धमासा, सुंठ, दारुहळद, दालचिनी, कडुनिंब यापैकी कोणताहि एक काढा करून द्यावा. १४ दिवसांत गुण येतो.

१३ अर्शावर तक्र प्रयोग

विड्विबंधे हितं तक्रं यमानीविडसंयुतम् ।
वातश्लेष्मार्शसां तक्रात् परं नास्तीह भेषजम् ॥
तत्प्रयोज्यं यथादोषं सस्नेहं रुक्षमेव वा ।
न विरोहन्ति गुदजाः पुनस्तक्र समाहताः ॥ भै. र. २१३

अर्श रोगांत कोष्ठबद्धता झाल्यावर ओव्याचें चूर्ण ३ मासे तसेच बीडलोण ।॥ तोळा ताकामध्यें घालून भोजनोत्तर प्यावें. वातकफयुक्त अर्शावर ताकाशिवाय दुसरें श्रेष्ठ औषध नाही. दोषानुरूप ताक स्नेहासह अगर स्नेहरहित या दोन्ही तऱ्हेने घेतलें जाते. अर्थात वातोल्वण अर्शावर स्नेहयुक्त (तूप काढल्याशिवाय) तसेंच श्लैष्मिक अर्शामध्यें स्नेहरहित (तूप काढलेलें) ताकाचा उपयोग करावा. ताकाचा प्रयोग केल्यानें एकदां नष्ट झालेलें गुदांकुर पुन्हां उद्भवत नाहोत.

१४ अर्शावर गुडाभयाप्रयोग

पित्तश्लेष्म प्रशमनी कच्छुकण्डूरुजाऽपहा ।
गुदजान्नाशयत्याशु योजिता सगुडाऽभया ॥ भै. र. २१३

एक तोळा जुना गुळ घेऊन त्यांत अर्धा तोळा हरितकीचूर्ण मिळवून ते गरम अगर थंड पाण्याबरोबर रोज सेवन करावें. ही गुळयुक्त हरीतकी पित्त व कफ, प्रकोप व ओली खरूज, कंडु, वातवेदना आणि सर्व प्रकारचे अर्श यांचा नाश करते.

१५ अर्शावर तिलभल्लातकादि योग

तिलभल्लातके पथ्या गुडश्चेति समांशिकम् ।
दुर्नाम कासश्वासघ्नं प्लीहपाण्डुज्वरापहम् ।। भै. र. २१४

काळ्या तिळाचें चूर्ण, शुद्ध बिब्याचें चूर्ण, हिरड्याचें चूर्ण व जुना गुळ हे सर्व समभाग घेऊन एकत्र घोटावें. त्याची चार माशाची गोळी तयार करावी. हा तीलभल्लतकादि प्रयोग दररोज सेवन केल्यानें अर्श, कास, श्वास, प्लीहावृद्धि पांडु आणि ज्वर नाहीसा करतो.

१६ अर्शावर तिलारुष्कर प्रयोग

तिलारुष्कर संयोगं भक्षयेदग्नि वर्द्धनम् ।
कुष्ठरोगहरं श्रेष्ठमर्शसां नाशनं परम् ।। भै. र. २१४

काळे तीळाचें चूर्ण, तसेच शुद्ध बिब्याचें चूर्ण हीं दोन्ही समभाग घेऊन प्रतिदिन अर्धा ते १ तोळा ताक, कोमट दूध अथवा थंड पाण्याबरोबर सेवन करण्यानें अग्नीची वृद्धि होते. तसेच अठरा प्रकारचे कुष्ठरोग व सहा प्रकारचे अर्श नाहीसे होतात.

१७ नवनीतादि प्रयोग रक्तार्श

नवनीततिलाभ्यासात् केशरनवनीत शर्कराऽभ्यासात् ।
दधि सर मथिताभ्यासात् गुदजाः शाम्यन्ति रक्तवहाः ।। भै. र. २२३

१८ मुळव्याधीवर योग

कलमी व सोरा १-१ तोळा, रसोत १ तोळा मुळाच्या रसांत घोटून हरबऱ्याएवढ्या गोळ्या कराव्यात. सकाळीं व सायंकाळीं १ ते ४ गोळ्या ताकांत मिसळून खाव्यात. तिखट, तेल, गुळ आणि गरम पदार्थ सात दिवस वर्ज्य करावेंत.

१९ मुळव्याधीवर रस

बोलपर्पटी, बोलबद्धरस, नित्योदितरस, अर्शकुठार, ताप्यादिलोह, नागभस्म, माक्षिक, रौप्यभस्म यापैकी कोणतींहि तीन औषधें योग्य प्रमाणांत एकत्र करून तीं अभयारिष्टांतून सकाळ-संध्याकाळ घेणें.

२० रक्तार्शावर योग

(१) दोन तोळे काळ्या तिळाचें चूर्ण, एक तोळा लोण्यांत मिळवून तें दररोज सेवन केल्यानें रक्तस्राव होणारे मोड नाहीसे होतात.

(२) नागकेशर अथवा कमलकेशर यांचें चूर्ण ६ मासे, लोणी २ तोळे, व २ तो. साखर हे तीन्ही एकत्र करून दररोज सकाळीं सेवन केल्यानें रक्तस्रावयुक्त गुदांकुर नष्ट होतात.

(२) दह्याचावर जमलेली स्निग्धयुक्त निवळी किंवा मलई यांत थोडें पाणी घालून घुसळावे व तें दररोज सेवन करावें, त्यामुळे रक्तस्रावयुक्त गुदांकुर नष्ट होतात.

२१ मलम

(१) वर्की हरताळ, पांढरा काथ, २-२ तोळे घेऊन १०० वेळ धुतलेलें लोणी मिसळून लावावे.

(२) सेंदुर ४ तोळें गोघृत २० तोळे एकत्र मिसळून काशाच्या भांड्यांत निंबाचा रस घालून घोटावें, तें मोडास लावावें.

(३) अफू ३ मासे, रुईचें दूध १ मासा, जायफळ १ तोळा हे सर्व एकत्र घोटून तुपांतून लावावें.

(४) शंखजिरें, कळीचा चुना, सोनगेरु, तुरटीची लाही, मुरडसिंग, आंबेंहळद हीं सर्व सहा औषधें वस्त्रगाळ चूर्ण करून चारपट गाईचें लोण्यांत घोटावें, नंतर कोंबास लावावें.

२२ अर्शावर लेप

स्नुक्क्षीरं रजनीयुक्तं लेपाद् दुर्नामनाशनम् ।
कोषातकीरजोघर्षान्निपतन्ति गुदोद्भवाः भै. र. २१२

थुहराचे (निवडुंगाचे) दुधामध्यें हळदीचें चूर्ण मिळवून त्याचा अर्शाचें अंकुरावर लेप केल्याने अर्श नाहीसा होतो अथवा केवळ कडु दोडक्याचें मूळाचें चूर्ण मोडावर घासल्यानें मोड गळून जातात.

अर्कक्षीरादी लेप

अर्कक्षीरं स्नुहीक्षीरं तिक्ततुम्ब्याश्च पल्लवाः ।
करञ्जौ बस्तमूत्रञ्च लेपनं श्रेष्ट मर्शसाम् ।। भै. र. २१२

अर्काचें दूध, निवडुंगाचें दूध, कडु भोपळ्याचीं पानें, करंजाची साल हे समभाग घेऊन ते बकऱ्याचें मूत्रांत घोटून त्याचा मोडावर लेप करावा.

पिप्पल्यादि लेप

पिप्पली सैंधवं कुष्ठं शिरीषस्य फलं तथा ।
सुधा दुग्धार्क दुग्धैर्वा लेपोऽयं गुदजं हरेत् ।। भै. र. २१२

लहान पिंपळी, सैंधव, कोष्ठ, सरसूचें बीज हे सर्व समभाग घेऊन निवडुंग किंवा रुईचें दुधांत घोटून त्याचा मलम तयार करावा. हा मलम गुदांत लावावा. तो कांही दिवस नियमित लावल्यास अर्श नाहीसे होतात.

अर्कं पयः सुधाकाण्डं कटुकालाबुपल्लवाः ।
करञ्जो बस्तमूत्रेण लेपनं श्रेष्ठमर्शसाम् ।। यो. र. ५०५

रुईचा चीक, त्रिधारी निवडुंगाचा दांडा, कडु भोपळ्याचीं पानें, करंजाचें बी ह्यांचा शेळीच्या मुत्रांमध्यें कल्क करावा आणि तो मूळव्याधीचें मोडास लावावा. हा फार उत्तम आहे.

सिन्धूत्थं देवदाल्याश्च बीजं काञ्जिकपेषितम् ।
गुदांकुरान्प्रलेपेन पातयत्थ चलानपि ।। यो. र. ५०५

सेंधेलोण व देवडांगरीचें बी हीं औषधें कांजींत वांटुन त्याचा मोडास लेप करावा म्हणजे न हलणारे मोडदेखील गळून पडतात.

ज्योतिष्का बीजकल्केन लेपो रक्तार्शसां हितः ।। यो. र. ५०६

करडकांगोणीचें बी आणून तें वाटून त्याचा लेप केला असतां तो रक्तजन्य मूळव्याधींवर उपयोगी आहे.

कोशातकीर जोघर्षान्निपतन्ति गुदोद्भवाः । यो. र. ५०६

कडु दोडक्याचें चूर्णानें घासावें म्हणजे मोड गळून पडतात.

२३ रालकर्पूर धूपयोग

रालचूर्णस्य तैलेन सार्षपेण युतस्यच ।
धूपदानेन युक्त्याऽर्शो रक्तस्त्रावो निवर्त्तते ।।
हिमांशु धूपनं श्रेष्ठं गुदे रक्तार्शसां कृते ।। भै. र. २२५

राळीचें चूर्ण सरसोच्या तेलाबरोबर घोटून पूर्वीं सांगितल्याप्रमाणें गुदांकुरास धुरी दिल्यानें मोडांतून होणारा रक्तस्त्राव बंद होतो अथवा केवळ कापूराची धुरी दिल्यानें मोडांतून अधिक प्रमाणांत होणारा रक्तस्त्राव थांबतो.

गोधूमपिष्टादि धूप

(२) गोधूमपिष्टं पलमेव हिंगु-
शाणार्द्धं मारुष्क रमब्धिसंख्यम् ।
स्याद्धूपदानाद् गुदशूल नाशः ।
स्यात्संनिपातो गुदसंभवानाम् ।। भै. र. २२५

गव्हाचें पीठ १ पळ, हिंग ।। शाण (२ मासे). बिंबे ४ नग, या सर्वांचें एकत्र चूर्ण करून धुरी दिल्यानें गुदांच्या ठिकाणीं होणारा शूळ नष्ट होतो व मोड गळू लागतात. (कांही जण त्यांत मनुष्याचे केसाचा चुरा घालतात.)

अर्शांवर धुरी

नृकेशाः सर्पनिर्मोको वृषदंशस्य चर्म च ।
अर्कमूलं शमीपत्रमर्शोभ्यो धूपनं हितम् ॥ यो. र. ५०६

मनुष्याचे केस, सापाची कात, मांजराचें कातडें, रुईचें मूळ शमीचीं पानें ह्याचीं धुरी मूळव्याधीचे मोडास हितकारक आहे.

२४ चक्राख्योरस

मृतसूताभ्रवैक्रान्तं ताम्रं कास्यं समं समम् ।
सर्वतुल्येन गन्धेन दिनं भल्लातकद्रवैः ॥
मर्दयेद्यत्नतः पश्चाद् वटीं कुर्याद् द्विगुंजिकाम् ।
भक्षणाद् गुदजान् हन्ति द्वन्द्वजान् सर्वजानपि ॥ भै. र. २३३

पारदाचें भस्म अथवा रससिंदूर १ तोळा, अभ्रकभस्म १ तोळा, वैक्रांतभस्म १ तोळा, ताम्रभस्म १ तोळा, कास्यभस्म १ तोळा व या सर्वांचे बरोबर (५ तोळे) शुद्ध गंधक घेऊन प्रथम पारद व गंधकाची कज्जली तयार करावी. व नंतर त्यांत इतर द्रव्यें मिळवावीत व त्याला चांगलें घोटावें. त्यांत शुद्ध बिब्याचा काढा घालून १ दिवस घोटावें. नंतर त्याच्या ९ गुंजेच्या गोळ्या करून बाटलींत भराव्यात. ह्या गोळ्या दररोज सेवन केल्यानें सर्व प्रकारचे (एकदोषज, द्विदोषज, सन्निपातज) अंकुराचा नाश होतो.

२५ नित्योदित रस

शुद्धसूताभ्र लौहार्कं विषं गंधं समं समम् ।
सर्वतुल्यांश भल्लात फलमेकत्र चूर्णयेत् ॥
द्रवैः शूरणमाणोत्थैर्भाव्यं खल्वे दिनत्रयम् ॥
माषमात्रं लिहेदाज्यै रसैश्चार्शांसि नाशयेत् ॥
रसो नित्योदितो नाम गुदोद्भव कुलान्तकः ॥ भै. र. २३४

मृतसूत (पारदभस्म व रससिंदूर) १ तोळा, अभ्रकभस्म १ तोळा, लोहभस्म १ तोळा, ताम्रभस्म १ तोळा, शुद्ध गंधक १ तोळा, बचनाग चूर्ण १ तोळा, व या सर्वां-बरोबर शुद्ध भल्लांतकचूर्ण घेऊन हीं सर्व एकत्र घोटावींत. सुरणकंद व मानकंद यांच्य स्वरसाच्या तीन दिवस भावना द्याव्यात व चांगलें घोटून सुकल्यावर शिशींत भरुन ठेवावें. त्याच्या ४ गुंजेच्या वजनाचें चूर्ण दररोज तुपाबरोबर किंवा निरनिराळ्या दोषनाशक अनुपानाबरोबर सेवन केल्यानें सर्व प्रकारचे अर्श नाश होतात. तसेंच हा नित्योदित रस गुदाचे ठिकाणीं होणाऱ्या सर्व रोगास नाहीसे करतो.

२६ अर्शःकुठारो रस

शुद्धसूतं द्विधा गन्धं मृतलोहञ्च ताम्रकम् ।
प्रत्येकं द्विपलं दन्ती त्र्यूषणं शूरणं तथा ॥
शुभाटङ्कयवक्षार सेंधवं पलपञ्चकम् ।
पलाष्टकं स्नुहीक्षारं द्वात्रिंशच्चगवां जलैः ॥
आविङ्क्ति पचेदग्नौ खादेन्माषद्वयं ततः ।
रसश्चार्शः कुठारोयं सर्वरोगकुलान्तकः ॥ भै. र. २३३

शुद्ध पारद १ पळ, शुद्ध गंधक २ पळ, लोहभस्म २ पळ ताम्रभस्म २पळ, दंतीच्या मूळाचें चूर्ण ५ पळ समभाग त्रिकटू (सुंठ, मिरे, पिंपळी) चूर्ण ५ तोळे, शुद्ध सुरणकंद ५ पळे, वंशलोचन ५ पळे, शुद्ध सुहागाचूर्ण ५ पळे. यवक्षार ५ पळे, सैंधव ५ पळे, निवडुंगाचें दूध ८ पळे घेऊन त्यांत प्रथम पारद व गंधकाची कज्जली करून त्यांत इतर द्रव्यें मिळवून बारीक घोटावी. त्यांत ३२ पळे गोमूत्र टाकून कढईत ठेवावें व त्याचा घट्टसर पिंड तयार होईपर्यंत त्याला आंच द्यावी. व गोमूत्र आटूं द्यावें. नंतर ती कढई खाली उतरून द्रव्याचें बारीक चूर्ण करून तें बाटलींत भरावें. हें अर्शकुठार २ मासे यथा दोषहर अनुपानासह घ्यावें. त्याचेमुळे सर्व रोगांचा नाश होतो. या रसानें अर्शाच्या मोडाचें छेदन होतें, म्हणून त्यास अर्शकुठाररस असे म्हणतात.

२७ अर्शावर पथ्यापथ्य

कुलित्था यवगोधूमाः शालयो रक्तभा हिताः ।
पुनर्नवा सूरणं च तक्रं धात्री कपित्थकम् ॥
नवनीतं तु वास्तुकं पटोलं मरिचं तथा ।
मृगमांसमजादुग्धं वृन्ताकं कांजिकं तथा ॥
अर्शोरोगे तु पथ्यानि मुनिभिः कथितानि तु । यो. र.

हुलगे, गहू, सातू, तांमसाळ, घोटूकी (वसु), सुरण, ताक, आवळे, कवठ, लोणी, चंदनबटवा, किंवा चाकवत, पडवळ, मिरे, हरिणाचें मांस, शेळीचें दूध, वांगीं, कांजी हें पदार्थ मुळव्याधीस पथ्यकारक आहेत, म्हणून मुनींनी सांगितलें आहेत,

वेगावरोधः स्त्री पृष्ठयानमुत्कटकासनम् ।
यथास्वं दोषलं चान्नमर्शसः परिवर्जयेत् ॥

मलमूत्रादिकांच्या वेगाचा अवरोध करणें, मैथुन, घोड्यावर बसणें, उकिडवें बसणें, आणि त्या त्या दोषांना वाढविणारे अन्न हें मूळव्याधीला अपथ्य. हें वर्ज्य करावें.

पहिल्यानें मूळव्याध पाहून कोंब आंतल्या पातळीवर आहेत का बाहेर हाताला लागणारे आहेत, हें पाहून घ्यावें. व त्या मोडावर मलम लावणें व धूरी देणें हें कसें शक्य होईल, याचा विचार करून ठेवावा. सर्व प्रकारच्या मूळव्याधीवर खालील उपचार उपयोगी आहेत.

२८ अर्शरोगावर प्रत्यक्ष अनुभविक चिकित्सा

पहिल्यानें रोग्याला इच्छाभेदी २ गुंजा दुधांतून द्यावी. त्यानें ३–४ जुलाब होतील. नंतर दुसरें दिवशीं खालील औषध, मलम व धूरी देणें सुरूं करावें. मलम व धूरी यांचा योग खाली दिला आहे.

सकाळीं–

तूप २॥ तोळे
सैंधव १ मासा
मध १ मासा

हें सर्व एक कप गरम पाण्यांत मिसळून घ्यावें.

दुपारीं ४ वाजता व रात्रीं–

कांकायनगुटिका ८ गुं.
नित्योदितरस ८ गुं.
बोलपर्पटी ४ गुं.

२ पुडचा. तूप-साखरेंतून किंवा १ तोळा अभयारिष्ठ घेऊन त्यांतून १ पुडी दुपारीं व १ पुडी रात्रीं घ्यावी.

याप्रमाणें ४ दिवस सकाळचें तूप–सैंधव व दुपारीं व रात्रींचें औषध चालू ठेवावें. तसेंच खाली लिहिलेला मलम व धूरी देणें सुरूं ठेवावें.

पांचवे दिवशीं–

पळसपापडी ८ गुं.
कृमिकुठार २ गुं.
गूळ १६ गुं.

यांची १ गोळी करून घ्यावी.

सहावें दिवशीं सकाळीं सर्व अंग शेकून टाकावें किंवा वाफारा द्यावा. दुपारीं ४ वाजतां गेळफळ ४ मासे, सैंधव १ मासा व मध ३ मासे. एक कप गरम पाण्यांत मिसळून घ्यावें. यानें १–२ वांत्या होतील.

सातवें दिवशीं पुन्हा इच्छाभेदी २ गुंजा दुधांतून घ्यावी.

त्याचे दुसरें दिवसापासून—

कांकायनगुटिका १६ गुं.

नित्योदित रस ८ गुं.

बोलपर्पटी ४ गुं.

४ पुड्या करून सकाळीं, दुपारीं १ वाजतां, ५ वाजतां व रात्रीं १० वाजतां असे चार वेळ अभयारिष्टांतून लावावें.

मलम-सेंदुर, हरताळ, मनशीळ, मुरदाडसिंग, पाषाणभेद, राळ, कलमी रसांजन हीं सर्व कुटून, वस्त्रगाळ करून, तूपांतून किंवा व्हॅसलीनमधून लावावें.

धूरी-बिट्याचे तुकडे, कणीक, केसाचे बारीक तुकडे करून, हिंग, राळ यांपैकी जे मिळेल, त्याचें चूर्ण करून परळांत निखारे ठेवून, त्यावर तें चूर्ण टाकून त्याची धूरी घ्यावी. सरसोच्या तेलांत तें चूर्ण भिजवून नंतर निखाऱ्यावर घातल्यास उत्तम.

——

राजयंक्ष्मा चिकित्साप्रकरण

अध्याय १९

१ राजयक्ष्म्यासंबंधी प्रास्ताविक

राजयक्ष्मा म्हणजे क्षय. क्षयांत शरिरांतील सर्व रस रक्तादि धातु थोडचा थोडचा प्रमाणांत क्षीण क्षीण होत जातात. पहिल्या पहिल्यानें तो क्षीणपणा कळूनच येत नाही. पण पुढे पुढे जेव्हां त्याला निरुत्साह वाटू लागतो. गळल्यासारखे वाटू लागते. तेव्हां आपल्याला असें कां होते, हें समजून घेण्याकरितां आपण वैद्याकडे जातो.

२ शरिरस्वास्थ्याकरितां धातुसाम्य आवश्यक

शरिराचें स्वास्थ्य कायम राहणें, त्याचें व्यवस्थित पोषण होणें, त्यामुळे शरीराच्या दैनंदिन व्यवहारांत शरीराची झालेली झीज भरून निघणें, अग्नि प्रदीप्त होणें, सर्व धातूंचें पोषण होऊन त्यांच्याकडून शरीराचीं नित्य कार्यें सुरळीत चालणें, इ. शरीराचा हा जो नित्याचा व्यवहार तो शरीरस्वास्थ्य (धातुसाम्य) असतांना अखंड व व्यवस्थित चालु असतो. थोडक्यांत एवढेंच सांगतां येईल की शरीर धातूंचें पोषण व्यवस्थित होत राहणें म्हणजेच धातु साम्य टिकविणें होय. आणि धातुसाम्य म्हणजे आरोग्यत म्हणजेच स्वास्थ्य (निरोगीपणा) होय. आणि हें धातुसाम्य टिकविण्याकरितां सर्वं धातूंचें व्यवस्थित पोषण झालें पाहिजे.

३ धातुसाम्य राखण्यासाठी जठराग्नि व धात्वग्नीचे महत्व

वरील वर्णनावरून आपणांस असें दिसून येईल की स्वास्थ्य टिकविण्याकरितां धातुसाम्य असावें लागते व धातुसाम्याकरितां प्रत्येक धातूंतील अग्नि हा अन्नरसाचें पचन करून त्या त्या धातूंचें पोषण व वृद्धि करील असा असावा लागतो. आणि धात्वग्नि उत्तम स्थितींत राहण्याकरिता ‘ स्वस्थानस्थ: कायाग्नेः अंशाः धातुषु संश्रिताः जठराग्नीचे अंश धात्वाग्नीचें पोषण करीत असतात. याकरितां जठराग्निच सुव्यवस्थित असावयास पाहिजे.

परंतु राजयक्ष्मांत पहिल्यानें जठराग्निच विकृत होऊन अग्निमांद्य निर्माण होते. आणि त्यामुळे कफाधिक्य निर्माण होऊन अन्नाचें नीट पचन न होता जो रस तयार होतो. तो आमयुक्त, चिकट असा असतो.

या अग्निमांद्यामुळे धातूंतील अग्निहि मंद होतो. त्यामुळे धातूचें पोषण बरोबर होत नाही व खाल्लेला अन्नरस हा अपक्व, आमयुक्त व चिकट होतो. त्यामुळे धातूचे पोषण करणारीं स्रोतसें भरून जातात व त्यामुळे अन्नरस पूर्णपणें धातूंत पोहचूं शकत नाही. त्यामुळे धातु क्षीण क्षीण होत जातात.

दोषैर्मंदानलत्वेन सोपलेपैः कफोल्बणैः ।
स्रोतोमुखेषु रुद्धेषु धातूष्म स्वल्पकेषुच ।। वा. नि. ५

धातु क्षीण क्षीण होत गेल्यानें धातुसाम्य बिघडतें. धातुसाम्य टिकविण्याकरितां धातुपोषणक्रम व्यवस्थित असावा लागतो. त्याकरितां धातुपोषणक्रम कसा असावा लागतो, हें समजणें जरूर आहे.

४ धातुपोषण क्रम

शरीराचें स्वास्थ्य कायम टिकविण्याकरितां धातुपोषणक्रम हा व्यवस्थित असावा लागतो.

यथास्वेनोष्मणा पाकं शरीरेयांति धातवः ।
स्रोतसाच यथा स्वेन धातुः पुष्यति धातुना ।। च. चि. ८

शरीरांतील रसरक्तादि धातु हें आपापल्या धात्वग्नीनें आपलें पोषण करतात. तसेंच आपापल्या स्रोतसामार्फत घेतलेल्या अन्नरसानें एक धातु दुसऱ्या धातूचें पोषण करितो. 'धातुः पुष्यति धातुनां' म्हणजे 'रसेन रक्तं, रक्तेन मांसं पुष्यति' रसधातुमुळे व रक्तघातुपासून मांसाचें याचप्रमाणें सप्तधातुचे त्याच्या त्याच्या मागील धातुपासून पुढील धातूचें पोषण होत असते.

५ धातुसाम्य राखण्याकरितां जठराग्नि स्रोतसें व धात्वग्नि यांची आवश्यकता

१ कोष्ठाग्नि सुस्थितींत पाहिजे. त्या अग्निमुळे खाल्लेल्या अन्नाचा रस आमयुक्त न होतां तो निराम होऊन सर्व धातूंचें पोषणाला लायक असा होतो.

२) तसेंच स्रोतसें हीं मोकळी व सुस्थितींत आपापली कार्यें करण्यास समर्थ असलीं पाहिजेत.

अन्नरसांतून आपापल्या धातुला पोषक असा रस आपापल्या स्रोतसामार्फत ओढून घेतल्यानंतर त्या त्या धातूंत नेऊन सोडणें हें जें स्रोतसाचें कार्य आहे तें त्यांच्याकडून बरोबर होत गेलें पाहिजे.

३) धात्वग्नि हा सुस्थितींत पाहिजे. अन्नरसांतून आपापल्या धातुला पोषक असा रस आपापल्या स्रोतसामार्फत त्या त्या धातूंत पोचविल्यानंतर त्याचे नीट पचन होऊन, त्याचा सार भाग वेगळा काढून त्यानें त्या धातूची झीज भरून काढणें व त्या

धातूची वाढ करणें हीं सर्व कार्यें त्या त्या धातूंतील अग्नि करित असतो. एवढ्या कार्याचा व्याप असलेला हा धात्वग्नि फारच सुव्यवस्थित पाहिजे. म्हणजेच सर्व धातूंचें पचन, पोषण होऊन सप्तधातुची वाढ होऊं शकेल.

हा धात्वग्नि सुस्थितींत [सम] राहण्याकरितां याला कोष्ठाग्नि, पाचकाग्नि, समाग्नि असला पाहिजे.

६ जठराग्निची दोन कार्यें

धात्वाग्नि सुस्थितींत राहण्याकरितां जठराग्नि सुस्थितींत राहणें फार जरूरी आहे. त्याची कार्याची माहितीखाली दिलीं आहेत.

१. खाल्लेल्या अन्नाचा निराम रस तयार होणें व त्या रसानें शरिरांतील रस रक्तादि धातूंचे पोषण होणें.

२. दुसरें कार्य म्हणजे जठराग्नि हा मांसमेदादि धातूंतील अग्नीला म्हणजे धात्वग्नीला अग्नीचा पुरवठा करतो.

हीं वर लिहिलेलीं जठराग्नीचीं दोन मुख्य कार्यें होत.

जठराग्नि सुस्थितींत नसून तो मंद किंवा विकृत झाला तर त्यामुळे शरीरांत तीन विकृति निर्माण होतात.

१) खाल्लेल्या अन्नाचा रस अपक्व राहील म्हणजे आमदोषयुक्त म्हणजेच कफप्रधान दोषयुक्त असा तयार होईल, तो स्रोतसाचें पोषण करूं शकणार नाही.

२) कोठ्यांत तयार झालेला अन्नरस धातुपर्यंत पोचविण्याकरिता ज्या स्रोतसांतून तो कफप्रधान अन्नरस जातो, तीं स्रोतसें त्या आमरसानें चिकट होतात व तो रस त्या स्रोतसांत चिकटून बसतो, त्यामुळे तीं स्रोतसें भरून जातात. त्यामुळे कोठ्यांतील अन्नरस त्या चिकट झालेल्या स्रोतसांतून धातुपर्यंत जाऊं शकत नाही. गेला तरी तो फारच थोडा जाईल. त्यामुळे धातूंचें पोषण होऊं शकणार नाही.

३) जठराग्नीच्या विकृतीमुळे होणारी तिसरी विकृति म्हणजे जठराग्नीचें अंश धातूंत जाऊन धात्वग्नीला कार्यक्षम करितात. परंतु जठराग्नीच जर विकृत असेल तर त्यांचे अंशहि विकृतच राहतील. अशा स्थितींत ते धातूंचें पोषण तरी कसें करूं शकतील ?

स्वस्थानस्थस्य: कायाग्ने अंशा: धातुषुसंश्रिता: ।
तेषां सादाति दिप्तिभ्यां धातुवृद्धिक्षयोद्भवः ॥ वा. सु. ११

जठराग्नींतील अग्नीचे अंश धातूंत जातात. ते जर साधारण सौम्य स्थितींत असतील तर अन्नरसाचें पचन करून त्या त्या धातूची वाढ करतील. परंतु तेंच कोष्ठाग्नीचे अंश जर प्रखर असतील तर त्यामुळे अन्नरस करपून जाईल व त्यामुळे धातूंचा क्षयच होत जाईल. व त्याचा परिणाम म्हणजे शरीर सुकत जाईल. धातूंतील अग्नि

जर मंद असेल, थोडाबहुत अन्नरस येईल, त्याचेहि पचन नीट होणार नाही. मळच जास्त निघेल.

वरील वर्णनावरून आपणांस दिसून येईल की जठराग्नीच्या विकृतीमुळे शरीर सुस्थितींत राहण्याकरितां जो धातुपोषणक्रम सांगितला आहे, तो सर्वच बिघडून जातो व राजयक्ष्माची सुरुवात होण्याची भीति निर्माण होते.

७ क्षयाची संप्राप्ति

कफप्रधानैर्दोषैस्तु रुद्धेषु रसवर्त्मसु ।
क्षीयंते धातवः सर्वे ततः शुष्यति मानवः ।। मा नि-

जठराग्नि मंद झाल्यामुळे खाल्लेल्या अन्नाचा जो रस तयार होईल, तो अपक्व, आमयुक्त व कफप्रधान असा होईल. त्या कफप्रधानयुक्त रसानें तो रस वाहून नेणारीं स्रोतसें भरून जातात, बंद होतात. त्यामुळे त्या स्रोतसांतून धातूपोषकरस धातूंपर्यंत जाऊंच शकत नाही. जो थोडासा जाईल, त्यानें धातूंचें नीट पोषण होणार नाही. त्यामुळे सर्व धातु सुकत जातात व मनुष्य क्षीण क्षीण होत जातो.

राजयक्ष्म्याची संप्राप्ति

स्रोतसां संनिरोधाच्च रक्तादीनांच संक्षयात् ।
धातूष्मणां चापचयात् राजयक्ष्मा प्रवर्तते ।। च. चि. ८

स्रोतमार्ग दोषांनी बंद झाल्यामुळे तसेच धात्वाग्नि बंद झाल्यामुळे धातुपोषकरस बनत नाही. अशा दोन्ही कारणांनीं रक्तादि धातुस त्याचा पोषक भाग मिळत नाही. त्यामुळे त्याचा क्षय होत जातो, म्हणून आपण त्याला राजयक्ष्मा किंवा क्षय असें म्हणतो.

८ क्षयांत सर्व धातूंचा क्षय कसा होतो

अन्नरसापासून शरीरधातु बनतांना रक्तांत मिसळलेला किंवा रक्त बनलेला अन्नरस त्या त्या धातूचे परमाणू खाल्लेलें अन्न जठराग्नीचें पचन झाल्यानंतर त्या अन्नांतून जठराग्नींतील सातहि धात्वाग्निचे कण तसेंच सातहि धातूपोषक कण वेगवेगळे होऊन रसांत एकत्रीत होतात. नंतर त्या रसाचें रक्त बनल्यानंतर त्या रक्तांत सातहि धातूचे पोषक कण येतात. नंतर तें रक्त शरीरभर फिरतांना त्या त्या धातूचें पोषक कण त्या त्या धातूंत टाकते. आणि धात्वग्नीचे कण धात्वाग्नींत मिसळतात. नंतर त्या धातूंतील अग्नि त्या अन्नकणाला पक्व करून त्याला धातुरूप बनविते. रक्तांतील परमाणुला धातुरूप बनविणारा जो पदार्थ धातूंत असतो, त्यासच धात्वग्नि असें म्हणतात. धात्वग्नि वर लिहिल्याप्रमाणें कफप्रधान दोषांनी बिघडले म्हणजे

शरीरांत नवे धातु बनत नाहीत व नवे धातु तयार न झाल्यामुळे शरीर क्षीण-क्षीण होत जाते. बिघडलेल्या कफप्रधान अशा तिन्ही दोषांनी धातूंतील अग्नि मंद होतात, इतकेंच नाही तर अन्नरस हा ज्या स्रोतसांमार्फत धातूंत जातो, तीं स्रोतसेंहि बिघडलेल्या दोषांनी बंद होतात. त्यामुळे धातूचे परमाणु धातुपर्यंत पोंचत नाहीत. कांही थोडे पोचले तर तेथे कफप्रधान अग्नि झाल्यामुळे, त्या परमाणुचें पचन न झाल्यामुळे त्याला धातु रूप येत नाही. ते अपक्व राहिलेले परमाणु मलरूपानें धातूचीं स्रोतसें बंद करतात. शरीराची अशी स्थिति जेव्हां येते, तेव्हां त्या शरीरस्थितीला क्षय असें म्हणतात.

९ क्षयांत पहिल्यानें फुफ्फुस विकृति

क्षयांत शरिरांतील जर कोणता भाग पहिल्यानें बिघडत असेल तर तो फुफ्फुसाचा भाग होय. राजयक्ष्म्यांत जीं मुख्य लक्षणें सांगितलीं आहेत, तींत ‘ अंशपार्श्वाभितापश्च’ हें एक लक्षण सांगितलें आहे. अंशपार्श्व म्हणजे खांदे व बरगडया अभि म्हणजे यांचे संबंधांत किंवा वरून खाली असा भाग. व ताप म्हणजे पिडा होणें म्हणजेच खांदे व बरगडया यांचे मधला भाग म्हणजे फुफ्फुस होय. त्या फुफ्फुसांत पीडा (ताप) होते. म्हणजे विकृति होते. फुफ्फुसांत विकृति होणें म्हणजे क्षयांतील लक्षणांपैकी एक मुख्य लक्षण होय. फुफ्फुसांत विकृति झाली म्हणजे ताप किंवा खोकला यापैकी एक किंवा दोन्हीं लक्षणें सुरू होतात.

१० राजयक्ष्म्यांतील ज्वराचें वैशिष्टय

क्षयांतील ताप हा पहिले पहिले थर्मामिटरनें दिसून येत नाही. हा ताप सायंकाळीं येतो. तो आला हें आजाऱ्याला कळूनच येत नाही. कांही दिवस तो ९८-९९॥° चे वर जात नाही; विचारलें असतां रोगी सांगतो की ज्वर नाही. पण दिवसानुदिवस रोगी गळत जातो. कांही दिवसांनी सायंकाळचें टेंपरेचर घेतलें तर ९९-९९॥° असें दिसून येते. परंतु टेंपरेचर घेण्याचे अगोदर रोग्याला विचारलें असतां तो म्हणतो, मला ज्वर चढला नाही. परंतु थर्मामिटरमध्यें पाहिलें तर ९९-९९॥ इतका ज्वर दिसून येतो. ज्वर चढला असतांना देखील रोग्याला समजत नाही. याचें कारण असें की कंदीलाची कांच एकाच बाजुनें जास्त गरम झाली तर ती फुटते. परंतु कंदीलाची बत्ति दोन्ही टोंकाला सारखी असली म्हणजे तिची आंच कांचेच्या सर्व भागाला समप्रमाणांत लागेल; त्यामुळे कंदीलाची कांच जी तापेल ती सर्व बाजुनी सारखी तापेल, त्यामुळे कांच फुटणार नाही.

त्याचप्रमाणें शरीराचेंहि आहे. नेहमीचे जे ताप येतात तेव्हां त्या तापाची उष्णता शरीराला जाणवते. रक्त, त्वचा, केव्हा केव्हा लघ्वी, डोळे हीं गरम होतात. परंतु शरीरांतील सातहि धातु उष्णता वाढली नसल्यामुळे त्या धातूंना ही उष्णता जाणवते व ज्वर आला असें त्याला वाटते. पण क्षयामध्यें सर्व शरीर–शरीरांतील सातहि धातु संतप्त होतात. शरीराचे सर्व भागाला सारख्या प्रमाणांत उष्णता वाढल्यामुळे ज्वर आला असें त्याला समजून येत नाही.

'ज्वरः सर्वांगश्चेति' राजयक्ष्म्याच्या ज्वराची उष्णता सर्व शरिरांतील सातहि धातूंत सारखी पसरलेली असते. त्यामुळे त्या आजाऱ्याला ती जाणवत नाही. शरीरांतील कांही भाग संतप्त झाला तर जो भाग कमी संतप्त झाला असेल त्या भागाला ती उष्णता जाणवेल. परंतु शरीरांतील सर्व भाग जेव्हा संतप्त होतात, तेव्हां कोणत्याहि भागास इतर भागाच्या जास्त उष्णतेची जाणीव होत नाही. त्यामुळे ज्वर आला हें क्षयी रोग्याला कळूनच येत नाही. हेंच क्षयी रोग्याच्या ज्वराचें वैशिष्टच. क्षयी रोग्याला कोणतेंहि काम करण्याला उत्साह वाटत नाही. नेहमी गळल्यासारखे वाटते. तोंडाला रुचि तितकीशीं चांगली नसते. वजन थोडें थोडें कमी होत जाते.

११ क्षयाच्या तीन अवस्था

क्षयाच्या सर्वसाधारण ३ अवस्था मानण्यात आलेल्या आहेत. पहिल्या अवस्थेंत स्रोतसांचा अवरोध होतो आणि धात्वग्नीहि मंद होतो. अशा ह्या दोन कारणांनी धातूंचे पोषण होत नाही. त्यामुळे सर्व धातु झिजत जातात. शरीर गळल्यासारखें वाटतें, काम करण्यास उत्साह न वाटणें, दिवसानुदिवस वजन कमी होत जाणें हीं ज्वरासारखीं लक्षणें दिसत असलीं तरी थर्मामिटरमध्यें किंचितहि ताप दिसून येत नाही. ह्या निर्जीव थर्मामिटरमध्यें जरी ताप दिसून येत नसला तरी जिवंत थर्मामिटर (शरीर) मध्यें ज्वराच्या सूक्ष्म चिन्हाची वरीलप्रमाणें स्पष्ट लक्षणें दिसतातच.

२. त्यानंतर स्थानविकृति दिसून येते. या स्थानांपैकी पहिल्यानें फुफ्फुसविकृतीला सुरुवात होते. या अवस्थेंत रोग्याला फारच गळल्यासारखे वाटते व वजनहि पहिल्या अवस्थेपेक्षा बरेंच कमी कमी होत जाते. टेंपरेचर सायंकाळीं ९९॥°–१०१ पर्यंत वाढते. पण रोग्याला ज्वर आला असें वाटत नाही.

३. तिसरी अवस्था म्हणजे दुसऱ्या अवस्थेंत होणारीं लक्षणें, जास्त प्रमाणांत होतात. ज्वर थोडा वाढतो, खोकला वाढून कफ पुष्कळ पडूं लागतो. कफाचा रंग पिवळट असतो. त्या कफाला घाण येते, यानंतर कांही रोग्यांना आंतडींत विकृति होऊन जुलाब होऊं लागतात.

१२ क्षयांत ज्वर चढण्याची वेळ

क्षयांत ताप हा सायंकाळीं ४ पासून पुढे येऊं लागतो. पहिले पहिले ९९–९९॥ डिग्रीपर्यंतच वाढतो. तो रात्रीं ९–१०चे नंतर थोडा थोडा कमी होतो. परंतु रात्रभर तो राहून सकाळीं साफ उतरतो. ज्वर उतरतांना थोडा घाम केव्हां केव्हां येतो. कांही जणांस तो मुळीच येत नाही. पुढे पुढे तो ताप दुपारीं अडीच वाजतांपासून थोडा वाढण्यास सुरुवात होतो तो सायंकाळपर्यंत १०० ते १०१ पर्यंत वाढतो. नंतर थोडा थोडा रात्रभऱ्यांत कमी होऊन सकाळीं तो ९५–९६ पर्यंत येतो. कांही दिवसांनी हें टेंपरेचर १०२ डिग्रीपर्यंतहि वाढते. त्यावेळीं वजन बरेंच कमी झालेलें दिसतें.

क्षयांत इतर लक्षणें

ज्वराप्रमाणें खोकलाहि पहिले पहिले थोडाच असतो. कफहि फारच थोडा पडतो. पुढे पुढे खोकला वाढत जातो व कफहि जास्त पडू लागतो. केव्हां केव्हां खोकतांना कफाबरोबर रक्त येते. पुढे पुढे कफाला दुर्गंधी येऊं लागते. काहींना पोटांत, काखेंत, गळ्यांत किंवा सांध्याचें ठिकाणीं गांठी आलेल्या दिसून येतात. पुढे त्या मोठ्या होऊन दुखूं लागतात, क्वचित वेळां फुटतात, कांही रोग्याचें यकृत, पांथरी वाढते, त्यामुळे जास्तच अशक्तता येते. पायावर, हातावर, तोंडावर व इतरत्रहि सूज येते. क्षयी रोग्याला जीं लक्षणें दिसूं लागतात, तीं केव्हां तीन, केव्हां सहा तर एकाद्या रोग्याला तीं लक्षणें अकरापर्यंत झालेलीं असतात. हा रोग झालेले रोगी फारच थोडे वाचतात.

१३ राजयक्ष्म्यांत पंचकर्मचिकित्सा

क्षयरोगांत औषधी योजना सुरूं करतांना पहिल्यानें या रोगांत जो धातुतील स्रोतसांचा अवरोध झालेला असतो तो दूर करणें, तसेंच धात्वग्नि व जठराग्नि हे प्रदीप्त होतील अशी योजना करणें, अशा तऱ्हेची योजना सुरूं केली पाहिजे. याकरितां पहिल्याने रोग्याची शक्ति पाहुन सोसेल त्या मानानें पंचकर्म चिकित्सा करावी आणि नंतर औषधोयोजना सुरूं करावी.

स्नेहन–(१) राजक्ष्म्यांत रोगी फार अशक्त झाला नसल्यास तीन दिवस स्नेहन द्यावें. त्याकरितां १ तोळा तूप, २ मासे सैंधव कपभर गरम दुधांत घालून पिण्यास द्यावें. याप्रमाणें ३ दिवस द्यावें.

(२) चंदनबला, लक्षादितेल छातीला चांगलें चोळीत जावें.

स्वेदन–(१) क्षयरोग्याची छाती व पाठ शेकावी.

(२) एका मोठ्या भांड्यांत बरेंच पाणी घालून त्यांत चंदनबला, लक्षादि तेल व नारायण तेल घालून तें भांडें चुलीवर ठेवावें व चांगली उकळी आल्यावर तें भांडें

बाजीखाली ठेवावें व बाजीवर पातळ कपडा घालून रोग्याला त्यावर निजवावें. छाती व पाठ या दोन्ही भागाला स्वेदन द्यावें त्यामुळे स्रोतसें मोकळी होतील.

जंतुनाशक योग--त्यानंतर पळसपापडी आठ गुंजा, कृमीकुठार दोन गुंजा व गुळ सोळा गुंजा यांचें चूर्ण करून गुळांत गोळी करून खाण्यास द्यावी.

वमन--त्यानंतर दुसरें दिवशीं गेळफळाचें चूर्ण ३ मासे, सैंधव १॥ मासा, कपभर गरम दुधांत घालून त्यांत अर्धा तोळा तूप घालून पिण्यास द्यावें.
रोगी फारच अशक्त असल्यास वमन देऊं नये.

याने एकदोन वेळ वांत्या होतील.

विरेचन-वमनानंतर एरंडेल अडीच तोळे गरम दुधांतून द्यावें, ४-५ तासानंतर २-३ जुलाब होतील.

स्रोतोरोध दूर करणारीं औषधें देणें-विरेचनानंतर राजयक्ष्म्यावरील औषधयोजना सुरू करावी. त्याचबरोबर स्रोतसांचा अवरोध दूर करणारीं औषधेंहि त्या योजनेंत असावी.

१४ क्षयरोग हें नांव कसे पडले ?

संशोषणाद्रसादीनां शोष इत्यभिधीयते ।
क्रियाक्षयकरत्वाच्च क्षय इत्युच्यते पुन: ॥
राज्ञश्चंद्रमसो यस्मादभूदेष किलामय: ।
तस्मात्तं राजयक्ष्मेति केचिदाहु: पुनर्जना: ॥ सु. उ. अ. ४१

हा रसादि धातुंचें शोषण करतो म्हणून ह्याला शोष (क्षय) असें म्हणतात. याच्यावर केलेले उपचार निरुपयोगी होतात म्हणून याला क्षय असें म्हणतात. आणि कित्येक लोक हा रोग पूर्वी सर्व नक्षत्रांचा राजा चंद्र याला झाला होता, म्हणून त्याला राजयक्ष्मा असें म्हणतात.

१५ क्षयरोग दुर्विज्ञेय

अनेकरोगानुगतो बहुरोग पुरोगम: ।
दुर्विज्ञेयो दुर्निवार: शोषोव्याधिर्महाबल: ॥ सु. उ. अ. ४१

अनेक उपद्रवांनी युक्त व ज्याच्या पूर्वरूपांत आरंभीच दुष्कळ रोगांचा प्रादुर्भाव असतो असा हा शोषव्याधि (क्षय) जाणण्यास फार कठीण आहे. लौकर बरा न होणारा व अतिशय जोरदार असा आहे.

१६ क्षय हा त्रिदोषात्मक

एकादशानामेकस्मिन् सान्निध्यात्तन्त्रयुक्तितः ।
क्रियाणामविभागेन प्रागेकोत्पादनेन च ।
एक एव मतः शोषः सन्निपातात्मको ह्यतः ।। सु. उ. अ. ४१

क्षयाच्या अकरा रुपानी युक्त अशा एका रूपाचें सान्निध्य क्षयामध्यें असते आणि त्यावर दोषानुरूप निरनिराळचा क्रिया नाहीत व तो पूर्वरूपामध्यें एकच रूपात्मक असतो. वगैरे कारणांनी कित्येक वैद्य शास्त्राच्या युक्तीला अनुसरून क्षय हा एकच त्रिदोषात्मक आहे, असें म्हणतात.

१७ क्षयाचीं चार कारणें

क्षयाद्वेगप्रतिघातादाघाताद्विषमाशनात् ।
जायते कुपितैर्दोषैर्व्याप्त देहस्य देहिनः ।

रसादि धातूंच्या क्षयामुळे शुक्र व मलमूत्र इत्यादिकांचे वेग धारण केल्यामुळे, शरीरावर काष्ठादिकांचा जबरदस्त आघात झाल्यामुळे व विषमान्न सेवनानें प्रकुपित झालेले दोष मनुष्याच्या देहाला व्यापतात.

अयथाबलमारम्भं वेगसन्धारणं क्षयम् ।
यक्ष्मणः कारणं विद्याच्चतुर्थं विषमाशनम् ।। च. चि. अं. ३०१

स्वतःच्या शक्तीपेक्षा जास्त काम करणें. वेगावरोध करणें, धातुंचा क्षय होणें, विषप्राशन करणें, ह्या चार कारणांमुळे राजयक्ष्मा होतो.

१८ साहसजन्य यक्ष्मा

युद्धाध्ययनभाराध्व लंघनप्लवनादिभिः ।
पतनैरविघातैर्वा साहसैर्वा तथाऽपरैः ।।
अयथाबलमारम्भैर्जन्तोरुरसि विक्षते ।
वायुः प्रकुपितो दोषावुदीर्योभौ प्रधावति ।। च. चि. अं. ३०२

युद्ध करणें, अध्ययन, मोठीं ओझीं वाहणें, पाई चालणें, उपवास करणें, पाण्यांत पोहणें, वरून पडणें, मार लागणें तसेंच इतर साहसाचीं कामें करणें, शक्तीपेक्षा जास्त काम करणें, यामुळे हृदयाला क्षत पडते. कारण प्रकुपीत वायु, पित्त व कफ यांचें उदीरण करून भ्रमण करतो.

१९ वेगावरोधामुळे राजयक्ष्मा

ऱ्हीमत्वाद्वा घृणित्वाद्वा भयाद्वा वेगमागतम् ।
वातमूत्रपुरीषाणां निगृण्हाति यदानरः ।।

तदावेग प्रतिघातात् कफपित्तौ समीरयन् ।
उर्ध्वं तिर्यगधश्चैव विकारान् कुरुतेऽनिलः ।।

जेव्हां एकादा मनुष्य लज्जेमुळे, घृणा उत्पन्न होऊन किंवा भीतीमुळे मळ मूत्र व वायु यांच्या वेगाचा अवरोध करितो. त्यामुळे वायु प्रकुपित होऊन कफपित्ताला प्रेरित करून उर्ध्व, तीर्यग व अधोमार्गांत विकार उत्पन्न करितो.

२० क्षयातील सहा लक्षणें

भक्तद्वेषो ज्वरः श्वासः कासः शोणितदर्शनम् ।
स्वरभेदश्च जायेत षड्रूपे राजयक्ष्मणि ।। सु. उ. अ. ४१

क्षयामध्यें अन्नद्वेष, ज्वर, श्वास, खोकला, थुंकींतून रक्त पडणें व आवाज बसणें हीं सहा लक्षणें होतात.

२१ क्षयाचीं अकरा लक्षणें

प्रतिश्यायंच कासंच स्वरभेदमरोचकम् ।
पार्श्वशूल शिरःशूलं ज्वरमंसावमर्दनम् ।।
अंगमर्दं मुहुश्छर्दि वर्चोभेदं त्रिलक्षणम् ।
रूपाण्येकादशैतानि यक्ष्मा यैरुच्यते महान् ।। च. चि. अं. ३०२

त्रिदोषज प्रतिश्याय, कास, स्वरभेद, अरुचि, पार्श्वशूळ, शिरःशूळ, ज्वर, खांद्यांना पीडा होणें, अंगमर्द, वरचेवर वमन होणें, वरचेवर शौचास होणें, या अकरा लक्षणांनी युक्त असणारा यक्ष्मा भयंकर समजला जातो.

२२ राजयक्ष्म्याचीं अकरा व सहा लक्षणें

कासोंऽसतापो वैस्वर्यं ज्वरः पार्श्वशिरोरुजा ।
शोणित श्लेष्मणश्छर्दिः श्वासः कोष्ठामयोऽरुचिः ।।
रुपाण्येकादशैतानि यक्ष्मिणः षडिमानि वा ।
कासो ज्वरः पार्श्वशूलं स्वरवर्चोगदोऽरुचिः ।।

कास, अंसताप, पार्श्वशूळ, विस्वरता, ज्वर, शिरःशूळ, रक्तवमन, कफवमन, श्वास, मलभेद, अरुचि, ही अकरा व तसेंच कास, ज्वर, पार्श्वशूळ, स्वरभेद, मलभेद व अरुचि हीं सहा अशीं राजयक्ष्म्याचीं रूपें आहेत.

२३ क्षयाचीं तीन व सहा लक्षणें

असंपार्श्वाभितापश्च संतापः करपादयोः ।
ज्वरः सर्वांगगश्चेति लक्षणं राजयक्ष्मणः ।
अग्निमांद्यं ज्वरः शैत्यं वान्तिः शोणित पूययोः ।
सत्वहानिश्च दौर्बल्यं रोगराजस्य लक्षणम् ।। यो. र. ५८८

खांदे व बरगड्या तापणें, हातापायाची आग होणें, सर्वांगाला ज्वर हीं लक्षणें (त्रिरूप) क्षयामध्यें होतात. अग्निमांद्य, ज्वर, थंडी वाजणें, रक्त व पू यांची वांति होणें, ओजाचा क्षय होणें व अशक्तपणा येणें हीं राजयक्ष्म्याची लक्षणें आहेत.

२४ दोषपरत्वें क्षयाची अकरा लक्षणें

स्वरभेदोऽनिलाच्छूलं संकोचश्चांस पार्श्वयो: ।
ज्वरो दाहोऽतिसारश्च पित्ताद्रक्तस्य चाऽऽगम: ॥
शिरस: परिपूर्णत्वमभक्तच्छन्द एव च ।
कास: कण्ठस्य चोद्ध्वंसो विज्ञेय: कफकोपत: यो. र. ५८४

क्षयामध्यें वातदोषामुळे स्वरभेद, शूळ, खांदे व बरगड्या जखडल्यासारख्या वाटणें हीं लक्षणें होतात. पित्तदोषामुळे ज्वर, दाह, अतिसार व थुंकींतून रक्त पडणें हीं लक्षणें होतात आणि कफदोषामुळे डोकें जड होणें, अन्नद्वेष, खोकला व घशांत कुसळ गेल्याप्रमाणें वाटणें हीं लक्षणें होतात.

२५ क्षयाचें सामान्य लक्षण

अंसपार्श्वाभितापश्च संताप: करपादयो: ।
ज्वर: सर्वांगश्चेति लक्षणं राजयक्ष्मण: ॥ च. चि. अ. ८

खांदे व बरगड्यांच्या ठिकाणीं पीडा होते. हातापायांची आग होते व सर्वांगांत ताप असतो, हीं क्षयाचीं लक्षणें आहेत.

२६ राजयक्ष्म्यांत वमन विरेचन मृदु

दोषाधिकानां वमनं शस्यते सविरेचनम् ।
स्नेहस्वेदोप पन्नानां सस्नेहं यन्न कर्षणम् ॥ भै. र. २९२

राजयक्ष्म्यामध्यें दोषाधिक्य असल्यास स्नेहन, स्वेदन करावें व नंतर स्नेहयुक्त द्रव्यानें वमन करावें व स्नेहयुक्त द्रव्यानेंच विरेचन करावें. परंतु वमन व विरेचन द्रव्यें अशीं मृदु असावींत कीं ज्यांच्यामुळे शरीराला कर्षणत्व येणार नाहीं.

२७ क्षयांत वांतिचें औषध

पयसा फलयुक्तेन मधुरेण रसेन वा ।
सर्पिष्मत्या यवाग्वा वा वमनद्रव्यसिद्धया वमेत ॥ वा. चि. अ. ५

गेळफळाचें चूर्ण घातलेलें दूध किंवा मधुर मांसरस अथवा वांतिकारक पदार्थांनी सिद्ध केलेली व तूप घातलेली कण्हेरो घ्यावी, म्हणजे वांति होईल.

२८ क्षयांत विरेचन

विरेचनं दद्यात्त्रिवृच्छया मानृपद्रुमान् ।
शर्करामधुसर्पिर्भिः पयसा तर्पणेन वा ।।
द्राक्षाविदारीकाश्मर्यमांसानां वा रसैर्युतान् । वा. चि. अ. ५

पांढरे निशोत्तर, काळे निशोत्तर किंवा बहाव्याचा मगज हीं औषधें साखर, मध व तूप यांजबरोबर, दुधाबरोबर, सातुच्या तखण्याबरोबर, द्राक्षें, भुईकोहळा व शिवणीचीं फळें यांच्या रसाबरोबर किंवा मांसरसाबरोबर जुलाब होण्याकरितां द्यावीत.

२९ क्षयरोगांत पंचकर्म कोणत्या अवस्थेंत उपयोगी

बलिनो बहुदोषस्य पंच कर्माणि कारयेत् ।
यक्ष्मिणः क्षीणदेहस्य तत् कृतं स्याद्विषोपमम् ।। भै. र. २९२

ज्याचें शरीर क्षीण झालें नाही, अगर तो पुष्कळ दोषांनी पीडित आहे, अशा रोग्याला वमन, विरेचन, निरुह, अनुवासन आणि स्वेदन या पंचकर्मांपैकी एक, दोन किंवा सर्वांचा प्रयोग करावा. पण बल व प्रकृति क्षीण असेल तर पंचकर्म चिकित्सा केल्यास ती विषाप्रमाणें घातक होते.

३० क्षयांत मळाचे संरक्षण करण्याची जरूरी

तस्मिन्काले पचत्यग्निर्यदन्नं कोष्ठसंश्रितम् ।
मली भवति तत् प्रायः कल्पते किंचिदोजसे ।।
तस्मात्पुरीषं संरक्ष्यं विशेषाद्राजयक्ष्मिणः ।
सर्वधातुक्षयार्त्तस्य बलं तस्य हि विड्बलम् ।। च. चि. अं. ३७६

या स्थितींत क्षयी मनुष्य जें अन्न खातो, त्याचा अग्नीच्या योगानें मळच बनतो व फारच थोड्याशा भागाचें ओज बनते. त्याकरितां क्षयी रोग्याचें मळाचें विशेष संरक्षण करावयास पाहिजे. कारण सर्व धातूंचा क्षय होत असल्यामुळे केवळ मळावरच त्याचें बल अवलंबून आहे.

२) मलायत्तं बलं पुंसां शुक्रायत्तं तु जीवितम् ।
तस्माद्यत्नेन संरक्षेद्यक्ष्मिणो मलरेतसी ।। यो. र. ५९१

मनुष्याचें सामर्थ्य मळावर अवलंबून आहे आणि जीवीत हें शुक्रावर अवलंबून आहे. यासाठी क्षयी मनुष्यानें वीर्य व मळ ह्यांचे हर प्रयत्नानें रक्षण करावें.

३) पुरीषं यत्नतो रक्षेच्छुष्यतो राजयक्ष्मिणः ।
सर्वधातुक्षयार्तस्य बलं तस्य हि विड्बलम् । वा. चि. अ. ५

क्षीण होत जाणाऱ्या क्षयरोग्याचा मळ राखण्याविषयी फार खबरदारी घ्यावी. कारण त्याच्या सर्व धातूंचा क्षय झालेला असल्यामुळे मळावर त्याची शक्ति अवलंबून असते.

३१ राजयक्ष्मा चिकित्साक्रम

ज्वराणां शमनीयो यः पूर्वमुक्तः क्रियाविधिः ।
यक्ष्मिणां ज्वरदाहेषु स सर्वोऽपि प्रशस्यते ॥ भै. र. २९१

ज्वरामध्यें दोषशमनासाठीं ज्या गोष्टी सांगितल्या आहेत, त्या सर्व राजयक्ष्मा या रोगामध्यें ज्वर व दाह या अवस्थांमध्यें उपयोगी आहेत.

उपद्रवा ज्वराद्यास्ते साध्याः स्वैः स्वैश्चिकित्सितैः ।
तेषु शान्तेषु रोगेषु पश्चाच्छोषमुपाचरेत ॥ भै. र. २९१

राजयक्ष्म्यामध्यें प्रथम ज्वरादि उपद्रवाची चिकित्सा, ज्वरनाशक काढे, चूर्ण, आसव, अरिष्ट, गुटिका व रसादि प्रयोगांनी करावी, व ज्वरादि उपद्रव शांत झाल्यावर राजयक्ष्म्याची स्वतंत्र चिकित्सा करावी.

ये च सर्पिगुडाः प्रोक्ता क्षते योज्याः क्षयेऽपि ते । वा. चि. अ. ५

उरक्षतावर जे सर्पिगुड सांगितले आहेत, ते क्षयावरहि योजावेत.

३२ राजयक्ष्म्यांत छागमांसादि सेवन

छागमांसं पयश्छागं छागं सर्पिः सशर्करम् ।
छागोपसेवा शयनं छागमध्ये तु यक्ष्मनुत् ॥ भै. र. २९३

बकरीचें मांस, बकरीचें दुध, साखर घातलेलें बकरीचें तूप हीं दररोज सेवन केल्यानें, तसेंच बकरीच्या तांड्यांत पलंग टाकून झोपल्यानें व बकरीच्याबरोबर सारखें राहिल्यानें राजयक्ष्मा नाहीसा होतो.

बोकडाचे सार क्षयावरील एक रामबाण औषध

बोकडाचे फुप्फुसाचे सार जर क्षयी रुग्णाला दिलें तर फुप्फुसांतील विकृति नाहीशी होऊन खोकला व ज्वर फारच लवकर नाहीसा होतो.

३३ क्षयांत षडंगयुष

द्रव्यतो द्विगुणं मांसं सर्वतोऽष्ट गुणं जलम् ।
पादस्थं संस्कृतं चाऽऽज्ये षडंगो यूष उच्यते ॥ यो. र. ५९५

औषधीद्रव्याचें दुप्पट मांस व सर्वाच्या आठपट पाणी एकत्र करून तें चतुर्थांश राहीपर्यंत शिजवावें व त्याला तुपाची फोडणी द्यावी. याला षडंगयुष म्हणतात.

३४ क्षयांत नवनीतादि प्रयोग

शर्करामधुसंयुक्तं नवनीतं लिहन् क्षयी ।
क्षीराशी लभते पुष्टिमतुल्ये चाज्यमाक्षिके ॥ भै. र. २९३

अग्नीबल असेल तर त्याप्रमाणें २ ते ३ तोळेपर्यंत ताजें लोणी किंवा तूप घेऊन त्यांत १ तोळा साखर व १ तोळा मध मिळवून तें दररोज सेवन करावें व त्यावर दूध घ्यावें. या नवनीतादि प्रयोगामुळे मनुष्य क्षयरोगांतून मुक्त होतो व मानसिक बल प्राप्त होतें, लोणी व मध विषम प्रमाणांत घ्यावें.

३५ क्षयांत सितोपलादि चूर्ण

त्वगेलापिप्पलीक्षीरी शर्करा द्विगुणाः क्रमात् ।
चूर्णिता भक्षिताः क्षौद्रसर्पिषा चावलेहिताः ।
स्वर्याः कासक्षय श्वास पार्श्व रुक्क फनाशनाः ॥ वा चि. अ. ५

१ तोळा दालचिनी, २ तोळे वेलची, ४ तोळे पिंपळी. ८ तोळे वंशलोचन व १६ तोळे खडीसाखर यांचें चूर्ण करून तें नुसतेंच खाल्लें असतां, मध. तूपाबरोबर चाटलें असतां, खोकला, क्षय, दमा, पार्श्वशूळ व कफ यांचा नाश होऊन स्वर चांगला होतो.

३६ क्षयरोगांत पारावतादि मांस चूर्ण

पारावतक पिच्छागकुरंगाणां पृथक् पृथक् ।
मांसचूर्ण मज्जाक्षीरैः पीतं क्षयहरं परम् ॥ भै. र. २९२

कबूतर, वानर, बकरे आणि हरिण यांचें शुष्क मांसाचें चूर्ण रोज बकरींच्या दुधाबरोबर सेवन केल्यानें क्षयरोग नाहीसा होतो.

३७ लवंगादि चूर्ण

लवंगकंकोलमुधीर चंदनं नतं सनीलोत्पल कृष्णजीरकम् ।
एला सकृष्णागरुभृंगकेसरं कणा सविश्वा जलदं सहाम्बुना ॥
कर्पूरजातीफलवशरोचनं सितार्धभागं सम सूक्ष्म चूर्णितम् ।
संरोचनं तर्पणमग्निदीपनं बलप्रदं वृष्यतमं त्रिदोषनुत् ॥
उरोविबंधं तमकं गलग्रहं सकासहिध्माहचि यक्ष्मपीनसम् ।
ग्रहण्यतीसारमथासृजः क्षयं प्रमेहगुल्मांश्च निहन्ति सत्वरन् ॥

यो. र. ५९६

लवंग, कंकोळ, वाळा, चंदन, तगर, निळी कमळे, शहाजिरें, वेलदोडे, कृष्णागरू, माका, नागकेशर, पिंपळी, सुंठ, जटामांसी, काळावाळा, कापूर, जायफळ,

वंशलोचन हीं सर्व औषधें समभाग घेऊन त्याचें चूर्ण करून, त्या चूर्णाच्या निम्यानें त्यांत साखर घालून तें सेवन करावें. हें रुचिकारक, तृप्तीदायक, अग्निदीपक, बलप्रद, अतिशय वृष्य, त्रिदोषनाशक व हृद्रोग, तमकश्वास, गलग्रह, खोकला, उचकी, अरुचि, क्षय, पीनस, संग्रहणी, अतिसार, रक्तक्षय, प्रमेह व गुल्म यांचा त्वरीत नाश करते.

३८ एलादि चूर्ण

एलापत्रं नागपुष्पं लवंगं भागस्त्वेषां द्वौ च खर्जूरकस्य ।
द्राक्षायष्टीशर्करापिप्पलीनां चत्वारस्तत्क्षौद्रयुक्तं क्षयेस्यात् ॥

यो. र. ५९७

वेलदोडे, तमालपत्र, नागकेशर, लवंग हीं औषधें एक एक भाग, खारीक दोन भाग, मनुका, जेष्ठमध, खडीसाखर व पिंपळी चार चार भाग, यांचें चूर्ण करून तें मधांतून क्षयावर द्यावें.

३९ द्राक्षादि चूर्ण

द्राक्षालाजसितोत्पलं समधुकं खर्जूरगोपीतुगा ।
ऱ्हीबेरा मलकाब्दचंदननतं कंकोलजातीफलम् ।
चातुर्जातकणा सधान्यकमिदं चूर्णं समां शर्करां ।
प्रातर्भक्षितमात्मकेन विधिना पित्तं सदाहं जयेत् ॥
मूर्च्छां छर्दिमरोचकं च शमयेत्कायस्य कान्तिप्रदं ।
पाण्डुं कामलरक्त पित्तमुदरं दाहज्वरारोचकम् ।
यक्ष्माणं रुधिरप्रमेहहरणं तद्योनिदोषापहं ।
रक्तार्शो मदवृद्धिविद्रधिहरं द्राक्षादिचूर्णोत्तमम् ॥
यवगोधूम चूर्णं वा क्षीरसिद्धं घृतप्लुतम् ।
सक्तून्वा सर्पिषा क्षौद्रसिताक्तान्क्ष यशान्तये ॥ यो. र. ५९८

मनुका, भाताच्या लाह्या, पांढरे कमळ, जेष्ठमध, खारीक, उपळसरी (अनंतमूळ वंशलोचन, वाळा, आवळकंठी, नागरमोथे, चंदन, तगर, कंकोळ, जायफळ, वेलदोडे, दालचिनी, तमालपत्र, नागकेशर, पिंपळी, धने यांचें समभाग चूर्ण करून त्यांत त्या चूर्णाच्या बरोबरीनें साखर मिळवून हें प्रातःकाळीं घ्यावें. म्हणजे दाहयुक्त पित्ताला जिंकते. मूर्च्छा, ओकारी, अरुचि यांचें शमन करून देहाला कांति देते. पांडुरोग, कावीळ, रक्तपित्त, उदर, दाह, ज्वर, अरुचि, क्षय, रक्तमेह यांचा नाश करिते. योनी, रक्त-मूळव्याध, उन्माद, अंडवृद्धि, करट यांचा नाश करितें. हें द्राक्षादिचूर्ण फार उत्तम आहे. तसेंच क्षयरोग बरा होण्याकरिता सातु किंवा गव्हाचें पीठ दुधांत शिजवून, तूप घालून खावें. किंवा त्याचेंच भाजून केलेलें पीठ, तूप, मध, व साखर घालून खावें.

४० अश्वगंधा चुर्ण

अश्वगंधादशपलं तदर्धं नागरान्वितम् ।
तदर्ध कणया युक्तं मरीचं च तदर्धकम् ।।
चातुर्जातं वन्दालं च भार्गीतालीस पत्रकम् ।
कचोराजाजिकैडर्यं मांसी कंकोलमुस्तकम् ।
रास्ना कटुकरोहिण्या जीवन्ती कुष्ठकं तथा ।
पृथक् कर्षमितं चूर्णं चूर्णेन समशर्करा ।।
प्रातःकाले त्विदं चूर्ण जलेनोष्णेन सेवयेत् ।
वातक्षये पित्तशोषे त्वजागोघृतसंयुतम् ।।
श्लेष्मक्षये क्षौद्रयुतं नवनीतेन मेहजित् ।
शिरोभ्रमे च पित्तार्ते गोक्षीरेण समायुतम् ।।
क्षतक्षीणे च देहे च विशेषबलवर्धनम् ।
मेहोदरं च मंदाग्निकुक्षिशुलोदरापहम् ।
अनुपानविशेषेण सर्वरोगहरं परम् ।।　　यो. र. ५९७

अश्वगंधा ४० तोळे, सुंठ २० तोळे, पिंपळी १० तोळे, मिरी ५ तोळें, दालचिनी तमालपत्र, वेलदोडे, नागकेशर, लवंग, भारंगमूळ, तालीसपत्र, कचोरा, जिरे, कायफळ, जटामांसी, कंकोळ, नागरमोथे, रास्ना, कुटकी, हरणदोडी, कोष्ठ हीं औषधें १—१ तोळा घेऊन. त्यांचें चूर्ण करून त्या चूर्णाच्या समान साखर घालून तें प्रातःकाळीं, ऊन पाण्याच्या घोटाबरोबर घ्यावें. ते वातजन्य व पित्तजन्य क्षयावर शेळीच्या तूपांतून घ्यावें. कफक्षयावर मधांतून घ्यावें. हें लोण्यांतून घेतलें असतां प्रमेहाचा नाश करिते. शिरोभ्रम (घेरी) व पित्तविकार, याजवर गाईचें दुधांतून घ्यावें. उरःक्षतानें क्षीण झालेल्यास हें विशेष बलवर्धक आहे. हें मेदनाशक असून अग्निमांद्य, कुशीतील शूळ व उदर यांचा नाश करिते. हें अश्वगंधा चूर्ण अनुपान विशेषानें दिलें असतां सर्व रोगांचा नाश करण्याविषयीं उत्तम आहे.

४१ कर्पूरादि चूर्ण

कर्पूरश्चोचकं कोलजातींफलदलाः समाः ।
लवंगमांसीमरिचकृष्णाशुंठ्यो विवर्धिताः ।।
चूर्णं सितासमं ग्राह्यं सदाहक्षयकासजित् ।
वैस्वर्यपीनसश्वास सच्छर्दिकण्ठामयापहम् ।
प्रयुक्तं त्वान्नपानैर्वा भेषजद्वेषिणां हितम् ।।　　यो. र. ५९७

कापूर, दालचिनी, कंकोळ, जायफळ व जायपत्री हीं समभाग, लवंग, जटामांसी, मिरी, पिंपळी व सुंठ हीं औषधें भागवृद्धीने घेऊन, चूर्ण करून त्या चूर्णांत त्याच्या

बरोबरीनें साखर घालून तें प्यावें. हें दाह, क्षय, कास, स्वरभेद, पीनस, श्वास, ओकारी व गळ्याचे रोग यांचा नाश करिते. ज्याला औषध घेण्याचा कंटाळा आहे, त्याला हें अन्नपानांतून दिलें असतां हितकारक आहे. हें कर्पुरादि चूर्ण हृदयदाहावर सांगितलें आहे.

४२ बृहन्नवायस चूर्ण

त्रिकटुत्रिफलैलाभिर्जातीफललवंगकैः ।
नवभागोन्मितैरेतैः समं तीक्ष्णं मृतं भवेत् ॥
संचूर्ण्याऽऽलोडयेत्क्षौद्रे नित्यं यः सेवते नरः ।
कासं श्वासं क्षयं मेहं पाण्डुरोगं भगंदरम् ॥
ज्वरं मन्दानलं शोथं मोहं संग्रहणीं जयेत् ॥ यो. र. ५९९

सुंठ, मिरी, पिंपळी, हिरडा, बेहाडा, आवळकंठी, वेलदोडे, जायफळ आणि लवंग हीं सर्व औषधें समभाग व ९ भाग तिख्याचें भस्म या सर्वांचें चूर्ण करून तें जो मनुष्य मधाशीं नित्य सेवन करतो, त्याचे कास, श्वास, क्षय, प्रमेह, पांडुरोग, भगंदर, ज्वर, अग्निमांद्य, सूज, मूर्च्छा व संग्रहणी हे रोग दूर होतात.

४३ क्षयावर योग

मधुताप्य विडंगाश्मजतुलोहघृताभयम् ।
हन्ति यक्ष्माणमत्युग्रं सेव्यमानं हिताशिना ॥ यो. र. ६००

मध, सुवर्ण माक्षिक, वावडींग, शिलाजित, लोह व हिरडयाची पूड, ही तुपाशी घेऊन, पथ्य करणाऱ्या मनुष्याचा अतिशय उग्र असा क्षय नाहीसा होतो.

शिलाजतुमधुव्योषताप्य लोहरजांसिच ।
क्षीरयुग्लेहिनश्चाऽऽशु क्षयःमवाप्नुयात् ॥ यो. र. ६००

शिलाजीत, मध, सुंठ, मिरी, पिंपळी, सुवर्णमाक्षिक, लोहभस्म या औषधांचें चूर्ण करून दुधाशीं ध्यावें, म्हणजे क्षय नाश पावतो.

४४ शिलाजत्वादि लोह

शिलाजतुमधुव्योषताप्यलोहरजांसि च ।
क्षीरेण लोहितस्याशु क्षयं क्षयमवाप्नुयात् ॥ भै. र. २९९

शुद्ध शिलाजीत, जेष्ठमधाचें चूर्ण, सुंठ, मिरे पिंपळी, व सुवर्णमाक्षिक भस्म. प्रत्येकी १--१ तोळा व सर्वाबरोबर (६ तोळे) लोहभस्म घेऊन सर्वांचा खल करावा मात्रा १ ते २ गुंजा. अनुपान दुध किंवा मध. हे शिलाजत्वादि लोह दररोज सेवन केल्यानें क्षयरोग बरा होतो.

शिलाजत्वादि लेह

शिलाजतुयुतं लोहं वल्लं तु विधिमारितम् ।
पथ्याशी सेवते यस्तु स यक्ष्माणं व्यपोहति ॥　　यो. र. ६३४

शिलाजीत, व विधियुक्त रितीनें मारलेलें लोहभस्म दोन्ही मिळून एक वाल सेवन करतो; व जो पथ्यानें राहतो त्याचा क्षय नाश पावतो.

४५ रजतादि लोह

भस्मीभूतं रजतममलं तत्समं व्योमचूर्णं ।
सर्वैस्तुल्यं त्रिकटु सवरं साय आज्येन युक्तम् ॥
लीढं प्रातः क्षययतितरां यक्ष्मपाण्डू दरार्शः ।
श्वासं कासं च नयनरुजः पित्तरोगानशेषान् ॥

रौप्यभस्म १ तोळा, अभ्रकभस्म १ तोळा, त्रिकटु २ तोळे तसेंच त्रिफळाचूर्ण २ ताळ. सर्व एकत्र करून समभाग (६ तोळे) लोहभस्म मिळवावें; सकाळीं योग्य मात्रा तुपाबरोबर सेवन केल्यानें राजयक्ष्मा, पांडु, उदररोग, अर्श, श्वास, कास, सर्व नेत्ररोग व पित्तविकार नाहीसे होतात.

४६ अश्वगंधादि क्वाथ

अश्वगन्धाऽमृताभीरुदशमुलीबलावृषाः ।
पुष्कराति विषे हन्ति क्षयं क्षीररसाशिनः ॥　　मै. र. २९३

अश्वगंधा, गुळवेल, शतावरी, दशमुळे, चिकणा, अडूळसा पुष्करमूळ, अतिवीष यांचा काढा ध्यावा व दूध व मांसरस याचे पथ्य करावें, त्यामुळे क्षय नाहीसा होतो.

४७ द्राक्षासव

मृद्वीकायास्तुलार्धं तु द्विद्रोणेऽपां विपाचयेत् ।
पादशेषे कषायेच पूतशीते प्रदापयेत् ॥
गुडस्य द्वितुला मानी धातक्या घृतभाजने ।
विडंगं फलिनी कृष्णा त्वगेला पत्रकेसरम् ॥
मरीचं च भिषक्चूर्णं सम्यग्दत्वा विचक्षणः ।
क्षिपेच्च पलिकैर्भागैः स्थापयेच्चैव तद्दिने ॥
ततो यथाबलं पीत्वा कासश्वासगलामयान् ।
हन्तियक्ष्माण मत्युग्रमुरः संधानकारकम् ॥
चतुर्थभागां द्राक्षाया धातकीपत्रकेचन ।
प्रयच्छन्ति ततो वीर्यं मेतस्योच्चैः प्रजायते ॥　　भै. र. ६१४

२०० तोळे मनुका, २०४८ तोळे (२ द्रोण, २ मण) पाण्यांत शिजवून, त्याचा चतुर्थांश काढा करावा. तो गाळून घेऊन निवल्यावर त्यांत आठशे तोळे जुना गूळ व ६४ तोळे धायटीचीं फुलें घालून ते तूपानें राबलेल्या मातीच्या घागरींत घालून त्यांत वावडींग, पिंपळी, दालचिनी, वेलदोडे, तमालपत्र, नागकेशर व मिरी हीं औषधें चार–चार तोळे घेऊन, त्याचें चूर्ण करून तें त्यांत घालून, पुरून ठेवावें. (महिना–पंधरा दिवसांनी काढून) यथाशक्ति प्राशन करीत जावें. म्हणजे ते कास, श्वास, गळयाचे रोग व अतिशय उग्र असा गळयाचा क्षय यांचा नाश करिते व उरःक्षताला भरून आणते. यामध्यें कित्येकांच्या मतानें मनुक्याच्या चतुर्थांश धायटीचीं फुलें घालावीत, असे आहे. यांच्या योगानें वीर्याची अत्यंत वृद्धि होते.

४८ च्यवनप्राशावलेह

शृंगीतामलकी फलत्रिकबलाछिन्ना विदारी शटी ।
जीवन्ती दशमूलचंदनघनैर्नीलोप्तलैलावृषैः ।
मृद्विकाष्टकवर्ग पौष्करयुतैः सार्धं पृथक्पालिकैः ।
रष्टोनानि शतानि पंच विपचेद्धात्रीफलानामपः ॥
उध्दृत्याऽऽमलकानि तैलघृतयोः षडभिश्च षडभिः पलैः ।
भृंष्टान्यर्धतुलां निधाय विधिवन्मत्स्यंडिकायाः पचेत् ॥
शीते षण्मधुनः पलानि कुडवौ वांशाश्चतुर्जाततो ।
मुष्टिर्मागधिकापलद्वयमयं प्राश्यः स्मृतश्चावनः ॥
न शोषः साफल्यं व्रजति वपुषि क्षीणमनसो ।
न मूर्च्छा नो छर्दिस्तदपि च न च श्वासकसनम् ॥
न चालक्ष्मीर्विघ्नः क्वचिदपि च न व्यापदभयं ।
प्रयोगादेत स्मान्मनसिजधिया बिभ्रति मनः ॥ यो. र. ६०१

काकडशिंगी, भुईआवळी, हिरडा, बेहेडा, आवळकंठी, चिकणामूळ, गुळवेल, भुईकोहळा, कचोरा, हरणदोडी, दशमुळे, चंदन, नागरमोथे, नीळे कमळ, वेलदोडे, अडुळसा, मनुका जीवक, ऋषभक मेदा, महामेद ऋद्धी वृद्धी, काकोली, क्षीरकाकोली व पोखरमूळ ही औषधें पृथक् पृथक् सहा सहा तोळे आणि आवळे चारशे ब्याण्णव घालून (दहाशे चोवीस तोळे) पाण्यांत काढा करावा. तो अष्टमांश उरल्यावर त्यांतून आवळे काढून घेऊन ते चोवीस तोळे तेल व चोवीस तोळे तूप यांत पचन करावे; नंतर त्या काढयात ते आवळे व दोनशे तोळे साखर घालून लेह करावा व तो थंड झाल्यावर त्यांत चोवीस तोळे मध, सोळा तोळे वंशलोचन, दालचिनी, तमालपत्र, वेलदोडे, नागकेशर ही दोन दोन तोळे व पिंपळीचे चूर्ण आठ तोळे घालून ढवळून सारखे करून ठेवावा आणि सेवन करावा. याला च्यवनप्राशावलेह म्हणतात. हा सेवन

करणाराला क्षय होत नाही देह पुष्ट होतो. मूर्च्छा व ओकारी हे विकार होत नाहीत, तसेच श्वास व खोकला हे विकार होत नाहीत व रोग होण्याची भिती नसते. या प्रयोगानें काम वासना उत्पन्न होते.

४९ क्षयावर कृष्णादि लेह

कृष्णाद्राक्षासितालेहः क्षयहा क्षौद्रतैलवान ।
मधुसर्पिर्युतो वाऽश्वगन्धाकृष्णासितोद्भवः ॥ भै. र. २९३

लहान पिंपळी, मनुका, खडीसाखरीचे चूर्ण, तिळाचे तेल हे सर्व मधा बरोबर सेवन केल्यानें क्षय शान्त होतो. किंवा अश्वगंधा, पिंपळी, खडीसाखर यांचे चूर्ण विषम प्रमाणांत मध व तूपाबरोबर सेवन केल्यानें क्षय नाहीसा होतो.

५० रक्तजवान्तीवर जेष्ठमधादि प्रयोग

यष्टयाव्हं चंदनोपेतं सम्यक् क्षीरप्रपेषितम् ।
क्षीरेणालोड्य पातव्य रुधिरच्छर्दिनाशनम् ॥ भ. र. २९३

ज्येष्ठमधचूर्ण व रक्तचंदन अर्धा अर्धा तोळा घेऊन दुधांत त्याचा खल करावा. ते अर्धा ते १ पाव दुधांत घालून गाळावे व त्यांत साखर मिळवून दररोज घ्यावे त्यामुळे रक्तज वांती बंद होते.

५१ रक्तयुक्त वान्तीवर लाक्षारस

अलक्तकरसः क्षौद्रं रक्तवान्तिहरं परम् ॥

एक तोळा लाक्षारस घेऊन त्यात मध घालून घेतल्यानें रक्तयुक्त वांती थांबते.

५२ यक्ष्मारिलौहम

मधुताप्य विडंगाश्म जतुलोहघृताभयाः ।
घ्नान्ति यक्ष्माणमत्युग्रं सेव्यमाना हिताशिना ॥

मध एक तोळा, सुवर्णमाक्षिकभस्म १ रत्ती, विढंगचूर्ण १ मासा शुद्ध शिलाजीत ३ रत्ती, लोहभस्म १ रत्ती, गोघृत अर्धा तोळा व हिरडाचूर्ण १ मासा हे सर्व सेवन करावें व भूक लागल्यावर हितकारक भोजन करावें, त्यामुळे उग्र राजयक्ष्मा नाहीसा होतो.

सर्वचूर्ण समं लोहचूर्णं घृतमधुभ्यां लिहेदिति 'भानुदासः ।

सुवर्ण माक्षिक भस्म १ तोळा, वावडींगचूर्ण १ तोळा, शुद्ध शिलाजित व हिरडाचूर्ण १-१ तोळा, लोहभस्म ४ तोळे या सर्वांचें चूर्ण करून त्यांत विषमप्रमाणांत तूप व मध मिळवावीत. नंतर त्याच्या २ गुंजा प्रमाणानें गोळ्या कराव्यात. रोज २ गोळ्या दुधाबरोबर घ्याव्यात.

किंवा-

योग्य प्रमाणानें तांबें, वावडींग, शिलाजतू, हिरडा, लोहभस्म हीं एकत्र करून तें १ ते ३ गुंजा प्रमाणानें पाव तोळा तूप व अर्धा तोळा मधाबरोबर दिवसांतून २ वेळ सेवन करावें. ज्वर असल्यास तूप मिळवूं नये. केवळ मधाबरोबर घ्यावें.

५३ चतुर्दशांग लोह

रास्नाकर्पूरतालीसं भेकवर्णी शिलाजतु ।
त्रिकटु त्रिफला मुस्ता विडंगदहनाः समाः
चतुर्दशायसो भागास्तच्चूर्णं मधुसर्पिषा ।
लीढं कासं ज्वरं श्वासं राजयक्ष्माणमेव च ।
बलवर्णाग्नि पुष्टीनां वर्धनं दोषनाशनम् ।। यो. र. ५९९

रास्ना, कापूर, तालीसपत्र, ब्राम्हीं शिलाजित, सुंठ, मिरी, पिंपळी, हिरडा, बेहाडा, आवळकंठी, नागरमोथें, वावडींग व चित्रकमूळ हीं औषधें समभाग व लोहभस्म चौदा भाग, या सर्वांचें चूर्ण करून तें तूप व मध यांशीं द्यावें, म्हणजे खोकला, ज्वर, श्वास व राजयक्ष्मा यांचा नाश करिते. बल, वर्ण, अग्नि व पुष्टी यांना वाढविते व दोषांचा नाश करिते.

५४ प्राणदा पर्पटी

सूताभ्रायोहिवंगोषणविषमखिलांशेन गन्धेन लोह्यां ।
कोलाग्नौ विद्रुतेन क्षणमथ मिलितं लितं गोमयस्थे ।
रम्भापत्रेऽमुनाऽन्येन च दृढपिहितं प्राणदा पर्पटी स्यात् ।
पाण्डौ रेके ग्रहण्यां ज्वररूजि कसने यक्ष्ममेहाग्नि मान्द्ये ।।
प्राणदा पर्पटी सैषा भाषिता शंभुना स्वयम् ।
तत्तद्रोगानुपानेन सर्वरोग विनाशिनी ।। यो. र. ६३२

पारा, अभ्रकभस्म, लोहभस्म, नागभस्म, वंगभस्म, मिरी, व शुद्ध बचनाग हीं सर्व समभाग घेऊन सर्वांच्या बरोबरीनें शुद्ध गंधक घालून खल करून लोखंडी कढईत बोरीच्या लाकडाच्या अग्निनें पातळ करून सर्व एकत्र मिसळल्यावर गाईच्या शेणावर केळीचें पान ठेवून त्यावर ओतावें. व केळीचें दुसरे पान वर ठेवून दडपून ठेवावे हिला प्राणदा पर्पटी असे म्हणतात. ही पांडुरोग हगवण, संग्रहणी, ज्वर, खोकला, क्षय, प्रमेह व अग्निमांद्य यावर द्यावी. ही प्राणदापर्पटी स्वतः शंभूनें सांगितली आहे. ही अनुपान योजून दिली असता सर्व रोग दूर करते.

५५ लक्ष्मीविलास

सुवर्णताराभ्रकताम्रवंगत्रिलोहनागामृत मौक्तिकानि ।
एतत्समं योज्य रसस्य भस्म खल्वे कृतं स्यात्कृतकज्जलीकम् ।।
सुमर्दयेन्माक्षिक संप्रयुक्तं तच्छोषयेद्वित्रिदिनंच धर्मे ।
तत्कल्कमूषोदरमध्यगामि यत्नात्कृतं तार्क्ष्यपुटेन पक्वम् ।।
यामाष्टकं पावकमर्दितं च लक्ष्मीविलासो रसराज एषः ।
क्षये त्रिदोषप्रभवे च पाण्डौ सकामलासर्वसमीरणेषु ।।
शोफप्रतिश्यायविनष्टवीर्यं मूलामयं चैव सशूलकुष्ठम् ।
हत्वाऽग्निमांद्यं क्षयसन्निपातं श्वासं च कासं च हरेत्प्रयुक्तम् ।।
तारुण्य लक्ष्मीप्रतिबोधनार्थं श्रीमद्विलासो रसराज एषः ।। यो. र. ६२५

सोनें, चांदी, अभ्रक, ताम्र, वंग, कान्तलोह, तिखे, मुंडलोह व नाग (शिसें) यांचीं भस्में व शुद्ध बचनाग, मौक्तिक हीं सर्व समभाग व या सर्वांच्या समान पाऱ्याचें भस्म घेऊन, त्या सर्वांचा चांगला खल करावा. व नंतर त्यांत मध टाकून खल करावा. व दोन तीन दिवस उन्हांत वाळवावा. नंतर मुशींत घालून तार्क्ष्यपुटामध्यें पचन करावें. स्वांगशीत झाल्यावर काढून चित्रकाच्या काढयांत आठ प्रहर खलावें, म्हणजे हा लक्ष्मीविलासरस तयार झाला. हा त्रिदोषजन्य क्षय, पांडुरोग, कावीळ, सर्व प्रकारचे वात, सूज, पडसें, धातूक्षीणता, मूळव्याध, कुष्ठ, शूळ, अग्निमांद्य, क्षय, सन्निपात, श्वास व खोकला यांचा नाश करतो. हा लक्ष्मीविलास नांवाचा रस ताऱुण्यलक्ष्मी देणारा आहे.

५६ कांचनाभ्ररस

कांचनं रससिंदूरं मौक्तिकं लोहमभ्रकम् ।
विद्रुमं मृतवैक्रान्तं तारं ताम्रंच वंगकम् ।।
कस्तूरिका लवंगंच जातीकोषंलवालुकम् ।
प्रत्येकं तिन्दुमात्रंच सर्वं संमर्द्य यत्नतः ।।
कन्यानीरेण संमर्द्य केशराजरसेन च ।
अजाक्षीरेण सम्भाव्यं प्रत्येकं दिवसत्रयम् ।।
चतुर्गुंजाप्रमाणेन वटिकां कारयेद्भिषक् ।
अनुपानं प्रदातव्यं यथादोषानुसारतः ।।
नानारोगप्रशमनं सर्वोपद्रवसंयुतम् ।
क्षयं हन्ति तथा कासं यक्ष्माणं श्वासमेव च ।।
प्रमेहान् विंशतिचैव दोषत्रय समुत्थितान्
सर्वरोगं निहन्त्याशु भास्करस्तिमिरं यथा

सुवर्णभस्म, रससिंदूर, मौक्तिकभस्म, लोहभस्म, अभ्रकभस्म, प्रवाळभस्म, वैक्रांन्तभस्म. रजतभस्म, वंगभस्म, कस्तुरी, लवंग, जायपत्री, जायफळ प्रत्येकाचें चूर्ण १ कर्ष सर्व एकत्र करून तें बारीक करावें व त्यास कोरफडीचा रस, माक्याचा रस आणि बकरीचे दूध यांचें प्रत्येकाच्या रसांत २ ते ३ दिवस खलावें. ४ गुंजा प्रमाणानें त्याच्या गोळया कराव्यात व दोषहर अनुपानाबरोबर हा कांचनाभ्ररस सेवन करावा. हा सर्व प्रकारचे रोगांना शांत करतो. तसेंच विशेषत: क्षय, कास, श्वास, वीस प्रकारचे प्रमेह व त्रिदोषानें उत्पन्न होणारे सर्व रोगांना नाहीसे करतो.

५७ कनकसुन्दर रस

रस: कनकभागिक: कनकमाक्षिकस्तालक:।
शिलारसकगन्धका रससमा: सतुत्था इमे ।
विमर्द्य पयसा रवे: सकलमेत दस्योपरि ।।
द्रवै: प्रतिदिनं पृथक्तदिति भावयेद् बुद्धिमान् ।
जयामुनिकलिप्रियादहन भृंगवासोद्भवै ।।
विभाव्य च रसैस्तत: सुदृढगोलकं स्वेदयेत् ।
मृगांकवदथाऽऽर्द्रकद्रवभरेण तं सप्तधा ।
विमर्द्य च कटुत्रयाम्बुभिरयं क्षयस्यान्तकृत् ।।
रस: कनकसुन्दरी भवति संनिपातेऽप्ययं ।
सदाऽऽर्द्रकरसैस्तथा पवनगुल्मशूलप्रणुत् ।
स विश्वघृतयोजित: सकलमत्र पथ्यं हितं
मृगांकवदथापरं किमपि नैव योज्यं क्वचिद् ।।

पारा, सोनें सुवर्णमाक्षिक, हरतालभस्म, शद्ध मनशीळ, शुद्ध कलखापरी व गंधक मोरचूद ही सर्व समभाग घेऊन रुईच्या चिकांत खल करावा. नंतर टाकळी, हदगा, बेहेडा चित्रक, माका अडुळसा यांच्या रसांत पृथक् पृथक् एक दिवस खल करून मृगांका प्रमाणें मिठानें भरलेल्या मातीच्या भांड्यात एक दिवस पचन करून स्वांगशीत झाल्यावर काढून आल्याच्या रसांत सात दिवस खल करून नंतर सुंठ, मिरी. पिंपळी यांच्या काढयांत खल करावा. म्हणजे हा रस क्षयाचा नाश करणारा होतो. हा कनकसुंदर रस आल्याचे रसांतून घेतला असतां सन्नीपात. वात, गुल्म व शूल यांचा नाश करतो हा सुंठ व तूप यांचे बरोबर द्यावा. व याच्यावर मृगांका-प्रमाणें पथ्य सांगावे दुसरे कांहीही केव्हांही योजू नये.

५८ राजमृगांक

रसभस्म त्रिभागं च भागैकं हेमभस्मकम् ।
मृतताम्रस्य भागैकं शिलागंधकतालकम् ॥
प्रतिभागद्वयं शुद्धमेकीकृत्वा विचूर्णितम् ।
वराटान्पूरयेत्तेन अजाक्षीरेण टंकणम् ॥
पिष्ट्वा तेन मुखं रुध्द्वा मृद्भांडे सन्निधापयेत् ।
शुष्कं गजपुटे पाच्यं चूर्णयेत्स्वांगशीतलम् ॥
रसो राजमृगांकोऽयं चतुर्गुंजा क्षयापहम् ।
एकोनविंशन्मरिचैर्घृतेन सह भक्षयेत् ॥
दशानां पिप्पलीनां च चूर्णं दत्वा प्रदापयेत् ।
क्षये कासे ज्वरे पाण्डौ ग्रहण्यामतिसारके ॥

पारदभस्म तीन भाग, सुवर्णभस्म एक भाग, शुद्ध मनशीळ, गंधक, हरताळ ही दोन दोन भाग या सर्वांचा एकत्र खल करून कवडयांत भरून शेळीच्या दुधांत टाकणखार खलून त्यानें त्या कवडयाच्या तोंडाला लेप करावा व मातीच्या भांडयात भरून संधीलेप करून सुकल्यावर गजपुट द्यावे. स्वांगशीत झाल्यावर काढून चूर्ण करावे याला राजमृगांक म्हणतात. हा चार गुंजा या प्रमाणानें द्यावा. म्हणजे क्ष याचा नाश होतो. हा एकोणवीस मिऱ्याची पुड किंवा दहा पिंपळयांची पूड व तूप याजबरोबर श्वास, खोकला ज्वर पांडुरोग संग्रहणी व अतिसार याजवर द्यावा.

५९ वसंत कुसुमाकर

प्रवालरस मौक्तिकाभ्रकमिदं चतुर्भागभाक् ।
पृथक्पृथगतः स्मृते रजतहेमनीद्वंशके ।
अयोभुजगरंगकं त्रिलवकं विमर्द्याखिलं ।
शुभेऽहनि विभावयेद्भिषगिदं धिया सप्तशः ।
द्रवैर्वृषनिशेक्षुजैः कमलमालती पुष्पजैः
पया कदलि कन्दजैर्मलयचन्दनादुद्भवैः ।
वसन्त कुसुमाकरो रसपतिर्द्विवल्लोऽशितः ॥
समस्तगदहृद्भवे त्किल निजानुपानैरयम् ॥
क्षिणोत्यनु मधुघणैः क्षयगदेषु सर्वेष्वपि ।
प्रमेहरुजि रात्रिभि समधुशर्कराभिः सह ।
सितामलयजद्रवैर्महति रक्तपित्तेऽथवा ।
सितामधु समन्वितैर्वृषभपल्लवानां द्रवैः ॥

त्रिजातगरुचन्दनैरपि च तुष्टिपुष्टिप्रदो ।
मनोभवकरः परो वमिषु शंखपुष्पीरसैः ।
अभिरूरस शर्करा मधुभिरम्ल पित्तामये ।
परेषु च यथोचितं ननु गदेषु संसेवयेत् ।।

प्रवाळभस्म, पारदभस्म (रससिंदूर), मौक्तिकभस्म, अभ्रकभस्म, हीं चार भाग, सुवर्णभस्म, रौप्यभस्म २-२ भाग, लोहभस्म, वंगभस्म हीं ३-३ भाग घेऊन, सर्वांचा खल करून, अडुळसा, हळद, ऊस, कमळाचीं फुलें, मालतीचीं फुलें, दूध, केळीच्या कांद्याचा रस व चंदन यांचा यथासंभव रसाच्या अगर काढयाच्या सात सात भावना द्याव्यात. नंतर वसंतकुसुमाकर रस अनुपान योजून द्यावा. म्हणजे सर्व रोगांचा नाशक होतो. हा मध व मिऱ्याची पूड यांशीं सर्व क्षयावर द्यावा. सर्व प्रमेहावर हळदीची पूड, मध व साखरेशीं द्यावा. चंदनाचा काढा व खडीसाखर यांशीं मोठ्या रक्तपित्तावर द्यावा किंवा मध व खडीसाखर यांत अडुळशाच्या पानांचा रस घालून त्यांतून द्यावा. दालचिनी, तमालपत्र, वेलदोड्याचे दाणे, अगरू व चंदन यांच्या चूर्णांशीं दिला असतां प्रसन्नता, पुष्टी व कामोत्तेजन करतो. हा ओकारीवर शंखपुष्पीच्या रसांतून द्यावा. शतावरीचा रस, साखर व मध याजबरोबर आम्लपित्तावर द्यावा आणि इतर रोगावर अनुपान योजून द्यावा.

६० हेमाभ्रक रससिंदूर

अभ्रकं रससिंदूरं मिश्रितं हेमभस्मना ।
समभागं प्रकुर्वीत रसेनाऽऽर्द्रक योजितम् ।
क्षयं च क्षयपाण्डुं च क्षयकासं च कुष्ठकम् ।
जयेन्मण्डलपर्यन्तं पूर्वकर्मविपाककृत् ।। यो. र. ६३४

अभ्रकभस्म, सुवर्णभस्म, रससिंदूर हीं औषधें समभाग घेऊन त्यांचा एकत्र खल करावा व आल्याच्या रसांतून त्याची योजना करावी. हा बेचाळीस दिवस घेतला असतां पूर्वकर्म विपाकानें झालेला क्षय, पांडुरोग, क्षयकास व कुष्ठ यांना जिंकतो.

६१ कुमुदेश्वर रस

पारदं शोधितं गन्ध मभ्रकंच समं समम् ।
तदर्धं दरदं दद्यात्तदर्धां च मनःशिलाम् ।।
सर्वार्धं मृतलोहं च खल्वमध्ये विनिक्षिपेत् ।
द्विःसप्तभावना देयाः शतावर्या रसेन च ।।
ततः सिद्धो भवत्येष कुमुदेश्वर संज्ञकः ।
सितया मरिचेनाथ गुंजाद्वित्रिप्रमाणतः ।।

भक्षयेत्प्रातरुत्थाय पूजयित्वेष्टदेवताम् ।
यक्ष्माणमुग्रं हन्त्येव वातपित्तकफामयान् ।।
ज्वरादीन खिलान्रोगान्यथा दैत्यान्जनार्दनः ।
सतताभ्यासयोगेन वलीपलितनाशनः ।।   यो. र. ६३३

शुद्ध पारा, गंधक व अभ्रक समभाग, अर्धा भाग शुद्ध हिंगुळ, पावभाग शुद्ध मनशीळ या सर्वांच्या निम्मे लोहभस्म, यांचा एकत्र खल करून त्याला शतावरीच्या रसाच्या चौदा भावना द्याव्या. म्हणजे हा कुमदेश्वररस तयार होतो. तो रोज प्रातःकाळीं इष्ट देवतेची पूजा करून हा रस दोन तीन गुंजांपर्यंत मिऱ्याची पूड व खडीसाखर याशीं द्यावा, म्हणजे वात, पित्त, व कफजन्य रोग, व उग्रक्षय यांचा नाश करतो. ज्याप्रमाणें विष्णू दैत्यांचा नाश करतो, त्याप्रमाणें ज्वरादि सर्व रोगांचा हा नाश करतो. सतत अभ्यासानें हा वलीपलीत रोगांचा नाश करतो.

६२ चतुर्मूखरस

सूतायोभ्रकगंधकं समलवं सूतार्धतुल्यं मृतं ।
स्वर्णं सर्वमिदं निधाय विमले खल्वे दिन मर्दयेत् ।
कन्याव्योषवरापुनर्नवरसैः कच्छूलवंगैः पुन ।
भाव्यं चित्रकपद्मकैर्घनतरं सेव्यष्टधान्यान्तगम् ।।
कुर्यात् ब्रह्मविनिर्मितं रसवरं यक्ष्मापहं पुष्टिदं ।
वल्लं क्षौद्र फलत्रयेण सहित मेहाग्निमांद्यप्रणुत् ।।   यो. र. ६१७

पारा लोहभस्म, अभ्रकभस्म गंधक, ही औषधें समभाग व पाऱ्याच्या चतुर्थांश सुवर्णभस्म या सर्वांचा खलामध्यें एक दिवस खल करावा. आणि कोरफड, सुंठ, मिरे, पिंपळी, हिरडा, बेहेडा, आवळकंठी, वसू, चित्रकमूळ, पद्मकाष्ठ, यांची एक एक भावना देऊन धान्याच्या राशींत कांही दिवस पुरून ठेऊन काढावा. याला चतुर्मूखरस म्हणतात, हा ब्रह्मदेवानें सांगितला आहे; हा क्षयनाशक व पुष्टीदायक आहे. हा एक वालभर मध व त्रिफळचाचा रस याशी घ्यावा म्हणजे प्रमेह व अग्निमांद्य यांचा नाश होतो.

६३ चंद्रामृतोरस

रसगंधक योर्ग्राह्यं कर्षमेकं सुशोधितम् ।
अभ्रं निश्चंद्रकं दद्यात् पलार्द्धंच विचक्षणः ।।
कर्पूरं शाणकं दद्यात् स्वर्णं तोलकसम्मितम् ।
ताम्रंच तोलकं दद्यात् विशुद्धं मारितं भिषक् ।।
लोहं कर्षं क्षिपेत्तत्र वृद्धादारुकजीरकम् ।

विदारी शतमूली च क्षुरकंच बला तथा ॥
मर्कटचतिबला चैव जातीकोषफले तथा ।
लवंगं विजयाबीजं श्वेतसर्जरसं तथा ।
शाणभागं समादाय चैकीकृत्य प्रयत्नतः ।
मधुना मर्दयेत्तावद् यावदेकत्व मागतम् ॥
चतुर्गुंजाप्रमाणेन वटिकां कुरु यत्नतः ।
भक्षयेद्वटिकामेकां पिप्पली मधुना सह ॥ भै. र. ३०२

शुद्ध पारा, गंधक १-१ तोळा, निश्चंद्रक अभ्रकभस्म अर्धा पळ (२ तोळे) शुद्ध कापूर १ शाण (४ मासे), सुवर्णभस्म, ताम्रभस्म, लोहभस्म हीं प्रत्येकी १-१ तोळा, वरधारा, जिरे, विदारिकंद, शतावरी, तालीमखाना, बेलाचें मूळ, कवचबीज, अतिबला मूळ, जायपत्री, जायफळ, भांगेचें शुद्ध बी, पांढरी राळ, प्रत्येक चूर्ण ४-४ मासे घेऊन, प्रथम पारा व गंधकाची कज्जली करून त्यांत राहिलेलीं द्रव्यें मिळवून तीं मधाबरोबर घोटून त्याच्या ४-४ गुंजेच्या गोळ्या कराव्यात ह्या बृहत्चंद्रामृत रसाच्या २ गोळ्या दररोज २ गुंजा पिंपळीचूर्णाबरोबर व अर्धा तोळा मध घेऊन सेवन कराव्यात.

६४ क्षय केसरी रस

त्रिकटुत्रिफलैलाभिर्जातीफललवंगकैः ।
नवभागान्वितं लौहं समं सिंदूरसन्निभम् ॥
छागी दुग्धेन सम्पिष्य वल्लभस्य प्रयोजयेत् ।
मधुना क्षयरोगांश्च हन्त्ययं क्षयकेसरी ॥ भै. र. २९९

सुंठ, मिरे, लहान पिंपळी, हिरडा, बेहाडा, आवळकंठी, इलायची, जायफळ व लवंग ह्या प्रत्येकाचें चूर्ण १-१ तोळा व त्याचें बरोबर (९ तोळे) सिंदुराप्रमाणें रंग असलेलें लोहभस्म घ्यावें व तें बकरीचें दुधांत एक प्रहरपर्यंत खलावें. २ गुंज प्रमाणानें गोळ्या कराव्यात. या २ गोळ्या दररोज मधाबरोबर सेवन केल्यानें सर्व प्रकारचे क्षयरोग नाहीसें होतात.

६५ लाक्षादि तैल

तैलं प्रस्थमितं चतुर्गुणजतुक्वाथं चतुर्मस्तुरु ।
यष्टीदारु निशाब्दमुर्वकटुकामिश्यश्च कौन्तीहिमैः ।
रास्नाद्यैः पिचुसंमितैः कृतमिदं शस्तं तु जीर्णज्वरे ।
सर्वस्मिन्विषमेऽपि यक्ष्मणि शिशौ वृद्धे सगर्भासु च ॥

तिळाचें तेल चौसष्ट, लाखेचा काढा चौपट, दह्याची निवळ तेलाच्या चौपट, कोष्ठ, जेष्ठमध, देवदार, हळद, नागरमोथे, मोरवेल, कुटकी, रेणुकाबीज, बडिशेप, कापूर व रास्ना या औषधांचा कल्क तोळा–तोळा घालून तेल सिद्ध करावे. तें जीर्णज्वरावर फार प्रशस्त आहे. तें सर्व प्रकारचे विषमज्वर व क्षय या विकारावर व बाल, वृद्ध, गर्भिणी स्त्रिया यांना फार उपयोगी आहे.

६६ चन्दनबलालाक्षादि तेल

चंदनंच बलामूलं लाक्षा लामज्जकं तथा ।
पृथक्पृथक्प्रस्थमितं जलद्रोणे विपाचयेत् ।।
चतुर्भागावशेषेऽस्मिंतैलं प्रस्थद्वयं क्षिपेत् ।
चंदनोशीरमधुकशताह्वा कटुरोहिणी ।।
देवदारु निशा कुष्ठं मंजिष्ठागुरुवालकम् ।
अश्वगंधाबलादार्वीमूर्वा मुस्ता सतूलिका ।।
एला त्वग्नागकुसुमं रास्ना लाक्षा सुगंधिका ।
चम्पकं पीतसारं च सारिवा चोरकद्वयम् ।।
कल्कैरेतैः समायुक्तं क्षीराढक समन्वितम् ।
तैलमभ्यंजने श्रेष्ठं सप्तधातु विवर्धनम् ।।
कासश्वासक्षयहरं सर्वच्छर्दि निवारणम् ।
असृग्दरं रक्तपित्तं हन्ति पित्तकफामयम् ।
कान्तिकृद्दाहशमनं कण्डूविस्फोटनाशनम् ।
शिरोरोगं नेत्रदाहमंगदाह च नाशयेत् ।।
वातामयहतानां च क्षीणाना क्षीणरेतसाम् ।
बालमध्यमवृद्धानां शस्यते शोफकामले ।
पाण्डुरोगे विशेषेण सर्वज्वरविनाशनम् ।। यो. र. ६१२

चंदन, चिकणामूळ, लाख व वाळा, हीं प्रत्येकी चौसष्ठ तोळे घेऊन, दहाशे चोवीस तोळे पाण्यांत चतुर्थांश काढा करावा. नंतर त्या काढ्यांत एकशे अठ्ठावीस तोळे तेल घालून, चंदन. वाळा, जेष्ठमध, बडिशेप, कुटकी, देवदार, हळद, कोष्ठ, मंजिष्ठ, अगरू, काळा वाळा, आस्कंद, चिकणामूळ, दारुहळद, मोरवेल, मुळासह नागरमोथे, वेलदोडे, दालचिनी, नागकेशर, रास्ना, लाख, पांच चाफ्याचीं फुलें. पिवळा चंदन, उपळसरी, तगर, गठोना यांचा कल्क व दोनशे छपन्न तोळे दूध यांमध्यें तेल पचन करावें, हें तेल अंगाला लावण्यास श्रेष्ठ असून सप्तधातूंना वाढविणारें आहे. खोकला, श्वास, क्षय, सर्व प्रकारची वांति, रक्तप्रदर, रक्तपित्त व पित्तकफात्मक रोग यांचा नाश करिते. कांति वाढविते. दाह शांन्त करिते. कंडु विस्फोट यांचा नाश करिते.

वातरोगाने जें पछाडलेले क्षीण झालेले धातुक्षयी बाल, तरुण व वृद्ध यांना हितावह असून सूज, कावीळ, पांडुरोग व विशेषत: ज्वर यांचा नाश करणारे आहे.

१७ क्षयरोग्याला हितकारक आहार

शुद्धकोष्ठस्य युंजीत विधि बृंहणदीपनम् ।
हृद्यानि चाऽन्नपानानि वातघ्नानि लघुनि च ।
शालिषष्टिकगोधूमयवमुद्गं समोषितम ।।
आजं क्षीरं घृतं मासं क्रव्यान्मांसंच शोऽजित् । वा. चि. अ. ५

शुद्ध कोठा झाला म्हणजे बृंहण व दीपन चिकित्सा करावी. हितकारक व हलकीं अशीं अन्नपानें सेवन करावींत. साळी, साठेसाळी, गहूं, जव, व मूग हीं धानें एक वर्षांचीं जुनीं द्यावींत. बकरीचें दूध, तूप व मांस आणि मांसभक्षक प्राण्याचें मांस हें सर्व क्षयरोग्याला हितकारक आहे.

शालिषष्टिक गोधूमयवमुद्गादयाः शुभाः ।।
मद्यानि जांगलाः पक्षिमृगाः शस्ता विशुष्यतः ।
मूलकानां कुलत्थानां यूषैर्वा सूपसंस्कृतैः ।।
सपिप्पलीकं सयवं सकुलत्थं सनागरम ।
दाडिमाम लकोपेतं स्निग्धमाजरसं पिबेत ।।
तेन षड् विनिवर्तन्ते विकाराः पीनसादयः
सधान्ययवगोधूममुद्गाश्चापि सदा हिताः ।।
स्त्रियश्चतुष्पदे श्रेष्ठाः पुमांसो विहगा मताः ।
हरिणच्छागमांसं तु श्लक्ष्णचूर्णीकृतं शुभम् ।।
अजाक्षीरेण पातव्यं क्षयव्याधिनिवारणम् ।
छागमांसं पयच्छागं सर्पिश्छागं सशर्करम् ।
छागोपसेवा सततं छागमध्ये तु यक्ष्मनुत् ।। यो. र. ५९४

साठचासाळी, गहु, सातू, मूग, हीं धान्यें पथ्यकारक आहेत. मद्यें, जांगलपक्षी मृग यांचें मांस, वाळलेले मुळे, हुलगे यांचे यूष किंवा वरण यांनी मिश्र असें अन्न खावें. तसेंच पिंपळी, सातू, हुलगे, सुंठ, डाळींब व आवळकंठी यांनी तयार केलेला शेळीच्या मांसाचा सुरवा घ्यावा. म्हणजे क्षयासंबंधी पिनसादि सहा विकार दूर होतात. धने, सातू, गहू व मूग हीं धान्यें नेहमी हितकारक आहेत. चतुष्पाद जनावरांतील मादीचें मांस श्रेष्ठ व पक्षामध्यें नराचें मांस श्रेष्ठ आहे. हरीण व बोकड यांचें मांस बारीक चूर्ण करून घ्यावें. तें चांगलें शेळीचें दूधांतून द्यावें. म्हणजे क्षय रोगाचा नाश होतो. शेळीचें मांस, शेळीचें दूध, शेळीचें तूप यांचें साखर घालून सेवन करावें. शेळयाची सेवा करणें व शेळयांतच राहणें, हें क्षयनाशक आहे.

राजयक्ष्म्यामध्ये पथ्य

मद्यानि जांगलं पक्षि मृगमांसं विशुष्यताम् ।
मुद्गषष्टिक गोधूमयव शाल्यादयो हिताः ॥
दोषाधिकस्य बलिनो मृदुशुद्धिरादौ ।
गोधूममुद्गचणकारुणशालयश्च ।
छागादिमांसनवनीतपयोघृतानि
क्रव्याद मांसमपि जांगलजा रसाश्च
मार्तण्डचण्डकिरणैः परिशोषितानि
लेह्यान्यपक्वपललानि सुचूर्णितानि ।
रागाः सकाम्बलिकषाडववेशवारा
भक्ष्याः शशांककिरणा मधुरो रसश्च ॥
पक्वानि मोचपनसाम्रफलानि धात्री ।
खर्जुरपौष्करपरुषकनारिकेलम् ।
शोभांजनं च कुलकं नवतालशस्यं
द्राक्षाफलानि मिशयोऽपि च मणिमन्थम् ॥
सिंहास्यपत्रमपि गोर्महिषी घृतं च ।
छागाश्रयश्च तदवस्करमूत्रलेपः ।
मत्स्यण्डिका शिखरिणी मदिरा रसाला ।
कर्पूरकं मृगमदः सितचंदनं च ।
अभ्यजनानि सुरभीण्यनुलेपनानि ।
स्नानानि वेशरचनान्यवगाहनानि ।
हर्म्यं स्त्रजः स्मरकथा मृदुगन्धवाहो ।
गीतानि नृत्यमपि चन्द्ररुचौ विपंची ।
संदर्शनं मृगदशामपि हेमचूर्णं
मुक्तामणिप्रचुरभूषणधारणंच ।
होमः प्रदानममरद्विजपूजनानि ।
हृद्यान्नपानमपि पथ्यगणः क्षयेषु ॥ भै. र. ३१४

मद्य, जांगल पशु-पक्षांचें मांस, मूग, साठेसाळी, गहू, जव, शाली धान्यें हीं सर्व शोष-क्षयरोग्यास हितकारक आहेत. जर क्षयरोगी बलवान असेल, तर त्यास हलका जुलाब देऊन कोठा शुद्ध करावा. गहू, मूग, चणे, लाल तांदूळ, बकऱ्याचें मांस शेळीचें दूध, लोणी, तूप, मांसभक्षक प्राण्याचें मांस, जांगल प्राण्याचें मांसरस, सूर्याच्या उष्णतेने शोषण केलेला अवलेह, कच्च्या मांसाचें चूर्ण, ताकाची कढी, गुळाची राब, मांसरस हे सर्व क्षयरोग्यास खाण्यास • हितकर आहे. चंद्राचीं किरणें, मधुररस, पिक-

लेली केळीं, फणस, आंबे, आवळा, खजूर, कमलकंद, फाळसा, नारळ, बहाव्याचो शेंग, पडवळ, नवीन ताडीचें फळ, सोप, सेंधेलोण, अडुळशाचीं पानें, गाय–म्हशीचें तूप, मेंढया बांधणीच्या जागेंत राहणें, बकरीच्या मलमूत्राचा लेप करणें, खडीसाखर, श्रीखंड, मद्य, मांसरस, कापूर, कस्तुरी, पांढराचंदन, सुगंधीत द्रव्यें यांचें अभ्यंग करणें, सुगंधीत द्रव्याचें लेप करणें, स्नान करणें, चांगली वस्त्रें व अलंकार धारण करणें, निवांत ठिकाणीं राहणें, फुलांच्या माळा घालणें, कामोद्दीपन गोष्टी ऐकणें, शीतल, मंद, सुगंधीत वायु घेणें, गाणें ऐकणें, सुंदर स्त्रियांच्या सहवासांत राहणें, रत्नें धारण करणें, होम करणें, दान करणें, देव–ब्राम्हणांचें पूजन करणें, हितकारक अन्न घेणें या सर्व गोष्टी राजयक्ष्म्याच्या रोग्याला पथ्यकारक आहेत.

६८ राजयक्ष्मामध्यें वर्ज्य पदार्थ

विरेचनं वेगविधारणानि श्रमं स्त्रियं स्वेदनमंजनंच ।
प्रजागरं साहसकर्ममेवा–रूक्षान्नपानं विषमाशनं च ।।
ताम्बूलकालिन्दकुलत्थमाष ।
रसोनवंशांकुररामठानि ।
अम्लानि तिक्तानि कषायकाणि ।
कटूनि सर्वाणि च पत्रशाकम्
क्षारान्विरुद्धान्यशनानि शिम्बी ।
कर्कोटकं चापि विदाहि सर्वम् ।
कठिल्लकं कोष्णमपि क्षयेषु ।
विवर्जयेत्संततमप्रमत्तः ।।
वृन्ताकं कारवेल्लंच तैलं बिल्वं च राजिकाम् ।
व्यायामं च दिवा निद्रां क्षयो कोपं विवर्जयेत् ।। भै. र. ३१५

जुलाब देणें, मलमूत्रादि वेगांचा अवरोध करणें, जास्त श्रम करणें, मैथुन, स्वेद घेणें, अंजन घालणें, रात्रीं जागरण, शक्तिपेक्षा जास्त मोठीं कामें करणें, रुक्ष अन्न सेवन करणें, विषम भोजन करणें, कुळीथ, उडीद, लसूण, वंशलोचन, हिंग, आंबट, कडु, कषाय हे रस, पालेभाज्या, क्षार पदार्थ, परस्पर विरुद्ध पदार्थ सेवन करणें, द्विदल धान्यें इत्यादि विदाही पदार्थ हीं सर्व द्रव्यें क्षयरोगामध्यें वर्ज्य करावीत. आणि वांगीं, कारलीं, तेल, बिल्व, मोहरी, व्यायाम, दिवसा झोप घेणें, क्रोध हे सर्व क्षयी रोग्यानें वर्ज्य करावें.

६९ क्षयरोग्यास द्यावयाचे पाणी

जलं वा पंचमूलिकम् ।
धान्य नागर सिद्धं वा तामलक्याऽथवाश्रृतम् ।

पर्णिनी भिश्चतसृभिस्तेन चान्नानिकल्पयेत् । च. चि. ३०९

पंचमुळे, घालून कढविलेलें पाणी अथवा धनें व सुंठ हे घालून उकळलेलें पाणी अथवा भुईआवळी घालून कढविलेलें पाणी अथवा चारहि पर्णिनि (शालपर्णि, मुद्गपर्णि, माषपर्णी व पृश्निपर्णि) पाण्यांत घालून कढविलेलें पाणी क्षयरोग्यांना पिण्यास द्यावें.

७० क्षयरोग्यांनी पाळावयाचे नियम

१. स्रोतसाचा अवरोध नाहीसा करणारी योजना.

२. क्षयरोगांत होणाऱ्या संभाव्य स्थानसंचयावर योजना. क्षयांत पहिल्यानें फुप्फुसांत विकृति होते. म्हणून फुप्फुसाचे कार्याला मदतगार व फुप्फुसांत विकृति झाल्यास ती दुरुस्त करणारी औषधी-योजना.

३. क्षयांतील ज्वर, खोकला, आदि विकार नाहीसे करणारी औषधीयोजना.

४. अग्नि प्रदीप्त करणारीं औषधें देणें.

५. फुप्फुस हें कफाचें स्थान होय. व क्षयांत विकृतीहि त्याच स्थानांत पहिल्यानें होते, म्हणून क्षयामध्यें हेमगर्भ एक गुंज रात्रीं निजतांना मधून मधून द्यावा व चंदन-बलालाक्षादि तेल छातीला व इतरहि भागाला चोळावें व छाती थोडी शेकत जावी.

६. पाणी, वावडींग व थोडी सुंठ घालून, ती उकळून चवथाई आटल्यावर थंड करून पीत जावें.

७. आंबट व थंड पदर्थ खाणें बंद करावे.

८. स्रोतसें मोकळीं होण्याकरितां आरोग्यवर्धिनी पहिलें आठ-दहा दिवस दिवसांतून एकादे वेळेस मधांतून देत जावें.

९. बकरीचें दूध, लिव्हर एक्स्ट्रॅक्ट हे दररोजच्या जेवणांत असावें.

१०. जेवणानंतर द्राक्षासव, अमृतारिष्ट, अर्जुनारिष्ट. यापैकी एकादे एक तोळा व तितकेंच पाणीं घालून पिणें.

११. क्षयरोग्याचें शरीराला विशेषे करून फुप्फुसाला चंदनबलालाक्षादि तेल, त्यांत सैंधव व कापूर घालून तें गरम करून कांही दिवस सतत मर्दन करावें.

७१ क्षयावर उत्तम योग

१. सकाळीं व रात्रीं-

अभ्रकभस्म १॥ मासा
प्रवाळ १॥ मासा
मृगश्रृंग १॥ मासा
सुवर्णभस्म ६ गुं.

वंशलोचन १ तोळा

गुळवेलसत्व ६ मासे

हीं सर्व औषधें एकत्र घोटून त्याच्या ४–४ गुंजेच्या पुडचा करून त्या अडुळशाच्या स्वरसांतून मध घालून सकाळीं १ पुडी व रात्रीं १ पुडी घ्यावी.

दुपारीं २ वाजतां–

राजमृगांक ॥ गुं.

कुमुदेश्वर ॥ गुं.

ह्याची एक पुडी करून बकरीचें दुधांतून घेणें.

तेलमर्दन–चंदनबलालाक्षादि तेलानें छातीला व इतरहि भागाला मर्दन करावें.

खोकला जास्त त्रास देत असल्यास कर्पूरादिगुटिका तोंडांत धरून चघळावी. श्वासकुठार व सितोपलादि हीं दोन्हीं एकत्र करून वापरावीत.

२. कुमुदेश्वर २ गुं.

राजमृगांक ३ गुं.

अभ्रक २ गुं.

आरोग्यवर्धिनी ४ गुं.

४ पुडचा. यापैकी १ पुडी चवनप्राशावलेह १ तोळा घेऊन त्यांत मिसळून घ्यावी. त्याचप्रमाणें रात्रीं १ पुडी घ्यावी.

निजतांना १ गुंज हेमगर्भ तुळशीच्या रसांतून घेणें व खोकल्याकरितां श्वासकुठार ३ गुंजेच्या २ पुडचा द्याव्यात.

३. सुवर्णमालिनीवसंत १ गुंज.

मौक्तिक १ गुंज

मृगश्रृंग १ गुंज

सितोपला १ मासा

हीं सर्व एकत्र करून मधांतून चाटावीत. याप्रमाणें सकाळीं व संध्याकाळीं घ्यावें व दुपारीं कुमुदेश्वर १ गुंज मधांतून घ्यावें. याप्रमाणें वीस–बावीस दिवस हें औषध सुरू ठेवावें. व खोकला फार असल्यास हेमगर्भ १ गुंज मधांतून निजतांना द्यावा. व खोकला असल्यास श्वासकुठार ३ गुंजा. २ पुडचा मधांतून द्याव्यात.

(४) हेमाभ्रकरससिंदुर ३ गुंजा. मौक्तिकभस्म ३ गुंज. प्रवाळभस्म २ गुंज, मौक्तिकभस्म १ गुंज, या सर्व औषधींची १ पुडी करून मधांतून घ्यावी व रात्रीं हेमगर्भ १ गुंज मधांतून घ्यावा. व खोकल्याकरितां श्वासकुठार ३ गुंज व सितोपलादि २ मासे यांच्या २ पुडचा करून त्या मधांतून द्याव्यात.

(५) वसंत तिलकरस दोन गुं.. प्रवाळप्रभस्म दोन गुंज, अभ्रक दोन गुंज, सीतोपलादिचूर्ण १ मासा, या सर्वांच्या २ पुड्या करून त्या मधांतून सकाळीं व रात्रीं घ्याव्यात. दुपारीं ४ वाजतां हेमाभ्ररससिंदुर १ गुंज मधांतून घ्यावा. व खोकल्याकरितां कफकुठार ३ गुंजेच्या गोळ्या करून त्या मधांतून द्याव्यात.

(६) रससिंदुर, चंद्रोदय, लक्ष्मीविलास, वसंतकुसुमार व सोन्याचा वर्ख यापैकीं कोणतीहि दोन किंवा तीन औषधें एकत्र करून योग्य प्रमाणांत व च्यवनप्राशावलेहांतून किंवा बकरीचें दुधांतून देणें.

(७) गळ्यांत किंवा पोटांत अथवा काखेंत गाठी दिसल्यास आरोग्यवर्धिनी, पुनर्नवामंडुर, लोकनाथ (यकृतावरील) यांपैकीं दोन औषधें एकत्र करून तें बकरीचें दुधांतून देणें.

(८) आंतडींत विकार होऊन शौचाला जास्त होत असल्यास सुवर्णपर्पटी ॥ गुंज मधांतून द्यावी. याप्रमाणें दिवसांतून २ वेळ देणें. शिवाय वरील नं. १ ते ४ पैकीं कोणतातरी एकादा योग चालू असावा.

मागे सांगितलेल्या औषधीनें उष्णता वाटणें, तोंड येणें हे विकार वाटत असतील तर, सुवर्णमाक्षिक १ गुंज व प्रवाळ २ गुंज हीं औषधें दूध–साखरेंतून ३–४ दिवस घेतलीं असतां नाहीसे होतात.

औषध सुरू असूनहि एक महिन्यानंतर वजन वाढलें नाही तर दुसरें औषध सुरू करावें.

कोणतेंहि औषध घेऊन त्यानें बरें वाटत असून, वजन, शक्ति, उत्साह वाढलेला दिसू लागला म्हणणे औषध बंद करावें. पुढे सामान्य पथ्यानें राहण्यास सांगावें.

७२ क्षयरोग्यांना द्यावयाचें अन्न व पाणी

क्षयरोग्याला जे पाणी द्यावयाचे तें मागे सांगितलेलीं औषधें घालून सिद्ध केलेलें द्यावें किंवा उकळी येईपर्यंत तापवून थंड केलेलें व उकळतांना त्यांत सुंठ, जेष्ठमध, वावडींग हीं थोडीं घालावी. तीं सामान्यत: पाण्याचा स्वाद बिघडणार नाही इतकीच असावी. नंतर तें पाणी गाळून घेऊन पिण्यास द्यावें. पाणी थोडेंच प्यावें. अशा पाण्यानें स्रोतसें मोकळीं होण्याला फार मदत होईल.

जुन्या तांदळाचा भात, मुगाचें वरण, ज्यांना तें चालत नसेल अशांना तुरीचेंहि वरण द्यावें. पोळी पातळ पण चांगली भाजलेली असावी. दूधभोपळा, चवळीच्या शेंगा, भेंडी, मेथी, पडवळ, पालक, तांदुळजा, मसाला न घालतां तुपाची फोडणी दिलेल्या भाज्या, थोडें आलें घालून केलेले कोकणी आमसोलाचे सार, लसूण, पुदिना, आलें, खोबरें, जिरे यांच्या चटण्या हें पदार्थ जेवणांत चालतात. त्याशिवाय गाईचें किंवा शेळीचें दूध, तूप, लोणी, साखर, खडीसाखर, चहा, कॉफी, कोको हीं पेयें घेण्यास

हरकत नाही. तसेंच मनुका, किसमिस, द्राक्षें, ओलें नारळ, गोड आंबा, पपई हीं फळें थोडीं खावीत. पण त्यावर लगेच पाणी पिऊं नये. कफ जास्त असल्यास फळें वर्ज्य करावीत.

क्षयरोग्यानें उन्हाळ्यांत सकाळीं दहा वाजतां व रात्रीं सात वाजतां, हिवाळ्यांत सकाळीं अकरा वाजतां व सायंकाळीं सहा वाजतां जेवण करावें.

मांसांपैकी हरिणाचें व बकऱ्याचें मांसाचा सुर्वा, कोंबड्याचीं अंडीं हीं जरूर तेव्हां द्यावीत. दुपारीं ३–४ वाजतां दूध, चहा, कॉफी, कोकोपैकी जें आवडेल तें घ्यावें. प्रकृतिमान व आवड पाहून योग्य ते घ्यावे. रोग्याचे कपडे नेहमी स्वच्छ असावेंत. जुने कपडे ताबडतोब धोब्याकडे द्यावें. खुंटीवर ठेवूं नये. थुंकण्याकरितां एक वेगळाच तस्त किंवा पॉलीश केलेलें भांडें असावें. घरांतील वापरणीपैकी तें नसावें. पहिल्याने त्यांत थोडें कर्बाम्लक ॲसिड व पाणी घालून ठेवावें. थुंकण्याचे वेळीं त्यांतच थुंकावें. दुसरीकडे कोठेहि थुंकूं नये. लहान मुलांना त्यांच्याजवळ ठेवूं नये.

वर दिलेल्या औषधाशिवाय राजयक्ष्मा रोगावर चालणारीं कांहीं औषधें खाली दिलेलीं आहेत. त्यांचे पाठ पुढे दिलेल्या रोगामध्यें पहावेंत.

सुवर्णपर्पटी–पाठ संग्रहणी रोगामध्यें पहावा.

वासावलेह–पाठ कास रोगामध्यें पहावा.

शितोपलादिचूर्ण– ”

......

यकृतप्लीहा चिकित्साप्रकरण

अध्याय २०

१ यकृत प्लीहेची ओळख

पोटाच्या उजव्या भागाला बरडचाखाली यकृत नांवाचा मांसमय अवयव आहे. तसेच पोटाच्या डाव्या भागी बरगडचाखाली, आमाशयाच्या खालचे भागाला पानथरी आहे. हे दोन्ही अवयव शरीराच्या कार्यापैकी महत्वाची कार्ये करितात. यकृतांत पित्त उत्पन्न होते व ते यकृतांतूनच निघालेल्या नळींतून आंतडींत येऊन अन्नपचनाला फार मोठी मदत करिते. पानथरी व यकृत या दोन्ही अवयवामुळे रक्ताची लाली कायम राहते.

२ प्लिहेची उत्पत्ति

शोणिताज्जायते प्लीहा वामतो हृदयादधः ।
रक्तवाहिशिराणां स मूलं ख्यातो महर्षिभिः भा. प्र. ५७४

शरीराचे डाव्या बाजूस, हृदयाचे खाली, रक्तापासून प्लीहा उत्पन्न होते. ही रक्तवाही शिरांचें मूळ आहे, असें महर्षि म्हणतात.

३ प्लीहा रोगाचें निदान व लक्षण

विदाह्यभिष्यन्दिरतस्य जन्तोः प्रदुष्टमत्यर्थमसृक्कफश्च ।
प्लीहाभिवृद्धिं कुरुतः प्रवृद्धो तं प्लीहसंज्ञं गदमामनन्ति ॥
वामे स पार्श्वे परिवृद्धिमेति विशेषतः सीदति चातुरोऽत्र ।
मंदज्वराग्निः कफपित्तलिंगैरुपद्रुतः क्षीणबलोऽति पाण्डुः ॥ भा. प्र. ५७४

जळजळ उत्पन्न करणारे आणि कफवर्धक असे हुलगे, उडीद, मोहरी, दहि, मूळ इत्यादि पदार्थांचें सेवन केल्यामुळे अत्यंत दुष्ट झालेलें रक्त व कफ प्लीहेची वाढ करितात. त्या रोगाला प्लीहगद असें म्हणतात. विशेषेकरून हा प्लीहारोग डाव्या बरगडीला अतिशय वाढतो. त्यामुळे रोगी अत्यंत दुःख पावतो. त्या रोग्याला बारीक ताप, अग्निमांद्य, कफ व पित्त या दोषांची इतर पीडा सुरुं होते. त्याचें बल क्षीण होऊन तो रोगी पांढरा फटफटीत होतो.

४ यकृत् परिचय

यकृतोऽवस्थितिरनिशं दक्षिणतः स्यादधो हृदयात् ।
तत्र तु विविधा रोगा जायेरन् भूरिदुःखदा नियतम् ।।

मा. नि. परि. ४११

हृदयाचे खाली, दक्षिण भागांत यकृतावें स्थान आहे. ज्यामुळे अनेक प्रकारचे अत्यंत दुःखदायक रोग उत्पन्न होतात.

५ यकृत रोग निदान

मद्यातिपानादथ वेगरोधादत्युष्णगुर्वन्ननिषेवणाच्च ।
स्वापाद्दिवा जागरतोऽथ रात्रावतिव्यवायादभिघाततो वा ।।
गुरुन् पदार्थान् वहतां नराणां सदैव मार्गक्रमणे रतानाम् ।
तथाऽपरैर्घोरनरैश्च कर्मभिर्भवन्ति नूनं यकृदुत्थिता गदाः ।।

मा. नि. परि. ४११

अत्यंत मद्यपान केल्यानें, मलमूत्रादि वेगांचा अवरोध केल्यामुळे, अत्यंत उष्ण व जड पदार्थ सेवन केल्याकारणानें, दिवसा झोप घेतल्यानें, रात्रीं जागरण केल्यामुळे, अत्यंत मैथुन करण्यानें, आघातामुळे, जड ओझें उचलल्यामुळे आणि जास्त पायीं प्रवास करणाऱ्या लोकांना व घोर असें पापकर्म करणाऱ्यांना यकृतरोग होतो.

६ वृद्धिदशायां यकृतो लक्षणम्

वृद्धिं गते यकृति चोरूरुजाऽप्युरोऽस्थिन स्कंधेऽधिदक्षिणमथापि च दक्षसक्थि।
जायेत जाडयमपि दक्षिणबाहुमध्ये वैवर्ण्यमप्यधिशकृत् कसनं ज्वरश्च ।।
तिक्तास्यताऽप्यरतिलोहितमूत्रते वा हानिर्बलस्य तनुबद्धपुरीषताऽपि ।
पीताक्षताऽथ सततं शयनं तु सव्यपार्श्वेन चात्र गदितः सुखलिप्सयास्यात्
निद्रानाशः कामला तोदभेदौ दाहः शोथो जायते चात्र तृष्णा ।
प्राणघ्नी स्याद्विद्रधिर्वै यकृत्स्थाप्राणी मुच्येतात्र कश्चित् सुभाग्यात् ।।

भा. नि. परि. ४१२

यकृत वाढल्यामुळे फासळ्या, दक्षिणस्कंध व पायांना सूज, दक्षिण बाहू जड होणें, मळ, विवर्णता, कास, ज्वर, तोंड कडू होणें, बेचैनी, रक्तमूत्रताशक्ति कमी होणें, मलबद्धता, डोळे पिवळे पडणें, डाव्या कुशीवर झोपल्यावर बरें वाटणें, निद्रानाश, कामला, दाह, शोथ, अंग फोडल्याप्रमाणें पीडा होणें, तहान फार लागणें इत्यादि लक्षणें होतात. केव्हां केव्हां यकृतांत विद्रधि निर्माण होते. ही फार घातक आहे. सुदैवानेच एखादा रोगी बरा होतो.

७ यकृत वृद्धिचें लक्षण

म्लाने यकृत्यथ भवेत् शकृदप्रवृत्तिः पित्ताल्पताऽप्यतितृषाऽऽविलमूत्रताच ।
देहस्य कर्दमसमप्रभताऽथ पाण्डुत्वाध्मान सादवमनान्यनलस्य मान्द्यम् ।
प्रातश्च तिक्तमुखता रसना मलाढ्योग्दा रो भृशं कठिनता धमनीगता स्यात् ।
आकृष्टिवब्द हृरूजाऽपि वमेश्चिकीर्षालिगान्यमूनि नतरां ननु पभवेयुः ॥
भा. नि. पारि. ४११

यकृताचें कार्य बरोबर न चालल्यामुळे, मलविसर्जन न होणें, पित्त कमी उत्पन्न होणें, तहान लागणे, मूत्र प्रवृत्ति बरोबर न होणे, शरीराचा वर्ण मळकट होणे, पांडुता, आध्मान, अवसाद, वमन, अग्नीची मंदता, सकाळीं तोंड कडु होणे, जीव्हा बुरसलेली होणे, बडबड, नाडीची गति मंदावणे, कांही खाण्याची इच्छा न होणे, मळमळणे हीं लक्षणें उत्पन्न होतात.

८ रक्तदुष्टीपासून वाढलेल्या प्लीहेचे लक्षण

क्लमो भ्रमो विदाहश्च वैवर्ण्यं गात्र गौरवम् ॥
मोहो रक्तोदरत्वंच ज्ञेयं रक्तजलक्षणम् ।
सज्वरः सपिपासश्च सदाहो मोहसंयुतः ॥
पीतगात्रो विशेषेण प्लीहा पैत्तिक उच्यते । भा. प्र. ५७४

श्रम केल्यापासून थकवा, भोवळ, जळजळ, शरीराचा रंग बदलणे, सर्व गात्रें जड होणें, मोह, पोटावर तांबूसपणा येणें हीं रक्तज प्लीहेची लक्षणें होत.

ताप, तहान, दाह व मोह या लक्षणांनी युक्त असलेला व ज्याचें शरीर पिवळे पडलें आहे तो पुरुष पित्तज प्लीहेनें दुष्ट झाला आहे, असें समजावें.

९ यकृतप्लीहेचा चिकित्साक्रम

प्लीहोदरिणः स्निग्ध खिन्नस्य दध्ना भुक्तवतो वामबाहौ कर्पूराभ्यन्तरतः सिरांविध्येत्, विमर्दयेत् पाणिना प्लीहानं रुधिरस्यन्दनार्थं; ततः संशुद्धदेहं समुद्रशुक्तिकाक्षारं पयसा पाययेत्, हिंगुसौवर्चिकाक्षारेण स्रुतेन पलाशक्षारेण वा यवक्षारं, किंशुकक्षारोदकेन वा बहुशः स्रुतेन यवक्षारं, पारिजातकेक्षुर कापामार्गक्षारं वा, तैलसंसृष्ट शोभांजनकषायं वा, पिप्पलीसैंधवचित्रकयुक्तं पूतिकरंज क्षारं वाऽम्लस्रुतं विड्लवणपिप्पली प्रगाढम् ॥ सु. चि. अ. १४

पांथरी झालेल्या मनुष्याला स्नेहन व स्वेदन देऊन, नंतर दहिभात जेवावयास घालून डाव्या हाताच्या कोपराच्या खाली शीर तोडावी व रक्त वाहण्याकरितां

पांथरीचें मर्दन करावें. नंतर वमनविरेचनादिकांनी कोठा शुद्ध करून त्याला समुद्रांतील शिंपांचें भस्म दूधांतून द्यावें, अगर हिंग व सज्जीखार पाण्यांत विरघळवून तें पाणी गाळून घेऊन त्या पाण्यांतून अगर पळसाच्या क्षाराचें पाणी करून त्यांतून जवखार द्यावा. अगर पळसाच्या क्षारीय पाण्यांत विरघळून पांच, सात वेळां तें पाणी गाळून घेऊन त्यांतून जवखार द्यावा. अथवा पारिजातक, काटे कोळिंजन अथवा आघाडा यांचा क्षार द्यावा. अथवा शेवग्याचें सालीचा काढा तेल मिश्र करून द्यावा. अथवा पिंपळी, सैंधेलोण व चित्रकमूळ याचें चूर्ण, घाणेऱ्या करंजाच्या क्षाराचें पाणी करून त्यांतून द्यावें. किंवा हरबऱ्याच्या आंबेंतून, कांजींतून, लिंबू वगैरे आंबट फळांच्या रसांतून बीडलोण व पिंपळी यांचें चूर्ण द्यावें.

१० यकृतप्लिहा सामान्य चिकित्साक्रम

स्नेहस्वेदप्रकारादि विधेयं प्लीहरोगिणि ।
दध्ना भुक्तवतो वामबाहुमध्ये सिरां भिषक् ॥
विध्येत् प्लीह विनाशाय यकृन्नाशाय दक्षिणे ।
प्लीहानं मर्दयग्दाढं दुष्ट रोग प्रशान्तये ॥
मणिबन्धे समुत्पन्न वामागुष्ठ समीरिताम् ।
दहेच्छिरां क्षारेणाशु वैद्यः प्लीहप्रशान्तये ॥ भै. र. ५४१

प्लीहारोग्यास स्नेहन, स्वेदनादि कर्म करावें व दह्याबरोबर अन्न सेवन करून डाव्या बाजूचे मध्यभागीं कोपराच्या सांध्याचें ठिकाणीं असणाऱ्या शिरेचा वेध करावा. तसेंच यकृत रोग्याचे उजव्या बाजूच्या कोपऱ्याच्या सांध्याचे खालचे बाजुस असलेल्या शिरेचा वेध करावा. त्यानंतर दुष्टरक्ताचे दोष घालविण्यासाठीं प्लीहा खूप दाबून रक्त काढावे. तसेंच डाव्या बाजूचे मणीबंधाच्या अंगठ्याचे शिराच्या ठिकाणीं क्षार लावून दग्ध केल्यानें प्लीहा शान्त होतो.

११ यकृद्रोगाची चिकित्सा

प्लीहोद्दिष्टाः क्रियाः सर्वा यकृद्रोगेः समाचरेत् ।
कार्यंच दक्षिणे बाहौ तत्र शोणितमोक्षणम् ।
क्षारं विडंग कृष्णाभ्यां पूतीकस्यांबुनि श्रुतम् ।
पिबेत्प्रातर्यथावन्हि यकृत्प्लीहप्रशांतये ॥ भा. प्र. ५७५

प्लीहेमध्यें सांगितलेल्या सर्व क्रिया यकृतरोगांत उपयोगांत आणाव्यात. सर्व क्रिया करून यकृत बरें न झालें तर शहाण्या वैद्यानें रोग्याच्या उजव्याहाताची शीर तोडावी. अथवा वावडींग, पिंपळी यांचा क्षार करंजाचें पानाच्या रसांतून, अग्निबळ पाहून द्यावा. त्या योगानें यकृताची वृद्धि कमी होते.

पैत्तिके जीवनीयानि सर्पींषि क्षीरबस्तयः ।
रक्तावसेकः संशुद्धिः क्षीरपानं च शस्यते ॥ वा. चि. अ. १५

पित्तजन्य पानथरीवर जीवनीय औषधांनी सिद्ध केलेलें तूप, दूधाचे बस्ति, रक्त काढणें, रेचन व दुग्धपान हे उपाय प्रशस्त आहेत.

यकृति प्लीहवत्कर्म दक्षिणे तु भुजे सिराम् । वा. चि. अ. १५

यकृतावर पानथरी सारखीच चिकित्सा करावी. मात्र शीर तोडणें झाल्यास ती हाताची तोडावी.

प्लीहोदरे यथादोषं स्निग्धस्य स्वेदितस्यच ।
सिरां भुक्तवतो दध्ना वामबाहौ विमोक्षयेत् ॥ वा. चि. उ. १५

प्लीहोदरांत दोषांनुरूप स्नेहन व स्वेदन करून, दहिभात खाऊं घालून, डाव्या हाताची शीर तोडावी.

१२ ताम्रेश्वरवटी

हिंगु त्रिकटुकं चैवापामार्गस्य च पत्रकम् ।
अर्कपत्रं तथा स्नुहीपत्रं च समभागिकम् ।
सैंधवं तत्समं ग्राह्यं लौहं ताम्रं च तत्समम् ।
प्लीहानं यकृतं गुल्ममामवातं सुदारूणम् ।
अर्शांसि घोरमुदरं मूर्च्छां पाण्डु हलीमकम् ॥
ग्रहणीमतिसारं च यक्ष्माणं शोथमेव च । र. चं. ४२२

हिंग, सुंठ, मिरे, पिंपळी, आघाडयाचीं पानें, रूईचीं पानें व त्रिधारी निवडुंगाचीं पानें हीं समभाग व सर्वांच्या बरोबरीनें सेंधेलोण, ताम्रभस्म व लोहभस्म हीं प्रत्येकी समभागच घ्यावींत. नंतर त्या सर्वांचा एकत्र खल करून त्याच्या १-१ माशाच्या गोळ्या कराव्यात. या वटिकेला ताम्रेश्वरवटी म्हणतात. ही पांथरी, यकृत, गुल्म, दारुण आमवात, भयंकर मूळव्याध, मूर्च्छा, पांडुरोग, हलीमक, संग्रहणी, अतिसार, क्षय, सूज यांवर योग्य अनुपान योजून दिली असतां त्यांचा नाश करिते.

१३ तिल्लभल्लातकादि योग

तिलभल्लातके पथ्या गुडश्चेति समांशिकम् ।
दुर्नामकासश्वासघ्नं प्लीहपाण्डुज्वरापहम् ॥ भै. र. २१४

काळ्या तिळांचें चूर्ण, शुद्ध बिब्याचें चूर्ण, हिरडयाचें चूर्ण आणि जुना गूळ हे सर्व समभाग घेऊन एकत्र घोटावें. चार माशाचें प्रमाणानें गोळ्या कराव्यात. हा तिळ भल्लातक योग नेहमी सेवन केल्यानें अर्श, कास, श्वास, प्लीहावृद्धि, पांडुरोग व ज्वर नाहीसे होतात.

१४ प्लीहारिवटिका

सहासाराभ्रकासी सलशुनानि समानि च ।
द्रोणपुष्पीरसेनैव मर्दयेत्प्रहरत्रयम् ॥
वल्लद्वयं प्रदातव्यं प्रदोषे सलिलं ह्यनु ।
प्लीहानं यकृतं गुल्ममग्निमान्द्यं सशोथकम् ।
कासं श्वासं तृषां कम्पं दाहं शीतं वमिं भ्रमिम् ।
प्लीहारिवटिका ह्येषा नाशयेन्नात्र संशयः ॥ भै. र. ५४८

सहासार, अभ्रकभस्म, हिराकस, लसूण हीं समप्रमाणांत घेऊन, कुटून त्याचें चूर्ण करावें. द्रोणपुष्पीच्या स्वरसामध्यें तीन प्रहर खलावें. त्याच्या २ गुंजा प्रमाणानें गोळ्या कराव्यात. ह्या गोळ्या सकाळीं १ व सायंकाळीं १ या प्रमाणानें सेवन कराव्यात. त्या प्लीहारि वटिका प्लीहा, यकृतवृद्धि, गुल्म, अग्निमांद्य, शोथ, कास, श्वास, तृषाधिक्य, शरीराचें कोणत्या अवयवाचा कंप, अंतर्बाह्य दाह, शीताधिक्य, वमन, भ्रम, या सर्व रोगांचा नाश करतात.

१५ भल्लातकादि मोदक

भल्लातकाभयाजाजी गुडेन सह मोदकः ।
सप्तरात्रान्निहन्त्याशु प्लीहानमति दारुणम् ॥ भै. र. ५४५

१६ गुड पिंपळी

पलैकं गुडमादाय पिप्पलींच तथैव च ।
हिंगु त्रिकटुका दीनां सैन्धवानां द्विमाषिकम् ।
चित्रकंच बिडं चैव द्वौक्षारौ शिखरीं तथा ।
तालपुष्पं कोलिलाक्षं चिंचाक्षारं सकेतकम् ॥
स्नुहीक्षीर समायुक्तं प्लीहज्वरबिनाशनम् । भै. र. ५४५

गूळ व पिपळी १-१ पळ, हिंग, सुंठ, मिरे, पिंपळी, सैंधव, चित्रक, वावडींग, जवखार, सज्जीखार, आपामार्गक्षार, तालपुष्प, तालीमखाना, चिंचेचा क्षार, समुद्रफेस तसेंच निवडुंगाचें दूध हीं प्रत्येकी २-२ मासे त्यांचे मोदक करावेत. त्याचें सेवन केल्यानें प्लीहा व ज्वर नष्ट होतात. मात्रा ३-४ मासे. अनुपान-गरम पाणी.

१७ अर्कलवण

अर्कपत्रं सलवणमन्तर्धूमं दहेन्नरः ।
मस्तुना तत्पिवेत्क्षारं प्लीहगुल्मोदरापहम् ॥ भै. र. ५४४

सैंधव पाण्याबरोबर बारीक करून त्याचा रुईच्या पिकलेल्या पानावर लेप करावा. अशा तऱ्हेनें तीं पानें परळांत ठेवून, त्याचें तोंड बंद करून त्याला गजपूट द्यावें. हें अर्कलवण ४ ते ८ गुंजा, दह्याची निवळी किंवा ताकाबरोबर सेवन केल्यानें प्लीहा, गुल्म, उदर यांचा नाश होतो.

१८ लशुनादि प्रयोग

लशुनं पिप्पलीमूलमभयांचैव भक्षयेत् ।
पिबेत् गोमूत्र गंडूषं प्लीहरोगनिवृत्तये ।।

लसूण, पिंपळमूळ, हिरडा यांचें चूर्ण करून दोन तोळे गोमूत्रांत मिसळून प्यावें किंवा नुसतें गोमूत्र प्याल्यानें प्लीहारोग नाहीसा होतो.

१९ प्लीहारोगाचा चिकित्साप्रयोग

पातव्यो युक्तितः क्षारः क्षीरेणो दधिशुक्तिजः ।
तथा दुग्धेन पातव्याः पिप्पल्यः प्लीह शांतये ।।
अर्कपत्रं सलवणं पुटदग्धं सुचूर्णितम् ।
निहन्ति मस्तुना पीतं प्लीहानमति दारुणम् ।। भा. प्र. ५७५

दुधाबरोबर समुद्रांतील शिंपल्याचा क्षार युक्तीनें प्राशन करावा. किंवा पिंपळीचें चूर्ण दुधाबरोबर घेतलें तर प्लीहेचा नाश होतो अथवा सैंधव व रुईचीं पानें पुटांत घालून, जाळून त्यांचा बनविलेला क्षार दह्याचे निवळीबरोबर घेतला तर महाभयंकर अशी प्लीहादेखील नाहीशी होते.

लब्धे बलेचभूयोऽपि स्नेहपीतं विशोधितम् ।
समुद्र शुक्तिजं क्षारं पयसा पाययेत्तथा ।।
अम्लश्रृतं बिडकणचूर्णाढ्यं नक्तमालजम् ।
सौभांजनस्य वा क्वाथं सैंधवाग्निकणान्वितम् ।।
हिंग्वादिचूर्णं क्षाराज्यं युंजीत च यथाबलम् । वा. चि. अ. १५

शक्ति आली म्हणजे पुन्हा स्नेहन पाजून व रेचक देऊन, समुद्राच्या शिंपांचा क्षार दुधांतून प्यावयास द्यावा. किंवा घाणेऱ्या करंजाचा क्षार आंबट पदार्थांत मिळवून बीडलोण व पिंपळाचें चूर्ण घालून द्यावा, किंवा शेवग्याचे सालीचा काढा, सैंधव, चित्रक, पिंपळी यांचें चूर्ण घालून पाजावा, तसेंच हिंग्वादि चूर्ण, क्षार व षट्पलादि घृतें यथाशक्ति द्यावीत.

पिप्पली नागरं दंतीसमांशं द्विगुणाभयम् ।
विडार्धांशयुतं चूर्णमिदमुष्णांबुना पिबेत् । वा. चि. अ. १५

पिंपळी, व सुंठ यांच्या इतकेंच दंतीमूळ, हिरडेदळ दोन भाग व बीडलोण अर्धभाग यांचें चूर्ण ऊन पाण्याबरोबर घ्यावें.

तैलोन्मिश्रैर्बदरकपत्रैः संमर्दितैः समुपनद्धः ।

मुशलेन पीडितोऽनु याति प्लीहा पयोभुजो नाशम् । वा. चि. अ. १५

बोरीचा पाला तेल घालून, वाटून त्याचा कौलूवर लेप करावा. आणि नंतर ती कौलू मुसळाने दाबावी. या क्रियेनें कौलू बरी होते. ही क्रिया चालू असतां नुसत्या दुधावर रहावें.

कदल्यास्तिलनालानां क्षारेण क्षुरकस्यच ।

तैलं पक्वं जयेत्पाना त्प्लीहानं कफवातजम् ।।

केळ, तिळाचे दांडे व तालीमखाना यांचा क्षार घालून कढविलेलें तेल प्याल्यानें कफवातजन्य पांथरी बरी होते.

विडंगं चित्रकं सक्तुन् सघृतान सैन्धवं वचाम् ।

दग्ध्वा कपाले पयसा गुल्मप्लीहापहं पिबेत् ।।

वावडींग, चित्रकमूळ, घृतमिश्रीत सातु, सैंधव व वेखंड यांचें चूर्ण खापरांत भाजून, त्याची राख दुधांतून प्यावी म्हणजे गुल्म व प्लीहा यांचा नाश होतो.

२० यकृत प्लीहेवर षट्पलक घृत

पिप्पली पिप्पलीमूलचित्रक श्रृंगवेर यवक्षारसैन्धवानां पालिका भागा घृतप्रस्थं तत्तुल्यं क्षीरं तदैकध्यं विपाचयेत् एतत् षट्पलकं नाम सर्पिः प्लीहाग्निसंगगुल्मोदरोदावर्त श्वयथु पाण्डुरोगकासश्वास प्रतिश्यायोर्ध्व वातविषमज्वरानपहन्ति मन्दाग्निर्वा हिंग्वादिकं चूर्णमुपूंजीत

सु चि. अं. १४

पिंपळी, पिंपळमूळ, चित्रकमूळ, जवखार व सैंधव हीं औषधें चार-चार तोळे घेऊन, त्याचें चूर्ण करून ते ६४ तोळे तूपांत घालून, त्यांत ६४ तोळे दूध घालून तें पचन करावें. त्याला षटपलघृत असें म्हणतात, हें पानथरी, अग्निमांद्य, गुल्म, उदर, उदावर्त, सूज, पांडुरोग, खोकला, श्वास, पडसें, उर्ध्ववास व विषमज्वर यांचा नाश करिते. अग्नि मंद झाल्यास हिंग्वादि चूर्ण योजावें.

२१ हिंग्वादि योग

हिंगु त्रिकटुकं कुष्ठं यवक्षारं च सैंधवम् ।

मातुलुंगरसोपेतं प्लीहशूलहरं भवेत् ।।

पलाशक्षारतोयेन पिप्पली परिभाविता ।

प्लीहगुल्मार्तिशमनी वन्हिमांद्यहरी मता ।।

रसेन जम्बीरफलस्य शंखनाभीरजः पीतमवश्यमेव ।
शाणप्रमाणं शमयेदशेषं प्लीहामयं कूर्मसमानमाशु ॥
शरपुंखमूलकल्कस्तक्रेणालोडितः पीतः ।
प्लीहानं यदि न हरति शैलोऽपि तदा जले प्लवते ॥
सुपक्व सहकारस्य रसः क्षौद्रसमन्वितम् ।
पीतः प्रशमयत्येव प्लीहानं नेह संशयः ॥
सुस्विन्नं शल्मलीपुष्पं निशापर्युषितं नरः ।
राजिकाचूर्णं संयुक्तं खादेत्प्लीहोशांतये ।
यवान्तिकाचित्रकयावशूकषड्ग्रन्थिदन्तीमगधोद्भवानाम् ॥
चूर्णं हरेत्प्लीहगदं निपीतमुष्णांबुना वास्तुरसासवैर्वा ॥ भा. प्र. ५७५

हिंग, सुंठ, मिरे, पिंपळी, कोष्ठ, जवखार, सैंधव यांचें चूर्ण महाळुंगाचें रसाबरोबर सेवन केलें असतां प्लीहा व शूळ यांचा नाश होतो.

पळसाच्या क्षाराच्या पाण्याची भावना देऊन तिचा उपयोग केल्यास पांथरी, गुल्म, अग्निमांद्य, यांचा नाश होतो.

कागदी लिंबाचे रसाबरोबर शंखभस्म ३ मासे सेवन केलें तर कांसवाएवढी वाढलेली प्लीहा शमते.

कालशाक नांवाच्या भाजीच्या मुळाचा कल्क ताकाबरोबर घेऊन जर प्लीहा कमी होणार नाही तर पर्वतहि पाण्यावर तरंगू लागतील. अर्थात जसे दगड पाण्यावर तरणें केव्हांहि अशक्य त्याचप्रमाणें शरपुंखेचें सेवन केलें तर पांथरीचा पूर्ण नाश झाल्याशिवाय रहात नाही.

चांगल्या पिककेल्या आंब्याचा रस, मध घालून घेतला तर निःसंशय प्लीहेचा नाश होतो.

सावरीचीं फुलें चांगली उकडून, रात्रभर झांकून ठेवून, दुसऱ्या दिवशीं त्यांत मोहरीचें चूर्ण टाकून घेतलें म्हणजे प्लीहेचा नाश होतो. किंवा ओवा, चित्रक, जवखार, पिंपळमूळ, जयपाळ, सुंठ यांचें चूर्ण, ऊन पाणी, दह्याची निवळी, मांसरस किंवा आसव यांचे बरोबर घेतलें तर प्लीहेचा नाश होतो.

२२ कुमारिकासव

कुमार्याश्च रसेद्रोणे गुडं पलशतं तथा ।
तुलार्धसंख्यां विजयां क्वाथयेत्तज्जलार्मणे ॥
चतुर्थांशावशेषे तु पूते तस्मिन्निधापयेत् ।
मधुनश्चाऽऽढकं दत्वा धातक्या द्विपलाष्टकम् ॥
स्निग्धभाण्डे विनिक्षिप्य कल्कं चैव प्रदापयेत् ।

जातीफलं लवंगं च कंकोलं च कषायकम् ॥
जटिलाचव्य चित्रं च जातीपत्री सकर्कटम् ।
अक्षं पुष्करमूलं च प्रत्येकं च पलं पलम् ॥
मृतं शुल्ब तथा लोहं शुक्तिमात्रं प्रदापयेत् ।
भूम्यां वा धान्यराशौ वा स्थापयेद्दिन विंशतिम् ॥
तमुद्धृत्य पिबेन्मात्रां यथा चाग्निबलाबलम् ।
पंचकासं तथाश्वासं क्षयरोगंच दारुणम् ॥
उदराणि तथाऽष्टौ च षडर्शांसि च नाशयेत् ।
वातव्याधिमपस्मारमन्यान्रोगान्सुदारुणान् ॥
जाठरं कुरुते दीप्तं कोष्ठशूलं च नाशयेत् ।
गुल्माष्टकं नष्टपुष्पं नाशयेदेकपक्षतः ।
कुमारिकासवो ह्येष बृहस्पतिविनिर्मितः ॥

यो. र. भा. २-१०५

कोरफडीचा रस २५ शेर, गूळ ४०० तोळे, हिरडे १०० तोळे यांचा १०२४ तोळे पाण्यांत काढा करावा. तो चतुर्थांश उरल्यावर गाळून घ्यावा. नंतर त्यांत २५६ तोळे मध व ६४ तोळे धायटीचीं फुलें घालून तूपानें राबलेल्या मातीच्या भांड्यांत भरावा. नंतर पुन्हा जायफळ, लवंग, कंकोळ, कबाब चिनी, जटामांसी, चवक, चित्रक, जायपत्री, काकडशिंगी, बेहेडेदळ, पोखरमूळ यांचें चूर्ण ४—४ तोळे, ताम्रभस्म २ तोळे व लोहभस्म २ तोळे हीं औषधे त्यांत घालून, जमिनींत अगर धान्याच्या राशींत २० दिवस पुरून ठेवावा व वीस दिवसानंतर काढून, अग्निबल पाहून द्यावा. म्हणजे पांच प्रकारचे खोकले, श्वास, क्षय, आठ प्रकारचीं उदरें, सहा प्रकारची मूळव्याध, वातरोग, अपस्मार, व दुसरें भयंकर रोग यांचा नाश करिते व अग्नि प्रदिप्त करिते. कोठ्यांतील शूळांचा नाश करिते. आठ प्रकारचे गुल्म व स्त्रियांचा नष्टार्तव विकार यांचा पंधरा दिवसांत नाश करिते. हे कुमारीआसव बृहस्पतीनें सांगितले आहे.

२३ रोहितकादि लोह

रोहितकसमायुक्तं त्रिकत्रययुतं तथा ।
प्लीहानमग्रमांसं च यकृतं च विनाशयेत् ॥ र. चं. ४२१

रक्तरोहिडा, सुंठ, मिरे, पिंपळी, हिरडा, बेहेडा, आवळकंठी, दालचिनी, तमालपत्र, वेलदोडे, यांच्या समभाग चूर्णांत त्या चूर्णाच्या बरोबरीनें लोहभस्म घालून तें खाण्यास द्यावें. तें पांथरी अग्रमांस व यकृत यांचा नाश करिते.

२४ अग्निकुमार लोह

तुत्थरामठ टंकानि सैंधवं धान्यजीरकम् ॥
यवानि मरिचं शुण्ठी लवंगैला विडंगकम् ।
प्रत्येकं तोलकं चूर्णं लोहचूर्णं तु तत्समम् ॥
रसस्य गन्धकस्यापि पलैकं कज्जलीकृतम् ।
घृतेन मधुना खाद्यं लोहमग्निकुमारकम् ॥
यकृत्प्लीहोदरहरं गुल्मं चापि हलीमकम् ।
बलवर्णाग्निजननं कान्तिपुष्टिविवर्धनम् ॥
श्रीमद्गहननाथेन निर्मितं विश्वसम्पदे ।　　र. चं. ४२२

शुद्ध मोरचूद, हिंग, टांकणखाराची लाही. सेंधेलोण, धनें, जिरे ओवा, मिरे, सुंठ, लवंग, वेलदोडे, वावडींग प्रत्येकी १-१ तोळा. लोहभस्म हें सर्वांच्या समभाग घ्यावें. नंतर २ तोळे पारा, २ तोळे गंधक यांची कज्जली करून त्यांत सर्व चूर्ण मिळवून चांगला खल करावा. याला अग्निकुमार रस असें म्हणतात. हा १ — १ मासा तूप व मध यांचें बरोबर घ्यावा. म्हणजे यकृत, पांथरी, उदर, गुल्म, हलीमक यांचा नाश होतो. तसेंच बळ, अंगाचा वर्ण व जठराग्नि हीं उत्पन्न करून, अंगकांति व पुष्ठी वाढवितो. हा श्रीमान गहनानंदनाथानें जगताच्या उपयोगासाठीं निर्माण केला आहे.

२५ प्लीहांतक रस

हत शुल्बंच तारंच गगनायस मौक्तिकाः ।
दरदं पुष्करं सूतं गंधकं नवमं तथा ॥
गुग्गुलुस्त्रिकटु रास्ना तथा जैपाल बीजकम् ।
त्रिफला कटुका दन्ती देवदाली तु सैंधवम् ॥
त्रिवृत्ता तु यवक्षारं वातारितैल मर्दितम् ।
अष्टोदराणि पाण्डुत्वमानाहं विषमज्वरम् ॥
अजीर्णमामंच कफं क्षयंच सर्वशूलकम् ।
कासं श्वासंच शोथंच सर्वमाशु व्यपोहति ॥
प्लीहान्तको रसो नाम प्लीहोदर विनाशनः ॥　　भै. र. ५४६

ताम्रभस्म, रौप्यभस्म, अभ्रकभस्म, लोहभस्म, मौक्तिकभस्म, हिंगूळ, पुष्कळमूळचूर्ण, पारा, गंधक, गुग्गुळ, त्रिकटु, रास्ना, जयपाळबीज, त्रिफळा, कुटकी, दंतीमूळ, देवदार, सैंधव. निशोत्तर, यवक्षार हीं प्रत्येकी २-२ तोळे घेऊन, पारा व गंधकाची कज्जली करावी व त्यांत सर्व द्रव्यें मिळवून त्यास एरंडेल तेलाची भावना

द्यावी. त्याच्या २ गुंजा प्रमाणाने गोळ्या कराव्यात हा रस आठ प्रकारचे उदर, पांडुरोग, आनाह, विषमज्वर, आमाजीर्ण, कफविकार, क्षय, सर्व प्रकारचे शूल, कास, श्वास व शोथ नाहीसे करतो. प्लीहोदराचे हा प्लीहांतकरस नाशन करणारा आहे.

२६ उदरामयकुंभकेसरी रस

रसगन्धकभस्म ताम्रकं कटुक्षारयुगं सटंकणम् ।
कणमुलकचव्यचित्रकं लवणानि यवानि रामठम् ।।
समभागमिदं विभावयेत् खरतापे त्वथ जम्बुवारिणा ।
उदरामयकुम्भकेसरी रस एष प्रथितोऽस्य माषकः ।।
सुरणानेनुपाययेद्भिषक् प्रसभं हन्ति गदव्रजं रसः ।
यकृतं कृमिमग्रमासकं कमठं प्लीहजलोदराह्वयम् ।।
जठरानल सार्धगुल्मकं पवनं साममथाम्लपित्तकम् ।। र. चं. ४२४

पारा, गंधक, ताम्रभस्म, सुंठ, मिरे, पिंपळी, जवखार, सज्जीखार, टांकणखार पिंपळमूळ, चवक, चित्रकमूळ, पंचलवणें (सेंधेलोण, पादेलोण, बिडलोण, बांगडखार, सांबरलोण), ओवा व हिंग हीं औषधें समभाग घेऊन सर्वांचें वस्त्रगाळ चूर्ण करून पारा व गंधक यांची कज्जली करून त्यांत तें चूर्ण मिळवावें व लिंबाच्या रसांत खल करून उन्हांत ठेवावें. याला उदरामयकुंभकेसरीरस असें म्हणतात. हा एक मासाभर सेवन करून वर सुरणाचा रस अगर काढा प्यावयास द्यावा. म्हणजे यकृत, कृमि अग्निमांस, कासव्यारोग, पांथरी, जलोदर, गुल्म, आमवात व अम्लपित्त यांचाहि तो नाश करितो व जठराग्नि वाढवितो.

२७ शंखद्राव नं. २

फटकीपलमेकं च सैंधवं पलमेवच ।
द्विपलं च यवक्षारं द्विपलं नवसागरम् ।।
चतुष्पलं सुवाक्षारं पलार्धं कासिसं तथा ।
डमरूयंत्रयोगेन चुल्यां वै बदरीन्धनैः ।।
साधयेल्लाघवात्तूर्णं शंखद्रावरसं परम् ।
गुल्मादिसर्वरोगेषु देयः सर्वसुखप्रदः ।। यो. र. भाग २ १०१,

तुरटी ४ तोळे, सेंधेलोण ४ तोळे, जवखार ८ तोळे, नवसागर ८ तोळे, सोरा सोळा तोळे आणि हिराकस २ तोळे हे सर्व जिन्नस एकत्र करून त्यांचा डमरू यंत्राने, बोरीच्या लाकडाच्या अग्नीने अर्क काढावा. ह्याला शंखद्राव म्हणतात. हा सर्वच गुल्मावर द्यावा. हा सर्वांना सुखावह आहे.

२८ लोकनाथ रस

पारदं गन्धकंचैव समभागं विमर्दयेत् ।
मृताभ्रं रसतुल्यंच पुनस्तत्रैव मर्दयेत् ।।
रसद्विगुणलौहंच लौहतुल्यंच ताम्रकम् ।
वराटिकाया भस्माथ पारदत्रिगुणं कुरु ।।
नागवल्ली रसेनैव मर्दयेद्यत्नतो भिषक् ।
पुटेल्लघुपुटे विद्वान् स्वांगशीतं समुद्धरेत् ।।
मधुना पिप्पलीचूर्णं सगुडां वा हरीतकीम् ।
अजाजीं वा गुडेनैव भक्षयेदनुपानतः ।।
यकृत्गुल्मोदरहरः प्लीहश्वयथुनाशनः ।
जीर्णज्वरं तथा पाण्डुं कामलांच विनाशयेत् ।।
अग्निमांद्यंच शमयेल्लोकनाथो रसोत्तमः ।। भै. र. ५४७

पारा, गंधक, अभ्रकभस्म हीं १-१ तोळा, लोहभस्म, ताम्रभस्म हीं २-२ तोळे, कवडीभस्म ३ तोळे घेऊन प्रथम पारा व गंधक यांची कज्जली करावी व त्यांत राहिलेलीं द्रव्यें मिळवावीत. त्यांचें चूर्ण करून नागवेलीच्या पानांच्या रसांत घोटावें. व वड्या करून लघू पूट द्यावें. स्वांगशीत झाल्यावर बारीक चूर्ण करावे. हा लोकनाथ रस मधाबरोबर पिंपळीचूर्ण किंवा गुळाबरोबर हिरडयाचें चूर्ण, किंवा गुळाबरोबर जिऱ्याचें चूर्ण खलून सेवन करावा. हा लोकनाथरस यकृतवृद्धि, गुल्म, उदर, प्लीहा वृद्धि, शोथ, जीर्णज्वर, पांडु, कामला, अग्निमांद्य या सर्वांचा नाश करतो.

२९ प्लीहशार्दुलो रस

सूतकं गंधकं व्योषं समभागं पृथक् पृथक् ।
एभिः समं ताम्रभस्म योजयेद्वैद्यसत्तमः ।।
मनःशिला वराटंच तुत्थं रामठलौहकम् ।
जयन्ती लोहितंचैव क्षारटंकणसैंधवम् ।।
विडं चित्रं कानकंच रसतुल्यं पृथक् पृथक् ।
भावयेत्त्रिदिनं यावत् त्रिवृच्चित्रकणार्द्रकैः ।।
गुंजामात्रां वटीं खादेत्सद्यः प्लीहविनाशिनीम् ।
मधुपिप्पलि संयुक्तां द्विगुंजां वा प्रयोजयेत् ।।
प्लीहानमग्रमांसंच यकृत्गुल्मं सुदुस्तरम् ।
आमाशयेषु सर्वेषु चोदरे शोथविद्रधौ ।।
अग्निमांद्ये ज्वरे चैव प्लीह्नि सर्वज्वरेषु च ।
श्रीमद्गहननाथेन भाषितः प्लीहशार्दुलः ।। भै. र. ५४८

पारा, गंधक, सुंठ, मिरे, पिंपळी हीं प्रत्येकी १-१ तोळा. तसेंच या सर्वांबरोबर अर्थात ५ तोळे ताम्रभस्म, मनशीळ, कवडीभस्म, मोरचूत, हिंग, लोहभस्म, जयंतीचें मूळ, हिरडयाची साल, यवक्षार, टांकणखार, सैंधव, बिडलोण, चित्रकाची साल व शुद्ध जयपालबीज प्रत्येकाचें १-१ तोळा चूर्ण घेऊन प्रथम पारद व गंधकाची कज्जली करावी. व नंतर त्यांत राहिलेलीं द्रव्यें मिळवावींत. तसेंच निशोत्तर, चित्रकाची साल, पिंपळी व आलें यांच्या रसामध्यें अगर अगर काढ्यामध्यें २ ते ३ दिवसपर्यंत खलावें. त्याच्या २ गुंजा प्रमाणानें गोळ्या कराव्यात. या रसाच्या २ गोळ्या दररोज मध आणि पिंपळीचें चूर्णाबरोबर सेवन करावे. हा रस सेवन केल्यानें प्लीहावृद्धि, हृदयाग्रमांसवृद्धि, यकृतवृद्धि, गुल्म यांचा नाश होतो. तसेंच सर्व प्रकारचे आमाशयाचे रोग, उदररोग, शोथ, विद्रधी, अग्निमांद्य, प्लीहावृद्धि व सर्व प्रकारच्या ज्वरामध्यें हितकारक आहे.

३० लोहमृत्युंजय रस

रसगंधकलोहाभ्रं कुनटी मृतताम्रकम् ।
विषमुष्टि वराटंच तुत्थं शंखं रसांजनम् ॥
जातीफलं च कटुकी द्विक्षारं कानकं तथा ।
व्योषं हिंगु सैंधवंच प्रत्येकं सूततुल्यकम् ॥
श्लक्ष्णचूर्णीकृतं सर्वमेकत्र भावयेत्ततः ।
सूर्यावर्तरसेनैव बिल्वपत्ररसेन च ॥
सूर्यावर्तेन मतिमान् वटिकां कारयेत्ततः ।
प्लीहानं यकृतं गुल्ममष्ठीलांच विनाशयेत् ॥
अग्रमांसं तथा शोथं तथा सर्वोदराणि च ।
वातरक्तं च जठरं चान्तर्विद्रधि मेव च ॥ भै. र. ५४९

३१ यकृतवृद्धिनाशक योग

पारा, गंधक, लोहभस्म, अभ्रकभस्म, मनशीळ, ताम्रभस्म, शुद्ध कुचला, कवडीभस्म, मोरचूत, शंखभस्म, रसांजन, जायफळ, कुटकी, यवक्षार, सज्जीखार, धोतऱ्याचें बीं किंवा जयपाळबीज, सुंठ, मिरे, पिंपळी, हिंग, सैंधव ह्या प्रत्येकाचें १-१ तोळा चूर्ण घेऊन, त्यांत प्रथम पारा व गंधकाची कज्जली करावी. त्यांत इतर द्रव्यें मिळवावीत. त्याला सूर्यावर्ताचा तसेंच बिल्वपत्राच्या स्वरसाच्या प्रत्येकी २-२ भावना द्याव्यात. पुन्हा सूर्यावर्ताच्या काढ्याची १ भावना द्यावी नंतर २ गुंजा प्रमाणानें गोळ्या कराव्यात. हा लोहमृत्युंजयरस प्लीहा, यकृतवृद्धि, गुल्म, अष्ठीला, हृदयाग्रमांसवृद्धि, शोथ, सर्व प्रकारचे उदररोग, वातरक्त, जठर व अंतर्विद्रधी यांचा नाश करतो.

१) लघुवसंत ४ गुंजा
शंखभस्म ४ ..
मंडूर ६ गुंजा
कटुकी (थोडी भाजून) १२ गुंजा

१ तोळा कुमारी आसवांत थोडें मध घालून वरील औषधाची एक पुडी यांत मिळवून घ्यावी. याप्रमाणें दिवसांतून ३ वेळ घ्यावें.

२) ताम्रादिलोह ३ गुंजा.
शौक्तिक ३ गुंजा
शंखभस्म ३ गुं.

या सर्वांच्या ३ पुडया कराव्यांत. त्या लिंबाच्या रसांतून घ्याव्यात.

३) अभ्रकभस्म २ गुंजा
पुनर्नवामंडूर ६ गुंजा
नवसागर ६ गुंजा
रोहितक ४ गुंजा
वज्रक्षार ६ गुंजा

या औषधींच्या ३ पुडया करून त्या कुमारीआसवांतून घ्याव्यांत.

४) आरोग्यवर्धिनी ३ गुंजा
लोकनाथरस ३ ,,
पुनर्नवामंडूर ३ ,,

३ पुडया करून त्या कुमारीआसवांतून घेणें.

५) गुल्मकालांतकरस ३ गुंजा
ताम्रेश्वरवटी ३ ,,
प्लीहार्णवरस ३ ,,
आरोग्यवर्धिनी ३ ,,

३ पुडया करून त्या कुमारीआसवांतून द्याव्यात.

६) पुनर्नवामंडुर ३ गुंजा
लोहभस्म ३ गुंजा
गुल्मकालानलरस ३ गुंजा.
ताम्रभस्स २ गुजा

३ पुडया करून त्या त्रिफळचाच्या काढचांतून घ्याव्यात.

७) हरितकी ६ गुंजा
कुटकी ६ गूंजा

निंबसाल ६ „

साप्यादिलोह ३ गुंजा

३ पुड्या करून त्या गोमूत्रांतून घ्याव्यात.

८) त्रिकटु ६ गुंजा

वज्रक्षार ६ गुंजा

लोह ३ गुंजा

३ पुड्या करून त्या गोमूत्रांतून घ्याव्यात.

——

वातरोग चिकित्साप्रकरण

अध्याय २१

१ वातरोगाचे संक्षिप्त वर्णन

शरिरांतील त्रिदोषांपैकी वायु हा सर्वव्यापी असल्यामुळे त्याचा प्रकोप झाला असता शरिरांतील सर्व भागांत नाना तऱ्हेचे विकार उत्पन्न होतात. ज्या भागांत वायुचा प्रकोप होतो, त्या भागांत वेदना. मुंग्या, ठणका, हालणें, लुळा पडणें इत्यादि विकार होऊन केव्हां केव्हां मनुष्य अपंगहि होतो.

शरिरांतील वातवाहिन्यांचें केंद्र डोक्याचे कवटीचें आंत मेंदू हें आहे मेंदुमध्यें शरीरचे निरनिराळ्या भागांतील ज्ञान करून देणारीं तसेंच इतरहि कार्यें करणारीं स्रोतसें आहेत, त्यांचें वेगवेगळे भाग आहेत. त्यापैकी जो भाग वायुच्या प्रकोपामुळे बिघडतो, त्या भागाकडून होणारी हालचाल किंवा इतर कार्यहि बिघडतात किंवा बंद पडतात. अर्धांगवायुमध्यें मेंदूतील रक्तवाहिन्यांत अडथळा आलेला असतो. केव्हां केव्हां तर मेंदुतील रक्तवाहिनी फुटून मेंदुच्या सर्व भागांत तें रक्त पसरते. यामुळे मेंदूतील वाहिन्याचें कार्यास अडथळा येतो. त्यामुळे त्या त्या भागांतील वायूचीं कार्यें हि बिघडतात. अर्धांगाची हालचाल नष्ट झाली म्हणजे अर्धांगवायु होतो. कांही कांही वेळा अर्धांगवायुची सुरुवात मेंदूतील रक्तवाहिनी फुटून होते. त्यामुळे सुरुवातींला रोगी बेशुद्ध होतो. विकाराचे मानानें कमी जास्त वेळानें रोगी शुद्धीवर येतो, केव्हां केव्हां हा अर्धांगवायूचा झटका प्राणघातक ठरतो. तर केव्हां केव्हां योग्य उपचारानें तो दुरुस्तहि होऊं लागतो. व लुळा पडलेला भाग थोडा थोडा दुरुस्तहि होऊं लागतो. पण कांही कांही वेळा स्मृति कमी होते. ज्ञान होणेंहि कमी होते. चेहरा बावळा होतो. मुंग्या येतात, शरीराला काळेपणाहि येतो. एखादा अवयव वाळतो. केव्हां केव्हां तर हनुस्तंभ, मन्यास्तंभ, जिव्हास्तंभ इत्यादि विकार होतात. अर्धांगवायु होतो तेव्हां शरीराचा सबंध अर्धा भाग बेकाम होतो. डोक्याच्या अर्ध्या भागांत चमका निघणें, त्या भागाकडील डोळा निमुळता होणें, चेहऱ्याच्या अर्ध्या भागांत मुंग्या होणें व चमका निघणें, अर्धी जीभ गिळण्याचें काम करीत नाही, अर्ध्या मानेंत चमका निघणें, बिळतांना घशांत त्रास होणें, एक हात व एक पाय अर्धवट किंवा सबंध बेकाम होणें.

२ चरकाचे काळीं मेंदु व धमन्या यांची माहिती

वातरोगाचें विशेष व संपूर्ण असें वर्णन चरकांतील 'वातकला कलीय' या अध्यायांत आलें आहे. आज अडीच हजार वर्षांपूर्वीं नाडी संस्थान (नर्व्हज सिस्टिम) संबंधांची संपूर्ण माहिती होती.

शरीरांतील वातवाहिन्यांचें केंद्र डोक्याच्या कवटीचे आंत असलेला मेंदू हें होय. शरीराचें निरनिराळ्या भागाकडील ज्ञान व कार्य करणारीं स्रोतसाचीं वेगवेगळीं केंद्रें मेंदूमध्यें आहेत. वाताचीं वृद्धि झाली म्हणजे शरिरांतील निरनिराळें कार्य करणारे विभाग बिघडतात, त्यामुळें त्या ठिकाणच्या शरीरांतील क्रिया बंद पडतात किंवा थोडच्या फार अंशानें त्यांत बिघाड होतो. कारण त्या त्या स्थानांत चालना देणारीं स्रोतसें यांतच विकृति झालेली असते. मेंदूतील वातवाहिन्यांपैकी ज्या क्रियांचेंकेंद्र बिघडलें असेल, त्या केंद्रामार्फत होणाऱ्या क्रिया म्हणजे हालचाल बंद होते. ह्या सर्व गोष्टी वाताचा प्रकोप झाल्यानेच होतात.

अलिकडे ह्या सुधारलेल्या काळांत जे शोध लागलेले आहे ते सर्व पाश्चात्य ॲलोपॅथीक पंडितांनीच लावले आहेत, असा त्यांचा व इतर बहुतेकांचा समज झालेला आहे. परंतु ते शोध अडीच हजार वर्षांपूर्वींच चरकसंहितेंत लिहून ठेवलेले दिसून येतात.

याचें स्पष्टिकरणार्थ अर्धांगवायुचेंच उदाहरण घेतल्यास मेंदुचा डावा भाग शरिरांतील उजवीकडील कर्मेंद्रियाकडून कार्य करवून घेतो. म्हणजे डावीकडील भागांत विकृति झाली तर शरिरांतील उजवीकडील कर्मेंद्रियाचें कार्यांत बिघाड होतो. व मेंदुचे उजवीकडील भागांत विकृति झाली तर शरीराच्या डावीकडील कर्मेंद्रियाचा बिघाड होतो.

हत्वैकं मारुतः पक्षं दक्षिणं वाममेव वा ।
कुर्याच्चेष्टा निवृत्ति हि रुजं वाक् स्तंभमेव च ।।
गृहित्वा वा शरीरार्धं शिराः स्नायुं विशोष्य च ।
पादं संकोचयत्येकं हस्तं वा तोदशूलकृत । च. चि. २८
अधोगमाःस तिर्यग्गाः धमनी रूर्ध्व देहगाः ।
यदा प्रकुपितोऽत्यर्थं मातरिश्वा प्रपद्यते ।।
तदान्यतरपक्षस्य सधि बंधान् विमोक्षयन् ।
हन्तिपक्षं तमाहुर्हि पक्षाघातं भिषग्वराः ।। सु. नि. १

शरीराच्या खालच्या भागांत जाणाऱ्या तशाच तीर्यग् म्हणजे आडव्या जाणाऱ्या व शरीराचे वरचे भागांत जाणाऱ्या धमन्या त्यामधून ज्यावेळीं अतिशय

प्रकुपित झालेला वायू संचार करतो, त्यावेळीं तो शरीराच्या उलट भागाकडील संधीबंधनें मोकळीं करून शरीराचा तो अर्धा भाग नष्ट करतो. याला पक्षाघात असें म्हणतात. शरीराचा तो अर्धा भाग कर्मे करण्यास असमर्थ होतो.

३ चरकाचे काळी स्नायू धमन्यासंबंधी ज्ञान

चरकसंहितेंत चरकाचार्यानें संधिगत, शिरागत, स्नायुगत, शुक्रगत, मज्जागत, मांसगत यामध्यें होणारी विकृति व त्याचीं लक्षणें दिली आहेत. यावरून पूर्वीचें काळीं स्नायु, धमन्या यासंबंधीं उत्तम माहिती दिली होती हें दिसून येते.

४ जाभाड उघडे राहिल्यास उपाय

याबाबतींत खालील श्लोकानें विशेष प्रकाश पडणार आहे.

हनुमूले स्थितो बन्धात् स्रंसयत्यनिलोहनू ।
विवृतास्यत्वमथवा कुर्यात्स्तब्धवेदनम् ॥　　च. चि. अं.

हनुमूल स्थानांत स्थित असलेला वायु हा हनुवटीचें एक स्नायुबंधन काढून जाभाड उघडें ठेवावें. त्यामुळे तोंड बंद होत नाही. असा हनुग्रह करतो.

'हनुग्रहं च संस्तभ्यं हनुं संवृत्त वक्त्रताम्' ।　　च. चि.

हनुवटीला जखडून टाकून संधीला बाजूला करून, तोंड बंद केलेला असाहि हनुग्रह वायुमुळे होतो.

५ हनुग्रह चिकित्सा

व्याधितास्ते हनुंस्विन्नमंगुष्ठाभ्यां प्रपीडयेत् ।
प्रदेशिनीभ्या चोन्नाम्य चिबुकोन्नमनं हितम् ॥
स्त्रस्तं स्वं गमयेत् स्थानं स्तब्धं खिन्नं विनामयेत् ।　　च. चि.

तोंड उघडेच राहात असलेल्या हनुग्रहांत पहिल्यानें हनुवटीला बरेंच तेल चोळून चोळून हाताच्या दोन्ही अंगठ्यांना तोंडांत घालून दो बाजूच्या दोन्ही दाढीवर त्या अंगठ्यानें दाबून, खालून दोन्ही तर्जनीनें हनुवटीला उचलून घ्यावी. त्याला त्याचे जागीं बसवून द्यावें. अशा वेळीं अंगठ्याला कपड्याची लहान पट्टी गुंडाळावी म्हणजे बोटाला दातांची इजा होणार नाही.

६ वातरोगावरील मुख्य चिकित्सा बस्तीकर्म

आस्थापनानुवासनं तु खलु सर्वथोपक्रमेभ्यो वाते प्रधानतमं मन्यंते भिषजः । तदादित एव पक्वाशयमनुप्रविश्य केवलं वैकारिकं वातमूलं छिनत्ति । तत्रावजिते वातेऽपि शरीरान्तर्गता वातविकाराः प्रशांति मापद्यन्ते यथा वनस्पतेर्मूले छिन्ने स्कंधशाकावरोह कुसुमफल पलाशादीनां नियतो विनाशस्तद्वत्.

वातविकाराची प्रधान चिकित्सा आस्थापन व अनुवासन बस्तीच आहे. आस्थापन व अनुवासन बस्तिद्वारा दिलेलें औषध पक्वाशयांत जाऊन विकार उत्पन्न करणाऱ्या वायूचा समूळ नाश करते. जर वाताचे वैकारिक मूळ नष्ट झाले तर जसे एकाद्या वृक्षाचे मूळच काढून टाकले तर त्याला फुटणाऱ्या फांद्या, पाने फुले हे सर्वच नष्ट होतात तसेच शरीरांतर्गत वातविकार आपोआपच नाहीसे होतात.

वातरोगाचे निर्मूलन करण्याकरितां सर्व प्रकारच्या वातनाशक उपायामध्ये आस्थापन व अनुवासन बस्तिकर्म हेच श्रेष्ठ दर्जाचे गणल्या गेलें आहे.

आस्थापनानुवासनन्तु खलु सर्वथोपक्रमेभ्यो वाते प्रधानतमं मन्यन्ते भिषजः

च. सूत्र २० श्लो. १४

वातनाशक सर्व उपायामध्ये आस्थापन व अनुवासन बस्तिकर्म यांनाच वैद्यसमाज वातरोगांवरील श्रेष्ठ चिकित्सा मानतात. त्याशिवाय इतरहि वातनाशक क्रम सांगितले आहेत.

स्वेदस्नेहास्थापनानुवासननस्तः कर्मभोजनाभ्यंगोत्सादन
परिषेकादि भिर्वातंहरेन्मात्रा कालंच प्रमाणीकृत्य

वातनाशक स्वेदन, स्नेहन, आस्थापन अनुवासन, नस्यकर्म, उष्णस्निग्ध भोजन, अभ्यंग, उत्सादन व परिषेकादिकाचें प्रमाण व तो देण्याचा योग्य काळ यांचा विचार करून वातविकाराला जिंकले पाहिजे.

७ वातरोगावर सामान्य उपचार

त्याशिवाय वातविकारावर सामान्य उपचार म्हणजे मृदु विरेचन, स्निग्ध व उष्ण असें अन्न खाणें, तेल चोळणें, शेकणें, बस्ति देणें हे आहेत. वातरोगांत एरंडेल तेलाचेंच विरेचन देणें हितकर होते. वातरोगाचें निर्मुलन करण्याकरितां मुख्य उपचार बस्ति हा आहे.

वातरोगांत बिब्यांचा उपयोग उत्तम होतो. भल्लातक पाक हा वैद्याकडून करवून घ्यावा. व योग्य प्रमाणांत योग्य पथ्य पाळून सेवन करावा. कांही वैद्य भल्लातक घृतहि करतात. त्याचाहि उपयोग उत्तम होतो.

वातरोगावर मुख्य औषधें म्हणजे महायोगराज गुग्गुळ, त्रिफळा गुग्गुळ, गोक्षुरादि गुग्गुळ, वातविध्वंस, वातराक्षस, वातारी शुद्ध कुचलाचूर्ण, समीरपन्नग, हेमगर्भ, नारायणतेल, विषगर्भतेल, महारास्नादि काढा, तसेच शिलाजित, लोहभस्म व मल्लसिंदूर हीं औषधें फारच उपयुक्त आहेत. यापैकी कोणतीहि तीन औषधे एकत्र करून तीं योग्य प्रमाणांत, योग्य अनुपानांतून दिवसांतून तीन किंवा चार वेळा घेणें

नारायण तेलाची मालीश करणें. मालीश करतांना कापूर व सैंधव घालून, गरम करून चोळावें व तेंच नारायणतेल एक चमचा गरम दुधांतून पिणें व आठवड्यांतून दोन दिवस बस्ति देणें व पथ्य करणें. खाण्याकरितां सांगितलेले पदार्थ खाणें व ज्या स्थानांत विकार झाला तें स्थान तेलानें खूप चोळून शेकणें. नंतर तो भाग कापडानें बांधून ठेवणें. त्या भागाला हवा लागूं देऊं नयें. औषध सुरूं करण्याचें अगोदर ४–५ दिवस २॥ तोळे तूप, त्यांत १ मासा सैंधव घालून गरम दुधांत घालून पिणें व एरंडेल तेलाचा जुलाब देणें. ह्या सर्व क्रिया केल्यास कोणत्याहि प्रकारचा वातविकार खात्रीनें बरा होतो.

८ वातरोगावरील आहार

वातरोगांत खाण्याकरितां गहू, बाजरी, जुने तांदुळ पण फारच थोडे व तेहि दररोज नाही, व त्यावर तूप जास्त प्रमाणांत घेणें. तेल तूप, साखर, गूळ, फळभाज्या, गोड फळें, कुळीथ, चटण्या. कोशिंबिरी हे पदार्थ व स्निग्ध असा आहार, हवा प्रत्यक्ष अंगावर न येऊं देणें. कपडे उबदार असावेत. आठवड्यांतून दोनदां तरी बस्ति घेणें, जेवणांत लसूणाचा उपयोग जास्त करणें. लसूणाची चटणी करून खाणें किंवा लसूणीच्या कळयातूपांत तळून खाणें, पाणी थोडें पिणें. तें उकळी येईपर्यंत तापवून थंड केलेलें असें असावें.

९ वातव्याधि निदान

पित्तं पंगुः कफः पंगुः पंगवो मलधातवः ।
वायुना यत्र नीयन्ते तत्र गच्छन्ति मेघवत् ॥ यो. र. ७८९

पित्त, कफ, रसरक्तादि धातु व मलमूत्रादिमल हे सर्व पंगु (गति हीन) आहेत. हे सर्व मेघाप्रमाणें वायु जिकडे नेईल तिकडे जातात.

१० वातव्याधीचे महत्व

शक्त्यानुप्रासशक्त्याऽथ ज्वरादौ प्रतिपाद्यते ।
सर्वव्याधिनिदानं वा वातव्याधिनिरुपणम् ॥

रोगाच्या शक्तीच्या (महत्वाच्या) अनुरोधाने पाहिले असतां ज्वराच्याहि आधी 'सर्वव्याधिनिदान' हेच सांगितलें जाते, कारण ज्वरापेक्षाहि वातव्याधीचें महत्त्व जास्त आहे.

११ वातव्याधिचिकित्सा

अभ्यंग स्वेदनं बस्तिर्नस्यं स्नेहविरेचनम् ।
स्निग्धाम्ल लवणं स्वादु वृष्यं वातामयापहम् ॥

स्वाद्वम्ललवणैः स्निग्धैराहारैर्वात रोगिणः ।
अभ्यंगस्नेहबस्त्याद्यैः सर्वानेवोपपादयेत् ॥
पित्तस्याऽऽवरणे वातरोगे शीतोष्णभेषजम् ।
कफस्याऽऽवरणे वातरोगे शीतोष्णभेषजम् ।
कफस्याऽऽवरणे वायौ रुक्षोष्णं भक्ष्यभेषजम् ॥ यो. र. ८०८

अभ्यंग (अंगास तेल लावणें), स्वेदन (घाम काढणें), बस्ति (एनिमा किंवा पिचकारी देणें, नस्य (नाकांत औषध घालणें), स्नेहविरेचन (स्निग्ध अशीं रेचक औषधें देणें), स्निग्ध, आंबट, खारट, गोड, वृष्य (पौष्टीक) असें खाण्याचे पदार्थ हे वातनाशक आहेत. सर्व वातरोगावर गोड, आंबट, खारट, स्निग्ध अशा आहारानें व अभ्यंग, स्नेहन, बस्ति इत्यादि कर्मानें उपचार करावेत.

१२ वातविकारात वमन वर्ज्य

वाताचे विकारांत वांतीचे औषध देऊं नये. वांतीनें कफाची उलटी होऊन पुष्कळसा कफ शरीराचे बाहेर निघून जाईल. त्यामुळे शरीरांत रुक्षता येण्याचा संभव असतो व रुक्षते मुळे वातविकार वाढण्याचा मोठाच संभव असतो. म्हणून वातविकारांत वांतीचे औषध देऊं नये.

१३ वातरोगावर स्वेद

एरण्डार्ककरंजमोरटबला तर्कारिसोमस्नुही
निर्गुन्डी तलराटशिग्रुवरणास्फोताश्वगन्धादिजैः ।
पत्रैः कांजिकमूत्रचुक्रसहितैः स्विन्नैर्घटस्थैः कृतः ।
स्वेदः क्रुद्धसमीरणार्तवपुषां सद्यः सुखोत्पादकः ॥
निगुण्डया चोपनाहं च सकरंजैः सपित्तलैः ।
भेषजैः सेकलेपादि त्वभिषेकादिकं चरेत् ॥ यो. र, ८५२

एरंड, रुई, करंज, मोरवेल, चिकणा, टाकळी, सोमवल्ली, त्रिधारी निवडुंग, निर्गुन्डी. तखड, शेवगा, वायवरणा, विष्णुक्रांता व अश्वगंधा यांचीं पानें, कांजी, गोमूत्र व चुक्र (आम्लद्रव्य) हीं एकत्र करून एका मातीच्या घागरींत घालून त्यानें शिजवून वातप्रकोपानें ज्याचें शरीर पीडित आहे, त्याला शेकावें (वाफारा द्यावा) म्हणजे तेव्हांच बरें वाटतें. निर्गुडीच्या पाल्यानें उपनाह स्वेद (पोटीसाप्रमाणें पोथंडी करून शेकणें) करावा. तसेंच निगुंडी, करंज व इतर पित्तल औषधें यांचा लेप, सेक (शिंपडणें) व त्यांच्याच काढ्याची धार धरणें यांचा उपयोग करावा.

१४ वातरोगावर लेप

शतपुष्प सुरद्रुदिनेशपयो गदरामठ सिन्धुभवं हरति ।
अपि लेपनतोऽस्थिगतं मरुतं कटिसंधितत्तभवं त्रिदिनात्सनम् ।।

बडीशेप, देवदार, रुईचा चीक, कोष्ठ, हिंग, सैंधव यांचा लेप केला असतां कंबर व सांधे यांत असलेला वात तीन दिवसांत नाश पावतो.

१५ पक्षाघातावर माषादि सप्त

माषबलाशुकशिम्बीकत्तृणरास्नाश्वगंधारुबुकाणाम् ।
क्वाथो नस्यनिपीतो रामठलवणान्वितः कोष्णः
अपनयति पक्षघातं मन्यास्तंभं सकर्णनादरुजम् ।
दुर्जयमर्दितवातं सप्ताहाज्जयति चावश्यम् ।।　　　यो. र. ८१२

उडीद, चिकणामूळ, कुहिलीचें मूळ, रोहिसगवत, रास्ना, अश्वगंधा व एरंडमूळ यांचा काढा, हिंग, सैंधव घालून नाकानें प्राशन केला असतांना (प्रातः पीतो. असा पाठ आहे, याचा अर्थ प्रातःकाळीं प्राशन केला असतां) सात दिवसामध्यें पक्षाघात, मन्यास्तंभ व दुर्जय असा अर्दितवात यांचा खात्रीनें नाश करतो.

१६ पक्षघातावर माष तेल

ग्रंथिकाग्निकणारास्नाकुष्ठनागर सैन्धवम् ।
माषक्वाथेन तत्तैलं पक्षघातविनाशनम् ।।　　　यो. र. ८१३

पिंपळमूळ, चित्रकमूळ, पिंपळी, रास्ना, कोष्ठ, सुंठ, सैंधव यांचा कल्क व उडदाचा काढा यामध्यें तेल सिद्ध करावें.

१७ महारास्नादि काढा

रास्नैरण्डामृतोग्रासहचरचविकाराम सेनाब्दभाङ्गी
दीप्यानन्ता यवानी वृकिसुर कृमि जिच्छृंगि शुण्ठी बलाभिः ।
मूर्वातिक्तासमंगाद्विविषशठिवराविप्पलीयाबशुकं ।
रक्तश्रीखंडकारग्वधकटुकफलैर्वत्सवृश्चीवयुक्तैः ।।
सर्वैरेतैर्दशांघ्रिप्रयुत समलवैः साधितोऽष्टावशेषः
क्वाथो रास्नादिरादौ महदुपपदवान्कौ शिकोक्तौ निहन्ति ।
सर्बांगैकांगवातांश्वसन कसन हृत्स्वेद शैत्यादि तन्द्रा ।
शूलं तूनीप्रतूनीगलगद निखिलां गध्यथा कम्प खल्लीः ।।
विश्वाची श्लीपदा मानिल निखिलमहासूतिकारोगसुप्ति
जिव्हास्तंभापतानं स्फुटनविमथ्र नक्लीबताक्षेप कौब्जम् ।

शोफाटोपापतन्त्रार्दित खुडहनुक् गृध्रसी पादशूलं
वायुश्लेष्मोत्थरोगानपि गिरितनयावल्लभेनोप दिष्टः यो. र. ८२३

रास्ना, एरंडमूळ, गुळवेल, कोरांटीची मुळी, चवक, काडेचिराईत, नागरमोथे, भारंगमूळ, धमासा, ओवा, अजमोदा, पहाडमूळ, देवदार, वावडींग, काकडशिंगी, सुंठ, चिकणामूळ, मोरवेल, कुटकी, लाजाळु, अतिविष, कचोरा, हिरडा, बेहेडा, आवळकाठी, पिंपळी जवखार, रक्तचंदन, बहाव्याची शेंग, कंकोळ, कुडयाची साल घेटुळी (वसु) ही सर्व औषधे समभाग वमर्वांच्या बरोबरीनें दशमूळे घेऊन सर्वांचा अष्टमांश काढा करावा. हा रास्नादिकाढा अधिच महागुणकारक आहे. शिवाय त्यांत गुग्गुळ घालून घेतला असतां सर्वांगवात, एकांगवात श्वास खोकला, घाम, शैत्य, तंद्रा, शूल, तूनी, प्रतूनी, गलरोग सर्व अंगाची व्यथा, कंपवात, खल्ली विश्वाची श्लीपद, आमवात सर्व प्रकारचे बाळंतिणीचे रोग सुप्तीवात, जिव्हास्तंभ अपतानक अंग फुटल्यासारखे होणें घुसळल्यासारखें होणें. क्लीबत्व, आक्षेपक, कुब्जवात, सूज आंतडयांत वाजणें, अपतंत्रक, अर्दितवात, हनुग्रह, गृध्रसी, पादशूल व कफजन्यरोग यांचा नाश करितो. हा महारास्नादी काढा पार्वतीपती शंकरानें सांगितला आहे.

१८ समीरदावानल काढा

भल्लातकानां शकलानि कृत्वा त्रिलोकमानं परिगृह्य वैद्यः ।
चतुष्पलं तोयसमन्वितोऽयं क्वाथश्चतुर्थांशक एष सम्यक् ॥
सिताघृतं गोपयमिश्रितेन कोलं पलार्धं पलमेकयुक्तम् ।
क्रमेण पीतः खलु हन्ति वातान्समीरदावानलनामधेयः ॥ यो, र. ८२४

तीन तोळे बिब्याचे तुकडे करून त्यांत सोळा तोळे पाणी घालून चतुर्थांश काढा करावा आणि त्यांत अनुक्रमें अर्धा तोळा खडीसाखर दोन तोळे तूप चार तोळे दूध घालून घ्यावा म्हणजे हा समीरदावानल नांवाचा काढा सर्व वातविकारांना जिंकतो.

१९ रास्नादिगुग्गुळ

रास्नामृतैरण्डसुराव्हविश्वं तुल्येन गाडं च पुरेण मर्द्यम् ।
खादेत्समीरी सशिरोगदी च नाडीव्रणी चापि भगंदरी ज ॥ यो. र, ८३२

रास्ना, गुळवेल, एरंडमूळ, देवदार व सुंठ हीं औषधें समभाग आणि सर्वांच्या बरोबरीनें गुग्गुळ घेऊन एकत्र खल करून वातरोग शिरोरोग, नाडीव्रण, भगंदर या रोगानें पीडीत मनुष्यानें शक्तीमानाप्रमाणें सेवन करावें.

२० सर्वसामान्य वातरोगावर उपचार

तैलं घृतं चार्द्रक मातुलुंग्यारसं सचुक्रं सगुडं पिबेद्वा ।
कटचूरुपृष्ठत्रिकगुल्मशूलगृध्रस्युदावर्तहरः प्रयोगः ।। भै. र. ३७४

तेल, तूप, आणि लिंबाचा रस समभाग एकत्र करून चुक्र आलेरस अथवा गुळाबरोबर सेवन केल्यानें कमर, ऊर, पाठ व कमरेच्या पार्श्वभागांत होणारी वातपीडा, गुल्म शूळ, गृध्रसी तसेच उदावर्त नाहीसा होतो.

२१ वातव्याधीचा सामान्य विधी

स्वाद्वम्ललवणैः स्निग्धैराहारैर्वातरोगिणः ।
अभ्यंगस्नेहवस्त्याद्यैः सर्वानेवोपपादयेत् ।। भै. र. ३७३

वातव्याधीने पीडित मनुष्याची चिकित्सा वातनाशक स्वादु, आम्ल, लवण, व स्निग्ध असा आहार आणि अभ्यंग, स्नेहबस्ती इत्यादि उपायांनी करावी.

२२ रास्नासप्तक्वाथ

रास्नाऽमृताऽऽरग्वधदेवदारु त्रिकण्टकैरण्ड पुनर्नवानाम् ।
क्वाथं पिबेन्नागरचूर्णमिश्रं जंघोरुपृष्ठत्रिकपार्श्वशूली ।। भै. र, ७९०

रास्ना, गुडूची, आरग्वध, देवदार, गोखरू, एरंडमूळ, पुनर्नवा या सर्व द्रव्यांच्या काढ्यांत सुंठचूर्ण घालून पिल्यानें जंघाशूळ, उरुशूळ, उष्ठशूळ, त्रिकशूळ, तसेंच पार्श्वशूळ नाहीसा होतो.

२३ गोक्षुरादि क्वाथ

गोक्षुरं रुबुमूलंच वचा रास्ना पुनर्नवा ।
कषायोऽसौ प्रशस्तः स्यात् सर्वांगगतमारुते ।। भै. र. ३८०

गोखरू, एरंडमूळ, वचा, रास्ना व पुनर्नवा या सर्वांचा क्वाथ तयार करून घेतल्यानें सर्वांगगतवातरोग नाहीसा होतो.

२४ रास्नादि गुटिका

रास्नायास्तु पलं चैकं कर्षान् पंच च गुग्गुलोः ।
सर्पिषा गुडिकां कृत्वा खादेद्वा गृध्रसी हराम् ।। भै. र. ३७८

रास्ना १ पळ घेऊन चूर्ण करावें. शुद्ध गुग्गुळ ५ कर्ष (१० तोळे) घेऊन तो पाण्यांत घोटून सुकवावी व त्यांत थोडेसे तूप मिळवून १ मासा प्रमाणानें गोळ्या कराव्यात. एक एक गोळी गरम पाण्याबरोबर किंवा गरम दुधाबरोबर सेवन केल्यानें गृध्रसी नष्ट होतो.

२५ एरंडतेल प्रयोग

तैलं ऐरण्डजं वाऽपि गोमूत्रेण पिबेन्नरः ।
मासमेकं प्रयोगोऽयं गृध्रस्यूरुग्रहापहः भै. र. ३७८

एक महिनाभर दररोज ।। ते एक तोळा एरंडेलांत २ तोळे गोमूत्र मिळवून सेवन केल्याने गृध्रसी व उरुस्तंभ नाहीसा होतो.

२६ एरंडादि क्वाथ

एरंडमूलं बिल्वंच बृहती कण्टकारिका ।
कषायो रुचकोपेतः पीतो वंक्षणबस्तिजम् ।
गृध्रसंज्ञं हरेच्छूलं चिरकालानुबंधिच ।। भै, र. ३८०

एरंडमूळ, बिल्व लहान व मोठी काटेरीच्या काढयांत काळे मीठ घालून प्यावें. त्यामुळे वंक्षण, बस्ति या ठिकाणीं होणारा शूळ व जुनाट गृध्रसीरोग नाहीसा होतो.

२७ लशुन योग

पलमर्धपलं वाऽपि रसोनस्य सुकुट्टितम् ।
हिंगुजीरक सिन्धूत्थ सौवर्चल कटुत्रिकैः ।।
चूर्णितैर्माषकोन्मानैरवचूर्ण्यावलीडितम् ।
यथाग्नि भक्षितं प्रातर्रुबुक्वाथानुपानतः ।।
दिने दिने प्रयोक्तव्यं मासमेकं निरन्तरम् ।
वातामयं निहन्त्येव मर्दितं चापतन्त्रकम् ।।
एकांगरोगिणां रोगं तथा सर्वांगरोगिणाम् ।
उरूस्तम्भं गृध्रसीं च शूलं द्वंद्वकृमीनपि ।। यो. र. ८१३

चार तोळे किंवा २ तोळे लसूण चांगला बारीक करावा. त्यांत हिंग, जिरे, सैंधव, संचळ, सुंठ, मिरे, पिंपळी यांचें चूर्ण एक मासाभर घालून अग्निबल पाहुन एरंडमूळाच्या काढयाच्या अनुपानांशीं प्रातःकाळी भक्षण करावी. याप्रमाणे एक महिनापर्यंत हा प्रयोग करावा. यापासून वातरोगाचा नाश होतो. त्याचप्रमाणें अर्दितवात व अपतंत्रक यांचाहि नाश होतो. तसेच अर्धांगवायु, सर्वांगवायु, उरुस्तंभ, गृध्रसी, शूळ, अंतर्बाह्य कृमि, कमर, पाठ, यामधील वात, उदरासंबंधीं वात यांचाहि नाश होतो.

२८ मिम्मिणवातावर (अडखळणें)

दशमूलस्य निर्यूहो हिंगुपुष्करचूर्णितः ।
शमयेत्परिपीतस्तु वातं मिम्मिणसंज्ञितम् ।। यो. र. ८१७

दशमूळाचा काढा, हिंग व पोखरमूळाचें चूर्ण घालून द्यावा. तो मिश्रण वाताचा (ज्या वातामुळे मनुष्य अडखळत व अक्षरें सोडीत बोलतो तो वात) नाश करतो.

२९ प्रत्याघात व उरूस्तंभ ह्याजवर कल्क

पिप्पली पिप्पलीमूलं भल्लातक फलानि च ।
एतत्कल्कश्च सक्षौद्र उरूस्तम्भ निवारणः ॥ यो. र. ८१८

पिंपळी, पिंपळमूळ व बिब्बे यांचा कल्क मधाशीं घ्यावा. तो उरुस्तंभाचा नाश करितो.

पंचमूलीकषायं तु सुखोष्णं त्रिवृतायुतम् ।
गृध्रसीं गुल्मशूलं च सद्यः पीतं नियच्छति ॥

मोठ्या पंचमूळाचा काढा, निशोत्तराचें चूर्ण घालून, कोमट करून घ्यावा. तो गृध्रसी, गुल्म व शूळ यांचा त्वरीत नाश करितो.

वाजिगन्धाबलाबिल्वदशमूल्यंबु साधितम् ।
गृध्रस्यां तैलमैरण्डं बस्तौ पाने च शस्यते ॥

अश्वगंधा, चिकणामूळ व दशमुळे यांच्या काढ्यांत सिद्ध केलेलें एरंडेल, गृध्रसी वातावर पिण्याला व बस्ति देण्यास प्रशस्त आहे.

३० गृध्रसी चिकित्सा

अन्तरा कण्डरा गुल्फं सिराबस्त्यग्निकर्मच ॥
गृध्रसीषु प्रयुंजीत खल्ल्यां तूष्णोपनाहनम् ।
पायसैः कृशरैश्चैव शस्तैस्तैल घृतान्वितै : च. चि. अं. ६४०

गृध्रसीमध्यें कंडरा व गुल्म यामध्यें सिरावेध, तसेंच अग्निकर्म करावे.

दशमूली बलारास्ना गडूची विश्वभेषजम् ।
पिबेदेरण्डतैलेन गृध्रसीखंज पंगुषु ॥ भै. र. ३७७

दशमूळे, बला, रास्ना गुळवेल, व सुंठ हे समभाग घेऊन बारीक चूर्ण करावें. ३ ते ६ मासे प्रमाणाने तें एरंडेल तेलांत मिसळून दररोज घेतल्याने गृध्रसी, खज, पंगू, आदि रोग बरे होतात.

१. वातविध्वंस ६ गुं.
आरोग्यवर्धिनी ६ गुं.
समीरपन्नग ४ गुं.

वरील औषधाच्या ४ पुड्या करून त्या महारास्नादि काढ्यांतून देणें

२. रात्रीं गजकेसरी १ गुंज पाण्याबरोबर देणें.

३. नारायणतेल एक चमचा गरम दूधांतून देणें व वरून शेकणें.

३१ गृध्रसीवर बस्ती प्रयोग

गृध्रस्यार्तं नरं सम्यक् पाचनाद्यैर्विशोधितम ।
ज्ञात्वा नरं प्रदीप्ताग्निं बस्तिभिः समुपाचरेत् ।।
नादौ बस्तिविधिं कुर्याद् यावदुर्ध्वं न शुद्धयति ।
स्नेहो निरर्थकस्तस्य भस्मनेवाहुतिर्यथा ।। भैं. र. ३७८

गृध्रसीने पीडित मनुष्याला पाचनादि उपायांनी शोधन करावे. उर्ध्व भागाची शुद्धि झाल्याशिवाय बस्तिविधि करूं नये. कारण अशुद्ध अवस्थेंत बस्तिविधि केल्यानें स्नेहऔषध फुकट जाते. जसे थंड राखेवर तूपाची आहुति द्यावी ती जळत नाही. त्या प्रमाणेंच अशुद्ध कोठ्याचे पुरुषाला दिलेलें स्नेह. मदाग्निमुळे पचन होत नाही. व ते जसेच्या तसे मलाबरोबर बाहेर पडते.

३२ गृध्रसी खलायखंज व पंगुत्व ह्याजवर

विशोध्यैरण्डबीजानि पिष्ट्वा क्षीरे विपाचयेत् ।
पायसं तत्कटीशूले गृध्रस्यां चौषधं परम् ।। यो. र. ८१९

एरंडाचें बी (एरंडयातील मगज) शुद्ध करून तें वाटून दुधांत टाकून तें दूध पचन करावें आणि तें दूध प्यावें. तें कटीशूळ व गृध्रसी याजवर उत्तम औषध आहे

रास्नायास्तु पलं चैकं कर्षाश्च गुग्गुले ।
सर्पिषा वटकान्कृत्वा खादेद् गृध्रसि नाशनान् ।। यो. र. ८९०

रास्ना चार तोळे, शुद्ध गुग्गुळ पांच तोळे यांच्या तूपांत गोळचा करून खाव्यात त्या गृध्रसीचा नाश करितात.

३३ पक्षाघात चिकित्सा पचकर्म

स्वेदनं स्नेहसंयुक्तं पक्षाघाते विरेचनम् । च. चि. अं. ६४०

पक्षांघातांत स्वेदन व स्नेहयुक्त विरेचन करावे.

३४ पक्षघाताची चिकित्सा

माषात्मगुप्तकैरंडवाटचालकशृतं जलम् ।
हिंगुसैंधवसंयुक्तं पक्षाघातनिवारणम् ।। यो. र. ८१२

उडीद, कवचबीज, एरंडमूळ व चिकणामूळ यांचा काढा, हिंग व सैंधव घालून घ्यावा. तो पक्षाघाताचा (अर्धांगवाताचा) नाश करितो.

३५ अर्दित चिकित्सा पंचकर्म

अर्दिते नावनं मूर्ध्नि तैलं तर्पणमेव च ।
नाडीस्वेदोपनाहाश्चाप्यानुपपिशितैर्हिताः ।। च. चि. अं. ६४०

अर्दित झाल्यावर नस्य, डोक्यांत तेलप्रयोग, तसेंच तर्पण, नाडी, स्वेदन, उपनाह, आणि अनुपदेशांतील प्राण्याचें मांस हितकर आहे.

३६ अर्दित चिकित्सा

रसोनकल्कं नवनीतमिश्रं खादेन्नरो योऽर्दितरोगयुक्तः ।
तस्यार्दितंनाशयती ह्शीघ्रं बृन्दं घनानामिव मातरिश्वः ।। भे. र. ३७५

अर्दित रोगाने पिडीत मनुष्याला दगडावर बारीक केलेल्या ४ मासे लसूणामध्यें १ तोळा लोणी मिळवून खावयास दिल्यास कांही दिवसांत हा अर्दितरोग समूळ नाश पावतो.

नवनीतेन संयुक्ता खादेन्माषेण्डरीं नरः ।
दुर्वारमर्दितं हन्ति सप्तरात्रान्न संशयः ।। यो. र. ८१३

लोण्याबरोबर उडदाचे वडे सात दिवस खावेत. ते दुर्निवार अर्दिताचा नाश करिते.

३७ माषेडरी प्रयोग

अर्दिते नवनीतेन खादेन्माषेण्डरीं नरः ।
क्षीरमांसरसैर्भुक्त्वा दशमूली रसं पिबेत् ।। भै. र. ३७६

अर्दित रोगामध्यें लोण्याबरोबर उडदाचे वडें खावेत व नंतर दूध किंवा मांस रसाबरोबर भोजन करावे व सकाळीं दशमूळाचा काढा ध्यावा.

३८ स्नेहाभ्यंग शिरोबस्ति विधी

स्वेदाभ्यंग शिरोबस्ति पाननस्य परायणः ।
अर्दितं स जयेत्सर्पिः पिबेदौत्तरभक्तिकम् ।। भै. र. ३७६

स्वेदनकर्म, वक्षमाण वातनाशक तेलाने अभ्यंग, शिरोबस्ती, स्नेहपान व स्नेहनस्य नेहमी करावे आणि नंतर तूप सेवन केल्याने अर्दितरोग नाहीसा होतो.

३९ हनुग्रह चिकित्सा

व्याधितास्ये हनुंस्विन्नमंगुष्ठाभ्यां प्रपीडयेत् ।
प्रदेशिनीभ्यां चोन्नाम्य चिबुकोन्नमनं हितम् ।।
स्त्रस्तं स्वं गमयेत् स्थानं स्तब्धं खिन्नं विनामयेत् ।
प्रत्येकं स्थानदूष्यादिक्रिया वैशेष्य माचरेत् ।। च. चि. अं. ६४०

ज्या रोग्याचे वरचे जाभाड वर राहून खाली येत नाही व खालचा जबडा खालीच राहतो. तो बंद होत नाही. त्यावर त्याचा प्रथम हनुभाग शेकावा

(स्विन्न) व त्याच्या मुखांत दोन्ही बाजूस दोन्ही अंगठे घालून दाढांचा शेवटचा भाग अंगठ्याने जोराने दाबावा व तर्जनीनें हनवटीचा खालचा भाग वर लोटावा अशा तऱ्हेने तो मूळच्या जागेवर बसवावा. जर त्या ठिकाणचीं जागा रुक्ष असेल तर स्नेहयुक्त स्वेद करावा.

४० हनुग्रह

सर्पिस्तैलवसामज्जापानाभ्यंजनबस्तयः ।
स्वेदः स्निग्धो निवातंच स्थानं प्रावरणानि च ॥
रसाः पयांसि भोज्यानि स्वाद्वम्ललवणानि च ।
बृंहणं यच्चतत्सर्वं प्रशस्तं वातरोगिणाम् ॥ च. चि. अं, ६४०

तूप, तेल, वसा, मज्जा, पाणी अभ्यंग, बस्तीप्रयोग, स्वेदन, स्निग्धस्वेद, निवातस्थान, प्रावरण, मांसरस, दूध, मधूर, आम्ल, लवण, इत्यादि भोज्य पदार्थ तसेंच बृंहण पदार्थ वातरोग्यास हितकारक आहेत.

४१ वातविध्वंसरस

रसं गंधकं नागवंगं च लोहं तथा ताम्रजं व्योम निश्चन्द्रिकं च ।
कणा टंकणं त्र्यषणं नागरं वे पृथग्भागमेकं विमर्द्यैकयामम् ॥
ततो वत्सनाभं चतुःसार्धभागं दृढं मर्दयेद्भावना व्योषजालिः ।
वराचित्रकैर्माकवैः कुष्ठजाद्भिस्तिभिर्भावये न्निर्गुंडी भानु दुग्धैः ॥
महौधात्रिकाचन्द्रिकानिम्बुनीरैः समं भावयेद्वात विध्वंसनोऽयम् ।
समीरेच शूले महाश्लेष्मरोगे ।
ग्रहण्यां तथा संनिपाते च सर्वे ।
स्त्रियः सूतिकावातरोगेषु दद्या।
न्निषेवेत गुंजाद्वयं सूतमेनम् ॥ यो. र. ८५६

पारा, गंधक, शिशाचें भस्म, वंगभस्म, लोहभस्म, ताम्रभस्म, निश्चंद अभ्रकभस्म, पिंपळी, टाकणखाराची लाही, सुंठ, मिरे पिंपळी हीं औषधें प्रत्येकी एक एक भाग घेऊन त्यांचा एक प्रहर खल करावा. त्यांत बचनाग साडे चार भाग, घालून त्यास त्रिकुटाच्या काढ्याच्या तीव भावना द्याव्यात. नंतर त्रिफळा, चित्रकमूळ, माका, काष्टें निर्गुडी, रुईचा चीक, भुईआवळी, आले, लिंबाचा रस, यांचा यथासंभव काढ्याच्या किंवा रसाच्या ३–३ भावना द्याव्यात. याला वातविध्वंसरस असें म्हणतात. हा वातविकार, शूळ, महान कफविकार, संग्रहणी, सर्व सन्नीपात स्त्रियांचा बाळांत रोग व वातविकार ह्यावर द्यावा. दोन गुंजापर्यंत त्याची योजना करावी.

४२ धनुर्वातावर सूतीकाभरण रस

सुवर्णं रजतं ताम्रं प्रवालं पारदं समम् ।
गधकं चाभ्रक तालं शिला त्रिकटु रोहिणी ।।
एतानि समभागानि रविक्षीरेण मर्दयेत् ।
चित्रमूलकषायेण पुनर्नवारसेन च ।।
दिनं गजपुटे पाच्यं मूषायां धारयेत् पृथक् ।
अनुपान विशेषेण देयं गुंजार्धकं च तत् ।
सूतिकारोगमतुलं धनुर्वातं विशेषतः ।
त्रिदोषोत्थान्हरेत्व्याधी निच्छापथ्यं प्रदापयेत् ।
सूतिकाभरणं नाम सर्वरोग हरं च तत् ।। यो. र. ८५९

सुवर्णभस्म, रौप्यभस्म, ताम्रभस्म, प्रवाळभस्म, रससिंदूर, शुद्ध गंधक, हरतालभस्म, अभ्रकभस्म, शुद्ध मनशीळ, त्रिकटु, कुटकी हीं सर्व समभाग घेऊन त्याचा रूईचें चिकांत खल करावा. नंतर चित्रकमूळाचा काढा. व पसूचा रस यामध्यें एक भावना देऊन एक दिवस गजपूट द्यावें. हा अनुपान योजुन अर्धी गुंज प्रमाणाने दिला असतांना महासूतीकारोग, विशेषतः धनुर्वात व त्रिदोषजन्य अन्य व्याधी यांचा नाश करितो. हा सूतिकाभरण नांवाचा रस संपूर्ण रोगनाशक आहे. यावर इच्छेनुरूप पथ्य द्यावें.

४३ कुब्जविनोदरस

रसगन्धौ समौ शुद्धौ चाभया तालकं तथा ।
विषं कटुकीव्योषं च बोलजैपालकौ समौ ।।
भृंगराज रसैर्मद्यं स्नुहृयर्कस्वरसै स्तथा ।
गुंजाद्वयं भक्षयेच्च हृच्छूलं पार्श्वशूलकम् ।।
आमवाताढच वातादीन् कटिशूलं च नाशयेत् ।
अग्निं च कुरुते दीप्तं स्थौल्यं चाप्यपकर्षति ।
रसः कुब्जविनोदोऽयं गहनानन्दभाषितः ।। भै. र. ३८४

शुद्ध पारा, शुद्ध गंधक, हिरडा, हरताळ, शुद्ध विष, कुटकी, त्रिकटू, बोळ तसेंच जमालगोटा समभाग घेऊन बारीक करून घोटावें. व तें माका, निवडुंग, रूईच्या स्वरसांत घोटावें. २ गुंजेच्या प्रमाणानें गोळी करावी. ह्या गोळ्या सेवन केल्यानें हृदयशूळ, पार्श्वशूळ, आमवात, आढचवात आणि कटिशूळ यांचा नाश करतो व अग्नि प्रदिप्त करतो. स्थौल्य नष्ट करतो. हा कुब्जविनोदरस गहनानंदजीने सांगितला आहे.

४४ सर्वांगकम्पारिरस

मृतं सूतं मृत ताम्रं मर्दयेतत्रिकटूद्रवैः ।
एकविंशतिवारं च शोष्यं पेष्यं पुनःपुनः ।।
चणमात्रा वटी भक्ष्या रसः सर्वांगकम्पजित् ।। भै. र. ३८४

पारदभस्म, ताम्रभस्म हीं समान घेऊन एकत्र घोटावींत व त्यास निवडुंगाच्या काढयाच्या २१ भावना द्याव्यात. प्रत्येक भावना दिल्यावर तें घोटून सुकवावे. २१ भावना झाल्यावर चण्याएवढ्या गोळ्या कराव्यात. हें सेवन केल्याने सर्वांगकम्पवात नष्ट होतो.

४५ चिंतामणि चतुर्मुख रस

विशुद्धं रससिन्दूरं तदर्धं लोहमभ्रकम् ।
तदर्धं कनकं खल्वे कन्यास्वरसमर्दितम् ।।
एरण्डपत्रैरावेष्टय धान्यराशौ निधापयेत् ।
त्रिदिनान्ते समुद्धृत्य सर्वरोगेषु योजयेत् ।।
एतद्रसायनवरं त्रिफलामधुसंयुतम् ।
तद्यथाग्निबलं खादेद्वलीपलितनाशनम् ।।
अपस्मारं महोन्मादं रोगान् वातसमुद्भवान् ।
क्रमेण शीलितं हन्ति वृत्रमिन्द्राशनिर्यथा ।। भै. र. ३८५

रससिंदूर १ पळ, लोहभस्म, अभ्रकभस्म हीं प्रत्येकी अर्धा पळ, सुवर्णभस्म ¼ पळ घेऊन सर्व एकत्र करून, तें कुमारीच्या रसांत एक प्रहरपर्यंत घोटावें. व गोळा तयार झाल्यावर त्यावर एरंडाचीं पानें बांधून तीं तीन दिवस धान्याचे राशीत ठेवावींत व तीन दिवसांनी बाहेर काढून एरंडाचीं पानें काढून टाकावींत व त्याचें चूर्ण करावें. अनूपानभेदाने हें रसायनश्रेष्ठ औषध रोग्याचें अग्निबल पाहून त्रिफलाचूर्ण व मध यांचेबरोबर द्यावें. यानें वलिपलितरोग नष्ट होतो. अपस्मार, भयंकर उन्माद आणि वातविकारानें उत्पन्न झालेल्या सर्व रोगांचा नाश करतो. जसें इंद्राचे वज्राने सर्व रोगांचा नाश होतो.

४६ चतुर्मुखरस

रसगन्धकलोहाभ्रं समं सूताङ्घ्रिहेम च ।
सर्वं खल्वतले क्षिप्त्वा कन्यास्वरसमर्दितम् ।।
एरण्ड पत्रैरविष्टय धान्यराशौ दिनत्रयम् ।
संराप्य च तदुद्धृत्य सर्वरोगेषु योजयेत् ।।

एतद्रसायनवरं त्रिफला मधुयोजितम् ।
तद्यथाग्निबलं खादेद्वलीपलित नाशनम् ।।
क्षयमेकादशविधं पाण्डुरोगं प्रमेहकम् ।
श्वास शूलंच मंदाग्नि हिक्काचैवाम्लपित्तकम् ।।
व्रणान् सर्वानाढ्यवातं विसर्पं विद्रधि तथा ।
अपस्मारं महोन्मादं सर्वार्शांसि त्वगामयान् ।।
क्रमेण शीलितं हन्ति वृक्षमिन्द्राशनिर्यथा ।
पौष्टिकं बल्यमायुष्यं स्त्रीणां प्रसवकारणम् ।।
चतुर्मुखेन देवेन कृष्णात्रेयस्य सूचितम् ।
जगतां च हितार्थाय चतुर्मुख मुखोदितः ।
रसश्चतुर्मुखी नाम चतुर्मुख इवापरः ।। भै. र. ८३५

शुद्ध पारा, गंधक, लोहभस्म, अभ्रकभस्म १—१ तोळा. पारदाच्या चौथाई सुवर्णभस्म घ्यावें. पारद, व गंधकाची कज्जली करावी व त्यांत राहिलेलीं द्रव्यें मिळवावीत. तीं सर्व घृतकुमारीच्या रसांत एक प्रहरपर्यंत खलावींत व त्याचा गोळा तयार झाल्यावर त्यावर एरंडाचीं पानें बांधून धान्याच्या राशीत ठेवावें. नंतर चौथ्या दिवशीं बाहेर काढून त्याचें बारीक चूर्ण करावें. तें अनुपान भेदाने सर्व रोगावर द्यावें. सर्व रसायनांत श्रेष्ठ अग्निबल असेल त्यानुसार त्रिकटु व मध यांचेबरोबर सेवन केल्यानें वलिपलीत रोग नाहीसे होतात. अनेक प्रकारचे क्षय, पांडुरोग, प्रमेह श्वास, शूळ, मंदाग्नि, हिक्का, आम्लपित्त सर्व प्रकारचे व्रण, आढयवात, विसर्प, विद्रधी, अपस्मार, भयंकर उन्माद, सर्व प्रकारचे अर्श व त्वचेचे सर्व विकार क्रमाने नाहीसे करतो. जसे इंद्राचे वज्राने वृक्षांचा नाश होतो. हा रस देह पुष्ट करणारा, बल व आयुष्य वाढविणारा व वन्ध्यास्त्रिला प्रसव करणारा चतुर्मूख ब्रम्हाजीने जगताच्या हितासाठीं कृष्णात्रेयनीला सांगितला म्हणून याला चतुर्मूखरस नांव आहे की जो आरोग्य व सृष्टि करण्यामध्यें दुसरा ब्रम्हा आहे.

४७ लक्ष्मी विलास रस

पलं कृष्णाभ्रचूर्णस्य तदर्धौ रसगन्धकौ ।
बलानागबलाभीरुविदारी कन्द मेव च ।।
कृष्ण धुस्तूर निचुलं गोक्षुरवृद्धदारयोः ।
बीजं शक्राशनस्यापि जातीकोषफले तथा ।।
कर्पूरश्चैव कर्षांशं श्लक्ष्णचूर्णं पृथक् पृथक् ।
गृहीत्वा चाष्टमांशेन स्वर्णं पर्णरसेन च ।।

खिन्नचणकप्रमाणां वटिकां कारयेद्भिषक् ।
रसो लक्ष्मीविलासोऽयं पूर्ववद् गुणकारकः ।। भै. र. ३८६

कृष्णाभ्रकभस्म १ पल, शुद्ध पारा व गंधक प्रत्येकी ·।।· पल, बलाचें मूळ, नागबलाचें मूळ, शतावरी, विदारीकंद, काळ्या धोतऱ्याचें बीज, समुद्रफेस, गोखरू, वरधारा (वृद्धदारू) शुद्ध बीज, भांगेचें शुद्ध बीज, जायफळ, जायपत्री व कापूर हीं प्रत्येकी १–१ कर्ष घ्यावींत. पारा–गंधकाची कज्जली करावी. त्यांत राहिलेलीं द्रव्यें मिळवावींत, सर्व एकत्र मिसळावींत व घोटावींत. त्यांत कर्षाचे आठवा भाग (·।।· शाण) सुवर्णभस्म मिळवावें व पानाच्या स्वरसांत एक प्रहरपर्यंत खल करावा व त्याच्या २ गुंजा प्रमाणानें गोळ्या कराव्यात. हा लक्ष्मीविलासरस सर्व वातविकार व अनुपान भेदाने सर्व विकारांचा नाश करतो.

४८ तालकेश्वररस

एकभागौ रसस्य स्याच्छुद्धं तालं च तत्समम् ।
अष्टौ स्युर्विजयायाश्च गुटिका गुडतश्चरेत् ।।
एकैकां भक्षयेत्प्रातश्छायायामुपवेशयेत् ।
तालकेश्वरनामाऽयं रोगश्चास्पर्शनाशनः ।। भै. र. ३८७

शुद्धरस (पारा) अथवा रससिंदुर, शुद्ध हरताळ १–१ पळ, भांगेच्या शुद्ध बीजाचें चूर्ण ८ पळ घेऊन बारीक करावें. तयार झालेल्या चूर्णाच्या दुप्पट (९० पळ) जुना गूळ घेऊन घोटावें. २ मासे प्रमाणाने गोळ्या कराव्यात. ह्या दोन गोळ्या दररोज सकाळीं द्याव्यात व सावलीत बसवावें. हा रस कांही दिवस सेवन केल्यानें वातरोगामुळे उत्पन्न झालेली स्पर्शज्ञानाभाव नष्ट होतो.

४९ महाविषगर्भ तेल

कनकस्य च निर्गुण्डी तुम्बिनी च पुनर्नवा ।
वातारिश्चाश्वगन्धा च प्रपुन्नटं सचित्रकम् ।।
सौभांजनं काकमाची कलिकारी च निम्बकम् ।
महानिम्बेश्वरी चैव दशमूलं शतावरी ।।
कारवल्ली सारिवा च श्रावणी च विदारिका ।
वज्रार्को मेषशृंगी च करवीरद्वयं वचा ।।
काकजंघा त्वपामार्गो बला चातिबला द्वयम् ।
व्याघ्री महाबला वासा सोमवल्ली प्रसारिणी ।।
पलोन्मितानि चैतानि द्रोणेऽम्भसि विनिक्षिपेत् ।

पचेत्पादावशेषेऽस्मिन्कल्कस्य कुडवं क्षिपेत् ॥
त्रिकटुं विषतिन्दुं च रास्ना कुष्ठं विषं घनम् ।
देवदारुवत्सनाभौ द्वौ क्षारौ लवणानि च ॥
तुत्थकं कट्फलं पाठा भार्गी च नवसागरम् ।
त्रायन्ती धन्वयासं च जीरकं चेन्द्रवारुणी ॥
तैलप्रस्थं समादाय पाचयेन्मृदुवह्निना ।
विषगर्भमिदं नाम्ना सर्वान्वातानपोहति ॥
वक्षोरुकटिजंघानां संधानं श्रेष्ठमेव च ।
गृध्रसीं च महावातान्सर्वांगग्रहणं तथा ॥
दण्डापतानकं चैव कर्णनादं च शून्यताम् ।
वनमध्ये यथा सिंहात्पलायन्ते यथा मृगाः ॥
यथाऽश्वगजभग्नानां नराणां च चतुष्पदाम् ।
नाशयेन्नात्र संदेहो विषगर्भस्य लेपनात् ॥ यो. र. ८३४

काळ्या धोतऱ्याचें मूळ, निरगुंडीचें मूळ दुध्या भोपळा, घेटुळीची मुळी, (वसूची मुळी), एरंडमूळ, अश्वगंध, टाकळ्याचें मूळ, चित्रकमूळ, शेवग्याची साल, कांगोणीचें मूळ, कळलावी, बाळांत निंबाची साल, लिंबाऱ्याची साल, (किंवा बी) शिवलिंगी, दशमूळ, शतावरी, कारल्याचे वेल, उपलसरी, मुंडी, भुईकोहळा, त्रिधारी निवडुंग, रुई, मेंढशिंगी, बडीशेप, बाळांतशेप, वेखंड, काकजंघा, आघाडा, चिकणा, थोर चिकणा, करंडीची (मुद्रिकेची) मुळी, रिंगणी, सहदेवी, अडुळसा, सोमवल्ली (रानशेर) व चांदवेल हीं औषधें चार–चार तोळे घेऊन दहाशे चोवीस तोळे पाण्यांत चतुर्थांश काढा करून त्यांत सुंठ, मिरे, पिंपळी, कुचला, रास्ना, कोष्ठ, अतिविष, नागरमोथे, देवदार, बचनाग, जवखार, सज्जीखार, सेंधेलोण, पादेलोण, बिडलोण बांगडखार, मीठ, मोरचूद, कायफळ, पहाडमूळ, भारंगमूळ, नवसागर, त्रायमाण, धमासा जिरे, इंद्रावणमूळ, या सर्व औषधांचा मिळून सोळा तोळे कल्क करावा व तो घालून दोनशेछप्पन्न तोळे तेल सिद्ध करावें. हें विषगर्भतेल सर्व वाताचा नाश करते, मोडलेल्या हाडाला सांधते. गृध्रसी, महावात, सर्वांग जखडणें, दंडापतानक, कर्णनाद व बधिरत्व यांचा नाश करिते. अरण्यांत सिंहाला पाहून जशीं श्वापदें पळ काढतात तशी हत्ती–घोडें यावरून पडलेल्या मनुष्यांना व जनावरांना या तेलाचा लेप केला असतां त्याच्या पीडा दूर होतात.

५० लघुविषगर्भ तेल

तैलाढके समतुषाम्बुहयारिहेम
निर्गुण्डिभास्करशिफाश्रुतया तु सिद्धम् :

धतूर कुष्ठफलिनी विषहेमदुग्धा ।
रास्नाहयारिकरभीमरिचोपचित्राः ॥
मांसीवचादहनसर्षपदेवदारु
दार्वीनिशारुबुजतुत्रिफलासमंगाः ।
पिष्ट्वा क्षिपेत्पलमिता विषगर्भ मेत ।
तैलं समस्तपवनामयनाशनं स्यात् ॥ यो. र. ८३२

दोनशेछपन्न तोळे तेलामध्यें तेलाच्या समान तुषोदक [अथवा कांजी] घालावे. आणि तितकेच कण्हेर, धोतरा, निरगुंडी, रूई यांचा काढा घालून, धोतरा, कोष्ठ, कळलावी, बचनाग, काटेधोतऱ्याच्या मुळ्या, रास्ना, कण्हेर यांच्या मुळ्या, मालकांगोणीच्या बिया, मिरे थोरदंतीमूळ, जटामांसी, वेखंड, चित्रकमूळ, मोहऱ्या, देवदार, दारुहळद, एरंडमूळ, लाख, हिरडा, बेहेडा, आवळकंठी, लाजाळू या औषधांचा प्रत्येकी चार चार तोळे कल्क करून घालावा व तेल सिद्ध करावे याला विषगर्भ तेल असें म्हणतात.

५१ लघुनारायण तेल

एलाबलानतकुचन्दनदारुसोम्या
शैलेयकुष्ठ कुटिलावरुणशृतेन ।
तैलं सदुग्धमिति सिद्धमभीरुकन्द
तोयेन तेन तुलितेन समीरणघ्नम् ॥ यो. र. ८३६

वेलदोडे, चिकणामूळ; तगर, पतंग, देवदार, सोमवल्ली, धोंडफूल, कोष्ठ, मोरवेल व वायवर्णा यांचा काढा, दूध व मोठ्या शतावरीच्या काढ्यांचा रस हीं प्रत्येक तेलाच्या समान घालून तेल सिद्ध करावें. तें वातनाशक आहे.

५२ योगराज गुग्गुळ

चित्रकं पिप्पलीमूलं यवानी कारवी तथा ।
विडंगान्यज मोदा च जीरकं सुरदारू च ॥
चव्यैला सैंधवं कुष्ठं रास्ना गोक्षुर धान्यकम् ।
त्रिफला मुस्तकं व्योषं त्वगुशीरं यवाग्रजम् ॥
तालीसपत्रं गोक्षूरं लवंगं सर्जिका शठी ।
दन्ती गुडूची हपुषा वाजिगन्धा शतावरी ॥
प्रत्येकं कर्षमात्रं स्याच्चतुष्कर्षमयो मृतम् ।
एतानि सुभिषक्पट्टे सूक्ष्मचूर्णानि कारयेत् ॥

यावन्त्येतानि चूर्णानि तावन्मात्रो हि गुग्गुलु:
संमर्द्य सर्पिषागाढं स्निग्धभांडे निधाय च ।
ततो मात्रां प्रयुंजीत यथेष्टाहारवानपि ।
योगराज इति ख्यातो योगोऽयमृतोपम: ।।
आमवातादिवातादीन्कृमीन्दुष्टरव्रणानपि ।
प्लीहगुल्मोदरानाह दुर्नामानि विनाशयेत् ।।
अग्निं च कुरुते दीप्तं रेतोवृद्धिं बलं तथा ।
वातरोगाञ्जयत्याशु संधिमज्जगतानपि ।।
पादग्रहं क्रोष्टुशीर्षं मन्यास्तंभं हनुग्रहम् ।
कर्णग्रहं कर्णशूलं शिर:शूलं मरुत्कृतम् ।
रास्नाक्वाथेन हन्त्येष केवलो वा प्रशस्यते ।। यो. र. ८२८

चित्रक, पिंपळमूळ, ओवा, बडीशेप, वावडींग, अजमोदा, जिरे, देवदार, चवक, वेलदोडे, सेंधेलोण, कोष्ठ, रास्ना, गोखरू, धणे, हिरडा, बेहेडा, आवळकंठी, नागरमोथे सुंठ, मिरे, पिंपळी, दालचिनी, वाळा, जवखार, तालीसपत्र, सराटे, लवंग, सुज्जोखार, कचोरा, दांतीमूळ, गुळवेल, शेरणी, अश्वगंध, शतावरी ही औषधें एक एक तोळा व चार तोळे लोहभस्म घेऊन त्याचें बारीक चूर्ण करावें. आणि त्या चूर्णासमान गुग्गुळ घालून त्याचा तुपांत खल करून तो तूप लावलेल्या मातीच्या भांड्यांत ठेवावा.

आणि शक्तीतारतम्यानें त्याची मात्रा सेवन करावी. याजवर यथेच्छ आहार करावा. याला योगराज गुग्गुळ असें म्हणतात. हा आमवातादिवात, कृमि, दुष्टव्रण, पानथरी, गुल्म, उदर, आनाह, मूळव्याध, यांचा नाश करितो, अग्नि प्रदिप्त करतो, शुक्रबल वाढवितो. सांधे व मज्जागतवात यांचा त्वरित नाश करितो, बाय जखडणें, क्रोष्टुशीर्ष, मन्यास्तंभ, हनुग्रह, कर्णशूल, काज गच्च होणें, वातजन्य मस्तकशूल या विकारावर हा रास्नाच्या काढ्यांतून दिला असतां त्याचा नाश करितो किंवा हा काढ्याच्या अनुपानावाचूनहि द्यावा.

५३ नारायण तेल

बिल्वाग्निमंथस्योनाक पाटलापरिभद्रका: ।
प्रसारिण्यश्वगंधा च बृहती कंटकारिका ।।
बला चातिबला चैव श्वदंष्ट्रा सपुनर्नवा ।
एषां दशपलान्भागांश्चैतु द्रोणाम्भसा पचेत् ।
पादशेषं परिस्राव्य तैलपात्रं प्रदापयेत् ।

शतपुष्पा देवदारू मांसी शैलेयकं वचा ॥
चंदनं तगरं कुष्ठमेलापर्णीचतुष्टयम् ।
रास्ना तुरगगन्धा च सैंधवं सपुनर्नवम् ॥
एषां द्विपलिकान्भागान्पेशयित्वा विनिक्षिपेत् ।
शतावरीरस चैव तैलतुल्यं प्रदापयेत् ॥
आजं वा यदि वा गव्य क्षीरं दत्वा चतुर्गुणम् ।
वाते बस्तौ यथाऽभ्यंगे भोज्ये नस्ये प्रयोजयेत् ॥
अश्वो वा वातभग्नो वा गजो वा यदि वा नरः ॥
पंगुर्वा भग्न हस्तो वा भग्नपादोऽथवा नरः ।
अधोभागे च ये वाताः शिरामध्यगताश्च ये ।
दन्तशूले हनुस्तम्भे मन्यास्तम्भेऽपतंत्रके ॥
एकांगग्रहणे वापि सर्वांगग्रहणे तथा ।
क्षीणेंद्रिया नष्टशुक्रा ज्वरक्षीणाश्च ये नराः ॥
लालाजिव्हाश्च बधिरा विस्वरा मन्दमेधसः ।
मन्द प्रज्ञा च या नारी या च गर्भं न विन्दति ॥
वातार्तो वृषणौ येषामंत्रवृद्धिश्च दारुणा ।
एततैलं वरं तेषां नाम्ना नारायणं स्मृतम् ॥ यो. र. ८३६

बेल, टाकळा, टेटू, पाडळ, लिंब, चांदवेल, अश्वगंधा, रिंगणी, डोरली, चिकणामूळ, पेटारीचें मूळ, गोखरू व वसुची मुळी हीं औषधें ४०–४० तोळे घेऊन तीं चाळीसशे शहाणव तोळे पाण्यांत घालून चतुर्थांश काढा करावा. व तो गाळून घ्यावा. नंतर त्यांत दोनशे छप्पन तोळे तेल आणि बडीशेप, देवदार, जटामांसी, घोडफूल, वेखंड, तगर, कोष्ठ, वेलदोडे, वेलदोडे, सालवण, पिठवण, रानमूग, रानउडीद, रास्ना, अश्वगंधा, सैंधव वसु सर्वांचा आठ–आठ तोळे कल्क करून शतावरीचा रस दोनशे छप्पन्न तोळे घालावा. शेळीचें किंवा गाईचें दूध तेलाच्या चौपट घालून तेल सिद्ध करावें. हें तेल पिण्यात, बस्तिकर्मांत अंगाला लावण्यांत, जेवणांत व नस्यकर्मांत योजावें. घोडा, हत्ती किंवा मनुष्य वाताने पिडले असल्यास त्याच्यावर या तेलाचा प्रयोग करावा. तसे जें पांगळे व हात किंवा पाय मोडकें असतील त्यांनाहि हें फादेशीर आहे. शरीराचें खालचे भागांतील वात, शिरामधील वात, दंतशूळ, हनुस्तंभ, मन्यास्तंभ, अपतंत्रक, एकांगवात, सर्वांगवात, क्षिणेंद्रिय. हीनवीर्य, ज्वराने क्षीण झालेले, ज्यांना लाळ फार असते ते, बहिरे, हतस्वर, मंदबुद्धि स्त्रिया, वांझस्त्रिया, ज्याचें वृषण वातानें पिडले आहे ते, अंडवृद्धीचा विकार असलेले यांना नारायणतेल फार उपयोगी आहे.

५४ वातराक्षस रस

मृतं सूतं तथा गंधं कान्तं चाभ्रकमेव च ।।
ताम्रभस्मकृतं सम्यङ् मर्दयित्वा समांशकम् ।
पुनर्नवा गुडूच्याग्निसुरसात्र्यूषणं तथा ।।
एतेषां स्वरसेनैव भावयेत् त्रिदिनं पृथक् ।
दत्वा लघुपुटं सम्यक् स्वांगशीतं समुद्धरेत् ।।
वातराक्षसनामाऽयं वातरोगे प्रयोजयेत् ।
तत्तरोगानुपानेन द्विगुंजामात्र सेवनात् ।।
उरुस्तंभं वातरक्तं गात्रभंगं तथैव च ।
आमवातं धनुर्वातं वेदनावातमेव च ।
पक्षाघातं कम्पवातं सर्वसंधिगतं तथा ।
सुप्तिवातं च शूलं च हृन्मादं च विनाशयेत् ।।
तत्तद्रोगानुपानेन वाताशीतिनिवारणः । र. चं ३५२

पारदभस्म, गंधक, लोहभस्म, अभ्रकभस्म, ताम्रभस्म ही समभाग घेऊन, त्यांचा खल करून वसू, गुळवेल, चित्रकमूळ, तुळस, सुंठ, मिरे, पिंपळी यांच्या स्वरसाने त्यास तीन-तीन दिवस भावना द्याव्यात. नंतर गोळा करून एक पुट द्यावें. व स्वांगशीत झाल्यावर रसायन काढून घ्यावें. हा वातराक्षस नांवाचा रस वातरोगावर द्यावा. त्या त्या रोगावरील अनुपान योजून त्यांतून दोन गुंजापर्यंत सेवन करावा. त्याने उरुस्तंभ, वातरक्त, एकादा अवयव ढिला पडणें, आमवात, धनुर्वात, वेदनावात, अर्धांगवात, कंपवात, सर्वसंधिगतवात, स्पर्शवात (ज्या वातविकारांत त्वचेला स्पर्श कळत नाही तो), शूळ व उन्माद यांचा नाश करितो त्या त्या रोगाचें अनुपान दिलें असतां हा ऐंशीहि रोगाचा नाश करितो.

५५ एकांगवीररस

शुद्ध गंधं मृतं सूतं कान्तं वंगच्च नागकम् ।
ताम्रं चाभ्रं मृतं तीक्ष्णं नागरं मरिचं कणाम् ।।
सर्वमेकत्र संचूर्ण्य भावयेत् त्रि पृथक् पृथक् ।
वराव्योषक निर्गुंडीवन्हिकार्द्रकजै र्द्रवैः ।।
शिग्रुकुष्ठ द्रवेणापि ततो धात्र्या द्रवेण च ।
विषमुष्टयार्कहारेश्च आर्द्रकस्य रसैस्तथा ।।
रसश्चैकांगवीरोऽसौ सुसिद्धो रसराड् भवेत् ।

पक्षाघातं चार्दितंच धनुर्वातं तथैव च ॥
अर्धांगं गृध्रसीं चापि विश्वाचीमपबाहुकम् ।
सर्वान् वातामयान्हन्ति सत्यं सत्यं न संशयः ॥ र. यो. सागर १९२

शुद्ध गंधक, पारा, कांतलोह, वंग, नाग, ताम्र, अभ्रक, पोलाद या सर्वांचीं भस्में, सुंठ, मिरे, पिंपळी हीं सर्व समभाग घेवून त्यांचा खल करावा. नंतर त्रिफळा. त्रिकटु, निरगुंडी, आले शेवगा, कोष्ठ, आवळा, कुचलाविष, रूईच्या मुळीची साल, अक्कलकारा या सर्वांच्या रसाच्या तीन–तीन भावना द्याव्यात. हा एकांगवीररस ३ गुंज प्रमाणाने वातघ्न अनुपानाच्या बरोबर सेवन केल्याने पक्षाघात (लकवा), धनुर्वात, अर्धांगवात, गृध्रसी, विश्वाची अपबाहूक व सर्व वताव्याधी नष्ट करतो.

५६ वातरोगावर प्रत्यक्ष अनुभविक चिकित्सा

वातरोग असलेल्या रोग्याला पहिल्यानें ३ तोळे एरंडेल गरम दुधांतून किंवा चहांतून द्यावें. नंतर दुसरे दिवशीं सकाळीं २॥ तोळे तूप व एक मासा सैंधव गरम दूधांत घालून घेणें. व रात्रीं एक बस्ति घेणें.

दुपारीं व रात्रीं खालील औषध खालील अनुपानांतून घेणें.

वातविध्वंस ३ गुंजा.
एकांगवीर ३ गुं.
कुचलाचूर्ण ४ गुं.

ह्याच्या दोन पुड्या कराव्यात. १ तोळा महारास्नादि काढ्यांतून, त्यांत तितकेंच गरम पाणी घालून सकाळीं एक व रात्रीं एक अशा दोन पुड्या ध्याव्यात.

व रात्रीं निजतांना एक चमचा नारायणतेल थोडचा गरम दुधांतून देणें, याप्रमाणें सकाळीं तूप नंतर २ वेळ औषध व निजतांना नारायणतेल असें पांच दिवस सुरूं ठेवावें. नंतर तूप देणें बंद ठेवावें. सहावे दिवशीं कृमीकुठार २ गुंजा, पळसपापडी ८ गुंजा व गूळ १६ गुंजा हीं एकत्र मिसळून गोळी करून खावी व त्याचे दुसरे दिवशीं सकाळीं सर्व अंग शेकून काढावें. नंतर दुपारीं पुन्हां एरंडेल तेल तीन तोळे द्यावें. दुसरे दिवसापासून खालील औषध व तेलाची मालीश सुरूं ठेवावी. व रात्रीं निजतांना एक चमचा नारायणतेल गरम दुधांतून घेणें.

१ वातविध्वंस ६ गुं.
२ एकांगवीर ६ गुं.
३ शुद्ध कुचलाचूर्ण ६ गुं.

४ पुड्या. सकाळीं, दुपारी व ४ वाजतां, रात्री ८ वा. असे ४ वेळा महारास्नादि काढ्यांतून घेणें व निजतांना नारायणतेल गरम दुधांत घालून घेणें.

याशिवाय दररोज एक वेळ अंगाला नारायणतेलाची सैंधव व कापूर घालून, गरम करून मालीश करावी व वरून शेकीत जावें. त्याशिवाय आठवड्यांतून २ वेळ बस्ति द्यावा. याप्रमाणे तीन आठवडे किंवा एक महिना वरीलप्रमाणें औषधीं नियमित घेतल्यानें कोणत्याहि प्रकारचा वात असला तरी खात्रीने बरा होईल. आणखी एक महत्वाची गोष्ट लक्षांत ठेवावी की शरीराचे कोणत्याहि भागांत वेदना, शिलका, मुग्या निघत असतील तर एक गुंज समीरगजकेसरी पाण्याबरोबर घ्यावी. म्हणजे वेदना अर्ध्या तासांत थांबतील. मात्र १ गुंजेपेक्षा कमी किंवा जास्त मुळीच घेऊ नये. खाण्याकरितां गव्हाची पोळी, दूध, खीर, तूप याबरोबर खावी. कांही दिवस भात खाऊं नये. १४ दिवसानंतर जुन्या तांदळाचा भात चालेल. परंतु डाळी सर्वच, तिखट. दही, हे पदार्थ महिनाभर खाऊं नये. पिण्याकरितां पाणी उकळो आणून थंड केलेलें असावें. वातुळ पदार्थ बंद करावेत. साखर व थोडे आंबट पदार्थ चालतील.

वातरोगावर योग

१. महायोगराजगुग्गुळ २ मासे
वातविध्वंस ६ गुं.

४ पुड्या. महारास्नादि काढ्यांतून व दिवसांतून ४ वेळा घ्याव्यात.

२. वातराक्षस ४ गुं.
समीरपन्नग २ गुं.
शिलाजित ६ गुं.

४ पुड्या. रास्नासप्तकादिकाढ्यांतून घेणें.

५७ पथ्य व अपथ्य

कुलत्थमाषगोधूमू रक्ताभाः शालयो हिताः ।
पटोलं शिग्रुवार्ताकं दाडिमं च परुषकम् ॥
मत्स्यण्डिका घृतं दुग्धं किलाटं दधिकूर्चिका ।
बदरं लशुनं द्राक्षा तांबूलं लवणं तथा ॥
चटकः कुक्कुटो बर्ही तित्तिरश्चेति जांगलाः ।
शिलींद्रः पर्वतो नक्रो गर्गरः खुडिशो झषः ॥
यथाश्रयं यथावस्थं यथाचरणमेव च ।
तद्व्याधौ समुत्पन्ने पथ्यमेतन्नृणा भवेत् ॥

हुलगे, उडीद, गहूं, तांमसाळ, पडवळ, शेवगा, वांगीं, डाळिंब, फालसा, साखऱ्या, तूप, दूध, ताकाची, निवळी दह्याची कूचिका (ताकवत), बोर, लसुण, द्राक्षें, विडा, मीठ, चिमणी, कोंबडा. मोर, तित्तीरपक्षी व जांगल प्राण्याचें मांस शिलिंद्र–पर्वत (एक जातीचे मासे), सुसर, गर्गर (एक जातीचा मासा), खुडीश व झब (मत्सविशेष) इत्यादि जलचर प्राण्याचें मांस हें पदार्थ जसा आश्रय (देश वगैरेंचा) जशी रोग्याची अवस्था व जसें आचरण असेल त्या मानानें वातव्याधीचे ठिकाणीं पथ्यास द्यावें.

५८ वातरोग अपथ्य

चिन्ताप्रजागरणवेग विधारणानि ।
छर्दिः श्रमोऽनशनता चणकाः कलायाः ।
श्यामाकचूर्णकुरुविन्दुनिवाररकंगु ।
मुद्गास्तडागतटिनीसलिलं करीरम् ॥
क्षौद्रं कषायकटुतिक्तरसा व्यवायो ।
हस्त्यश्वयानमपि चंक्रमणं च खट्वा ।
आध्मानितोऽर्दितवतोऽपि पुनर्विशेषा
त्स्नानं प्रदुष्ट सलिलैर्द्विजघर्षणं च ॥
निःशेषतन्त्रपरिकीर्तित एष वर्गो
नृषां समीरणगदेषु मुदं न दत्ते ॥ यो. र. ८६१

चिता, जागरण, मलमूत्रादिकांचें वेगधारण, वान्तीकारक औषध, श्रम, लंघन, हरबरे, वाटाणे, सावे, चुना, मोठ्या साळी, देवभात, राळे, मूग, तळ्याचें पाणी, नदीचें पाणी, नेपती, मध, तुरट, तिखट, कडू, असें रस, मैथून, हत्ती व घोडे याजवर बसून जाणें, अतिशय चालणें, बाजेवर निजणें, पोट फुगलें असूनहि अन्न खाणें, तसेंच अर्दितवात झाला असतां स्नान करणें, वाईट पाण्यानें स्नान करणें व दांत घासणें इत्यादि सर्व वैद्यक ग्रंथांतून सांगितलेला हा वातरोगावरील अपथ्यकारक वर्ग वातविकारामध्ये संतोषदायक होत नाही.

५९ धनुर्वातावर योग

खुरासनी ओवा १ मासा, जुन्दवेदस्तर १ मासा, कस्तुरी १ मासा, गांजा १ मा. हे सर्व बारीक वाटून त्याच्या चण्याएवढ्या गोळ्या कराव्यात व त्या ४–४ तासानें घ्याव्यात.

६० गृध्रसीवर योग

वातविध्वंस ६ गुंजा, आरोग्यवर्धिनी ६ गुंजा यांच्या ४ पुड्या व रात्रीं समीरगजकेसरी द्यावी. निजतेवेळीं नारायणतेल दुधाबरोबर १ चमचा घ्यावें.

६१ पंचामृत लोहगुग्गुळ

पारा ४ तोळे, गंधक ४ तोळे, रौप्य ४ तोळे, अभ्रक ४ तोळे, माक्षिक ४ तोळे, लोह ८ तोळे, गुग्गुळ २८ तोळे या सर्वांची प्रथम कज्जली करून, इतर द्रव्यें त्यांत मिळवून त्यांचा दिवसभर खल करावा, व तें ४-४ गुंज प्रमाणाने घ्यावे.

पहिल्याने जुलाब घ्यावा. वातविध्वंस ४ गुंजा, एकांगवीर ४ गुंजा यांच्या ३ पुड्या सकाळ, दुपार व संध्याकाळीं घ्याव्यात व नारायणतेल १ चमचा दुधांतून किंवा गरम पाण्यांतून ४ द्यावें व समीरगजकेसरी १ गुंज पाण्याबरोबर घ्यावी.

......

मांसार्बुद-रक्तार्बुद-[कॅन्सर] चिकित्साप्रकरण

अध्याय २२ वा

अर्बुद--कॅन्सर

१ प्रास्ताविक

या रोगाचे ४-५ रोगीं आलेत पण त्यांतला एकहि रोगी १० दिवसाचे वर राहिला नाही. फक्त एकच रोगी २५ दिवस राहिला. तो रोगी दुसऱ्या हॉस्पिटल-मधून उपचार करून आला होता. त्याच्या घशांत आंतून कॅन्सर होता. पाणी-दूध पोटांत घेतल्यावर लगेच बाहेर निघून जात असें. दुसरा कोणताहि पदार्थ जात नव्हता. आमच्या रुग्णालयांत राहिल्यावर त्या रोग्यास खालील औषधीं दिल्यावर २० दिवसा-नंतर पोटांत घेतलेले दूध व पाणी बाहेर येत नव्हते. नंतर साबुदाणाहि पोटांत जाऊ लागला. परंतु दुधाबरोबर भात जात नसे. कांही दिवस राहीला असतां तर भातहि पोटांत गेला असता. कारण पाणी व दूध जें पूर्वी थोडया वेळाने बाहेर येत होते तें जर बंद झालें तर कांही दिवसांनी भातहि जाऊं शकला असता असें वाटते. नंतर १ नंबरचें औषध २५ दिवस दिलें. पहिल्यांदा ५-५ थेंब औषधीचें द्यावें लागे. १५ दिवसानंतर एका वेळेस सर्व औषध पोटांत जात होते.

त्यानंतर तो निघून गेला. परंतु हा एकच रोगी २५ दिवस राहिला. कोणत्याहि औषधी खात्रीने देता येत नाही.

२ अर्बूदाची व्याख्या

गात्रप्रदेशे क्वचिदेव दोषाः सर्मूछिता मांसमसृक् प्रदूष्य ।
वृत्तं मृदुं मन्दरुजं महान्तमनल्पमूलं चिरवृद्ध्यपाकम् ॥
कुर्वन्ति मांसोच्छ्रयमत्यगाधं तदर्बूदं शास्त्रविदो वदन्ति ॥

सु. नि. यो. र. २६८

शरीराच्या कोणत्याहि भागीं प्रकुपित झालेले वातादि दोष, मांस व रक्त ह्यांना दूषित करून वाटोळा, स्थिर, थोडा ठणका असणारा, मोठा होणारा, ज्यांचीं मुळें फार खोल गेलीं आहेत, असा, फार दिवसपर्यंत सावकाश वाढणारा, फार दिवसांनी पकणारा आणि अतिशय खोल भागांतून ज्याची उत्पत्ति आहे असा मांसाचा गोळा उत्पन्न करितात. त्याला वैद्यशास्त्रवेत्ते अर्बूद-आवाळु असें म्हणतात.

३ अर्बुदाचे प्रकार

वातेन पित्तेन कफेन चापि रक्तेन मांसेन च मेदसा च ।
तज्जायते तस्य च लक्षणानि ग्रंथेः समानानि सदा भवन्ति ।

वातानें, पित्ताने व कफाने अशीं तीन, रक्तानें, मांसाने व मेदाने एक-एक मिळून सहा प्रकारचीं अर्बुदें होतात. त्याचीं लक्षणें नेहमी गाठीसारखी असतात.

४ रक्तज अर्बुदाची संप्राप्ति

दोषाः प्रदुष्टा रुधिरं शिराश्च संकुच्य संपीडच गतास्त्व पाकम्
सास्त्रावमुन्नह्यति मांसपिण्डं मांसाकुरैराचितमाशु वृद्धिम् ।।
कुर्वन्त्यजस्त्रं रुधिरप्रवृत्तिमसाध्यमेत द्रुधिरात्मकं तु ।
रक्तक्षयोपद्रव पीडितत्वात्पाण्डुर्भवदेर्बुदपीडितस्तु ।।

सु. नि. यो. र. २६८

प्रकुपित झालेले वातादि दोष, रक्त व शिरा यांचा संकोच करून आणि त्यांना दाबून किंचित स्त्रावयुक्त असा मांसाचा गोळा वर उचलून आणतात. हा लवकर वाढतो. व त्याजवर मांसाचे अंकुर असतात. त्यांतून सारखें रक्ते वहात असते. याला रक्तार्बुद असें म्हणतात. हे असाध्य आहे, ह्यामध्यें रक्ताचा फार क्षय होतो. त्या उपद्रवामुळे तो रोगी पांढरा फटफटीत दिसतो.

५ मांसज अर्बुदाचीं संप्राप्ति

मुष्टिप्रहारादिभिरर्दितेंऽगे मांसं प्रदुष्टं जनयेत्तु शोथम् ।
अवेदनं स्निग्धमनन्यवर्णमपाकमश्मोपमम प्रचाल्यम् ।
प्रदुष्टमांसस्य नरस्य गाढमेतद्भवेन्मासपरायणस्य ।।

सु. नि. यो. र. २६९

मुष्ठिप्रहारादिकांनी पीडित झालेल्या ठिकाणचें मांस दूषित होऊन वेदनारहित, तुळतुळीत त्वचेच्या वर्णाचा, न पिकणारा, दगडाप्रमाणें कठीण व अचल असा शोथ उत्पन्न करितो. त्याला मांसार्बुद असें म्हणतात. नित्य मांस खाणारा व ज्याचें मांस बिघडलें आहे, त्याला होते.

६ पित्तजन्य अर्बुद चिकित्सा

स्वेदोपनाहा मृदवस्तु पथ्याः पित्तार्बुदे कायविरेचनं च ।
विघृष्य चोदुम्बरशाकगोजी पत्रैर्भृशं क्षौद्रयुतैः प्रलिम्पेत् ।।
श्लक्ष्णीकृतैः सर्जरसप्रियंगुपतंगरोध्रांजनयष्टिकाह्वैः ।
विस्त्राव्य चारग्वधगोजि सोमाऽश्यामा च योज्या कुशलेन लेपे

श्यामगिरिव्हांजन कीरसेषु द्राक्षारसे सप्तलिकारसेच ।
घृतं पिबेत् क्लीतकसंप्रसिद्धं पित्तार्बुदी तज्जठरी च जन्तुः ।।

पित्तजन्य अर्बुदावर हितकारक अशा मृदुपोटीसाने शेक द्यावा. शोधन होण्या-होण्याकरितां विरेचन द्यावें. त्या अर्बुदावर उंबर, सोहाडा आणि सागवान यांच्या पानानें घासून, राळ, गहुला, पतंग, लोध्र, रसांजन व जेष्ठमध यांचें चूर्ण मधांत कालवून वर लेप करावा.

किंवा अर्बुदांतून रक्त काढून बहावा, सोहाडा, अंकोल, बरधारा या औषधांचा वर लेप करावा. निशोत्तर व सोनकाव यांचा काळचा कापशीच्या रसांत, द्राक्षाच्या रसांत व शंखाहुलीच्या रसांत कालवून लेप करावा. जेष्ठमधाच्या कल्काने सिद्ध केलेलें तूप पित्तार्बुदाच्या रोग्यास प्यावयाला द्यावें.

७ कफजन्य अर्बुद चिकित्सा

शुद्धस्य जन्तोः कफजेऽर्बुदेतु रक्तेऽवसिक्ते तु ततोऽर्बुदं तत् ।
द्रव्याणि यान्यूर्ध्वमधश्च दोषान् हरन्ति तैः कल्ककृतैः प्रदिह्यात् ।
कपोतपारावतविड्विमिश्रैः संकास्थनीलैःशुकलांग लाख्यैः ।
मूत्रैस्तु काकादनिमूलमिश्रैः क्षारप्रदिग्धैरथवा प्रदिह्यात् ।।

सु. चि. अ. १८

कफजन्य अर्बुदामध्यें वमन विरेचनानें रोग्याचें संशोधन करून अर्बुदांतून रक्त काढावें. नंतर संशोधन गणांतील वमन विरेचनकारक अशा औषधांचा त्याच्यावर लेप करावा.

किंवा पारवा, होला यांची विष्ठा, काशाचा कीट किंवा कळंक, गठोना, कळलावी, कायळी यांचा गोमूत्रामध्यें कल्क करून प्रथम अर्बुदावर क्षार लावून नंतर त्याचा लेप करावा.

८ कफार्बुद नाशक लेप

लेपनं शंखचूर्णेन सह मूलकभस्मना ।
कफार्बुदापहं कुर्याद् ग्रंथ्यादिषु विशेषतः ।। भै. र. ५८२

शंखचूर्ण आणि मुळाची राख हीं समप्रमाणांत घेऊन कांजी किंवा पाण्या-बरोबर घोटून त्याचा लेप केल्यानें कफार्बुद नाहीसा होतो.

९ मेदोजन्यअर्बुदावर लेप

हरिद्रालोध्रपत्तंगगुडधुमो मनःशिला
मधुप्रगाढो लेपोऽयं मेदोर्बुदहरः परः ।।
एतामेव क्रियां कुर्यादशेषे शर्करार्बुदे ।। यो. र. २८३

हळद, लोध्र, पतंग, गूळ, घेरोसा व मनशीळ यांचा मधांतून लेप करावा. तो मेदोजन्य अर्बुदाचा नाश करण्याविषयीं फार उत्तम आहे. हीच क्रिया सर्व प्रकारच्या शर्करार्बुदावरहि करावी.

१० सर्व प्रकारच्या अर्बुदावर चिकित्सा योग्य

लिप्तं यवक्षारविडंगबीजं गन्धोपलैः स्यान्मसृणीकृतैर्यत् ।
रक्तेन मिश्रैः सरठस्य सद्यस्तदर्बुदं शाम्यति नान्यथैतत् ॥

यो. र. २८२

जवखार, वावडिंग व गंधक हे जिन्नस सरडयाच्या रक्तांत लोण्यासारखे बारीक करून त्याचा अर्बुदावर लेप करावा म्हणजे त्वरित शमते.

उपोदकरसाभ्यक्ता तत्पत्रपरिवेष्टिता ।
प्रणश्यत्यचिरान्नृणां पिटिकार्बुदजातयः ॥ यो. र. २८२

मयाळीचा रस लावून तिच्याच पानानें वेष्टण करावें. म्हणजे अर्बुदाच्या जातीच्या पुळया लवकर नाश पावतात.

उपोदिका कांजिकतक्रपिष्टा तयोपनाहो लवणेन सार्धम् ।
दृष्टोऽर्बुदानां प्रशमाय कैश्चिद्दिने दिने रात्रिषु मर्मजानाम् ॥

यो. र. २८२

मर्मस्थानीं झालेल्या अवाळूवर तें बरें होण्याकरितां मयाळ कांजींत किंवा ताकांत वाटून त्यांत मीठ घालून, तिचें पोटीस करून कांहीं दिवस व रात्रीं बांधीलेले पाहिले आहे.

गन्धशिलाविश्वौषधविडंगनागभस्मभिः समैश्चूर्णम् ।
कृकला सरक्तयुक्तं लेपात्सद्योऽर्बुदध्वंसि ॥ यो. र. २८३

गंधक, मनशीळ, सुंठ, वावडिंग, नागभस्म, यांचें समभाग चूर्ण सरडयाच्या रक्तांत खलून त्याचा लेप करावा. तो तात्काळ आवाळूचा नाश करतो.

स्नुहीगण्डोरिकास्वेदो नाशयेदर्बुदानि च ।
लवणेनाथ वा स्वेदः सीसकेन तथैव च ॥ यो. र. २८३

त्रिधारी निवडुंगाचे काटे उकडून त्याने शेकावे. तो अर्बुदाचा नाश करतो. तसेंच मिठाच्या पुरचुंडीने अथवा शिसे तापवून त्यानें स्वेदन करावें.

निष्पावपिण्याककुलत्थकल्कैर्मांसप्रगाढैर्दधिमर्दितैस्तु ।
लेपं विदध्यात् क्रिमयो यथाऽत्र मुंचन्त्यपत्यान्यथ मक्षिकाश्च ॥
अल्पावशिष्टं क्रिमिभिः प्रजग्धं लिखेत्ततोऽग्निं विदधीत पश्चात् ।
यदल्पमूलं त्रपुताम्रसीसैः संवेष्टय पत्रैरथवाऽऽयसैर्वा

क्षाराग्निशस्त्राण्यवतारयेच्च मुहुर्मुहुः प्राणमवेक्षमाणः ।
यदृच्छया चोपगतानि पाकं पाकक्रमेणोपचरेद् यथोक्तम् ।।

भै. र. ५८२

तीळकल्क, कुळीथ आणि मांस हीं समप्रमाणाने घेऊन तीं दह्याबरोबर पुष्कळ वेळ घोटून अर्बूदावर लेप लावावा. लेप लावल्यावर तेथें कुजण्याचीं क्रिया होऊन कृमि उत्पन्न होतात. त्यावर माशा बसून अंडीं घालतात. याप्रमाणें माशा व कृमि अर्बूद खाण्यास सुरवात करतात. कृमि व माशा बराचसा भाग खातात. नंतर राहिलेला भाग शस्त्राने कापून टाकावा. तप्त शलाकेने व्रणभाग दग्ध करावा. व याप्रमाणें शस्त्रचिकित्सा आणि दग्ध चिकित्सा करूनहि व्रणाचा कांही भाग राहिलाच तर त्यावर वंग, ताम्र, शिसें, लोह यांपैकी एका धातुचा पत्रा बांधावा. रोगी बलवान असल्यास त्याचा प्राण वाचविण्यास अर्बूदावर क्षार, अग्नि, शस्त्र यांनी वरचेवर चकित्सा करावी व अर्बुद पिकल्यास पाटन-शोधनादि क्रमाने करावी.

७) गंधक, मनशीळ, हळद, गूळ, राळ, जेष्ठमध, निशोत्तर, शंखभस्म, जवखार, पुनर्नवा हीं सर्व वस्त्रगाळ चूर्ण करून सरडयाच्या रक्तांत अर्बूदावर लावावींत.

११ अर्बुदशेषे दोषनिर्देश:

सशेषदोषाणिहि योऽर्बुदानि करोतितस्याशु पुनर्भवन्ति ।
तस्मादशेषाणि समुद्धरेत्तु हन्युः सशेषाणि यथा विषाग्नी ।। भै. र. ५२

जो शल्यचिकित्सक अर्बुदाला संपूर्ण नाहीसा करूं शकत नाही व तें अल्पप्रमाणांत राहिलेलें अर्बुद पुन्हा वाढतें. यासाठीं अर्बुद संपूर्ण नाहीसें करावें. कारण विष हे अग्नीप्रमाणें अर्बूद रोग्याला मारते.

१२ अर्बूदावर कांही औषधें

बृहत लोकनाथ, नित्यानंद, सोमनाथी ताम्र, खदिरारिष्ट, कैशोरगुग्गळ, सुवर्ण पर्पटी आरोग्यवर्धिनी, शिलाजतु प्रयोग ताम्रयोग, सिद्धमकरध्वज, ताम्रपर्पटी, रौद्ररस.

वरीलपैकी कोणतींहि दोन किंवा तीन औषधें एकत्र करून तें विडयांच्या पानाचा रस, आलेरस, गोखरूचा काढा, मध, पुनर्नवासव यांपैकी कोणत्यातरी एका अनुपानाबरोबर सेवन केलें असता अर्बुदरोग नाहीसा होतो.

१३ रौद्ररस

शुद्धसूतं समं गन्धं मर्द्यं यामचतुष्टयम् ।
नागवल्लीदलयुतं मेघनादपुनर्नवा ।।

गोमूत्रपिप्पलीयुक्तं मद्यं रुद्ध्वा पुटेल्लघु ।
लिहेत् क्षौद्रे रसो रौद्रौ गुंजामात्रोऽर्बुदं जयेत् ।। भै. र. ५८३

शुद्ध पारा, गंधक, दोन्ही पांच-पांच तोळे घेऊन बारीक करून त्याची कज्जली तयार करावी. नागवेलीच्या पानांचा रस, तांदुळजाचा काढा, पुनर्नवाच्या मूळाचा काढा किंवा पानांचा स्वरस, गोमूत्र हे पिंपळीच्या काढ्याबरोबर प्रत्येकी चार तास घोटावें. शरावसंपुटांत बंद करून त्यास लघुपुट द्यावें. स्वांगशीत झाल्यावर तें बारीक करावें. हें २ गुंजा सकाळीसायंकाळ मधाबरोबर सेवन केल्यास अर्बुदरोग नाहीसा होतो.

१४ कैशोरगुग्गुळ

त्रिफलात्रय: प्रस्था: प्रस्थेकमगृता भवेत् ।
संक्षुद्य लोहपात्रे तु सार्धद्रोणाम्बुना पचेत् ।।
जलमर्धं श्रुतं ज्ञात्वा गृण्हीयाद्वस्त्रगालितम् ।
ततः क्वाथे क्षिपेच्छुद्धं गुग्गुलुं प्रस्थसंमितम् ।।
पुनः पचेदयस्पात्रे दर्व्या संघट्टयेन्मुहुः ।
सांद्रीभूतं च तं ज्ञात्वा गुडपाकसमाकृतिम् ।।
चूर्णीकृत्य ततस्तत्र द्रव्याणीमानि निक्षिपेत् ।
त्रिफला द्विपला ज्ञेया गुडूवी पलिका मता ।।
षडक्षं त्र्यूषणं पोक्त विडंगंच पलार्धकम् ।
दन्ती कर्षमिता कार्या त्रिवृत्कर्षमिता स्मृता ।।
ततः पिण्डीकृतं सर्वं घृतभाण्डे विनिक्षिपेत् ।
गुटिकाः शाणिकाः कृत्वा युंज्याद्दोषाद्यपेक्षाव ।।
अनुपानं भिषग्दद्यात्कोष्णं नीरं पयोऽथवा ।
मंजिष्ठादिशृतं वाऽपि युक्तियुक्तमतः परम् ।।
जयेत्सर्वाणि कुष्ठानि वातरक्तं त्रिदोषजम् ।।
सर्वव्रणांश्च गुल्मांश्च प्रमेहपिटिकास्तथा ।।
प्रमेहोदरमन्दाग्नि कासश्वयथु पाण्डुतः ।
हन्ति सर्वामयान्नित्यमुपयुक्तो रसायनः ।।
कैशोरकाभिधानोऽयं गुग्गुलुःकान्तिकारकः ।
वासादिना नेत्रगदान्गुल्मादीन्वरुणादिना ।।
क्वाथेन खदिरस्यापि व्रणान्कुष्ठान्विनाशयेत ।

अम्लं तीक्ष्णमजीर्णं च व्यवायं श्रममातपम् ।
मद्यं रोषं त्यजेत्सम्यगुणार्थी पुरसेवकः ।। यो. र. भा. २-९

१५ उदयभास्कररस

गन्धकेन मृतं ताम्रं दशभागं समुद्धरेत् ।
उषणं पंचभागं स्यादमृतंच द्विभागिकम् ।।
श्लक्ष्णचूर्णीकृतं सर्वं रक्तिकैकप्रमाणतः ।
दातव्यं कुष्ठिने सम्यगनुपानस्य योगतः ।।
गलिते स्फुटिते चैव विषुच्यां मण्डले तथा ।
विचर्चिका दद्रुपामा कुष्ठरोग प्रशान्तये ।। र. चं. ४३७

गंधक एक भाग, ताम्रभस्म दहा भाग, मिरें पांच भाग, बचनाग दोन भाग घेऊन सर्वांचा एकत्र खल करून त्यांतून एकेक गुंज औषध योग्य अनुपान योजून कुष्ठी रोग्याला द्यावें. गलत्कुष्ठ, विसूचिका, मंडलकुष्ठ विचर्चिका, दद्रु खरूज वगैरे रोग दूर होण्याकरितां या औषधाची योजना करावी. याला उदयभास्कररस असें म्हणतात.

१६ नित्यानंदरस

हिंगुलात्सम्भव सूतं गंधकं मृतताम्रकम् ।
वगं तालं च तुत्थं च शंखं कांस्यं वराटकम् ।।
त्रिकटु त्रिफला लौहं विडंगं पटुपंचकम् ।।
चविकापिप्पलीमूलं हपुषा च वचा तथा ।।
शठी पाठा देवदारु एलाच वृद्धदारकम् ।
एतानि समभागानि वटिकां कुरु यत्नतः ।।
हरीतकी रसं दत्वा पंचगुंजामितां शुभाम ।
एकैकां भक्षयेन्नित्यं शीतं वारि पिबेदनु ।।
श्लीपदं कफवातोत्थं रक्तमांसगतं च यद् ।
मेदोगतं धातुगतं हन्त्यवश्यं न संशयः ।।
श्रीमगद्दहननाथेन निर्मितो विश्वसम्पदि ।। र. चं. ४३०

हिंगुळांतून काढलेला पारा, शुद्ध गंधक, ताम्रभस्म, वंगभस्म, शुद्ध हरताळ, शुद्ध मोरचूद, शंखभस्म, कास्यभस्म, कपर्दिकभस्म, सुंठ, मिरे, पिंपळी, हिरडा, बेहेडा, आवळकंठी, लोहभस्म, वावडींग, सेंधेलोण, पादेलोण, बिडलोण बांगडखार, मिठ, चवक, पिंपळमूळ, शेरणीचें मूळ, वेखंड, कचोरा, पहाडमूळ, देवदार, वेलची, वरधारा हीं औषधें समभाग घेऊन सर्वांचा हिरडयाच्या काढ्यांत खल करून ५ गुंजेची एक गोळी

करावी. रोज एक गोळी खाऊन थंड पाणी प्यावें. म्हणजे ती कफवातजन्य रक्त व मांसापर्यंत व मेदधातूपर्यंत गेलेले श्लीपद यांचा नाश करिते. हा नित्यानंदरस श्रीमान गहनानंदनाथाने जगाच्या हिताकरितां सांगितला आहे.

१७ खदिरारिष्ट

खदिरस्य तुलार्द्धन्तु देवदारु च तत्समम ।
बाकुची द्वादशपला दार्वी स्यात्पलविंशतिः ॥
त्रिफलाविंशतिपलान्यष्टद्रोणेऽम्भसः पचेत् ।
कषाये द्रोणशेषे च पूते शीते विनिक्षिपेत् ॥
तुलाद्वयं माक्षिकस्य तुलैका शर्करा मता ।
धातक्या विंशतिपलं कक्कोलं नागकेशरम् ॥
जातीफलं लवंगैलात्वक् पत्राणि पृथक् पृथक् ।
पलोन्मितानि कृष्णाया दद्यात्पलचतुष्टयम् ॥
घृतभाण्डे विनिक्षिप्य मासादुर्ध्वं पिबेत्ततः ।
महाकुष्ठानि हृद्रोगं पांडुरोगार्बुदं तथा ॥
गुल्मं ग्रंथिक्रिमीन् कासं तथा प्लीहोदरं जयेत् ।
एष वै खदिरारिष्टाः सर्वकुष्ठ निवारणाः ॥　　भै. र. ६३९

खैरसाल व देवदार अर्धा तुला, बाकुची २० पळे, दारुहळद, त्रिफळा प्रत्येकी सव्वाशेर घेवून सर्व बारीक कुटावींत व ८ द्रोण पाण्यामध्यें त्यांचा काढा करावा व त्याचा चौथा भाग राहिल्यावर गाळून त्यांत मध दोन तुला, साखर एक तुला, धातकीच्या फुलाचें चूर्ण सव्वाशेर, शीतलचिनी, नागकेशर, जायफळ, लवंग, वेलची, दालचिनी व तेलपत्र हीं प्रत्येकी ५–५ तोळे चूर्ण व पिंपळीचूर्ण २० तोळे मिळवून तूप लावलेल्या भांड्यांत एक महिना बंद करून ठेवावे. हें खदिरारिष्ट रोज २ तोळे घेतल्याने सकाळ–संध्याकाळ भोजनानंतर घेतल्यानें महाकुष्ठ, हृद्रोग, पांडुरोग, अर्बूद, गुल्म, ग्रंथीवृद्धि, क्रिमी, कास, प्लीहा तसेंच सर्व प्रकारचे कुष्ठरोगांचा नाश करतो.

हिरडा, बेहेडा, आवळकाठी प्रत्येकी ६४–६४ तोळे, गुळवेल ६४ तोळे घेऊन, कुटून लोखंडाच्या भांड्यांत पंधराशे छत्तीस तोळे पाणी घालून त्यांत तीं द्रव्यें टाकून अर्धे पाणी आटल्यावर काढा वस्त्रगाळ करून घ्यावा. त्यांत ६४ तोळे शुद्ध गुग्गुळ घालून पुन्हा लोखंडाच्या भांड्यांत घालून कढवावा. वरचेवर पळीनें ढवळावें. गुडपाकाप्रमाणें घट्ट झाल्यावर त्यांत पुढील द्रव्यांचें चूर्ण मिळवावें. त्रिफळा ८ तोळे,

गुळवेल ४ तोळे, सुंठ, मिरे, पिंपळी यांचें चूर्ण ६ तोळे, वावडींग २ तोळे, दंतीमूळ १ तोळा, तेड १ तोळा, याप्रमाणें औषधांचें चूर्ण घालून ३—३ माशांच्या गोळ्या करून त्या तुपानें राबलेल्या भांड्यांत ठेवाव्यात आणि दोषांचा विचार करून योजना करून द्याव्या. याला कोमटपाणी अथवा दूध हें अनुपान द्यावें. मंजिष्ठादि काढा अगर आपल्या विचाराप्रमाणें दुसरेंहि अनुपान योजावें. हा सर्व कुष्ठें, त्रिदोषजन्य वातरक्त, सर्व व्रण, गुल्म, प्रमेहपीटिका, प्रमेह, उदर, अग्निमांद्य, खोकला, सूज, पांडुरोग यांना जिंकतो. हा नित्य घेतला असतां सर्व रोगांचा नाश करतो. हा रसायन आहे. हा कैशोरक नांवाचा गुग्गुळ कांतीकारक आहे. वासादिगणांच्या काढ्यांतून दिला असतां हा नेत्ररोगांचा नाश करतो. वरूणादि गणाच्या काढ्यांतून दिला असतां गुल्मादिकांचा नाश करितो. खैराच्या काढ्यांतून दिला असतां व्रण व कुष्ठ यांचा नाश करतो. आंबट व तीक्ष्ण पदार्थ, अजीर्ण होईपर्यंत खाणें, मैथुन, श्रम, ऊन, मद्य, राग हे गुग्गुळ सेवन करणाऱ्यानें वर्ज्य करावेत.

१८ अर्बुदाचें असाध्यत्व

मांसार्बुदं त्वेतदसाध्यमुक्तं साध्येष्वपीमानि विवर्जयेतु ।
संप्रस्रुतं मर्मणि यच्च जातं स्त्रोतःसु वा यच्च भवेदचाल्यम् ।

सु. नि. यो. र. २६९

हें मांसार्बुद असाध्य आहे. साध्य अर्बुदामध्येंसुद्धां स्रवणारीं, मर्मस्थानीं झालेलीं. नाकादि स्रोतसांचें ठिकाणीं झालेलीं व अचल अशीं अर्बुदें असाध्य म्हणून सोडावींत.

१९ अध्य अर्बुद

यज्जायतेऽन्यखलु पूर्वजाते ज्ञेयं तदध्यर्बुदमर्बुदज्ञैः । सु. नि. यो. र. २६९

पूर्वीं झालेल्या अर्बुदावर आणखीं जें दुसरें अर्बुद होतें त्याला वैद्य अध्य अर्बुद असें म्हणतात.

२० द्विरर्बुद

यद्वंद्वजातं युगपत्क्रमाद्वा द्विरर्बुदं तच्च भवेदसाध्यम् ।

यो. र. २६९

जीं दोन अर्बुदें एकदम किंवा एका मागून एक अशीं जवळजवळ उत्पन्न होतात त्यांना द्विरर्बुद असें म्हणतात आणि हें असाध्य आहे.

२१ अर्बुदे न पिकण्याचे कारण

न पाकमायान्ति कफाधिकत्वान्मेदोबहुत्वाच्च विशेषतस्तु ।
दोषस्थिरत्वाद्ग्रथनाच्च तेषां सर्वार्बुदान्येव निसर्गतस्तु ।।

यो. र. २६९

सर्व अर्बुदें निसर्गत: गाठीसारखीं असून त्यांतील दोष स्थिर असतात आणि विशेषत: त्यांत कफ व मेद अधिक असतो. त्यामुळे तीं पिकत नाहींत.

२२ मांसार्बुद रक्तार्बुद (कॅन्सर) वर उपयुक्त चिकित्सा,

या रोगावर औषधीयोजना करण्याचे अगोदर एक जुलाब स्निग्ध अनुपानांतून द्यावा. त्यासाठीं पावभर गरम दूध त्यांत एक तोळा तूप व एक मासा सैंधव घालून त्यांत इच्छाभेदी २ मासे मिसळून द्यावी. त्यामुळे २-३ जुलाब होतील. दुसरें दिवशीं खालील योजना करावी. ही योजना खात्रीनें गुण देणारी नसली तरी अनुभव पाहण्यास योग्य अशी आहे.

१) सकाळीं व दुपारीं—

सुवर्णभस्म '।' गुं.
ताम्रभस्म २ गुं.
वंगभस्म २ गुं.
नागभस्म २ गुं.
आरोग्यवर्धिनी ३ गुं.

हीं सर्व एकत्र घोटून त्याच्या २ पुड्या करून अभयारिष्ठ अर्धा तोळा, पुनर्नवासव अर्धा तोळा व १ तोळा पाणी मिसळून त्यांत ती १ पुडी मिळून घ्यावी किंवा ती पुडी मधांतून घ्यावी व वरून तें आसव अरिष्ठाचें मिश्रण घ्यावें. व याचप्रमाणें दुसरी पुडी वरील मधाच्या सहपानांतून दुपारीं २ वाजतां घ्यावी व वरील आसव आरिष्ठाचें अनुपानांतून घ्यावें.

२) रात्रीं निजतांना—
दोन तोळे तूप अर्धा पाव गरम दुधांत घालून घ्यावें.

याप्रमाणें सतत चार दिवस वरील औषध घ्यावें. पांचवें दिवशीं सकाळीं वरील औषधीची गोळी करून घ्यावी. पळसपापडी ८ गुंजा, कृमिकुठार २ गुंजा, गूळ सोळा गुंजा; वरील औषधीचें चांगलें चूर्ण करून तें गुळांत मिसळून, गोळी करून खावी. त्या दिवशीं दुसरें औषध मुळीच घेऊं नये. नंतर दुसरें दिवशीं गेळफळाचें वस्त्रगाळ चूर्ण चार मासे पावभर गरम दुधांत घालून त्यांत दीड मासा सैंधव घालून घ्यावें. त्यानें १-२ वांत्या होतील. दुसरें दिवशीं सकाळीं वरीलप्रमाणे इच्छाभेदी २ गुंजा पावभर गरम दुधांत एक तोळा तूप व एक मासा सैंधव घालून घ्यावें. त्यानें २-३ जुलाब होतील. त्या दिवशीं दुसरें कोणतेंहि औषध घेऊं नये.

योग नं. १

सुवर्णभस्म एक तृतीयांश गुंज, ताम्रभस्म ३ गुंजा, वंगभस्म ३ गुंज, नागभस्म ३ गुंजा, आरोग्यवर्धिनी ४ गुंजा हीं सर्व एकत्र घोटून, त्याच्या ३ पुडचा करून त्या सकाळीं, दुपारीं २ वाजतां, सायंकाळीं ७ वाजतां याप्रमाणे दररोज ३ पुडचा मधांतून घ्याव्यात व वरून अभयारिष्ठ अर्धा तोळा, पुनर्नवासव अर्धा तोळा हीं दोन्हीं एकत्र करून त्यांत १ तोळा पाणी घालून प्यावें. याप्रमाणे तीनहि वेळ मधांतून औषध घेतल्यानंतर हें आसवारिष्टाचें मिश्रण घेत जावें.

रात्रीं निजतांना हेमगर्भ १ गुंज, आल्याचा रस व मध यांतून द्यावा. याप्रमाणें १ महिना औषध सुरूं ठेवावें. मात्र आठ दिवसांतून एक वेळ वरीलप्रमाणें जुलाब घेत जावा. व मागे सांगितलेला अर्बुदावरील लेप नियमित लावीत जावा.

योग नं. २

अभ्रकभस्म २ गुंजा.
सुवर्णभस्म ·॥· ,,
रौप्यभस्म ३ ,,
वंगभस्म ३ ,,
नागभस्म ४ ,,

यांच्या ४ पुडचा कराव्या.

योग नं. ३

ताम्रभस्म ४ गुंजा.
अभ्रकभस्म २ ,,
कासीसभस्म ४ ,,
रौप्यभस्म ३ गुंजा
रौप्यभस्म ३ ,,
नागभस्म ४ ,,

यांच्या ४ पुडचा कराव्यात.

योग नं. ४

ताप्यादिलोह ३ गुंजा,
वंगभस्म ३ ,,
नागभस्म ४ ,,
ताम्रभस्म ४ ,,

यांच्या ४ पुडचा कराव्यात.

योग नं. ५

त्रिवंग ३ गुंजा.
हेमगर्भ २ ,,
आरोग्यवर्धिनी ४ गुंजा.
त्रिफळा गुग्गुळ ६ गुं.
चंद्रप्रभा ८ गु.

यांच्याहि ४ पुड्या कराव्यात.

योग नं. ६

नागभस्म ४ गुंजा.
शिलाजित ६ ,,
त्रिफळागुग्गुळ ६ गुं.
नागभस्म ४ गुं.

यांच्या ४ पुड्या.

अनुपान-अभयारिष्ट व पुनर्नवासव हीं दोन्ही अर्धा-अर्धा तोळा घेऊन त्यांत १ तोळा पाणी टाकून वरीलपैकी कोणत्याहि एका योगांतील १ पुडी टाकून द्यावी. याप्रमाणें ३ किंवा ४ वेळ द्यावें.

योग नं. ७

बिबे चांगले वजनदार घेऊन ४ तोळे वजन होईल इतके घ्यावें. ते एका ओल्या फडक्यांत ठेऊन त्यांत विटकरीचें चूर्ण घेऊन, त्याची पुरचुंडी बांधून ती दगडी बत्त्यानें हलके हलके ठेचावें. बिब्याचें कांही तेल विटकरीच्या चूर्णाला लागेल नंतर ते बिबे काढून गरम पाण्यानें धुवून, सुकवून घ्यावें. नंतर बिब्याचें वजनाइतकेंच चांगले तीळ निवडून घेऊन दोन्हीं एकत्र करून कुटावें. त्यांचीं चांगली लगदी झाली म्हणजे बिब्याचें वजनाइतकेंच हिरड्याचें चूर्ण घेऊन पुन्हा घोटावें व त्यांत पुन्हां बिब्याचें वजनाबरोबर गूळ घेऊन त्यांत मिसळून, पुन्हा घोटून त्याच्या १—१ माशाच्या गोळ्या कराव्यात. पहिल्यानें १ गोळी गिळून वरून १० तोळे दूध प्यावें. याप्रमाणें रात्रींहि घ्यावें. ४–५ दिवसानंतर कांहीहि विकृति, दाह वगैरे न वाटल्यास एका वेळेस दोन गोळिचा याप्रमाणें दिवसांतून चार गोळया घ्याव्यांत. यालतिलभल्लातक योग म्हणतात. कांही जण हें मिश्रण तीन मासे घेऊन, त्यांत पावभर पाणी घालून त्याचा एकचतुर्थांश काढा करून तो अर्धा सकाळीं व अर्धा रात्रीं ५–५ तोळे दूध मिसळून पिण्यास सांगतात. खाण्याकरितां फक्त दूधच द्यावें. मीठ, तिखट व आंबट वर्ज्य करावें.

योग नं. ८

वंगभस्म, कज्जली, हेमगर्भ, ताम्रभस्म, अभ्रकभस्म, रौप्यभस्म, जस्तभस्म, नागभस्म, सुवर्णभस्म· हीं सर्व औषधें १–१ मासा एकत्र करून पुनर्नवादि काढ्यांत घोटून १–१ गुंजेच्या गोळ्या कराव्यात. अर्धा तोळा पुनर्नवादि काढ्याबरोबर एक गोळी घ्यावी, असे ३ वेळ घ्यावें. मीठ बंद करावें व नुसते दुधावर रहावें.

रात्रीं हेमगर्भ १ गुंज, आल्याचा रस व मध यांतून द्यावा व मागे सांगितलेला अर्बुदाचा लेप दररोज नियमितपणें लावीत जावा.

योग नं ९

ताम्रभस्म ३ गुं.
वंगभस्म ३ गुं.
शुद्ध मोरचूद ३ गुंजा.
वाकेरीचे भात अर्धा तोळा.
नागभस्म तीनगुंजा.

यांच्या ३ पुड्या कराव्यात. त्या दूध अगर मधांतून घेणें. हें औषध २१ दिवस घ्यावें. नुसते दुधावरच रहावें किंवा वाकेरीचे भाते दुधांत उगाळून त्यांत वरील औषध मिसळून घ्यावें व वरून लेप लावावा.

या रोगांत शक्यतोवर एक महिना फक्त दुधावरच राहावें.

—––

बहुमूत्र चिकित्सा प्रकरण

अध्याय २३ वा

बहुमूत्रावर योग १ ते ७

कदलीनां फलं पक्वं धात्रीफलरसं मधु ।

शर्करापयसा पीतमपां धारणमुत्तमम् ।। भै. र. ८०७

पिकलेलें एक केळ घेऊन तें कुस्करून त्यांत कच्चा आवळयाचा स्वरस २ तोळे, मध १ तोळा, साखर २ तोळे व दूध एक पाव मिळून त्यांपैकी थोडें थोडें दिवसभर रोग्यास खावयास द्यावे. त्यामुळे शरीरामध्यें जलधातु निर्माण होऊन बहुमूत्र-रोग आणि मूत्रातिसार-रोग नाहीसे होतात.

कदलीनां फलं पक्वं विदारींच शतावरीम् ।

क्षीरेण पाययेत्प्रातरपां धारणमुत्तमम् ।। भै. र. ८०७

पिकलेलें १ केळ बारीक करून त्यांत विदारीकंद व शतावरीचें चूर्ण एक-एक मासा मिळवून दुग्धानुपानाबरोबर सकाळीं दररोज सेवन केल्यानें सोमरोग व मूत्रातिसार नाहीसे होतात.

बहुमूत्राची चिकित्सा

त्रिफलावेणुपत्राब्द पाठामधुयुतः कृतः ।

कुम्भयोनिरिवाम्भोधिं बहुमूत्रं तु शोषयेत् ।। यो. र. भा. २-१९२

त्रिफळा वेळूची पानें, नागरमोथे. पहाडमुळ यांचा काढा मध घालून घेतला असतां तो अगस्तीनें जसा समुद्र आटविला त्या प्रमाणे बहुमुत्राला आटविते.

धात्रीफलस्य रसकं मधुना च पिबेत्सदा ।

बहुमूत्रक्षयं कुर्यात् क्षारेण वासकस्य च । भै. र. ८०७

कच्च्या आवळ्याचा रस १ तोळा मधा बरोबर किंवा आवळ्यांचे स्वरसांत अडूळशाचा क्षार मिळवून दररोज सेवन केल्यानें बहुमूत्ररोग नाहीसा होतो.

तालकन्दश्च तरुणं खर्जूरं कदलीफलम् ।

पयसा पाययेत्प्रातर्मूत्रातीसारनाशनम् ।

ताड वृक्षाची मुळें, खजूर, पिकलेलें सुकलेलें केळ ही सम प्रमाणांत घेऊन सम करावे. हे चूर्ण २ मासे घेऊन त्यांत तेवढीच साखर मिळवून सकाळीं सेवन करावे व त्यावर दुध प्यावें त्यामुळे मुत्रातिसार नाहीसा होतो.

माषचूर्णं समधुकं विदारी शर्करा मधु ।
पयसा पाययेत्प्रातः सोमरोगविनाशनम् ॥ भै. र. ८०७

उडीद, ज्येष्ठमध, विदारीकंद, साखर यांचे चूर्ण २ मासे घेऊन त्यांत मध मिळवून दुग्धपानाबरोबर सेवन केल्यानें सोमरोग नाहीसा होतो.

वराऽम्बष्ठावंशपर्णमुस्तकं च विचूर्णितम् ।
मध्वाज्यमिश्रितं लीढं बहुमुत्रामयापहम् ॥ भै. र. ८०७

हिरडा, बेहेडा, आवळा, पाठा, वंशपर्णी, नागरमोथे. यांचे चूर्ण २ मासे घेऊन त्यांत मध व तूप मिळवून सेवन केल्यानें बहुमूत्र रोग नाहीसा होतो.

२ बहुमूत्रावर अफू

फणिकेनप्रयोगोऽपि बहुमूत्रनिवारकः ॥ भै. र. ८१७

शुद्ध अफू योग्य प्रमाणानें (अर्धा रत्ती) घेतल्यास बहुमूत्र रोग नाहीसा होतो.

३ आनंदभैरववटी

विशोषण कनाटंक हिंगुलैः समचूर्णकः ।
आनंदभैरवस्थास्य गुंजाऽतीसारमेहनुत् ॥

बचनाग, मिरे, पिंपळी, टाकणखाराचीलाही, हिंगूळ यांचे समभाग चूर्ण करावे. ह्याला आनंदभैरव वटी म्हणतात. हा गुंजभर अतिसार व मेह यांचा नाश होण्याकरितां घ्यावा.

४ तारकेश्वर रस

मृतसूताभ्रवंगंश्च मर्दयेन्मधुना दिनम् ।
तारकेश्वरनामाऽयं गहनानन्दभाषितः ॥
माषमात्रं लिहेत्क्षौद्रैर्बहुमूत्रप्रशान्तये ।
उदुम्बरफलं पक्वं चूर्णितं कर्षमात्रकम् ।
संलिह्यान्मधुना सार्द्धमनुपानं सुखावहम् ॥ भै. र. ८०७

रससिंदुर, अभ्रकभस्म, वंगभस्म ही १—१ तोळा घेऊन त्यांत मध मिळवून याचा खल करावा. नंतर १–१ माशाची गोळी करावी. ती १–१ गोळी मधाबरो-

बर सेवन केल्यानें बहुमूत्ररोग नाहीसा होतो. त्यावर पिकलेल्या औदुंबराच्या फळाचें चूर्ण १।· तोळा घेऊन तें मधाबरोबर सेवन करावें. यास तारकेश्वररस असें म्हणतात.

५ तालकेश्वर रस

तालं सूतं समं गन्धं मृतलोहाभ्रवंगकम् ।
मर्दयेन्मधुना चैव रसोऽयं तालकेश्वरः ।।
माषमात्रं लिहेत्क्षौद्रैर्बहुमूत्रप्रशान्तये ।
उदुम्बरफलं पक्वं चूर्णितं कर्षमानतः ।।
संलेह्यं मधुना सार्द्धमनुपानं सुखावहम् ।। भै. र. ८०८

शुद्ध हरताळ, शुद्ध पारा, गंधक, लोहभस्म, अभ्रकभस्म, वंगभस्म हीं १–१ तोळा घेऊन त्याची कज्जली तयार करून व त्यांत इतर द्रव्यें मिळवून मधाबरोबर खल करावा. हा तालकेश्वररस १ मासा प्रमाणानें मधाबरोबर सेवन केल्यावर औदुंबराच्या पक्व फळाचें चूर्ण १।· तोळा मधाबरोबर खावें.

६ बहुमूत्रान्तक रस

रसश्च शाल्मलीमूलचूर्णं कदलीमूलजम् ।
उदुम्बरबीजचूर्णं लौहो वंगंच विद्रुमम् ।।
मुक्ताहिफेनसारौ च प्रत्येकं समभागिकम् ।
मर्दयेन्मालतीपुष्परसेन कुशलो भिषक् ।।
रक्तिद्वयमितां कुर्याद्वटिकामतिशोभनाम् ।
बहुमूत्रान्तकी नाम रसः परमशोभनः ।।
मधुमेहं सोमरोगं हन्ति भास्वान् यथा तमः ।। भै. र. ८०८

रससिंदुर, मुळाचें चूर्ण, केळीचा कंद, औदुंबराचें बीज, लोहभस्म, वंगभस्म, प्रवाळभस्म, मौक्तिकभस्म, शुद्ध अफू प्रत्येकी चूर्ण १–१ तोळा घेऊन सर्व चांगल्या तऱ्हेने बारीक करून चमेलीच्या फुलांचे रसाची भावना देऊन त्याचा खल करावा. २ गुंजेच्या गोळ्या कराव्यात, हा अत्यंत शुभ बहुमूत्रांतकरस ज्याप्रमाणें सूर्य अंधःकार नाहीसा करतो, त्याप्रमाणें हा रस मधुमेह व सोमरोग यांना नाहीसें करतो.

७ बहुमूत्रावर उपयुक्त योग

१) रससिंदुर, लोह, वंग, अभ्रक, सु. माक्षिक हीं प्रत्येकीं १–१ तोळा, कापूर अर्धा तोळा, हळद २ तोळे हें मिश्रण १–१ गुंज मधाबरोबर २ वेळ घ्यावे.

२) वंग २ गुं., नाग २ गुंजा यांची प्रत्येकी १–१ पुडी अशा २ पुड्या घ्याव्या.

३) शिलाजित १ मा., अफू अर्धा मासा, जायपत्री १ मासे, जायफळ ६ मासे, केशर २॥ मासे या सर्वांचा वडाच्या चिकांत खल करून २ गुंजेच्या गोळ्या ३ वेळ पाण्यांतून घ्याव्यात.

४) मदनफळ, लवण, वचा, देवदार तेल बडीशेप, दशमुळाचा काढा द्यावा, १० तोळे तिळाच्या तेलाची अनुवासन बस्ती द्यावी.

......